14-12-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A

DGS/ 10:30

14-12-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1

DGS/ KTG/ SBT/ 10:30

**सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.अरविंद सावंत**

पृ.शी. : जीवनावश्यक वस्तूंची झालेली बेसुमार भाववाढ

मु. शी. : जीवनावश्यक वस्तूंची झालेली बेसुमार भाववाढ यासंबंधी सर्वश्री.पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, अरविंद सावंत, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, श्री. मधु चव्हाण, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री संजय केळकर, अनिल परब, किरण पावसकर, चंद्रकांत पाटील, परशुराम उपरकर, सय्यद पाशा पटेल, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यात गेल्या काही महिन्यांपासून जीवनावश्यक वस्तू विशेषत: तूरडाळ, साखर, तांदूळ, गहू, कडधान्य, खाद्यतेल, भाजीपाला तसेच फळे इत्यादींच्या किंमतीत झालेली बेसुमार वाढ, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या काही वस्तू विशेषत: तूरडाळ, साखर, तांदूळ, इत्यादी रेशन दुकानातून वितरणासाठी निश्चित केल्या असूनही त्यांचा वेळेवर पुरवठा न होणे, तसेच अतिशय निकृष्ट दर्जाच्या असणे, वाढत्या महागाईमुळे कमी पगार घेणारे सर्वसामान्य, मध्यम वर्गीय, झोपडपट्टीतील रहिवाशी यांची परिस्थिती अत्यंत हालाखीची होणे, अत्यावश्यक वस्तूंच्या भाववाढी बरोबरच वीज दरवाढ, एस.टी.बस भाडयात वाढ, बेस्ट बस भाडयात वाढ, शाळा व महाविद्यालयातील फी वाढ इत्यादी सर्व प्रकारच्या भाववाढीमुळे सर्वसामान्य जनतेला त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थ चालविणे दिवसेंदिवस गंभीर होत जाणे, महागाईस कारणीभूत असणारे साठेबाज, अकार्यक्षम सार्वजनिक वितरण व्यवस्था, बोगस शिधापत्रिका याप्रकरणी शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, परिणामी राज्यातील जनतेमध्ये महागाईमुळे शासनाविरुध्द तीव्र असंतोष व संतापाची भावना पसरणे, सबब भाववाढ रोखून जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा सुव्यवस्थित होण्याच्या दृष्टीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढीसंबंधीचा प्रस्ताव आम्ही विरोधी पक्षाच्या वतीने सभागृहामध्ये मांडीत आहोत. खरे म्हणजे हे महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आपण साजरे करीत आहोत. या देशाच्या स्वातंत्र्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री. पांडुरंग फुंडकर...

साजरे झाले आहे. परंतु या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये सर्वसामान्य जनता मात्र आज या महागाईमुळे अत्यंत होरपळून निघत आहे. सर्वसामान्य माणसाला जीवन जगणे मुश्कील झाले आहे अशी स्थिती आहे. याबाबत सरकारने काय उपाय योजना केली पाहिजे किंवा सरकार काय उपाय योजना करणार आहे, हे महाराष्ट्रातील जनतेला समजले पाहिजे. महागाईचे हे अस्मानी किंवा नैसर्गिक संकट नाही तर हे सुलतानी संकट आहे. महागाईच्या वाढीला या शासनाचे धोरण कारणीभूत आहे. हे सुलतानी संकट असल्यामुळे या सुलतानाचे नाव आघाडी सरकार असेच म्हणावे लागणार आहे. कधी कधी असे वाटते की, या देशामध्ये ज्या ज्यावेळी कॉंग्रेस पक्ष सत्तेवर येतो त्या त्यावेळी या देशामध्ये महागाई वाढत असते. असे चित्र मागील काळात होते. सन २००४ नंतर कॉंग्रेस पक्ष या देशामध्ये सत्तेवर आल्यानंतर सुध्दा महागाई वाढण्यास सुरुवात झाली. मी याठिकाणी जाणीवपूर्वक उल्लेख करतो की, १९९८ ते २००४ या काळात या देशामध्ये माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली सरकारने काम केले त्यावेळी या देशामध्ये भाववाढ वेगाने कधीही वाढलेली नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

त्याची माझ्यादृष्टीने प्रमुख पाच कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे त्या काळामध्ये सरकारने चांगले भाव दिल्यामुळे धान्याची विक्रमी खरेदी झाली होती. सरकारी गोदामे इतकी प्रचंड प्रमाणात भरली होती की त्यामुळे धान्य ठेवण्यासाठी देखील जागा नव्हती, अशी स्थिती होती. त्यावेळी 4 कोटी गरीब कुटुंबांना 2 रुपये प्रति किलो या दराने 35 किलो धान्य दिले जात होते. मंत्र्यांची जी बाजार समिती नेमण्यात आली होती, ती दर 15 दिवसांनी बाजारातील जीवनावश्यक वस्तुंच्या दराची पहाणी करुन त्यावर तातडीची उपाययोजना करीत होती. त्या सरकारचे एक प्रमुख धोरण असे होते की, धान्य व्यापारावरील महागाई वाढण्याची बंधने होती, ती बंधने त्यावेळच्या सरकारने काढून टाकली होती. 2004 मध्ये सरकार बदलले आणि या देशामध्ये काँग्रेसचे सरकार सत्तेवर आले. त्यानंतर सर्व धोरणांमध्ये देखील बदल झाला. त्यावेळेला मन्सेंटो आणि कारगील यासारख्या देशी-विदेशी कंपन्या देशामध्ये आल्या आणि देशातील शेतकऱ्यांकडून माल खरेदी करु लागल्या. त्यावेळेला मन्सेंटो आणि कारगील या कंपन्यांनी प्रचंड प्रमाणात माल खरेदी केला आणि त्याची साठेबाजी केल्यामुळे, तेव्हा बाजारामध्ये कृत्रिम स्वरुपाची टंचाई निर्माण झाली.या विदेशी कंपन्यांनी धान्य खरेदी केल्यामुळे, त्यांनी साठेबाजी केल्यामुळे सरकारी गोदामे रिकामी राहिली आणि त्याचा परिणाम रेशनिंग दुकानांवर झाला. त्या काळामध्ये गरीबांना 35 कि.धान्य मिळत होते, त्याचे प्रमाण कमी झाले आणि आता जेमतेम 15 ते 20 किलो धान्य रेशनिंग कार्डवर मिळू लागले आणि उरलेले धान्य विकत घेण्यासाठी त्यांना बाजारामध्ये जावे लागले आहे. ही परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत गेली आणि सरकारने त्याकडे लक्षच दिले नाही. शासनाने वित्तीय धोरणे चुकीच्या पध्दतीने राबविल्यामुळे बाजारामधील वस्तुंच्या दरावर नियंत्रण राहिले नाही आणि आयात-निर्यात घोटाळे झाले, त्याचा जरुर सत्ताधिकाऱ्यांना फायदा झाला. पण जनतेच्या हातामध्ये आयात-निर्यातीच्या धोरणामुळे धुपाटणे आले आहे. सरकारने गहू,तांदूळाच्या बाबतीत शेतकऱ्यांना जो भाव द्यावयास हवा होता, तो भाव देण्याचे नाकारले. त्यामुळे देशातील तांदूळ व गव्हाच्या उत्पादनाचे क्षेत्र कमी झाले आणि त्या काळामध्ये त्याचे उत्पादनही कमी होऊ लागले.त्या काळामध्ये देशी शेतकऱ्यां कडून गव्हाच्या पिकाच्या बाबतीत मागणी होत होती की, 800 रुपयाच्यावर म्हणजे किमान 1000 रुपयापर्यंत भाव देण्यात यावा. पण तेव्हा सरकारने अशा प्रकारचा भाव दिला नाही. त्यामुळे टंचाई निर्माण झाली. त्यानंतर या देशामध्ये गव्हाची आयात करण्यात आली, त्यावेळी मात्र क्विंटलला ....

. . . .बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

1600 रुपये इतका भाव दिला. देशातील शेतकऱ्यांना 800 रुपये भाव देण्यास सरकार तयार नव्हते, परंतु परदेशातून जो गहू आयात करण्यात आला, त्यावेळी मात्र 1600 रुपये क्वि.असा भाव देण्यात आला. आपल्या देशातील मंत्री महोदयांना अशा प्रकारे गहू आयात करण्यामध्ये काय इंटरेस्ट होता हे समजू शकले नाही. त्यावेळी लाखो टन गहू आयात करण्यात आला. पण आयात केलेल्या गव्हाच्या बाबतीत आम्ही अनेक गोडाऊन्स्मध्ये जाऊन पहाणी केली. काही गोडाऊन्स् मधील गव्हाचे काही नमुने देखील घेण्यात आले. तेव्हा असे दिसून आले की, जो गहू डुक्कर सुध्दा खाणार नाही अशा पध्दतीचा गहू आयात करुन, तो या देशातील जनतेला खाऊ घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. लोकांना स्वस्तामध्ये गहू मिळालाच नाही, पण निकृष्ट दर्जाचा गहू देशा-तील जनतेला खावयास घातला. सभापती महोदय, आता या देशामध्ये गहू आयात केलाच जातो, पण आपल्याला आता तांदूळ सुध्दा आयात करावी लागणार आहे. पेट्रोल-डिझेलचे दर वाढले आहेत आणि मागच्या काळामध्ये डाळीच्या बाबतीत काय रामायण झाले हे आपल्याला माहिती आहे. डाळीचा भाव प्रचंड प्रमाणात वाढला. याचे कारण असे की, या देशातील डाळ उत्पादक शेतकऱ्याला भाव मिळाला नाही. खरे म्हणजे या देशाला जेवढी डाळ लागते, त्याच्या पेक्षा अर्धेच उत्पादन देशामध्ये होत आहे. त्यामुळे पर्यायाने याठिकाणी डाळ सुध्दा आयात करावी लागली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

SMT/ SBT/ KTG/ 10:40

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, खाद्यतेलाच्या बाबतीत बाबतीत ही स्थिती आहे. या देशातील तेल बियाणाचे वाण मग ते तीळ असतील, सोयाबीन असेल, सूर्यफूल असेल या तेलबियाणे पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना भाव दिला जात नाही. दिवसेंदिवस तेलबियाण्यांच्या पिकाचे उत्पादन कमी होत आहे. त्याचे क्षेत्र कमी होत आहे कारण या तेलबियाण्यांना भाव मिळत नाही म्हणून शेतकरी तेलबियाण्यांचे उत्पादन घेण्यास तयार नाहीत.

सभापती महोदय, साखरेची कहाणी आपल्याला माहीत आहे.ऊस उत्पादक शेतकरी 1200 रुपये भाव मिळावा म्हणून त्यावेळेला आंदोलने करीत होता. पण या देशातील ऊस उत्पादक शेतकऱ्याला किंवा साखर उत्पादक शेतकऱ्याला त्यावेळी भाव मिळाला नाही. सन 2009 च्या सुरुवातीच्या काळामध्ये या देशातील कृषी मंत्र्यांनी असे जाहीर केले की, "या देशात भरपूर साखर आहे" आणि म्हणून साखर निर्यातीला परवानगी देण्यात आली आणि जवळपास 48 लाख टन साखर त्यावेळी 12 रुपये किलो या दराने या देशातून निर्यात करण्यात आली आणि सहा महिन्यानंतर या देशात साखरेचा तुटवडा निर्माण झाल्यानंतर 27 ते 30 रुपये किलो या दराने परदेशातून साखर भारतात आयात करण्याचा प्रयत्न झाला. आता 70 लाख टन साखर पुढील वर्षासाठी आयात करण्याची तयारी सुरु आहे. यावर्षी ऊसाचे उत्पादन कमी राहणार आहे. एकीकडे बाजारात गुळाचे भाव 40 रुपयाच्यावर गेले आहेत. दुसऱ्या बाजूला उत्तर भारतातील शेतकरी गुळाला भाव मिळत नसल्यामुळे ऊसाचे पीक जाळत आहेत अशी स्थिती निर्माण झाली आहे. राज्य सरकारला किंमती ठरविण्याचा जो अधिकार होता तो काढून घेण्यासाठी केंद्र सरकारने वटहुकुम काढला. खरे म्हणजे असे करण्याची काही गरज नव्हती. राज्याचा भाव ठरविण्याचा अधिकार काढून टाकला व राज्य सराकरने शेतकऱ्यांना जास्त किंमत दिली तर राज्य सरकारला ती भरावी लागेल अशा प्रकारचे आदेश या वटहुकुमाच्या माध्यमातून काढण्यात आले. सभापती महोदय, या पध्दतीने या देशातील भाववाढीच्या संबंधीची धोरणे चूकत गेली. आता सध्या स्थिती अशी आहे की, गेल्या वर्षभरात सातत्याने वस्तुंचे भाव वाढत गेले आहेत. वर्षभरातील भाववाढ पाहिली तर आपल्या लक्षात येईल. नोव्हेंबर, 2008 मध्ये तुरीच्या डाळीचा भाव 35 ते 40 रुपये होता तो आता नोव्हेंबर,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर....

2009 मध्ये 100 रुपये झालेला आहे. साखरेचा भाव 14 ते 15 रुपये होता तो आता 40 ते 50 रुपये झाला. खाद्यतेलाचा भाव 40 ते 45 रुपये होता तो आता 80 रुपयांपर्यंत गेला आहे. गुळाचा भाव 20 ते 25 रुपये होता तो आता 40 ते 45 रुपयांपर्यत गेला. नोव्हेंबर, 2008 मध्ये चहा-पावडरचा भाव 100 ते 125 रुपये होता तो आता 200 रुपये किलो झालेला आहे. मुगाच्या डाळीचा भाव आता 65 रुपये आहे. चनाडाळ 55 रुपये किलो आहे स्वंयपाकाचा गॅस 350 रुपयांपर्यंत गेलेला आहे.

श्री. मनमोहन सिंग यांनी या देशाच्या पंतप्रधानपदाची शपथ घेतली तो शपथविधीचा सोहळा मी टी. व्ही.वर पाहत होतो. शपथ घेतल्यानंतर माननीय पंतप्रधान घरी गेले त्यावेळी त्यांच्या पत्नीने त्यांना ओवाळले. ओवाळणी केल्यानंतर माननीय पंतप्रधानांनी आपल्या पत्नीला विचारले की, आज मैं देश का प्रधानमंत्री बना हूं, बोल तुझे क्या चाहिए ? त्या माऊलीने दुसरे काही मागितले नाही. प्रत्यक्षदर्शी टी.व्ही.वर दाखविण्यात आलेला प्रसंग मी माझ्या डोळयांनी पाहिलेला आहे. पंतप्रधानाची पत्नी असल्यामुळे मनात आणले असते तर ती माननीय पंतप्रधानांना काहीही मागू शकली असती. तिने संगितले की, "मुझे कुछ नहीं चाहिए. आप प्रधानमंत्री बन गए, यह बहुत बड़ी बात हो गयी, देना है तो सिर्फ इतना कीजिए कि, देश में गॅस का भाव मत बढ़ने दीजिए." या देशातल्या गॅसची किंमत वाढू देऊ नका एवढीच मागणी पंतप्रधानांच्या पत्नीने केली होती. सभापती महोदय, केंद्रातील सरकार सत्तेवर आले तेव्हा गॅसचा भाव 150 रुपये होता पाच वर्षे उलटून गेल्यानंतर आणि पुन्हा हेच सरकार केंद्रात आल्यानंतर गॅसचा भाव 350 रुपये आहे. ज्या देशातील पंतप्रधान आपल्या पत्नीची मागणी पूर्ण करु शकले नाहीत ते या देशातील कोटयावधी जनतेची मागणी काय पूर्ण करणार आहेत?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, अन्नधान्याप्रमाणेच रोजच्या आहारातील ज्या भाज्या आहेत त्यांचेही भाव प्रचंड वाढलेले आहेत. काही खावयास मिळाले नाही तर गरीब माणूस भाज्या खातो परंतु या रोजच्या आहारातील पदार्थांचे भाव खिशाला न परवडणारे झालेले आहेत. आज भाज्यांचे भाव 60 ते 70 रुपये किलो झालेले आहेत. कांदा-बटाट्याचा भाव 35 रुपये किलो झालेला आहे. टोमॅटोचा भाव 60 रुपये किलो झालेला आहे. कोथिंबीर 100 रुपये किलो झालेली आहे. लिंबू 5 रुपयांला एक मिळतो. अशी प्रचंड महागाई वाढलेली आहे. केळी जे गरिबांचे फळ आहे त्या केळीचा भाव सुध्दा 30 ते 35 रुपये डझन झालेला आहे. एका केळ्याला 3 रुपये द्यावे लागतात अशी राज्यात स्थिती झ ालेली आहे.

सभापती महोदय, राज्यात सहावा वेतन आयोग लागू केला. सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वाढले. त्यानंतर आता सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार मोठ्या प्रमाणावर वाढले. कारण महागाईच्या प्रमाणात त्यांना पगार मिळाला पाहिजे असे तत्व लागू केल्यामुळे त्यांचे पगार वाढले आणि त्यांना सहावा वेतन आयोग लागू झाला. राज्यामध्ये सगळेच शासकीय कर्मचारी राहात नाहीत. या राज्यात छोट्या उद्योगामध्ये, छोट्या फॅक्टरीमध्ये काम करणारे कामगार आहेत, हमाली करणारे हमाल आहेत, घरकाम करणारे घरगडी आहेत, शेतमजूर आहेत, अल्पभूधारक शेतकरी आहेत त्यांना आपले घर कसे चालवावयाचे, आपला संसार कसा चालवावयाचा याची चिंता लागून राहिलेली आहे. एका बाजूला शेतकऱ्यांवर नैसर्गिक आपत्ती येते, दुसऱ्या बाजूला अतिवृष्टी होते, फयान सारखे चक्रीवादळ येते, तिसऱ्या बाजूला अवकाळी पाऊस येतो, चौथ्या बाजूला पिकांवर रोगराई येते, लाल्या नावाचा रोग येतो, करपा नावाचा रोग येतो आणि त्यामध्ये शेतकरी उद्ध्वस्त होतात. स्वत:चे घर कसे चालवावयाचे याची चिंता शेतकरी, कामगार, शेतमजूर, गरीब लोकांना पडलेली आहे. ही समस्या आपण निर्माण केलेली आहे. स्वस्त धान्य दुकानातून साखर, तूरडाळ, गहू, तांदूळ याचे वितरण करण्याची घोषणा शासनाने केली. युती शासनावर नेहमी टीका करण्यात येते की, आपण युती शासनाच्या काळामध्ये काय केले ? आपण एक गोष्ट मान्य केली पाहिजे की, ज्या दिवशी या

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .. .. ..

राज्यामध्ये युतीचे शासन आले त्या दिवशी युतीच्या सरकारने घोषणा केली की, स्वत: धान्य दुकानातून ज्या पाच वस्तू दिल्या जातील त्या वस्तूंचे आज जे भाव असतील तेच भाव पाच वर्षे कायम राहतील. युतीच्या शासनाने पाच वर्षे ते भाव कायम ठेवले. त्यावेळी स्वस्त धान्य दुकानातील वस्तूंच्या दरामध्ये एक नया पैशाची सुध्दा वाढ होऊ दिली नाही. आज अशी स्थिती आहे की, आपण पाच वस्तू जाहीर केल्या परंतु त्या वस्तू 15 तारखेपर्यंत दुकानात येतच नाहीत. आता स्वस्त धान्य दुकानदारांना 20 तारखेपर्यंत माल मिळतो आणि तो माल दुकानात जाईपर्यंत 25 तारीख उजाडते. तोपर्यंत गरीब माणसाला मिळलेली मजुरी किंवा पगार संपलेला असतो. स्वस्त धान्य दुकानात 25 तारखेला माल येतो आणि ते दुकानदार कसेबसे त्या मालाचे वाटप करण्याचा प्रयत्न करतात. काही लोकांना माल मिळतो तर काही लोकांना मिळत नाही. डाळीचे भाव वाढल्यानंतर या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली की, आम्ही स्वस्त धान्य दुकानातून तूर डाळ देण्याचा प्रयत्न करु. आपण त्या डाळीचा दर 55 रुपये किलो जाहीर केला. आम्ही 55 रुपयांमध्ये डाळ देऊ असे शासनाने सांगितले. त्या डाळीच्या वितरण योजनेमध्ये महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह फेडरेशन लिमिटेड, मुंबई या संस्थेला शासनाची अभिकर्ता संस्था म्हणून नियुक्ती केली. त्यांनी ही तूर डाळ पुरवावयाची आहे. या योजनेसाठी पी.ई.सी. आणि स्टेट ट्रेडींग कॉर्पोरेशन या केंद्र पुरस्कृत उपक्रमांमार्फत आयात केलेली तूर डाळ पुरविण्यात आली. ती तूर डाळ कशी आहे ? मी एका स्वस्त धान्य दुकानातून नमुना आणलेला आहे तो आपल्याकडे देतो. या तूर डाळीमध्ये 50 टक्के डाळ भेसळ केलेली आहे. यामध्ये लाखोलीची डाळ, सोयाबीनची डाळ आहे. अशी भेसळयुक्त डाळ गरीब माणसांना स्वस्त धान्य दुकानातून 55 रुपये दराने खाण्यास दिली जात आहे.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 10:50

श्री.पांडुरंग फुंडकर....

ही डाळ शिजत नाही. ही डाळ शिजवावयाची असेल तर त्यासाठी 100 रुपयांचा गॅस खर्च होतो. कोणत्याही पाण्याने ती डाळ शिजत नाही. या डाळीचे नमुने प्रयोगशाळेमध्ये तपासण्यासाठी पाठविले असता त्या डाळीत भेसळ असल्याचे सिध्द झाले आहे. मराठवाडयातील बीड, परभणी व इतर 3 जिल्हे अशा 5 जिल्हयांमध्ये या डाळीत भेसळ झाल्याचा अहवाल मला प्राप्त झाला आहे. या डाळीच्या खरेदीमध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. या भ्रष्टाचाराची शासन चौकशी करणार आहे की नाही हा माझा सवाल आहे. या तूर डाळ खरेदीत भ्रष्टाचार झाला आहे. ही डाळ कोणी खरेदी केली, कोठून आयात केली, कोणत्या दुकानदाराकडून त्याचा पुरवठा करण्यात आला याची शहानिशा करुन वस्तुस्थिती जनतेसमोर आली पाहिजे. सभापती महोदय, मी स्वस्त धान्य दुकानातून या डाळीचा नमुना आणलेला आहे. त्याची पिशवी आपल्यामार्फत सन्माननीय मंत्रिमहोदयांकडे पाठवित आहे. माझ्या हातामध्ये असलेल्या पिशवीतील नमुना भेसळयुक्त डाळीचा आहे. त्याचा अहवाल प्रयोगशाळेतून आलेला आहे. अशाप्रकारे स्वस्त धान्य दुकानाची वाईट स्थिती झालेली आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या पिकांचे पावसामुळे अतोनात नुकसान झालेले आहे. त्या धान्याचे शासन काय करणार आहे ? ज्वारी काळी झाली, भात काळा झाला आहे. त्याची शासनाकडून खरेदी केली जाणार आहे की नाही ? हे पीक शासनाने खरेदी केले नाही तर जनावरांना खाण्यालायक सुध्दा ते उरणार नाही. मग असे धान्य शासन लोकांना वितरित केले जाईल यात शंका नाही.

सभापती महोदय, विजेची दरवाढ हा एक मोठा प्रश्न जनतेसमोर आहे. वीज वितरण कंपनीने 9 हजार कोटींची दरवाढ महसूल गोळा करण्यासाठी सुचविलेली आहे. एका बाजूला जनता महागाईने होरपळत असताना दुसऱ्या बाजूला विजेच्या दरवाढीचे चटके लोकांना बसत आहेत. शासन मॉलला स्वस्त दरामध्ये वीज देते. परंतु त्यांना सवलतीत दिलेल्या विजेची भरपाई शेतकऱ्यांच्या व सामान्य माणसांच्या खिशातून दरवाढ करुन घेत आहे. ही दरवाढ सामान्य जनतेला न परवडणारी आहे. एका बाजूला शेतकऱ्यांना वीज मिळत नाही. 8-8 तासापेक्षा अधिक

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर....

काळ वीज मिळत नाही आणि दुसऱ्या बाजूला महागडी वीज घेण्यास भाग पाडत आहे. त्यामुळे शेतकरी आत्महत्या केल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, 'सकाळ' या वर्तमानपत्राने महागाईच्या संदर्भात काही महिलांच्या प्रतिक्रिया घेतल्या आहेत. माझ्याजवळ दोन सामान्य गृहिणींनी दिलेल्या बोलक्या प्रतिक्रिया आहेत. लालबाग येथील श्रीमती ज्योती शिंदे यांनी असे म्हटले आहे की, "मुले हुशार असूनही पाहिजे त्या क्षेत्रात त्यांना करियर करता येत नाही. कारण वाढत्या महागाईमुळे दोन वेळच्या जेवणाच्या खर्चासाठी पैसे पुरत नाहीत, तर शिक्षणासाठी पैशाची बचत काय करणार ? आधीची बचत आता महागाईच्या काळात खर्च करावी लागत आहे. महागाई हे एक मोठे संकट बनून सर्वसामान्य माणसासमोर उभे राहिलेले आहे. महागाईस सरकारच जबाबदार आहे." दुसरी प्रतिक्रिया दादरच्या श्रीमती छाया सावंत यांनी दिली असून त्या असे म्हणतात की, "साठेबाजांना सरकार सवलत देत आहे. वाढत्या महागाईस सरकारच जबाबदार आहे. महागाईवर नियंत्रण ठेवणे हे सरकारचे काम आहे. खरे तर साठेबाजांकडे धान्याऐवजी विष द्यावे आणि सर्व जनतेला मारण्याचे काम त्यांच्याकडे सोपवावे, जेणे करुन जनता महागाईच्या संकटातून बाहेर पडू शकेल. महागाईमुळे बचतीचे तीन तेरा वाजले. सर्व बाबींवर कर आकारला जात आहे. काही दिवसांनी पाणी पिणेही कठीण होईल इतकी वाईट परिस्थिती आहे." रिलायन्स, टाटा या सारखी तत्सम मंडळी घाऊक बाजारातून किंवा उत्पादन येण्यापूर्वी थेट उत्पादकाकडून पडेल त्या भावाने तो माल खरेदी करुन डम्प करुन ठेवतात आणि तो साठा चढया दराने विकतात. राज्यात जीवनावश्यक वस्तू कायदा अस्तित्वात आहे. परंतु या कायद्याचा परिणामकारक वापर करुन महागाईला नियंत्रित करण्याचे काम सरकारकडून कधीच होत नाही. सरकारकडून तसा प्रयत्न होताना दिसत नाही. तामीळनाडूमध्ये काँग्रेसचे राज्य आहे. त्या राज्यात तूर डाळीचा भाव 40 रुपये आहे, गहू 7 रुपये 50 पैशात मिळत आहे. साखर 13 रुपयात मिळत आहे, पाम तेल 30 रुपये प्रति लिटर या दराने शिधावाटप दुकानातून दिले जात आहे.

यानंतर श्री.शिगम

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

तामीळनाडू सरकार या गोष्टी करु शकते तर तुमचे गतिमान सरकार ते का करु शकत नाही असा माझा सवाल आहे. या देशाचे कृषीमंत्री श्री. शरद पवार यांच्याबद्दल मला आदर आहे. श्री. शरद पवारसाहेबांची एक जाणता राजा म्हणून ख्याती आहे. सभापती महोदय, या व्यक्तीला 1978 सालापासून मी पहातोय. दूरदृष्टी असलेला नेता म्हणून त्यांची सर्वसामान्यांना ओळख आहे. परंतु त्यांनी काही दिवसापूर्वी महागाईच्या संदर्भात "महागाईचा विळखा आणखी काही दिवस पुढे राहणार आहे" अशा प्रकारचे एक वक्तव्य केले. विविध वृत्तपत्रांच्या अर्थविषयक विश्लेषकांच्या परिषदेसमोर बोलताना श्री. शरद पवारसाहेबांनी वाढत्या महागाईवर चिंता व्यक्त करताना महागाईवर नियंत्रण ठेवण्याच्या बाबतीत अगतिकता विशद केली. मान्सूनच्या अनियमितपणामुळे खरिपाचे पीक पुरेशा प्रमाणात न आल्यामुळे, धान्य टंचाईमुळे महागाईचा आलेख उंचावत आहे असे ते म्हणाले. या महागाईवर नियंत्रण केव्हा येणार ती कशी आटोक्यात येणार याबाबत देशाचे कृषीमंत्री नेमके उत्तर देऊ शकले नाहीत. ते अन्नधान्याच्या वाढत्या किंमतीवर नियमंत्रण ठेवू शकले नाहीत हे यातून स्पष्ट होते. रब्बी हंगामातील पिके बाजारामध्ये आल्यानंतर महागाईच्या संदर्भात सांगता येईल असे संदिग्ध उत्तर त्यांनी दिले. तीन-चार महिन्यानंतर किंमती उतरतील की नाही हे सांगता येत नाही अशी स्थिती आहे असे सांगून देशाच्या कृषी मंत्र्यांनी या वाढत्या महागाईबाबत आपली आगतिकता व्यक्त केली. आता देशाचे कृषी मंत्री या महागाईबाबत आगतिक झाले तर मग या देशाचे पुढे काय होणार आहे ? मागणी आणि पुरवठा यावर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवले नाही तर असंतुलित स्थिती निर्माण होत असते. विरोधी पक्षाच्या अनेक सन्माननीय सदस्यांना या विषयावर आपले विचार मांडावयाचे असल्यामुळे मी अधिक बोलणार नाही.

सभापती महोदय, मी आपणास सन 2004 सालातील उदाहरण देतो. 2004 साल उलटून फार वर्षे झालेली नाहीत. त्यावेळी श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार होते. त्यावेळच्या अन्नधान्याच्या किंमती मी आपणास सांगतो. त्यावेळी चणाडाळ 27 रु. किलो, तूरडाळ 32 रु. किलो, गहू 15 रु. किलो, तांदूळ 20 रु. किलो., साखर 20 रु. किलो, गूळ 19 रु. किलो, शेंगदाणा तेल, 30 रु. किलो, चहा 120 रु, पेट्रोल 46 रु. आणि गॅस त्यावेळी 250 रु. होता. त्यावेळी 5 वर्षात अन्नधान्याच्या किंमती वाढल्या नाहीत. परंतु या दोन वर्षामध्ये देशामध्ये महागाई

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

प्रचंड प्रमाणात वाढली. एका बाजूला शेतक-याच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही आणि दुस-या बाजूला तो ग्राहक म्हणून बाजारात गेला तर त्याची लूट होते अशी स्थिती आहे. सभापती महोदय, मलिदा कोण खातो ? तर उत्पादक आणि ग्राहक यांच्यामधील दलाल हा मलिदा खातो. हा मधला दलाल पहिल्यांदा संपविला पाहिजे. शेतकरी आपले सोयाबीन बाजारात घऊन गेला तर त्याला क्विंटलला 1500 रु. भाव मिळतो. परंतु त्याच सोयाबीनचे तेल घेण्यासाठी तो बाजारात गेला तर त्याला किलोला 70 रु. मोजावे लागतात. सभापती महोदय, या महागाईवर कायमची मात करावयाची असेल तर कृषी उत्पादन वाढविण्याची नितांत गरज आहे. आता कृषी उत्पादन दिवसेंदिवस कमी होत चालल्यामुळे कृषी उत्पादनाचे भाव वाढत चालले आहेत. मागे स्वामीनाथन नावाची कमिटी नेमली होती. त्या कमिटीने सांगितले होते की, उत्पादन खर्च अधिक 50 टक्के हे सूत्र वापरुन दीर्घकालीन किंमतीची हमी दिली पाहिजे. गरीब व कनिष्ठ मध्यम वर्गाला रास्त दरात पुरेसे धान्य दिले पाहिजे. पुरवठा साखळीवर योग्य देखरेख ठेवली पाहिजे, आयात निर्यातीचे धोरण पारदर्शी असले पाहिजे अशा प्रकारचे विविध उपाय स्वामीनाथन कमिटीने सुचविलेले आहेत. सभापती महोदय, हे सरकार महागाई कमी करण्यासाठी निश्चितपणे काय करणार आहे ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

माननीय मुख्यमंत्र्यांनी शपथ घेतल्यानंतर काही पत्रकारांनी त्यांना प्रश्न विचारला होता की, आपली प्रथम प्रायॉरिटी काय आहे? त्यांनी सांगितले होते, माझी पहिली प्रायॉरिटी महागाई कमी करणे ही आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी शपथ घेतल्यानंतर गेल्या काही दिवसात या महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केल्या? पुढील कालखंडात गरीब माणसाला स्वस्त दरात धान्य देण्यासाठी, स्वस्त दरात जीवनावश्यक वस्तू देण्यासाठी, भाजीपाल्याचे वाढलेले भाव रोखण्यासाठी शासन काय उपायोजना करणार आहे हे सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला समजले पाहिजे, यासाठीच आम्ही हा प्रस्ताव याठिकाणी आणलेला आहे. सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री, सन्माननीय उर्जामंत्री हे निश्चितपणे या राज्यातील जनतेला दिलासा देण्यासंबंधीचे धोरण जाहीर करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे वक्तव्य पूर्ण करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.अरविंद सावंत) : या प्रस्तावावरील चर्चेसाठी एकूण दोन तासांचा कालावधी निश्चित केलेला आहे. या चर्चेवरील मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण उद्या होणार आहे. त्यामुळे माझी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, या प्रस्तावावर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जे मुद्दे मांडले आहेत त्यांची द्विरुक्ती न करता कमीत कमी वेळेत सन्माननीय सदस्यांनी आपले मुद्दे मांडावेत. सत्ताधारी व विरोधी पक्षाकडून 12 ते 14 सदस्य बोलणार आहेत.

श्री.दिवाकर रावते : सत्ताधारी पक्षाकडील किती नावे आलेली आहेत?

**तालिका सभापती** : सत्ताधारी पक्षाकडून आतापर्यंत माझ्याकडे दोन नावे आलेली आहेत. माझ्याकडे एकूण जी नावे आलेली आहेत ती मी सभागृहाच्या माहितीसाठी वाचून दाखवितो. यानंतर माननीय सदस्यांना भाषण करण्याची संधी मिळण्याकरिता माझ्याकडे नावे देऊ नयेत अशी मी पक्ष प्रतोदांना विनंती करतो. विरोधी पक्षाकडून माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, अरविंद सावंत, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री परशुराम उपरकर, विनोद तावडे, संजय केळकर, अशोक मानकर, भगवानराव साळुंखे, जयंत प्र.पाटील यांची नावे आलेली आहेत तर सत्ताधारी पक्षाकडून माननीय सदस्य डॉ.वसंत पवार व श्री.हेमंत टकले यांची नावे आलेली आहेत. सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी आपले भाषण सुरु करावे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सन्माननीय सभापती महोदय, विरोधी पक्षनेते सन्माननीय श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व इतर यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव याठिकाणी मांडला आहे, त्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

महागाईचा विषय हा अत्यंत महत्वाचा गोरगरीब जनतेच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळयाचा आहे. सर्वसामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनातील महागाई आणि त्यावर राज्य शासनाने केलेल्या उपाययोजना आपल्या सर्वांच्या नजरेसमोर येणे ही काळाची गरज आहे. महागाई जरुर वाढलेली आहे. राज्यात सध्या गोरगरीब जनतेपैकी जे पिवळी शिधापत्रिका धारक आहेत...

नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.वसंत पवार.........

केसरी कार्ड होल्डर आहेत ते अंत्योदय योजनेमध्ये सहभागी झालेले आहेत, त्यांच्यासाठी शासनाने उपाययोजना केल्या आहेत, त्याचा गोषवारा येथे सादर करणे आवश्यक आहे. राज्यशासनाच्या पी.डी.एस. व नव संजीवनी तसेच डोअर स्टेप डिलीव्हरी या ज्या योजना आहेत त्यापैकी नाशिक जिल्ह्यात डोअर स्टेप डिलीव्हरी योजना सुरु आहे. द्वारपोच धान्य वितरण ही व्यवस्था मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास विभागांमार्फत नाशिक जिल्ह्यातील 281 गावांमध्ये चालू आहे. या योजनेत जर 70 टक्के गावकऱ्यांनी मागणी केली की आम्हाला तीन ते सहा महिन्यांचे धान्य घरपोच द्यावे तर त्या ठिकाणी शासनाच्या या योजनेच्या माध्यमातून ही सेवा दिली जाते आणि अशा प्रकारे ही योजना अत्यंत चांगल्या प्रकारे नाशिक जिल्ह्यात सुरु आहे. या अनुषंगाने माझी अशी विनंती आहे की, अजुनही ही योजना संपूर्ण राज्यात सुरु करुन त्यामार्फत जास्तीत जास्त डायरेक्ट गोरगरिबांपर्यंत सुविधा उपलब्ध करुन देता येईल अशी उपाययोजना शासनाने करावी. केंद्रशासनाच्या सुध्दा 6-7 योजना राज्यशासन आपल्या राज्यात राबवित आहे. "सप्लाय ऑफ फूडग्रेन टू बीपीएल" आणि "यलो कार्ड" या त्यापैकी दोन योजना आहेत. मध्यंतरी शासनाने एक सर्व्हे केला आणि यादी तयार केली होती. या यादीला शासनाच्या नगरविकास विभाग आणि ग्रामविकास विभागाने मान्यता दिली परंतु अन्न व नागरी पुरवठा विभागाने अजुनही मान्यता दिलेली नाही त्यामुळे या योजनेपासून राज्यातील गोरगरीब वंचित राहिलेले आहेत. त्यांनाही यलो कार्ड मिळणे अत्यंत गरजेचे असून त्यादृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करावी. या योजनेला मान्यता दिली तर अनेक लोकांना स्वस्त धान्य दुकानातून जो गहू, तांदूळ, तूर डाळ, केरोसीन आणि साखर अशा जीवनावश्यक वस्तू मिळू शकतील. साखरेचा विषय सभागृहात निघाला म्हणून मला त्यासंदर्भात सांगणे आवश्यक आहे की, मी सुध्दा एका साखर कारखान्याचा चेअरमन आहे. आजपर्यंत जिल्हाधिकाऱ्यांकडे कारखान्याकडून येणे असलेली लेव्हीची साखर 100 टक्के दिलेली आहे व देत असतो.राज्यात अनेक साखर कारखाने असून त्यापैकी अनेक कारखाने बंद पडलेली आहेत तर काही कारखान्यांमध्ये संप चालू आहे,कामगारांचे पगार नाहीत म्हणून काही बंद आहेत, काही ठिकाणी पावसामुळे साखर ओली झाली अशी देखील परिस्थिती आहे.अशा परिस्थितीत

......2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ........

शासनाने जास्तीत जास्त लक्ष देऊन सर्वसामान्य माणसाला साखर उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. बी.पी.एल. धारकांना माणसी 500 ग्रॅम रुपये 13.50 दराने आपण पी.डीएस. मार्फत साखर देत असतो आणि मार्केटमध्ये त्याचा दर 33 रुपये किलो आहे. त्याचप्रमाणे केसरी कार्डधारकांना मात्र एका कार्डावर 2 किलो साखर देतो आणि त्याचा दर 25 रुपये किलो असा ठरलेला आहे. आज संपूर्ण जगातच साखरेचे शॉर्टेज आहे. कारण साखरेचे प्रॉडक्शनच मुळात अत्यंत कमी झालेले आहे. माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले की, शासनाने मागील वर्षी साखर निर्यात केली परंतु मी त्या संदर्भात सांगू इच्छितो की, मागील वर्षी साखरेचे प्रॉडक्शन जास्त झालेले होते आणि त्याचा साठा कसा करावा हा प्रश्न शासनाच्या समोर होता म्हणून साखरेची निर्यात करावी लागली. तसेच रॉ शुगर तयार करण्यासाठी देखील शासनाने 25 ते 30 लाख मे.टनाला परवानगी दिली, त्यामध्ये आता गळती आली हे देखील लक्षात ठेवणे आवश्यक आहे. रॉ शुगर एक्स्पोर्ट करण्यासाठी सुध्दा शासनाने सबसिडी दिली. (अडथळा) त्यात भ्रष्टाचार झालेला नाही, असे मी सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांना सांगू इच्छितो. तसेच जी साखर एक्स्पोर्ट झाली ती एक्स्पोर्ट करणेच आवश्यक होते कारण त्या साखरेचा साठा करणे आपल्याला शक्य नव्हते....

यानंतर श्री. जुन्नरे.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ....

त्यावेळेस साखर साठवण्याची सर्व गोदामे पूर्ण भरली होती त्यामुळे साखर साठविण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती. खरे म्हणजे शेतक-यांना धन्यवाद दिले पाहिजे कारण त्यांनी अशा अडचणीच्या काळात सुध्दा अन्न-धान्याचे उत्पादन फार मोठया प्रमाणात केले होते. त्यावेळेस शेतक-यांनी अन्नधान्याचे 241 लक्ष मे.टन उत्पादन केले होते. परंतु दुष्काळ आल्यामुळे पिकाचे नियोजन शेतक-यांना अधिक चांगल्या प्रकारे करता आले नाही. दुष्काळामुळे गहू,तांदूळ आणि साखरेचे उत्पादन कमी झाले होते व पर्यायाने मालाचा तुटवडा जाणवला होता. या परिस्थितीचे जाणत्या राजाने चांगल्या प्रकारे आत्मपरीक्षण केले होते व सांगितले होते की, जोपर्यंत अन्नधान्याचा पुरवठा वाढणार नाही, सुरळीत होणार नाही तोपर्यंत महागाई कंट्रोलमध्ये येऊ शकणार नाही. सर्वसामान्य जनतेला, गोरगरीब जनतेला महागाईची झळ पोहचू नये यासाठी शासनाने बीपीएल कार्डधारक, अंत्योदय योजनेतील कार्ड धारकांना सवलतीच्या दरामध्ये गहू, तांदूळ, साखर, तेल कमी किंमतीमध्ये उपलब्ध करुन दिले होते. गहू 3 रुपये किलो तर तांदूळ 2 रुपये प्रती किलो दरामध्ये उपलब्ध करुन दिलेला आहे. सभापती महोदय, कमी किमतीमध्ये सर्वसामान्य जतनेसाठी शासनाने धान्याचा पुरवठा उपलब्ध करुन दिलेला आहे व हा पुरवठा अन्न व नागरी पुरवठा विभागाने उपलब्ध करुन दिलेला आहे. तुरीची डाळ शिजत नाही यासंदर्भात ब-याच लोकांची तक्रार होती आणि ती काही प्रमाणात खरीही होती. खरे म्हणजे शेतकरी जो माल तयार करतो त्या मालाला चांगला बाजारभाव मिळणे गरजेचे आहे. माननीय शरदचंद्रजी पवार साहेबांनी गहू तसेच तांदळाची आधारभूत किमंत वाढवून दिलेली आहे. आधारभूत किमंत वाढवून मिळाल्यामुळे शेतक-यांच्या मालाला डबल किंमत मिळालेली आहे. परंतु दुष्काळी परिस्थितीमुळे मालाचे ऊत्पादन पाहिजे त्या प्रमाणात होऊ शकले नाही हे त्या मागचे मुख्य कारण आहे. माननीय पवार साहेबांनी सांगितले आहे की, आपल्या देशामध्ये 1.5 कोटी बोगस रेशनकार्ड आहे. सभापती महोदय, यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये जी बोगस रेशन कार्ड आहेत त्याचा शोध घेण्याच्या कामाला आता सुरुवात झालेली आहे. यासंदर्भात शासनाने 11 लक्ष रेशन फॉर्मचे वितरण केलेले असून जे खरे रेशन कार्ड धारक आहेत तेच फॉर्म भरुन देतील तसेच जे फॉर्म भरुन देणार नाहीत किंवा त्यासंदर्भातील ठोस पुरावा देणार नाहीत ते बोगस रेशन कार्डधारक आहेत असे समजण्यात येईल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KTG/ SBT/ प्रथम श्री. खर्चे.....

डॉ. वसंत पवार.....

सभापती महोदय, शासनाने क्वालिटी कंट्रोलच्या संदर्भात कडक भूमिका घेतली पाहिजे. खरे म्हणजे आपल्याकडे क्वालिटी कंट्रोलचे काम कारकुणाकडून केले जाते. खरे म्हणजे हे काम क्वालिटी कंट्रोलच्या एक्सपर्ट कडून करुन घेतले पाहिजे. प्रत्येक वेळी फूड डायरेक्टरकडून हे काम करुन घेणे कठीण जाते. त्यामुळे गोडाऊन सुपरवायझर कडून क्वालिटी कंट्रोलचे काम करुन घेतले तर ते अधिक चांगले होईल.

सभापती महोदय, पूर्वी पीएल 48 योजनेखाली धान्याची आयात केली जात होती. परंतु आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. माझी विरोधी पक्षाला विनंती आहे की, गव्हाचे शॉर्टेज झाल्यामुळे गव्हाच्या किमती वाढू नये म्हणून शासनाने गहू आयात केला तरी विरोधी पक्ष आरडाओरड करतो. गव्हाची आयात केली नाही तरीही विरोधी पक्ष आरडाओरड करतो हे काही बरोबर नाही. त्यामुळे माझी शासनाला विनंती राहणार आहे की, या ठिकाणी भाव वाढीच्या संदर्भात, महागाईच्या संदर्भात जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यामध्ये काही अंशी तथ्य आहे. परंतु या महागाईला चलन फुगवटाही तेवढाच जबाबदार आहे असे माझे म्हणणे आहे. आज सर्व जगात महागाई वाढली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.. ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ...

ते खाते त्यांच्या गळ्यात अडकवून ती घाण काढण्यासाठी, ते सारे निस्तरण्यासाठी त्यांना ते खाते दिले आहे अशी आमची सर्वांची भावना आहे. हा यातील एक भाग. म्हणजे हे खाते त्यांच्याकडे देऊन त्यांना एक प्रकारे शिक्षा दिली गेली आहे, तुम्हाला यापूर्वी मंत्री केल्यानंतर तुम्ही जे काही केले त्याची शिक्षा म्हणून हे खाते आता तुम्हाला दिले आहे असे आमचे मत झाले आहे. अर्थात तो विषय माझा नाही, तो सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांचा आहे त्यामुळे त्याबद्दल मी अधिक काही बोलत नाही. असे झाले असले तरी आता आपण आपल्या नेत्यावर कसलाही आक्षेप येऊ नये यासाठी तुम्ही जणू सरकारच्या वतीनेच आपण उत्तर देत आहोत अशा प्रकारे जाणता राजा काय काय करतो हे सांगण्याचा येथे प्रयत्न केला. वस्तुत: या प्रस्तावावरील चर्चेत आजचा माझा विषय हा बीइएसटीच्या वीज दरवाढीसंबंधीचा आहे. केवळ तुम्ही बोलतं केले म्हणून मी त्यावर थोडेसे बोललो इतकेच. सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी मांडल्याप्रमाणे या विषयी देशाच्या पंतप्रधानांनी सातत्याने सांगितले की माझी प्रॉयॉरिटी काय आहे ? या देशातील महागाई कमी करणे हे माझे आणि माझ्या सरकारचे प्रथम उद्दिष्ट असेल अशा प्रकारची घोषणा माननीय पंतप्रधानांनी केल्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये .... सभापती महोदय, मी हे जे काही सांगतो आहे ते माझ्या पदरचे मी सांगत नाही तर हे सारे वृत्तपत्रातून छापून आलेले आहे. त्यात असे छापून आलेले आहे की, केंद्रीय मंत्रिमंडळाने संपूर्ण महागाईला माननीय शरद पवार, कृषी मंत्री यांना दोष दिला. हे जाहीर झालेले आहे. आता हे जे काही छापून आले ते आपल्याला कौतुकाचे मेडल आहे असे वाटत असेल तर जरूर ते आपण मिरवू शकता. .... सभापती महोदय, आमचे मित्र डॉ.वसंतराव पवार यांना मी सांगू इच्छितो की, ठराव होणे वेगळे आणि मंत्रिमंडळाचे मत बाहेर व्यक्त होणे वेगळे असते हे आपण समजून घ्या. तसेच श्री.शरद पवार साहेबांमुळेच हे सारे झाले आहे असेही सोनिया गांधी यांचे मत झाल्याचेही पेपरमध्ये छापून आलेले आहे. ..

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य जे काही सांगत आहेत असे कोठेही उल्लेख झालेले नाही.

श्री.जयंत प्र. पाटील : हे सारे पेपरमध्ये छापून आलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, हे सारे पेपरमध्ये छापून आलेले आहे, माझ्या पदरचे मी काहीही सांगत नाही.

..... के 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, असा उल्लेख कोणत्याही ठिकाणी झालेला नाही त्यामुळे अशा प्रकारे चुकीचे उल्लेख येथे सांगितले जाऊ नयेत. म्हणूनच मी माननीय सभापती महोदयांना विनंती करतो की, त्यांनी ही गोष्ट रेकॉर्डवरून काढून टाकावी.

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)** : आपण ही बाब तपासून पाहू, त्यानंतरच रेकॉर्डवर काय ठेवायचे, काय ठेवायचे नाही हे ठरवू.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना या प्रस्तावावर उत्तर देण्याची संधी आहे. त्यावेळी ते असे जे काही कोणाचे मत असेल तर ते खोडून काढू शकतात. तसेच सन्माननीय सदस्य श्री.टकले हे देखील याबाबत बोलू इच्छित आहेत. पण त्यांनाही या प्रस्तावावर बोलण्याची संधी मिळणारच आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांना सांगेन की, आपल्याला या प्रस्तावासाठी वेळ थोडा आहे. तरी आपण यावर अधिक वेळ न घालविता आपले भाषण पुढे सुरू करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझ्या भाषणात अशा प्रकारे व्यत्यय येणार असेल तर त्याला मी काय करायचे ? उलटपक्षी आपण मला अधिक वेळ दिला पाहिजे. परवा माननीय उपमुख्यमंत्री 'जय हो, जय हो' करीत होते तेव्हा तुमचा कसा 'जय हो' आहे ते सांगण्याचा प्रयत्न मी करीत होतो इतकेच. बाकी काही नाही. तरीही आम्ही जिंकलो असेच माननीय उपमुख्यमंत्र्यांना म्हणायचे होते. लोकांच्या तोंडामध्ये डुकरे देखील खात नाहीत असा गहू घातलात तरीही आम्हीच जिंकलो असे त्यांना म्हणायचे आहे. हा जो तुमचा विषय आहे ना त्याबाबत मला भाजपची जुनी घोषणा आठवते आहे. त्यांची घोषणा अशी होती ...

" वाह रे इंदिरा, तेरा खेल, सस्ती दारू, महंगा तेल "

ती घोषणा आता परत आली पण ती कोणाच्या नावाने द्यायची हा त्यांच्यापुढे प्रश्न असल्याने ती घोषणा ते देत नाहीत इतकेच. आता सन्माननीय सदस्य डॉ.पवार यांनी जो साखरेचा विषय काढला त्या विषयावर आदरणीय श्री.गिडवानी साहेब, जे काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते आहेत किंवा आणखी कोण आहेत हे मला माहिती नाही, पण ते सतत दिल्लीलाच असतात. त्यांनी या विषयावर स्वत:च श्वेतपत्रिका काढली, ती 'प्रेस'पुढे मांडून दाखवली आणि या साखरेच्या निर्यात घोटाळ्यासाठी केंद्रीय कृषी मंत्रीच जबाबदार आहेत हे त्यांनी जाहीर केले. मी हे केलेले नाही. तुमच्याच मित्र

.... के 3 ...



KBS/ SBT/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 11:20

श्री. रावते ....

पक्षाने हे केले आहे. तुम्ही तेव्हा हात हलविलात ते लोकांना टीव्हीवर दिसले आहे. या संबंधातील अहवाल त्यांनी सोनिया गांधींना सादर केला आणि साखरेच्या निर्यात घोटाळ्याकरिता व देशातील महागाईकरिता केंद्रीय कृषी मंत्री जबाबदार आहेत अशा आशयाचा अहवाल त्यांनी सादर केला. त्यात आमचा काहीही संबंध नाही. दुसरे असे की, हे सारे टीव्हीवर त्यांनी जाहीर केले आहे. श्री.गिडवानी यांनी टीव्हीवर याबाबत मुलाखत दिली. त्यांचा अहवाल सोनिया गांधी यांनी स्वीकारला. आणि मग स्वाभिमानी संघटनेच्या, शेतकरी संघटनेच्या श्री.राजू शेट्टी यांनी जाहीरपणे सांगितले की, साखरेच्या महागाईला आणि साखर निर्यात घोटाळ्याला श्री.शरद पवार, कृषी मंत्री हेच जबाबदार आहेत. जनतेला आज जी महाग साखर मिळते आहे त्याला जबाबदार श्री.शरद पवार हे आहेत असे शेतकरी संघटनेने आणि स्वाभिमानी संघटनेच्या नेत्यांनी जाहीरपणे मुलाखत देऊन सांगितले इतकेच नव्हे तर तशा आशयाचे पत्र त्यांनी खासदार या नात्याने केंद्र सरकारला देखील दिले. अमेरिकेला तुम्ही 1800 रूपये क्विंटलने साखर निर्यात केली आणि त्याच अमेरिकेकडून लगेचच 6 महिन्यांमध्ये 3,800-3900 रूपये किंमतीने आयात देखील केली. हा जो घोटाळा त्यांनी मांडला तेव्हा जाणत्या राजाला सहा महिन्यांमध्ये पिकांची काय परिस्थिती आहे गाळप काय होणार आहे, साखरेचे उत्पादन किती होणार आहे याची जाण नसावी ही खेदजनक बाब आहे. महाराष्ट्राचा जाणता राजा ज्याला म्हणतो त्याला महाराष्ट्रात महागाई होणार आहे तर त्याच्या दूरदृष्टीला का हे दिसले नाही. हा प्रश्न आहे. मग गहू आयात केला त्याचे वाभाडे निघाले. ...

( यानंतर श्री. सरफरे .... एल 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

गव्हाचे सँपल आम्ही उघडले नाही. ते सँपल माननीय सदस्य श्री. संजय दत्त हे सभागृहामध्ये घेऊन आले, तुमच्या आघाडीतील कॉग्रेसचे प्रमुख भागीदार या सभागृहात घेऊन आले. डुकरे खात नाहीत तो गहू माणसे खातात. ते गव्हाचे सँपल त्यांनी आणून माननीय सभापतींकडे दिले तसेच ते आपल्यालाही दिले. काल परवा माननीय श्री. शरद पवार यांनी जाहीर केले की, अवकाळी पाऊस महाराष्ट्रामध्ये पडला. सर्वात जास्त धान्याचे उत्पादन महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश व तामिळनाडूमध्ये होते. जाणत्या राजाची दूरदृष्टी आपण मान्य केली पाहिजे. त्यांनी सांगितले की, तांदळाचे पीक नासल्यामुळे आपल्याला तांदूळ आयात करावा लागेल. बाहेरुन, परदेशामधून तांदूळ येणार आहे, त्याची किंमत काय असणार? हे आपण ठरवावे. त्यांनी परवाच्या दिवशी जाहीर केले की, ही महागाई येत्या सहा महिन्यामध्ये आवाक्यात आणणे शक्य नाही, त्याबद्दल त्यांनी जनतेची माफी मागितली. ही दूरदृष्टी आहे...

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्य वारंवार चुकीच्या गोष्टी रेकॉर्डवर आणीत आहेत. ज्याचा कुठेही उल्लेख नाही, अशा गोष्टी रेकॉर्डवर येत आहेत. त्यामुळे ती वाक्ये कामकाजातून काढून टाकण्यात यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत)** : कार्यवृत्त तपासून पाहिल्यानंतर त्यामध्ये जे गैर असेल ते काढून टाकण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या नेत्याबद्दल आदर असला पाहिजे. मी आपल्या नेत्याबद्दल कधीही अनादराने बोलणार नाही. परंतु आपण आता खिजवायला लागलात तर ते तुमच्या किती अंगाशी येईल, हे लक्षात घ्या. माझ्याकडे "लोकमत" या वर्तमानपत्राचे कात्रण आहे. माननीय श्री. शरद पवार हे तुमचे आहेत तर "लोकमत" चे दर्डा तुमचे नाहीत? यामध्ये आपण काहीतरी एक स्वीकारले पाहिजे. असे कसे चालेल? या वर्तमानपत्राच्या कात्रणामध्ये असे म्हटले आहे की, "महागाईचा विळखा आणखी तीन महिने" आणि पुढे म्हणतात की, "माफ करा" मंत्रिमहोदय आपण उभे राहून एवढे बोलला, याकडे आपण लक्ष द्या. माननीय श्री. शरद पवार साहेब म्हणतात "माफ करा" "खरीप हंगाम बरा झाला नाही तर किचन बजेट कोलमडलेलेच राहणार" "महागाईने होरपळलेल्या सर्वसामान्य जनतेची सपशेल माफी मागत केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी रब्बी पिकाची कापणी झाल्यानंतर किंमती उतरणार की नाही हे सांगता येत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री.दिवाकर रावते..

नाही असे म्हणून महागाईवर चक्क हात वर केले." आपण कल्पना करा की, माननीय श्री. शरद पवार साहेबांनी हात वर केल्यानंतर ते कसे दिसत असतील.? हे माझे नाही, मी आता माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांचासारखा बोलतो. हे माझे म्हणणे नाही.

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी वेळ कमी असल्यामुळे आपले म्हणणे थोडक्यात संपवावे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, अनेक वर्तमानपत्रामध्ये वेगवेगळया बातम्या छापून येतात. त्यांचे जर आपण याठिकाणी वाचन करीत राहिलो तर..

श्री. दिवाकर रावते : परंतु ते जाहिरात करतात ना.

**तालिका सभापती** : त्यामध्ये गैर नाही.

श्री.दिवाकर रावते : जगातील आणि देशातील सर्वात खात्रीलायक वर्तमानपत्र "लोकमत"आहे, असे असतांना आपण एका मंत्रिमहोदयांचा आणि आपल्या सहकाऱ्यांचा अपमान करता काय?

श्री. विलासराव शिंदे : वर्तमानपत्रामध्ये छापून आले असेल तर त्याची चौकशी करा.

श्री. दिवाकर रावते : तुमच्यात हिंमत असेल तर लोकमतची चौकशी करा. तुमच्यात हिंमत नाही...

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी वेळ घालवू नये. जनता महागाईने होरपळत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, साखरेचे चिटींग, गव्हाचे चिटींग, तांदळाचे चिटींग, फसवणुकीचे चिटींग, माफीचे चिटींग झाले, विषय संपला. प्रत्येक वेळी आम्हाला हिणविले जाते म्हणून मी तुमच्या माहितीसाठी सांगतो.आमच्या युती सरकारच्या काळात काय केले? असे विचारले जाते. त्याबाबत सांगतो की, त्यावेळी 9 रुपये किलो गहू होता तो आपण 22.50 रुपये केला, तांदूळ 10 रुपये किलो होता तो 24.50 पैसे झाला, साखर 14 रुपये किलो होती ती 50 रुपयावर गेली. ही संपूर्ण यादी मी वाचत नाही कारण ती अतिशय भयानक आहे. कांदा आणि बटाटयाच्या किंमतीबाबत तर बोलायलाच नको. म्हणून महागाई कमी होणार नाही अशी केंद्र सरकारकडून सूचना मिळाल्यानंतर इकडचीया जनता हवालदिल झाली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11.30

श्री.दिवाकर रावते . . . .

मी अत्यंत महत्वाचा विषय मांडून माझे भाषण संपविणार आहे. केवळ जीवनावश्यक वस्तुंची, अन्नधान्याची भाववाढ नाही तर जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या सर्वसामान्य वस्तुंची भाववाढ होत आहे आणि त्यामध्ये विजेची भाववाढ देखील महत्वाची बाब आहे. मला एक गोष्ट समजलेली नाही की, वीज गळती आणि वीज चोरी हे प्रकार थांबविणे हे प्रशासनाचे काम आहे.परंतु प्रत्यक्षात जेवढे वीज गळती आणि वीज चोरीचे प्रकार होत आहेत, त्याचा भार जे प्रामाणिकपणे बिल भरत आहेत, त्यांच्यावरच पूर्णपणे टाकण्यात येत आहे. प्रत्यक्षात विजेची चोरी करणारे चोर वेगळेच आहेत, पण जे प्रामाणिकपणे बिल भरत आहेत, त्यांच्यावर तुम्ही हा भार टाकत आहात. अशा प्रकारे तुम्ही वीज ग्राहकांवर वेगळया प्रकारची भाववाढ लादत आहात. त्यानंतर आता महाराष्ट्रामध्ये पारेषण कर 37 टक्के याप्रमाणे प्रत्येक युनिट मागे 75 पैसे वेगळया पध्दतीने वाढविले आणि मुंबईमध्ये तर कहर झाला.या राज्यामध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना जनतेवर कोणत्या प्रकारची करवाढ लावण्यात यावी, कोणत्या पध्दतीने कर वसूल करण्यात यावेत हे ठरविण्याचा अधिकार आहे.पण बी.ई.एस.टी.मध्ये महाव्यवस्थापक हे अतिशय माजोरी आहेत आणि ते मुजोरपणे वागतात. ते म्हणतात की, मी तुम्हाला, निवडून आलेल्या बॉडीला विचारतच नाहीत, जुमानतच नाहीत. त्यांनी असा प्रकार ज्या-ज्या ठिकाणी केलेला आहे, तेथून शासनाने त्यांची बदली केलेली आहे. ते आपले अधिकार कोणत्या पध्दतीने वापरतात याची मला कल्पना नाही. माझ्या हातामध्ये महानगरपालिकेचा 1988 चा कायदा आहे, त्या नुसार "460-आय" मध्ये असे लिहिलेले आहे की,"मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाचे वीज शक्तीचा पुरवठा करण्याबद्दल त्या-त्या वेळी अंमलात आलेल्या कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदीच्या आणि त्याखालील महानगरपालिकेला दिलेल्या कोणत्याही लायसन्स्च्या तरतुदीच्या अधीनतेने महापालिकेच्या मान्यतेने मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती वेळोवेळी निश्चित करेल अशा दराने आकार वसूल केला जाईल." म्हणजे वीज निर्मिती झाल्यानंतर विजेच्या आकाराच्या संबंधातील प्रस्ताव जे निवडून आलेले आहेत, त्यांच्यासमोर ठेवला जाईल. मग त्यांनी याबाबत ठरवावयाचे आहे की, सर्वसामान्य गरीब जनतेला किती दराने वीज द्यावी, मध्यमवर्गीयांना किती दराने वीज द्यावी, व्यापारी संकुलासाठी किती दराने वीज द्यावी, मोठी फॅक्टरी असेल तर त्यासाठी किती दराने वीज द्यावी हे ठरविण्याचा अधिकार तेथे निवडून आलेल्या बॉडीचा आहे.पण आमच्या सन्माननीय महाव्यवस्थापकांनी वीज समितीपुढे हा दरवाढीचा प्रस्ताव....

. . . .एम-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

कसा आणला ? त्यावेळेस त्यांनी फक्त एवढेच सांगितले की, तुमच्यासमोर हा प्रस्ताव केवळ माहितीसाठी ठेवत आहोत, मंजुरीसाठी नाही. निवडून आलेल्या बॉडीपुढे प्रस्ताव ठेवल्यानंतर तेथील सदस्यांनी सांगितले की,"तुम्ही आमच्यासमोर प्रस्ताव ठेवावा, आम्हाला चर्चा करावयाची आहे." त्यावर महाव्यवस्थापकांनी सांगितले की,"नाही.हा प्रस्ताव केवळ तुमच्या माहितीसाठी आहे. तसा तुम्हाला अधिकार नाही आणि तो अधिकार देणारच नाही."एवढी वीज ग्राहकांच्या संबंधात त्या महाव्यवस्थापकांना मस्ती आहे. आज मुंबईतील वीज ग्राहकांचे दरवाढीमुळे कंबरडे तुटलेले आहे. 20-25 हजार रुपये पगार असलेल्या घरामध्ये पूर्वी तीन हजार, चार हजार, पाच हजार बिल येत होते, ते आज दहा हजार रुपयापर्यंत बिल येत आहे आणि त्यामुळे लोकांचा अर्धा पगार वीज बिल देण्यासाठी खर्च होऊ लागला आहे. मग त्या लोकांची घरे कशी चालणार ? एकतर महागाईमुळे त्यांचे कंबरडे मोडलेले आहे. एका बाजूला वीज दराच्या बाबतीत अडेलतट्टूपणा एवढया मखलाशीने केला जात आहे आणि दुसरी कडे निवडून आलेली जी बी.ई.एस.टी.समिती आहे, त्यांचा अधिकार कोणत्या अधिकारात काढून घेतला आहे, असा प्रश्न निर्माण होत आहे. या विधीमंडळामध्ये हे कायदे तयार झालेले आहेत, त्या कायद्याचा अधिक्षेप करुन, त्या कायद्याची पायमल्ली करुन अशा प्रकारे एखादा सनदी अधिकारी मनमानी करीत असेल तर मला आपल्याला एवढीच विनंती करावयाची आहे की, आपण मला मार्गदर्शन करावे की, या सभागृहामध्ये मंजूर करण्यात आलेल्या कायद्याची पायमल्ली करणाऱ्या अधिकाऱ्यावर मी हक्कभंगाची सूचना द्यावयाची की नाही ? माझ्या पुढे असा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय,जेव्हा महाराष्ट्र इलेक्ट्रीसिटी रेग्युलेशन कमिशनपुढे अर्ज करण्यात आला, तेव्हा "Application and Affidavit for approval of the ...." असा अर्ज केला. पण तो समितीपुढे आणून, समितीचा सल्ला घेऊन, याबाबतीत आपण कमिशनपुढे कशा प्रकारे वीज आकारणी करण्याच्या बाबतीत जावे हे त्यांनी सांगितले नाही. कमिशनने ठरवून दिले की, जी वीज खरेदी करावयाची आहे, तिचा दर एवढा राहील. तो त्यांचा अधिकार आहे. हे केंद्र शासनाने नियुक्त केलेले कमिशन असल्यामुळे त्यांनी ठरविले की, तुमचा वीज खरेदीचा दर एवढा असेल,

**(सभापतीस्थानी - तालिका सभापती डॉ.वसंत पवार)**

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ ST/ KGS/ प्रथम सौ. रणदिवे... 11:35

श्री. दिवाकर रावते....

पण वितरणाचा दर? हा व्यापार आहे. मी एखादी वस्तू खरेदी केल्यानंतर मी ती माझ्या ग्राहकांना कोणत्या पध्दतीने कशी विकावी हा विकणाऱ्याचा प्रश्न आहे. हे पब्लिक अंडरटेकिंग असल्यामुळे अर्थसंकल्पात तूट येऊ नये ही काळजी त्या बॉडीने जर घेतली नाही तर निश्चितपणे त्यांना जाब विचारता येतो. बी.ई.एस.टी.च्या अर्थसंकल्पातून जो काही नफा मिळतो त्या नफयामधून परिवहन सेवेचा तोटा भरून काढला जातो. मुंबईतील वीज ग्राहक मोठया प्रमाणावर बी. ई. एस.टी.ला जो निधी उपलब्ध करुन देतात त्यातून उपनगरातून जे 42 लाख प्रवाशी येतात त्यांच्या संदर्भातील तोटा भरुन काढण्याचे काम संपूर्ण शहरातील नागरिकांच्या खिशाला खार लावून केले जाते. संपूर्ण मुंबई शहरातील नागरिकांना त्याची मदत होते याबद्दल तक्रार नाही. परंतु मॉलला वीज स्वस्त दरात कशासाठी द्यावयाची? बाहेर बाजारात 500 रुपयात मिळणारा एक शर्ट मॉलमध्ये दोन हजार रुपयात विकला जातो. बाहेर साध्या दुकानात 25 रुपयात मिळणारी एखादी साधी वस्तू मॉलमध्ये 500 रुपयात विकली जाते. त्यांना लागणाऱ्या विजेपासून सगळया गोष्टी त्या किंमतीमध्ये आकारल्या जातात. त्या मॉलला वीज स्वस्त देणार? मुंबईमध्ये सर्वत्र लावण्यात येणारे होर्डिंग्सचे लाईट रात्रभर चालू असतात. सामान्य गरीब माणसाची, मध्यमवर्गीय माणसाची वीज ही गरज आहे. तो घरगुती वापराकरिता वीज वापरतो. तो व्यापारासाठी वीज वापरत नाही. अशा वेळी बी.ई.एस.टी. समितीला असे वाटले की, रहिवाशांकरिता, निवासाकरिता विजेचा दर अमुक असावा आणि व्यापाऱ्यांकरिता अमुक असावा तर ते ठरविण्याचा बी.ई.एस.टी. समितीचा अधिकार काढून आज मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मुंबई शहरवासियांच्या डोक्यावर प्रचंड विजेची दरवाढ करण्यात आलेली आहे. आम्ही जनतेकडे गेल्यानंतर लोक आम्हाला सांगतात की, आम्ही तुम्हाला निवडून दिले आहे हे तुमचे काम आहे आणि येथे प्रशासकीय अधिकारी सांगतात की, हा अधिकार मी तुम्हाला देणार नाही. मी हे ठरवतो, मी हे करतो, या मी पणामधून दुर्दैवाने मुंबईच्या लाखो रहिवाशांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे. कमविलेला अर्धा पगार बी.ई.एस.टी.ला द्यावा लागतो. घराच्या बाहेर पडल्यानंतर बसमध्ये बसल्यानंतर बसचे भाडे सुध्दा स्वस्त नाही. रोज त्याच्या घरातील मुलाबाळांपासून सगळयांच्या बसच्या प्रवासासाठी महिन्याला त्याच्या खिशातील दोन हजार रुपये जातात. अधिक हे विजेचे दरवाढीचे पैसे. म्हणून सामान्य माणूस जे काही कमवितो ते या बी.ई.एस.टी.ला द्यावयाचे अशी परिस्थिती या मुंबईत महागाईच्या बाबतीत निर्माण झालेली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

कोथंबिरीची जुडी पंधरा रुपयात परवडली पण वीज दरवाढ नको अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून सभापती महोदय, या माध्यमातून मला एवढाच मुद्दा मांडावयाचा आहे की, शासनाने यामध्ये हस्तक्षेप करावा आणि जर ही वीज दरवाढ अशाच प्रकारे कायद्याने राहणार असेल तर याच कायद्यात अशी तरतूद आहे की, यासाठी राज्य सरकारने अर्थसहाय्य पुरवावे. म्हणून या माध्यमातून माझी मागणी आहे की, वीज दरवाढ झाली तर त्याबाबतीत सरकारला सबसिडी देणे आवश्यक आहे. सर्वसामान्य माणसाला श्वास घेऊ देणे याकडे मायबाप सरकारला पहावे लागते, ती सर्वसामान्य माणसाची गरज असते. म्हणून सर्वसामान्य माणसाच्या हिताकरिता या दरवाढीला परवानगी द्यावयाची असेल तर बी.ई.एस.टी.ला दोनशे कोटी रुपयाचे अनुदान शासनाने द्यावे आणि 100 ते 150 कोटी रुपये महापालिकेने अनुदान द्यावे. अशा प्रकारे या 350 ते 400 कोटी रुपयाच्या अनुदानातून सर्वसामान्य माणसाच्या कमाईतील अर्धा हिस्सा हिसकावून घेतला जातो तो थांबवावा. या दरवाढीपासून सर्वसामान्य नागरिकांना वाचवावे अशा प्रकारची विनंती करतो आणि मी जे नमूद केलेले आहे त्याबाबतीत योग्य ती समज संबंधित सनदी अधिकाऱ्यांना द्यावी आणि लोकशाहीचा गळा गोठला जाणार नाही, याची काळजी घ्यावी अशी सूचना करतो. वीजदरवाढीच्या संदर्भातील टॅरिफ ठरविण्याचा अधिकार निवडून आलेल्या समितीला आहे. तो त्यांना पुन्हा द्यावा अशा प्रकारची विनंती माननीय सभापती महोदय, आपल्या माध्यमातून माननीय मंत्रिमहोदयांना करतो आणि आपली रजा घेतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, या राज्यामध्ये भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाल्यासारखे वातावरण आज तरी आहे. माझ्या आधी बोललेल्या सर्व सदस्यांनी महागाईच्या संदर्भातील आकडेवारी याठिकाणी सांगितलेली आहे. त्यामुळे मी त्याबाबतीत जास्त वेळ घेणार नाही. कोथिंबीर महागलेली आहे. टोमॅटो महागलेले आहेत. संपूर्ण भाजीपाला खरेदी करण्याची सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीयांची आर्थिक कुवत सध्या नाही. पण प्रत्यक्ष शेतकऱ्यांना तो भाव मिळतो काय? काथिंबीर, टोमॅटो किंवा भाजीपाला जे शेतकरी पिकवतात त्या शेतकऱ्याला त्याची किंमत मिळत नाही. मधले दलाल मोठया प्रमाणात दलाली करुन महागाई वाढवत आहेत.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .. .. ..

सभापती महोदय, यावर या शासनाचे नियंत्रण राहिलेले नाही. ज्यासाठी आपण मार्केटींग कमिट्या निर्माण केल्या ते दलालांचे अड्डे झालेले आहेत. माझा शासनाला सवाल आहे की, या ठिकाणी मिळणारा सगळा भाजीपाला आणि तो उत्पादन करणारा शेतकरी यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी अभ्यास केलेला आहे काय ? या अधिवेशनाला येत असताना मी माझ्या पत्नीला घेऊन येतो. नागपूरला भाजीपाला चांगला मिळतो म्हणून माझी पत्नी हौसेने नागपूरला येते. सकाळी 5.00 वाजता उठून ती मार्केटमध्ये भाजीपाला आणण्यासाठी जाते. परंतु या वर्षी तिची हिंमतच होत नाही. मी या ठिकाणी दहा-वीस लोकांचे जेवण घेऊन येतो. माझी पत्नी ते जेवण बनवते परंतु या वर्षी वांगी, मटार या भाज्या महाग झालेल्या आहेत. काही सन्माननीय सदस्य माशांबाबत उल्लेख करीत आहेत. मासे सुध्दा महाग झालेले आहेत. त्यामध्ये सुध्दा दलाली आहे. हा विषय चेष्टेचा नाही. या ठिकाणी शासनाचे अधिकारी आणि दलालांचे रॅकेट निर्माण झालेले आहे. सन्माननीय सदस्य माशांचा उल्लेख करीत आहेत म्हणून सांगू इच्छितो की, समुद्रात 12-12 वाव अंतरावर जाऊन आम्ही मासे पकडतो परंतु पश्चिम महाराष्ट्रातील लोक येऊन दलाली करतात. आमच्या माणसांना माशांचा भाव मिळत नाही. या प्रस्तावाच्या विषयाला जोडून हा विषय असला तरी मी या ठिकाणी वेगळ्या विषयावर बोलण्यासाठी उभा आहे. या ठरावाच्या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देत असताना ठोसपणे सांगितले पाहिजे की, आम्ही ही दलाली संपविण्याचा प्रयत्न करु. आम्ही प्रत्यक्ष उत्पादकाला खऱ्या अर्थाने न्याय देऊ. ही आमची शासनाच्या वतीने या ठरावाच्या निमित्ताने अपेक्षा आहे.

सभापती महोदय, आमच्या कोकणामध्ये भात हे एकमेव पीक आहे. इतर भागामध्ये दोन तीन पिके घेतली जातात. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते जे म्हणाले ते खरे आहे की, आपल्याला मागावून शिल्लक राहिलेले खाते दिलेले आहे. माझी आणि आपली लढाई होणार आहे. हा भात एकाधिकार पध्दतीने मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून खरेदी केला जातो. त्या खरेदीची केंद्रे कधी सुरु होतात ? सन्माननीय सदस्य श्री. मानकर साहेब, आपल्याकडे विदर्भामध्ये भात खरेदीची केंद्रे कधी सुरु झाली मला माहीत नाही परंतु कोकणामध्ये गेल्या आठवड्यापर्यंत भात

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ...

खरेदी केंद्रे सुरु झालेली नव्हती. त्या ठिकाणी भात खरेदी केंद्रे सुरु झाली नाहीत म्हणून व्यापारी कमी दराने शेतकऱ्यांकडून भात खरेदी करतात आणि तोच भात ते व्यापारी शेतकऱ्याचा खोटा दाखला देऊन मार्केटिंग फेडरेशनच्या केंद्रावर आणि सबएजन्टकडे विकतात. यावर शासन नियंत्रण ठेऊ शकत नाही काय ? मी सभागृहामध्ये मोघम बोलत नाही. मी पंधरा ते वीस वर्षे मार्केटिंग फेडरेशनमध्ये काम करीत आहे. माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आपले पिताजी आता त्या ठिकाणी चेअरमन आहेत परंतु मी त्यांच्यापेक्षा सिनियर आहे. ते या वर्षी चेअरमन झालेले आहेत परंतु मी 20 वर्षे ते कामकाज जवळून पाहात आहे. त्यावर आपले नियंत्रण आहे की नाही ? त्यावर आपल्या खात्याचे नियंत्रण आहे की नाही ? ही यंत्रणा आपण निर्माण करणार की नाही ? त्या ठिकाणी प्रत्यक्षात काय घडते याबाबतीत आपण काय निर्णय घेणार आहात हे या ठिकाणी सांगितले पाहिजे. आमच्याकडें सप्टेंबर महिन्यापासून भाताचे पीक येण्यास सुरुवात होते आणि खरेदी केंद्रे ऑक्टोबर ते डिसेंबर या महिन्यात सुरु होतात. त्यामुळे महागाई वाढणार नाही काय ? जाणूनबुजून दलाल ही यंत्रणा उभी करीत आहेत आणि त्याचा पाठपुरावा करीत आहेत. ते सर्व बंद करण्याचे काम शासनाने तातडीने करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी बोगस रेशन कार्डबाबत सांगितले.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ पूर्वी श्री.बरवड 11:45

श्री.जयंत प्र.पाटील...

सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री.अजितदादा पवार येथे असते तर बरे झाले असते. त्यांच्या उपस्थितीत मला माझे विचार व्यक्त करावयाचे होते. सभापती महोदय, आता मी जे बोलणार आहे ती माझी प्रतिक्रिया नाही. काँग्रेस पक्षाचे एक खासदार श्री.सुरेश कलमाडी यांचे मत आहे. पुणे महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीपूर्वी किती बोगस रेशन कार्डे दिली गेली ते समोर आले आहे. श्री.तटकरे हे कॅम्प भरवून बसले होते. पुणे जिल्हयातील या प्रकाराबाबत सन्माननीय राज्यमंत्री श्री.रमेश बागवे यांचीच तक्रार होती. परंतु आता ते मंत्री झ ाल्यामुळे बोलणार नाहीत. नवी मुंबई व पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या काळात एक खासदार जाहीररित्या बोलले की, बोगस रेशन कार्डांची मतदानासाठी नोंदणी केली गेली. बारामतीमध्ये असलेले जयंत पाटील यांचे नाव कसबापेठ मतदार संघामध्ये सुध्दा असते. ही किमया कशी व कोणी केली ? या कटामध्ये कोणते अधिकारी सामील आहेत, कोणत्या अधिकाऱ्यांनी ही डबल रेशन कार्डे नोंदविली ? या प्रकाराची शासनाने चौकशी केली पाहिजे. त्याचप्रमाणे या रेशन कार्डांचा केवळ मतदानासाठी वापर करण्यात आला असे नाही तर रेशन धान्याचा कोटा वाढवून घेऊन तो माल काळया बाजारात विकला जात आहे. राज्यामध्ये हे मोठे रॅकेट निर्माण झ ालेले आहे. सभापती महोदय, रॉकेलच्या काळया बाजारासंबंधी मी सभागृहात अनेक वेळा बोललो आहे. रोहा तालुक्यामध्ये एका गावाची लोकसंख्या 800 असताना रेशन कार्डांची संख्या मात्र 1600 इतकी दिसून आली आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांना विचारतो की, या गोष्टीचा आम्ही पाठपुरावा करावयाचा नाही काय ? माझ्या या मुद्याचे आपण समर्थन करणार नाही का ? सभापती महोदय, माझा मतदार संघ अलिबागला जोडला गेल्यामुळे मी त्या संपूर्ण मतदार संघामध्ये फिरलो. त्यावेळी मला असे आढळून आले की, गावची लोकसंख्या 800, 900 अशी असताना रेशन कार्डांची संख्या मात्र 2000, 3000 इतकी आढळून आली आहे. याचे उत्तर मला मंत्रिमहोदयांकडून अपेक्षित आहे. मी हे जाहीरपणे सांगत आहे, माझ्याजवळ त्याबाबतचे पुरावे आहेत. मी यासंबंधी जिल्हाधिकारी व तहसीलदारांना भेटलो होतो. त्यांनी मला असे सांगितले की, जयंत पाटील आपण हे करु नये, आम्ही गोत्यात आल्यामुळे हे

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.जयंत प्र.पाटील...

केलेले आहे. अशाप्रकारच्या भ्रष्टाचारामुळे महागाई वाढणार नाही का ? या भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने यंत्रणा उभी केलेली आहे. परंतु भ्रष्टाचार हा शिष्टाचार होऊन बसलेला आहे. तरी देखील सत्ताधारी पक्षाकडून या शासनाची तरफदारी केली जाते. शासनाची बाजू घेतली जाते. त्याप्रमाणे राज्यात प्रत्यक्षात जनतेला अनुभव येत आहे काय, असा प्रश्न मी सत्ताधारी पक्षाला विचारु इच्छितो. प्रत्यक्षात सर्वसामान्य गरीब जनता महागाईने भरडली जात आहे, चिरडली जात आहे. खऱ्या अर्थाने महागाईवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी शासनाची आहे. दुर्दैवाने लोकशाही आघाडी पुन्हा एकदा सत्तेवर आली आहे. जनतेने या शासनाला पुन्हा सत्तेमध्ये बसविले आहे. परंतु दोन महिन्यातच लोकांना पश्चाताप झालेला आहे. आपण या सरकारला पुन्हा सत्तेत बसविल्याची चूक केली असे त्यांना वाटत आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री.हर्षवर्धन पाटील हे मला खुणावून सांगत आहेत की, आमचे सरकारला सहकार्य आहे. परंतु मी त्यांना सांगतो की, आमचे सरकारला सहकार्य नाही. मी माझ्या पक्षाचा प्रमुख आहे. आम्ही पाठीवर वार करीत नाही, पोटावर वार करतो. वापर करुन फेकून देण्याचे आमचे धोरण नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी असे सांगत होतो की, सभागृहामध्ये आपले सहकार्य आहे. सरकारला त्यांचे सहकार्य आहे असे मी म्हटलेले नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रिमहोदय हे माझे मित्र आहेत. ते बोलण्यामध्ये माझ्यापेक्षा पटाईत आहेत. म्हणूनच ते 1995 पासून आजपर्यंत सत्तेमध्ये आहेत. सभापती महोदय, महागाईसारख्या महत्वाच्या विषयामध्ये राजकारण न आणता महाराष्ट्रातील 10-11 कोटी जनतेच्या शासनाकडून वेगळया अपेक्षा आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी खाजगीत राज्यात प्रचंड महागाई वाढल्याचे कबूल केलेले आहे. त्याच्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम शासनाने केलेले नाही. सुदैवाने राज्यात आणि केंद्रात आपल्याच पक्षाचे सरकार आहे. त्यामुळे केंद्रातील सरकार महागाईवर नियंत्रण ठेवू शकले नाही असे राज्य शासनाला म्हणता येत नाही.

यानंतर श्री.शिगम

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 11:50

(श्री. जयंत प्र. पाटील...)

पण ते मनापासून बोलल्यासारखे वाटले नाही. त्यांच्या बोलण्यामध्ये जोश वाटला नाही. तेव्हा या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या ठिकाणी जो ठराव आणलेला आहे त्याला समर्थन देऊन मी माझे भाषण संपवितो.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी महागाईच्या संदर्भात मांडलेल्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आताच सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा उपस्थित करुन सांगितले की, एका गावची लोकसंख्या 700 आहे, मात्र त्या गावातील रेशनिंग कार्डांची संख्या 2 हजार आहे. या महत्वाच्या मुद्याचा खुलासा करण्यासाठी माननीय मंत्री महोदय उठले नाहीत. परंतु त्याआधी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि अन्य सन्माननीय सदस्यांच्या भाषणातील मुद्दे खोडून काढण्यासाठी ते मध्ये मध्ये उठून खुलासा करीत होते. त्याप्रमाणे या रेशनिंग कार्डाच्या संदर्भात ते खुलासा करण्यासाठी उठले नाहीत. या बाबतीत ते आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा करतील अशी अपेक्षा मी व्यक्त करतो. मी दोन-तीन महत्वाच्या गोष्टींचा उल्लेख या ठिकाणी करणार आहे. औषध विक्रीमध्ये प्रचंड प्रमाणावर नफा कमाविला जातो. औषधांची प्रोडक्शन कॉस्ट आणि एमआरपी यामध्ये फार मोठा फरक असतो. हा विषय वेळोवेळी राज्यापुढे आलेला आहे. कोणत्याही वस्तूपेक्षा औषधे ही प्रत्येक माणसाला महत्वाची असतात. या औषधांची प्रोडक्शन कॉस्ट प्रत्येक औषधावर लिहिली गेली पाहिजे. ती लिहिली जात नसल्यामुळे प्रत्येक औषधावर जवळ जवळ 200 ते 300 टक्के नफा कमाविला जातो. काही काही औषधे तर भरमसाठ किंमतीने विकली जातात. यावर प्रतिबंध घालणे आवश्यक आहे. माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी लातूरला असे सांगितले होते की, औषधांवर ऑक्ट्राय बसणार नाही. त्यासंबंधीचे परिपत्रकही निघाले होते. परंतु औषधावरील ऑक्ट्राय कधीच रद्द केला गेला नाही.

**तालिका सभापती (डॉ. वसंत पवार)** : या प्रस्तावामध्ये औषधांच्या किमतीसंबंधीचा उल्लेख नसल्यामुळे यासंबंधीचे उत्तर मंत्री महोदयांकडून मिळणार नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी हे सांगू इच्छितो की, 7 वर्षापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी औषधांच्या किंमती कमी करण्यासाठी औषधावरील ऑक्ट्राय रद्द करण्यासंबंधीची घोषणा केली होती आणि त्या घोषणेनुसार जी.आर.देखील काढण्यात आला होता. परंतु असे होऊन देखील औषधावरील ऑक्ट्राय रद्द करण्यात आला नाही. किंबहुना

.3...



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 11:50

(श्री. चंद्रकांत पाटील...

1 जानेवारीपासून काही अनुत्पादक वस्तू करातून वगळल्या. मात्र औषधे वगळण्यात आली नाहीत. या विषयी माननीय मंत्री महोदय आपल्या उत्तराच्या भाषणात खुलासा करतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, राज्यातील स्वस्तधान्य दुकानांच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, दारिद्रय रेषेखालील लोकांना स्वस्त धान्य मिळण्याची सोय स्वस्त धान्य दुकानामार्फत केली जाते. परंतु या दुकांनावर धान्याचा फक्त 25 टक्केच कोटा येतो. स्वस्त धान्य दुकानदार त्याच्या आर्थिक क्षमतेनुसार हे धान्य ठराविक टक्क्यामध्ये टप्प्या टप्प्याने उचलतो. या संदर्भात एका वर्षापूर्वी मी कोल्हापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा केली असता त्यांनी असे सांगितले की, स्वस्त धान्य दुकानदाराची धान्याचा संपूर्ण कोटा उचलण्याची क्षमता नसते आणि त्यामुळे तो 25 टक्के धान्य उचलतो आणि गावामध्ये सांगतो की एवढाच कोटा आलेला आहे. त्यानंतर उरलेला कोटा तो दोन-तीन टप्प्यामध्ये उचलून ते धान्य तो काळया बाजारात विकतो. कोल्हापूरच्या जिल्हाधिका-यांनी त्यावेळी, ज्या दुकानदाराची संपूर्ण धान्य कोटा उचलण्याची ऐपत नसेल त्याचे लायसन्स रद्द करण्याचा निर्णय घेतला पाहिजे असे सांगितले. मला वाटते त्या जिल्हाधिक-यांनी सुचविल्याप्रमाणे ज्या दुकानदारांची धान्याचा संपूर्ण कोटा उचलण्याची क्षमता नसेल त्यांचा परवाना रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला पाहिजे. तसेच त्या जिल्हाधि-यांनी असेही सांगितले की, स्वस्त धान्य दुकानांना किती कोटा वितरित करण्यात आलेला आहे ते त्या त्या गावातील प्रमुख 10 व्यक्तींना एसएमएस पाठवून कळविणार आहेत. ही त्यांची कृती स्वागतार्ह आहे. तेव्हा स्वस्त धान्य दुकानातून धान्याचे वाटप सुरळीत व्हावे यासाठी कोल्हापूरच्या जिल्हाधिका-यांनी ज्या काही गोष्टी केलेल्या आहेत त्या राज्यात सर्वत्र राबविण्यासंबंधीचा निर्णय शासनाने घ्यावा. यामुळे स्वस्त धान्य दुकानातील धान्याचा काळाबाजार होणार नाही.

दुसरे असे की, दूध बाजारामध्ये येईपर्यन्त त्याची किंमत खूप वाढलेली असते. दूध असो अथवा अन्य कोणतीही वस्तू असो, त्यांची पर्चेस कॉस्ट आणि एमआरपी यामध्ये फरक किती असावा

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील...

याचे गणित आपण करणार आहात की नाही हा महत्वाचा मुद्दा आहे. नुकताच महाराष्ट्र शासनाने एक निर्णय केला. सभापती महोदय, आपण सुध्दा संस्थाचालक आहात. आपल्यालाही हा प्रश्न जाणवला असेल. सर्वसामान्य ग्राहकांना जो विजेचा दर लागू होता तोच दर शैक्षणिक संस्थांना सुध्दा लागू होता. शैक्षणिक संस्था या कारखाने नाहीत. त्यांना महाराष्ट्र शासनाने विजेच्या वापराबाबत कमर्शियल रेट लागू केला. त्यामुळे शैक्षणिक संस्थांना वार्षिक 5 लाख रुपयांपर्यंत येणारे विजेचे बिल आता 10 लाखावर गेले आहे. सरकारने हे मान्य करावे की, शैक्षणिक संस्था व्यापारामध्ये मोडतात अन्यथा सामान्य ग्राहकाला घरगुती वापरासाठी जो वीज दर आकारला जातो, जो दर वर्षानुवर्षे शैक्षणिक संस्थांना सुध्दा लागू होता, तोच दर त्यांना पुन्हा लागू केला पाहिजे. 2004 पासून शासनाने वेतनेतर अनुदान देणे बंद केले आहे. शैक्षणिक संस्था वीज बिलांचा भरणा वेतनेतर अनुदानातून करीत होत्या. आता त्या संस्थांना कमर्शियल रेट लागू केल्यामुळे त्यांना भूर्दंड सहन करावा लागत आहे, हे अत्यंत चुकीचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जे मुद्दे मांडले त्या संदर्भात मंत्रीमहोदय जरुर खुलासा करतील अशी अपेक्षा व्यक्त करुन आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : माननीय सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते व इतर सदस्य यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे त्या संदर्भात माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सुरुवातीलाच हे सांगितले पाहिजे की, विरोधी पक्षाच्या बाजूने आलेला हा प्रस्ताव असला तरी त्यांच्या मनामध्ये सत्ताधारी पक्षाकडील सदस्यांनी बोलावे की नाही यासंबंधी संदिग्धता असल्याचे त्यांच्या भाषणावरुन दिसून येते. परंतु मला असे वाटते की, सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीने असलेल्या या महत्वाच्या प्रश्नावरील चर्चेमध्ये आपल्याला सहभागी होता आले आणि काही चांगल्या गोष्टी निदर्शनास आणून सुधारणा होण्याच्या दृष्टीने काही सहभाग देता आला तर जरुर द्यावा आणि विरोधी बाकावरचे सदस्य त्याचे स्वागत करतील असा मला विश्वास वाटतो. साधारणपणे राजकारण आणि अर्थकारण या दोन वेगळ्या गोष्टी मानल्या तर अर्थशास्त्राचा एक मुलभूत नियम असा आहे की, इतर सर्व परिस्थिती कायम असताना, other things being common असतील, बाकीच्या गोष्टी स्थिर आहेत अशाच वेळेला अर्थशास्त्राचा नियम लागू होऊ शकतो. उदाहरण द्यायचे झाले तर आपल्या हातात पैसे किती आहेत? आपल्याला काय काय खरेदी करायचे आहे आणि आपल्या डोक्यात त्या अगोदर खरेदीचे मूल्य काय आहे हे ठरवून बाजारात गेल्यानंतर आपल्या अपेक्षेपेक्षा मूल्य कमी जास्त असेल तर त्यामध्ये जो फरक येतो तशाच प्रकारची काहीतरी व्यवस्था आता या महागाईच्या निमित्ताने तयार होताना आपल्याला दिसते. या प्रस्तावामध्ये एसटी बस भाडयात वाढ, बेस्ट बस भाडयात वाढ, फी वाढ याचा उल्लेख असला तरी या सगळया घटकांवर होणारा खर्च आणि त्या खर्चाची मिळवणी करताना शासनाकडे असलेला अर्थपुरवठा यामधील ताळमेळ सांभाळण्याच्या दृष्टीने त्यामध्ये काहीतरी वेगळे विचार होत असतील. परंतु मला सर्वात महत्वाचे वाटते ते असे की, या प्रस्तावातील शासनाविरुध्द तीव्र असंतोष व संतापाची भावना पसरणे या वाक्यापेक्षा भाववाढ रोखून जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा सुव्यवस्थित होण्यासाठी उपाययोजना विचारात घेण्यात यावी हा भाग मला महत्वाचा वाटतो. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सभागृहात निकृष्ट प्रकारच्या डाळीचे सॅम्पल सादर केले आहे. या डाळीमध्ये भेसळ होते व ती वितरित केली जाते ही गोष्ट प्राथमिकता मानली तर या व्यवस्थेमध्ये काय चालले आहे याचे चित्र सभागृहासमोर उभे राहते. हे सर्व होत असताना याबाबतीत मानसिकता बदलण्याचा विचार शासनाने करावयास हवा.

(नंतर श्री.खर्चे..

श्री. हेमंत टकले ........

आणि ज्यावेळी विरोधी पक्षाकडून या गोष्टीतील त्रुटी दाखविल्या जातात त्यावेळी सत्ताधारी पक्षाकडून फक्त शासन यंत्रणेकडे बोट दाखविले तर आपली जबाबदारी संपली का असे विचारले तर त्याचे उत्तर निश्चितच नकारार्थी येईल. या सर्वांमध्ये महत्वाचा भाग म्हणजे या यंत्रणेचे नियंत्रण जर शासनाकडे आहे तर यामधील ज्या चुका आहेत, चुकीची कृत्ये करणारे जे लोक आहेत त्यांच्यावर जरब बसविण्याची व्यवस्था देखील व्हायला हवी. त्याचबरोबर काही छोट्या छोट्या ठिकाणी बसून उपक्रम राबविले जातात त्यातून त्या त्या पातळीवर त्या त्या भागातून या समस्येला सामोरे जाण्यासाठी नवीन रस्ता दाखविला जातो. मघाशी आपण बोलताना उल्लेख केला की, आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्यात थेट घरापर्यंत धान्य पुरविण्याची योजना सुरु करुन असाच एक नवीन उपक्रम शासनाने चालू केला. त्यानुसार केवळ एक-एक महिनाच नाही तर तीन-तीन आणि सहा-सहा महिन्याचे धान्य सुध्दा घरात भरुन ठेवता येते अशी ही योजना आहे. ती योजना अंमलात आणून प्रामाणिकपणे राबविली गेली तर यंत्रणेवरील बराचसा ताण कमी होऊ शकतो आणि टंचाई देखील कमी होऊ शकते. यामध्ये शासन यंत्रणा, अधिकारी किंवा कर्मचारी काम करीत असतात परंतु जेव्हा महागाईचा प्रश्न, सर्वसामान्य जनतेचा जीवनमारणाचा प्रश्न होतो त्यावेळी ही पी.डी.एस. व्यवस्था चांगल्या प्रकारे राबविली जाते की नाही यावर सुध्दा शासनाने अंकुश ठेवायला हवा. मग त्यात केवळ अन्न व नागरी पुरवठा खाते फक्त फ्लाईंग स्क्वॉड काम करु शकते अथवा नाही एवढेच नाही. आज आपल्याकडे होमगार्ड नावाची एक संघटना आहे व ती संघटना सुरक्षेसाठी पोलिसांना मदत करण्याचे काम करीत असते. तसेच अपघात झाल्यानंतर अथवा नैसर्गिक आपत्ती येते त्यावेळेस ही संघटना उपयोगात येते. माझी या निमित्ताने अशी सूचना आहे की, या होमगार्ड संघटनेला रेशन दुकानावरील धान्य साठा वेळेत येतो की नाही, त्याचे वितरण योग्य वेळेत होते किंवा नाही अशा कामामध्ये सुध्दा सहभागी करुन घेता येईल काय याबाबत शासनाने विचार करावा. तसेच दररोजची भाजी आणणे ही जबाबदारी घरातील महिला वर्गाची आहे. शासन महिला बचत गटांना प्रोत्साहन देते. त्यांच्या माध्यमातून ही एक सार्वजनिक जबाबदारी समजून अशा महिला बचत गटांना या पी.डी.एस. मधील यंत्रणेवर नियंत्रण ठेवण्याचे काम देता येईल काय किंवा या

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .......

माध्यमातून काही स्वयंसेवक हे काम करण्यास तयार करता येतील काय याचाही विचार करावा. अशा बचत गटांमध्ये काम करणाऱ्या महिला अथवा आपण तयार केलेले स्वयंसेवक त्या त्या भागातील रेशन दुकानांवर जाऊन लक्ष घालतील काय याचाही विचार होणे आवश्यक आहे. बऱ्याच वेळा केंद्रशासन आणि राज्यशासनाचे कृषी मंत्री काय म्हणाले त्याचा उपयोग आपण जरुर करुन घेतो. तसेच माननीय श्री. गिडवानी साहेबांबद्दल सुध्दा येथे उल्लेख झाला की ते अनेक ठिकाणी फिरुन येत असतात आणि पत्रकार परिषदा घेत असतात. परंतु या क्षेत्रातील वास्तविकता काय आहे, या देशातील अन्नधान्याचे उत्पादन आणि वितरणाच्या योजनेची सद्य:स्थिती काय आहे, पुढील दोन महिन्यानंतर काय बदल होणार अथवा पुढील वर्षी काय परिस्थिती होणार आहे तसेच नैसर्गिक ऋतुचक्रातील बदलांमुळे होणाऱ्या परिणामांमुळे धान्य उत्पादनावर होणारे परिणाम, त्याची साठवणूक, त्याचे वितरण आणि त्यावरील योग्य भाव त्याचबरोबर देशातील गोरगरीब जनतेला वाजवी दराने किंवा कमी दराने धान्य उपलब्ध करुन देणे अशी ही सगळी मांडणी असते आणि त्याचे पुरेसे भान न ठेवता उगाचच काही तरी पोकळ आश्वासन देण्यापेक्षा लोकांसमोर खरी परिस्थिती आणली तर गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन आपण त्याचा मुकाबला केला पाहिजे याबाबतच्या उपाययोजना करण्यासाठी प्रत्येक राज्यावर काही जबाबदारी असते. आपल्या राज्यात याबाबतीत पुष्कळ ग्राहक संख्या आहे आणि त्या सर्वांचा योग्य तो परिणामकारक उपयोग आपण करुन घेतो काय, तसेच यासंदर्भात शासनाला कोणते प्रयत्न करता येतील काय याचाही विचार व्हावा असे मला वाटते. प्रत्येक वेळेस या सर्व प्रस्तावाकडे पाहताना त्यातील सुधारणा, त्यातील बदल याबाबतीत आपल्याला लक्ष द्यायला पाहिजे. या निमित्ताने या सर्व गोष्टींचा आपण पुन्हा विचार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे. मला आठवते की जुन्या काळात रेडियोवर "सिलोन" नावाचे एक स्टेशन प्रसिध्द होते.....

यानंतर श्री जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

दर महिन्याच्या एक तारखेला "खुश है जमाना आज पहिली तारीख है, खुष है जमाना आज पहिली तारीख है" गाणं लागत असे. या एक तारखेचा आनंद सर्वसामान्य माणसाला इतका होता की, कमावता माणूस पैसे घरी घेऊन येईल व घरातील सगळी मंडळी पुढच्या आठवडया पर्यंत तरी खुश राहतील इतके त्यावेळी पहिल्या तारखेला महत्व होते. त्यामुळे या आघाडी शासनाने एक तारखेची खुशी लोकांपर्यंत पोहचवण्याचा संदर्भात जरुर तो विचार करावा अशी सूचना करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदविधर) : सभापती महोदय, महागाईच्या संदर्भात मी माझ ो विचार थोडक्यात मांडणार आहे. आज महागाई किती वाढली आहे यासंदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात विचार मांडलेले आहेत. माननीय फुंडकर साहेबांनी महागाईच्या संदर्भात जो प्रस्ताव या ठिकाणी मांडलेला आहे त्याचे विवेचन त्यांनी या ठिकाणी चांगल्या प्रकारे केलेले आहे. या वाढत्या महागाईवर कशा प्रकारे मात करावी यासंदर्भात माननीय डॉ. वसंत पवार साहेबांनी तसेच सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी विचार व्यक्त केलेले आहेत. आपण काल टीव्ही वरुन बघितलेच असेल की, अंधेरी मधील चकाला गावठाण येथे रेशनींगचा सडका गहू घेऊन जातांना ट्रक पकडला गेला आहे. शिवसेनेचे उपविभाग प्रमुख श्री. सुभाष सावंत यांनी या सडक्या गव्हाचे सॅंपल आपल्याकडे पाठविलेले आहे. या गव्हामध्ये उंदराच्या लेंडया, अळया, कचरा तसेच खडे सुध्दा आहेत. पोलीस यासंदर्भात संबंधितांवर जरुर कारवाई करतील आणि नेहमी प्रमाणे सर्व काही ॲडजस्ट होईल, पैसेही मिळतील आणि पैसे खाल्लेही जातील आणि नेहमी प्रमाणे भ्रष्टाचार देखील होईल. या ठिकाणी पकडण्यात आलेल्या गव्हाचे जे सॅंपल आणलेले आहे ते मी आपल्याकडे पाठवितो. या सडक्या गव्हाच्या पोळया जनता कशी खाते आणि कशी जगते याचा आपण विचार करावा असे मला वाटते. शेवटी यासंदर्भात शासनाचीच सामुहिक जबाबदारी आहे, हे शासनाने विसरु नये. त्यामुळे या सडक्या गव्हाच्या बाबतीत शासन काय कारवाई करणार आहे? संबंधित रेशन दुकानदारावर कोणती कारवाई केली जाणार आहे? याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, शालेय फीच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. सामान्य माणसाला अन्नधान्य, भाजी तसेच अंडी खायला मिळत नाहीत तसेच वाढत्या महागाईमुळे प्री स्कूल फी भरणे सुध्दा कठीण होऊन बसलेले आहे. सामान्य माणूस आपल्या मुलाची शैक्षणिक फी सुध्दा आज भरु शकत अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे सामान्य माणूस आपल्या मुलांना शाळेत पाठवू शकत नाही अशी स्थिती आहे. मुंबईतील किड स्कूलची वर्षाची एकूण फी किती आहे याची काही आकडेवारी मी येथे देऊ इच्छितो. सिंधानिया हायस्कूलची फी 20 ते 35 हजार, लिटील फ्लॉवर 20-25 हजार, किडस् हायस्कूल 28-40 हजार, सरस्वती हायस्कूल 25 ते 40 हजार आणि हॅलो किडस्ची फी 28 ते 50 हजार रुपये इतकी आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 12.10

डॉ.दीपक सावंत ...

सभापती महोदय, एवढी फी देऊन मुलांना प्री स्कूलमध्ये शिकवावयाचे असेल तर ज्यावेळी हा मुलगा एसएससीपर्यत जाईल त्यावेळी त्याची फी किती होईल, त्याच बरोबर जेव्हा तो उच्च शिक्षण घेण्यासाठी कॉलेजमध्ये जाईल त्यावेळी त्याची फी किती होईल. याचा विचार केला पाहिजे. मुंबईतील उच्च शिक्षण हे केवळ मुंबईतील वा महाराष्ट्रातील सर्वात महागडे शिक्षण आहे असे नाही तर संपूर्ण देशातील ते महागडे शिक्षण आहे. अशा प्रकारचा अहवाल नॉलेज कमिशनने दिला होता. श्री.राजेश टोपे हे त्यावेळी या विभागाचे मंत्री होते. महाराष्ट्रातील उच्च शिक्षण हे सर्वात महागडे आहे अशा प्रकाराचा अहवाल नॉलेज कमिशनने दिला होता तेव्हा याबाबतीत शासन निश्चित कोणती कार्यवाही करणार आहे ?

सभापती महोदय, शासनाने माजी शिक्षण सचिव श्रीमती कुमुद बन्सल यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती त्या समितीने आपला अहवाल शासनाकडे सादर केला होता ही समिती कशासाठी नेमण्यात आली होती व त्या समितीमध्ये कोण कोण होते ? या समितीमध्ये सगळे संस्था चालक होते तसेच ब्युराक्रॉटसही होते. ही समिती कशासाठी नेमण्यात आली होती ? फी रेग्युलेटीग समिती नेमण्यासाठी ही समिती नेमण्यात आली होती परंतु त्यानी ही समिती नेमली नाही तर त्यांनी फीमध्ये वाढ केली होती. 1972 की 1974 सालातील सुप्रीम कोर्टाचा असा निर्णय आहे की,शाळेचे जे संचालक असतील वा जी कोणती ॲथॉरिटी असेल त्यानी विना अनुदानित शाळांची फी ठरवावी. याचाच फायदा सर्वाना मिळत आहे . परंतु पुन्हा एकदा सुप्रीम कोर्टाने असा निर्णय दिला आहे की, अशा प्रकारची फी ठरविण्याचा त्यांना अधिकार नाही. खाजगी शाळांची फी वाढविण्याचा अधिकार शासनालाच आहे.या बाबतीत माझ्याकडे वर्तमानपत्रातील कात्रण असून त्यात असे म्हटलेले आहे की, "सर्वोच्च न्यायालयाचा पुनरुच्चार : 2004 साली दिलेल्या निर्णयावर शुक्रवारी पुन्हा शिक्कामोर्तब करीत असतांना सर्वोच्च न्यायालयाने खाजगी शाळातील फी ठरविण्याचा अधिकार फक्त शासनालाच असल्याचे स्पष्ट केले आहे.कोणतीही खाजगी शाळा स्वत:च्या मर्जीनुसार शाळेची फी वाढवू शकत नाही असे सांगत न्यायालयाने खाजगी शाळा चालकांना फटकारले. हे जर असत्य असेल तर आपण संबंधिताविरुध्द कारवाई करावी. आता शासन फी रेग्युलॅरिटी ॲथॉरिटी निर्माण करीत आहे तेव्हा त्याचा नेमका स्कोप काय आहे आणि



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ...

ही ॲथॉरिटी कशासाठी निर्माण करण्यात येणार आहे ? ही फी खरोखर रेग्युलराईज करण्यात येण्ार आहे काय आणि गरीब विद्यार्थ्याकडे जर मेरिट असेल तर त्यांना चांगल्या शाळांमध्ये शिक्षण मिळणार आहे काय असा माझा माननीय मंत्र्यांना प्रश्न आहे. जर ही बाब त्या स्कोपमध्ये नसेल तर माननीय मंत्रीमहोदयांनी त्याबाबतीत माहिती घ्यावी व या प्रश्नाचे उत्तर द्यावे असे मला त्यांना सांगावयाचे आहे. सभापती महोदय, काल सुध्दा या संदर्भात एक मोर्चा काढण्यात आला होता. फी वाढीच्या विरोधात मुंबईमध्ये दादर येथे एक मोठे आंदोलन झाले होते. तेव्हा यासबंधीची माहिती माननीय मंत्री महोदयांनी घ्यावी आणि शासनाची भूमिका स्पष्ट करावी. कुमुद बन्सल समिती मोठी की फी रेग्युलरिटी ॲथॉरिटी मोठी यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. अशी माझी त्यांना विनंती आहे. महाराष्ट्रातील सर्व मेट्रोपोलिटन सिटीमधील जनता आपल्या निर्णयाकडे लक्ष ठेवून आहेत.

सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो. जयहिंद जय महाराष्ट्र.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ KGS/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे ़12.10

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांनी संगितले की, एका एका मतदारसंघात उमेदवारांनी 20 कोटी रुपये खर्च ्केले होते. अर्जुन सेन गुप्ता यांनी जो अहवाल दिला होता त्या अहवालात त्यांनी असे म्हटले होते की, "देशातील 83 कोटी जनता अर्धपोटी राहते आणि त्यांचा रोजचा खाण्याचा खर्च फक्त 20 रुपये आहे. "एका बाजूला निवडणुंकीमध्ये एका एका मतदारसंघात 20 कोटी रुपये खर्च करणारे उमेदवार आहेत आणि दुस-या बाजूला 83 कोटी जनता खाण्यावर फक्त 20 रुपये खर्च करुन झोपत आहे. देशाचे इतके भयाण वास्तव आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मी पुण्याचे एक उदाहरण देतो. पुण्यातील आरोग्य सेनेने पुण्यातील कष्टकरी जनतेची एक पहाणी केली होती त्याकडे मी माननीय मंत्रिमहोदयांचे मुद्दाम लक्ष वेधू इच्छितो.डॉ.बाबा आढाव हमालांची एक संघटना चालवत असून त्यां हमालांचा रोजचा खाण्यापिण्याचा खर्च किती आहे हे या संस्थेने शोधून काढले होते . हा सर्व वर्ग दारिद्रय रेषेखालील नाही. दारिद्रय रेषेच्या वरचे उत्पन्न असलेला हा वर्ग आहे . या कष्टकरी वर्गाचे दरडोई उत्पन्न 1165 रुपये असून कुटुंबाचे एकूण उत्पन्न 5 हजार 782 रुपये आहे परंतु सकाळच्या चहा पासून ते रात्रीच्या जेवणापर्यतचा त्यांचा खर्च त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या तुलनेने खूपच कमी आहे.

नंतर श्री.सुंबरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ ST/ KGS/ श्री. गायकवाड नंतर --- 12:15

श्री.कपिल पाटील ...

म्हणजे 49 बिंदू आणि वर काही इतकाच खरा आकडा आलेला आहे. हीच स्थिती महाराष्ट्रातसुद्धा असेल, सभापती महोदय, हे केवळ पुण्याचे चित्र नाही पण पुण्याची पाहणी केल्यानंतर असे लक्षात आले की, हे चित्र राज्यातील सगळ्या कष्टकरी वर्गाचे असेल तर या महागाईने गरीबाचे काय हाल झाले असतील हे सांगण्यासाठी वेगळे असे आकडे देण्याची गरज नाही. सभापती महोदय, बी.पी.एल.ची जी व्याख्या आहे त्यानुसार ग्रामीण भागामध्ये 450 रूपये आणि शहरी भागामध्ये 550 रूपये खर्चाची मर्यादा घातलेली आहे. त्याच्यापेक्षाही खालचे आकडे आणि शहरी भागातील ज्याचे उत्पन्न ठरलेले आहे, आणि जो बीपीएल खालील नाही त्यांची ही स्थिती आहे. सभापती महोदय, माणसाला एकंदर किती कॅलरीज लागतात ? शहरी भागामध्ये माणसाला साधारणत: 2100 कॅलरीज आणि ग्रामीण भागामध्ये 2400 कॅलरीज रोज लागतात. ज्यांचा सर्व्हे करण्यात आला त्यांच्या कॅलरीज दर माणशी 1238 इतक्या आहेत. म्हणजे जेवढ्या कॅलरीज तुम्हाला कमीत कमी हव्या आहेत त्यापेक्षाही निम्म्याने ग्रामीण आणि शहरी भागातील कष्टकरी माणूस कॅलरीज घेतो आणि इतक्या कमी कॅलरीज घेतल्यानंतर तो माणूस एखाद्या रोगाला बळी पडणार नाही, आजाराला बळी पडणार नाही तर मग आणखी कशाला बळी पडणार आहे ? ज्यावेळेस महागाई वाढता तेव्हा सगळ्याच गोष्टींवरील खर्च हा हळूहळू कमी व्हायला लागतो. माणूस मग त्यासाठी आपल्या खाण्यावरील खर्च कमी करतो, कपडेलत्त्यावरील खर्च कमी करतो, शिक्षणावरील खर्च कमी करतो. एकदा खर्च कमी व्हायला लागले त्याचा परिणाम त्याच्या आरोग्यावर होतो पण मग औषधपाण्यावरील खर्च देखील तो कमीच करतो. तसेच तुमचे राहणीमान देखील इतके घटत जाते की, रोगांना आणि आजारांना आपले घर आमंत्रण द्यायला लागते. अस्वच्छता वाढते. आज राज्यातील रोगराईचे जे थैमान आहे, डासांचे थैमान आहे त्याला जितकी अस्वच्छता जबाबदार आहे तितकीच महागाई देखील जबाबदार आहे याकडे मला या सरकारचे लक्ष वेधावयाचे आहे. सभापती महोदय, या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांकडे केवळ तीन मागण्या करणार आहे. ज्या पद्धतीने आरोग्य सेनेचे अभिजित वैद्य यांनी पुण्यात हा सर्व्हे केला त्या पद्धतीने महाराष्ट्रातील तमाम कष्टकऱ्यांचा, ज्यांचे उत्पन्न दारिद्र्य रेषेखालील नाही, त्यापेक्षा थोडे वरचे आहे अशा सर्व कष्टकऱ्यांचे तुम्ही सर्वेक्षण करून घ्या. त्यासाठी एखाद्या मान्यवर संस्थेकडे आपण हे काम द्या, आणि त्यांच्याकडून ग्रामीण व शहरी भागातील किमान सॅम्पल्स काढले तर आपल्याला महाराष्ट्रातील नेमके चित्र काय आहे हे लक्षात येईल.

.... व्ही 2 ..

श्री.कपिल पाटील ..

सभापती महोदय, महागाईचा दुसरा परिणाम जो होत असतो तो बालकामगारांच्या संख्या वाढीवर होत असतो. आताच माझ्याशी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील बोलत असताना म्हणाले की, रायगड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर मुली मुंबईमध्ये घरकाम करण्यासाठी येत असतात. यांचे वयोमान 18 ते 16 वर्षे आहे. साधारणपणे 16 वर्षे वयोगटापेक्षा खालील मुली जेव्हा घरकाम करण्यासाठी मुंबईत येतात तेव्हा त्या कोठेही राहण्यास तयार असतात. एका बाजूला आपण असेही म्हणतो की, या मुली शिक्षणात त्या काळात असल्या पाहिजेत, बालकामगारांची पद्धत संपली पाहिजे असे म्हणतो, त्याचवेळेस दुसऱ्या बाजूला मोठ्या संख्येने अशा मुली आपले शिक्षण सोडून, घरदार सोडून शहरात काहीही काम करण्यास तयार होतात ते हे चित्र किती वाईट आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. म्हणून त्यांच्या संदर्भात काही तरतूद करणे आवश्यक आहे असे मला येथे आवर्जून सांगितले पाहिजे. तिसरा महत्त्वाची मागणी अशी आहे की, आपली गरीबीची जी व्याख्या आहे, त्या संदर्भात तेंडुलकर समितीदेखील आहाराच्या बाबतीत आता फेरविचार करू लागली आहे. केंद्र सरकार जेव्हा ही व्याख्या बदलेल तेव्हा बदलेल. परंतु महाराष्ट्र सरकारने या बाबतीत काही पावले उचलणे आवश्यक आहे. आज एखाद्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 15 हजाराच्या खाली असेल त्याला तुम्ही सगळ्या सवलती देता. म्हणजे तुम्ही रेशनवर कितीही काहीही पुरविले तरी ही माणसे जास्त खाऊ शकत नाहीत. याचे कारण आपले सगळे खर्च तो मर्यादित करून आपल्या मुलाबाळांच्या भविष्यासाठी तरतूद करीत असतो आणि असे कोणताही पालक करीतच असतो. त्यासाठी प्रसंगी तो स्वत:च्या पोटाला चिमटा काढत असतो. त्यामुळेच ही जी तुमची 15 हजाराची व्याख्या आहे ती बदलून, वाढवून 1 लाख इतकी केली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी शिक्षणाच्या संदर्भात उल्लेख केला त्याप्रमाणे अंबानींच्या शाळेत काही त्याला आपल्या मुलांना घालायचे नाही पण ती मुले शाळेत टिकायची असतील आणि सरकारची फी माफीची सवलत देखील त्याला घ्यायची असेल तर 15 हजाराचे प्रमाणपत्र आता कोणीही देऊ शकत नाही. दारिद्र्यरेषेखालील माणूस देखील ते देऊ शकत नाही. म्हणून ही मर्यादा 1 लाख करण्याची आवश्यकता आहे. म्हणून आपण त्यादृष्टीने विचार करून ही मर्यादा वाढवावी अशी मागणी करून मी थांबतो. धन्यवाद.

***

..... व्ही 3 ..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरूण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी महागाईच्या महत्त्वाच्या विषयावर येथे चर्चा उपस्थित केलेली आहे. प्रतिवर्षी विधानसभा असेल वा विधान परिषद असेल या सभागृहात किमान एक चर्चा तरी महागाईवर होते याचा अर्थ असा होतो की, दरवर्षी महागाई वाढत आहे आणि ही वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे. पण सन् 2009 आणि 2010 या दोन वर्षात विचित्र अशी परिस्थिती होती. अमेरिकेमध्ये मंदी आली त्याचा परिणाम महाराष्ट्रात, हिंदुस्थानात होईल. देशातदेखील मंदी येईल. अशा पद्धतीने अर्थशास्त्रज्ञ वगैरे त्याची चर्चा करायला लागले आणि आपण पाहतो की, देशात हा जो भाववाढीचा निर्देशांक हा कमी होत गेला. तो इतका कमी होत गेला की, मायनस झाला. म्हणजे एकीकडे महागाईचा निर्देशांक मायनस होतो आहे ....

( यानंतर श्री.सरफरे .... डब्ल्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

आणि दुसरीकडे बाजारात महागाई वाढत आहे अशाप्रकारचे चित्र निर्माण झाले. अशाप्रकारचे विचित्र चित्र दिसत आहे. निर्माण झालेली महागाई ही किचन बजेटच्या संदर्भातील आहे. दुसऱ्या वस्तूंची भाववाढ झालेली नाही. कदाचित ती भाववाढ कमी झाली असेल, परंतु ती भाववाढ खाद्य पदार्थ, डाळी, गहू, तांदूळ, कडधान्य, कांदा-बटाटा या वस्तूंची झाली. त्यामुळे सर्वसामान्य माणसाला फटका बसला ही वस्तुस्थिती आहे. आणि म्हणून मध्यंतरी अशी सूचना आली की, तुम्ही निर्देशांक काढीत असतांना स्वयंपाकासाठी लागणाऱ्या वस्तूंचा वेगळा निर्देशांक काढा. त्यामुळे महत्वाची बाब अशी की, सर्वसामान्य माणसाला जीवन जगण्यासाठी ज्या वस्तू लागतात, त्या वस्तूंच्या महागाईचा निर्देशांक वेगळया पध्दतीने काढावा. त्या वस्तूंची भाववाढ कां झाली? आणि ती आपल्याला कशापध्दतीने कमी करता येईल याचा आपण विचार केला पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी फार महत्वाचा मुद्दा मांडला आहे. महागाईचा निर्देशांक वेगळा तयार करण्यात यावा असे त्यांनी सुचविले आहे. ही बाब केंद्र सरकारच्या अखत्यारीतील आहे, केंद्र सरकारमध्ये माननीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार साहेबांच्या अखत्यारीतील आहे. ही बाब राज्य सरकारच्या अधिकारातील नसल्यामुळे हे राज्य शासन वेगळा निर्देशांक काढू शकत नाही, किंवा त्याबाबत निर्णय घेऊ शकत नाही. कॉंस्टिटयुशनल लिस्टप्रमाणे निर्णय घ्यावयाचा आहे, हा सेंट्रल लिस्टमधील विषय असल्यामुळे तो केंद्र सरकारचा विषय आहे. त्यामुळे माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी मांडलेली सूचना राज्य सरकारने स्वीकारुन ही महागाई वाढण्यासाठी केंद्रातील जे मंत्री जबाबदार आहेत त्यांच्याकडे पाठविली तर ही महागाई कमी होईल. तशाप्रकारची शिफारस राज्य शासनाने केली तर बरे होईल.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, एका अभ्यास गटाने महागाई वाढण्याच्या संदर्भात जी प्रमुख कारणे शोधली आहेत. त्यामध्ये वाढती लोकसंख्या हे देखील एक कारण आहे, उत्पन्नामध्ये झालेली वाढ हे देखील कारण आहे. रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांची मजूरी पूर्वी 60-70 रुपये होती ती आज 100-120 रुपयांवर गेली. त्याचप्रमाणे आपल्या उपभोगाच्या पध्दतीमध्ये झालेला बदल, खनिज तेलाच्या किंमतीमध्ये वाढ झाली, पेट्रोल, डिझेलच्या किंमती वाढल्या, वीजेच्या दरामध्ये वाढ झाली, वहातुकीच्या दरामध्ये वाढ झाली. आणि कृषी वस्तूंच्या किमान किंमतीमध्ये वाढ झाली. गव्हाचे आणि तांदुळाचे भाव केंद्र शासनाने वाढविले.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

श्री. अरुण गुजराथी..

मानननीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी शेतकऱ्यांना न्याय देण्याकरिता हे दर वाढविले. आपल्या काळात गव्हाची किंमत 5 रुपये होती ती 10 रुपयांवर गेली, त्याचप्रमाणे तांदळाच्या किंमतीमध्ये वाढ झाली. सभापती महोदय, मी याठिकाणी राजकीय भाषण करीत नाही. परंतु याबाबत आपण गंभीरपणे विचार केला पाहिजे. ज्या पध्दतीने महागाई वाढली,त्याची जी कारणे आहेत ती निश्चितपणे आहेत. कांदा महाग झाला, याचे कारण आंध्र प्रदेश, कर्नाटक व महाराष्ट्रामध्ये अतिवृष्टी झाली. तो केंद्रसरकार किंवा राज्य सरकारच्या धोरणांमुळे महाग झाला नाही. बटाटा महाग झाला. कारण बिहार, उत्तर प्रदेश व पश्चिम बंगालमध्ये या राज्यांमध्ये अतिवृष्टीमुळे बटाटयाचे पिक आले नाही. म्हणून मी मंत्रिमहोदयांना विनंती करतो की, आपल्याला बटाटयाचा बफर स्टॉक करुन ठेवता येईल काय? भाज्या व हिरव्या भाज्या महाग झाल्या. हे सर्व अवकाळी पावसामुळे झाले. निसर्गाची माया, निसर्गाची दया, निसर्गाची नजर, निसर्गाची लहर यामुळे भाज्या महाग झाल्या. आपण बटाटयाचा बफर स्टॉक करुन  ठेवू शकतो काय तसेच त्याप्रमाणे कांद्याचे देखील आपण निर्जलिकरण करुन ठेवू शकतो कां याचाही विचार करावा. ज्यावेळी कांदे बटाटयाचे भाव कमी होतात त्यावेळी आपण मार्केट इंटरॅप्शन स्कीम आणतो. ज्यावेळी फार महागाई वाढली त्यावेळी आपण मार्केट इंटरॅप्शन स्कीमचा अभ्यास केला पाहिजे असे मंत्रिमहोदयांना सांगितले. त्याचप्रमाणे आपण वेअर हाऊसिंग स्कीमचा देखील विचार केला पाहिजे. याठिकाणी माननीय सदस्य सांगत होते की ही वस्तू पोत्यामधून काढली आहे की, गोडावूनमधून केर काढून आणलेली आहे? हे आपण बघा. मी याबाबत कुणावरही हेत्वारोप करीत नाही. माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, त्यांनी माननीय सदस्यांना सोबत घेऊन नागपूरच्या एखाद्या गोडावूनमध्ये घेऊन जावे आणि तेथील गहू आणि तांदळाची काय परिस्थिती आहे ती पहावी.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KGS/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:25

श्री.अरुण गुजराथी . . . .

सभापती महोदय, मला भाषणासाठी वेळ फार कमी आहे याची मला जाणीव आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, वेअर हाऊसिंग स्किम मजबूत केली पाहिजे. त्याठिकाणी 10-15 टक्के धान्याचा नाश होतो किंवा मघाशी आपण सांगितले त्याप्रमाणे गहू किंवा तांदूळ खराब होतो. म्हणून आपल्याला वेअर हाऊसिंग स्किम मजबूत करावी लागेल आणि सार्वजनिक वितरण व्यवस्था अत्यंत पारदर्शक व कार्यक्षम करावी लागेल. माझी शेवटची विनंती अशी आहे की, काळया बाजारात धान्य विकणारे, ते खरेदी करणारे आणि वाहतूक करणारे या संदर्भात आपण कठोर कायदे करावेत. असे प्रकार करणाऱ्यांना जेलमध्ये पाठविले तरी हरकत नाही. कारण परिस्थिती अशी आहे की, यासंबंधात केसेस होतात, पण निर्णय होत नाहीत आणि कोणालाही शिक्षा होत नाही याचा देखील आपण विचार केला पाहिजे. तसेच दक्षता कमिट्या बळकट कराव्यात. अजूनही काही मुद्दे शिल्लक आहेत पण जास्त वेळ झालेला आहे. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी या सर्व सूचनांचा विचार करावा ही विनंती.

----

. . . .एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, एका अत्यंत ज्वलंत विषयावर सदनामध्ये चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्यांनी बरेचसे मुद्दे मांडलेले आहेत. पण यातील महत्वाची बाब अशी आहे की,गेल्या दहा वर्षामध्ये आपण या सर्व प्रश्नांच्या मूळापर्यंतच जात नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकलेसाहेब म्हणाले त्याप्रमाणे आयडिअल कंडीशनमध्ये काय करावयाचे याचे आपल्याकडे नियोजन आहे. पण जेव्हा संकटे येतात, तेव्हा मात्र आपण भांबावून जातो. त्यामुळे नियोजनशून्य कारभार हे याचे खरे कारण आहे. मी एकच उदाहरण देतो. आपण गेल्या दहा वर्षातील कृषी विभागाचे बजेट पाहिले तर दिसेल की, 2001 मध्ये आपण 48,510 कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला आणि कृषी विभागासाठी 2078 कोटी रुपयांची तरतूद केली. याचा अर्थ एकूण अर्थसंकल्पाच्या 4.28 टक्के इतकी तरतूद केली. मला वेळ कमी असल्यामुळे मी दरवर्षाची माहिती देत नाही. केवळ दोन-तीन वर्षाची माहिती देतो. 2001-2002 मध्ये 55,161 कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला आणि कृषी विभागासाठी 1948 कोटी रुपयांची म्हणजे 3.53 टक्के तरतूद केली, म्हणजे 4.28 टक्क्यावरुन 3.53 टक्क्यापर्यंत ही तरतूद कमी झाली. आता 2009-2010 साली 1,22,963 कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सादर केला, त्यामध्ये कृषी विभागासाठी 2722 कोटी म्हणजे 2.21 कोटीची तरतूद केली. सभापती महोदय, येथेच घोडे पेंड खाते. मधल्या काळामध्ये केंद्र शासनाकडून मदत मिळणार या भावनेतून कमी तरतूद करण्यास सुरुवात केली आणि त्याचा परिणाम असा झाला की, आज महागाई वाढलेली आहे. मी यामध्ये होणाऱ्या भ्रष्टाचाराच्या बाबतीत नंतर बोलणार आहे. पण मूळ मुद्दा असा आहे की, धान्याचे उत्पादन वाढले की घटले? मघाशी सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथीसाहेब कदाचित चुकून बोलले असतील. पण उत्पादन वाढले नाही. फक्त ते गेल्या वर्षी वाढले होते. उत्पादकता वाढली नाही आणि ती का वाढली नाही याच्या मुळाशी गेले पाहिजे. सगळयात वाईट गोष्ट कोणती घडली असेल तर राज्यामध्ये सिंचनाच्या बाबतीतील अनुशेष भयानक आहे. आजची "सकाळ"ची पुरवणी वाचावी. त्यामध्ये "कोरडा महाराष्ट्र" या सदरासाठी बातमी आली आहे. आपण गेल्या दहा वर्षामध्ये हजारो कोटी रुपये खर्च केले, परंतु सिंचनाचा एकही प्रकल्प पूर्ण झाला नाही. मी यासंदर्भात अर्धा तास चर्चेसाठी परवानगी द्यावी अशी मागणी देखील केली आहे आणि पुरवणी मागण्यांच्या वेळी देखील बोलणार आहे.सिंचनाचा प्रश्न निर्माण झाल्यावर दुष्काळाची स्थिती येते. अवकाळी पावसामुळे किंवा पाऊस न पडल्यामुळे अशी परिस्थिती निर्माण होते,पण त्यावेळी आपल्या

. . . .एक्स-3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

कडे बफर स्टॉक नसतो. जेव्हा साखरेचे भरपूर उत्पादन झाले, तेव्हा ती कमी दरामध्ये निर्यात केली आणि आता मात्र साखर आयात करताना ती चढ्या भावामध्ये खरेदी करीत आहोत. मग अशा वेळी शेतकऱ्यांचे हाल होतात. आज शेतीमालाचे उत्पादन पुरेसे होत नाही म्हणून भाववाढ होत आहे. यापूर्वी आम्ही पाहिलेले आहे की, टामॅटोचे प्रचंड उत्पादन झाले म्हणून त्याला भाव मिळाला नाही. त्यामुळे तो रस्त्यावर फेकण्यात आल्याचे पाहिलेले आहे. ऊसाचे देखील प्रचंड उत्पादन झाले म्हणून ऊस जाळावा लागला. कांद्याचे प्रचंड उत्पादन झाले म्हणून कांदा फेकून दिला. माझे असे म्हणणे आहे की, आपण याच्या मुळाशी गेलो तर असे लक्षात येईल की, याबाबतीत केलेला नियोजनशुन्य कारभार. खरे म्हणजे शेतीच्या बाबतीत नियोजन करणे आवश्यक आहे. ऊसाला भाव मिळतो म्हणून पाहिजे तेवढा ऊस लावण्यात आला. एखाद्या वर्षी कापसाला चांगला भाव मिळतो म्हणून मोठया प्रमाणात कापूस लावला जातो.मग त्यावर्षी भाव कमी मिळतो आणि कोणी कापूस उचलत नाही. मग शेतकऱ्याचे नुकसान होते. म्हणून शेतीचे, सिंचनाचे नियोजन करणे आवश्यक आहे. तसे ते होत नाही. दुष्काळ पडल्यानंतर शेतकऱ्यांची जी अवस्था होते, ती पाहिल्यानंतर लक्षात येते की, नाफेडकडून वेळेवर बियाणे मिळत नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (डॉ. वसंतराव पवार ):सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ दहा मिनिटे वाढविण्यात येत आहे. यानंतर श्री. संजय केळकर आणि श्रीमती अलका देसाई बोलतील.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, दोन-तीन मिनिटात मी माझे भाषण संपविणार आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण थोडक्यात पूर्ण करावे.

श्री. अरविंद सावंत : बोगस बियाणांच्या बाबतीत प्रश्न निर्माण होतो. बोगस बियाणांमुळे उत्पादन वाढत नाही. त्यामुळे आलेले उत्पादन टिकविण्यासाठी पुन्हा औषध फवारणी करावी लागते. पुन्हा ती औषधे बोगस निघतात. त्यातून पुन्हा शेतकऱ्याचे नुकसान होते. याला समांतर अशी परिस्थिती निर्माण होते की, उत्पन्न आले पण दरम्यान डिझेल, पेट्रोलचे भाव वाढले, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे भाव वाढले. त्यामुळे वाहन खर्च वाढतो, त्यामुळे ग्राहक त्रासतो. पुन्हा उत्पादक शेतकऱ्याच्या मालाला भाव मिळत नाही आणि ग्राहकांनाही समाधानकारक भाव मिळत नाही. या एका विशिष्ट सर्कलमध्ये महागाईचे मूळ कारण आहे. त्या कारणाचा शोध घेतला जात नाही. त्या कारणाचा अभ्यास केला जात नाही. त्यासंदर्भात कुठली समिती नाही. त्यामुळे शेतीचे नियोजन जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत कुठलीही गोष्ट शासन यशस्वीपणे करु शकणार नाही.

विजेचा प्रश्न पुन्हा शिल्लक आहेच. मुंबई शहरातील महागडया विजेबद्दलचा प्रश्न या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे. त्यासंदर्भात मी बोलणार नाही. पण पुन्हा वीज मिळत नाही. सगळे काही मिळाले तरी वीज नाही, पाणी नाही, यामुळे उत्पादकता कमी झालेली आहे त्याचा परिणाम भाववाढीवर झालेला आहे. एवढे सगळे झाल्यानंतर शेतकऱ्यांसाठी किंवा गरिबांसाठी शिधावाटप केद्रातून धान्य वाटप करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. या संदर्भात थोडया वेळापूर्वीच डॉ. दीपक सावंत यांनी बोगस प्रकरण उघडकीस आणलेले आहे. सभापती महोदय, दिनांक 11 डिसेंबर, 2009 रोजी यासंदर्भात याठिकाणी एक लक्षवेधी सूचना आली होती, त्यामध्ये असे म्हटले आहे की,"अन्नधान्य महामंडळाचा शिक्का असलेले स्वस्त धान्य दुकानात वितरित करावयाचे सुमारे एकवीस लाख किमतीचे स्वस्त गव्हाचे कट्टे जळगांव एम.आय.डी.सी. मधील सुंदरपुरीया स्टील ॲन्ड रोलर फ्लोअर मिलमध्ये आढळून येणे" याबाबतीत शासनाने असे उत्तर दिलेले आहे की, "दिनांक 3-12-2009 रोजी जिल्हा पुरवठा यंत्रणेने त्यांना प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे सुंदरपुरीया फ्लोअर मिलच्या गेटमध्ये एका मिनी ट्रकची तपासणी केली व त्यामध्ये असलेला





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत. . .

38.70 क्विंटल गहू हा सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील असल्याच्या संशयावरुन जीवनावश्यक वस्तू कायदा, 1955 अन्वये गुन्हा दाखल करण्यात येऊन दोन व्यक्तींना अटक करण्यात आली."माननीय अरुणभाईंनी असे म्हटले की, यासंदर्भात कायद्यात तरतूद नाही त्यामुळे अटक होऊन ते सुटणार आहेत,त्यांना शिक्षा होणार नाही. यामध्ये सगळयात महत्वाचे असे की, "सुंदरपुरीया फ्लोअर मिलची दिनांक 4-12-2009 रोजी अचानक तपासणी करण्यात आली. सदर तपासणीत सुंदरपुरीया फ्लोअर मिलमध्ये सुमारे 3,000 क्विंटल गव्हाचा साठा आढळला. सदर साठयातील 50 किलो ग्रॅम वजनाच्या 2,726 गोण्यांवर भारतीय खाद्य निगम, उत्तर प्रदेश सरकार खाद्य निगम pungrain पंजाब स्टेट ग्रेन प्रोक्युअरमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड, हरियाणा फुड सप्लायर्स असे शिक्के आढळले. असेच शिक्के असलेली 5,500 रिकामी पोती सुध्दा आढळून आली. या व्यतिरिक्त प्रत्येकी, 100 किलो गहू असलेली 1,600 पोती आढळली. प्रथमदर्शनी हा साठा सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील असल्याचे निदर्शनास आल्याने सर्व मुद्देमाल जप्त करुन दिनांक 4-12-2009 रोजी जीवनावश्यक वस्तू कायदा,1955 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचे एकूण मूल्य सुमारे रुपये 46,10,500/- एवढे आहे." सभापती महोदय, एवढया मोठया रक्कमेचा सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गहू सुंदरपुरिया मिलने गायब केला.

सभापती महोदय, मोखाडयामध्ये शिधावाटप केंद्राच्या मालकाच्या गोडावूनमध्ये प्रचंड प्रमाणात माल आहे पण आदिवासींना ते धान्य मिळत नाही. ते सारे धान्य काळया बाजारात विकले जाते, ते पकडले जाते. पण शेवटी मूळ प्रश्न तसाच राहिला आहे. शेतकरी, आदिवासी, ग्राहक हा त्यापासून कायमचा वंचित राहिलेला आहे. यासंदर्भात कारवाई जरुर करण्यात येईल पण वंचिताच्या तोंडात घास कसा जाईल हा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, फी वाढीच्या संदर्भातील एकच मुद्दा उपस्थित करुन मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. पुण्यातील बोगस कॉलेजेंसच्या संदर्भातील प्रश्न मी सभागृहात मांडला होता. तत्कालीन उच्च शिक्षण मंत्री महोदयांनी तीन महिन्यात त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे संगितले होते पण आजतागायत त्यांच्यावर कारवाई झालेली नाही, एवढेच मला याठिकाणी निदर्शनास आणावयाचे आहे. धन्यवाद.

यानंतर श्री. बरवड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

त्यामुळे त्यांचे सर्व प्रयोग फेल जात आहेत, फेल झालेले आहेत....

**तालिका सभापती ( डॉ.वसंत पवार )** : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांचे भाषण अपूर्ण राहिलेले आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.40 ते 1.00 पर्यंत स्थगित झाली. )

----

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**पेण (जि.रायगड) येथे गेल कंपनीने गॅस पाईप लाईन टाकतांना शेतकऱ्यांचे केलेले नुकसान**

**(१) * ११७ श्री. जयंत प्र.पाटील , श्री.कपिल पाटील** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील मे.गॅस ॲथॉरिटी कंपनीने गॅस पाईप लाईन टाकण्यासाठी पेण कोलेटीवाडी येथून जाणाऱ्या खाडीमध्ये बांध घालून भरतीचे पाणी अडविल्याने खारे पाणी शेतात घुसून अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा प्रशासनाच्या आदेशानुसार या नुकसानीचे पंचनामे करुन नुकसान भरपाई देण्याचे मान्य केले व त्यानुसार गेल कंपनीस अपर जिल्हादंडाधिकारी यांनी दिनांक २९ जून, २००९ रोजी नुकसान भरपाईची रक्कम रुपये २२ लाख ५० हजार देण्याचे निर्देश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल व्यवस्थापनाने सदर रक्कम नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना अदा केली आहे काय,

(४) असल्यास केव्हा, नसल्यास, रक्कम अदा न करण्याची कारणे कोणती ?

**श्री. सचिन अहिर, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही. तथापि, अशा आशयाची तक्रार एका जमिन मालकाने जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे केली होती.

(२) हे अंशत: खरे आहे. तथापि, अपर जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अहवालानुसार तालुका कृषी अधिकारी, तलाठी व खारजमिन विभागाच्या संयुक्त पंचनाम्यांवरुन रु.२२ लाख ५० हजार एवढ्या नुकसान भरपाईचा दावा गेल इंडिया कंपनीकडे पाठविण्यात आला होता.

(३) नाही.

(४) जिल्हाधिकारी, रायगड यांचे अहवालानुसार त्यांनी संबंधितांसमवेत घेतलेल्या बैठकीमध्ये सदर नुकसान भरपाईचा दावा तथ्यहिन असल्याचे आढळल्याने तो अनुज्ञेय नसल्याचा निष्कर्ष काढण्यात आला.

श्री. जयंत प्र. पाटील : पहिल्या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे आणि दुस-या प्रश्नाला "हे अंशत: खरे आहे" असे उत्तर दिलेले आहे. तेव्हा नेमके उत्तर काय आहे, याचा माननीय मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

श्री. सचिन अहिर : पहिला पश्न असा विचारलेला आहे की, बांध घालून भरतीचे पाणी अडविल्याने खारे पाणी शेतात घुसून अनेक शेतक-यांचे नुकसान झालेले आहे काय ? अनेक शेतक-यांच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे म्हणून त्यास "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

दुसरा प्रश्न हा अपर जिल्हादंडाधिकारी यांनी भरपाईची रक्कम देण्याचे निर्देश गेल कंपनीला दिले आहेत काय ? असा प्रश्न विचारलेला आहे. म्हणून त्यास "अंशत: खरे आहे" असे उत्तर दिलेले आहे. हे उत्तर देण्याचा हेतू असा आहे की पंचनामे केल्यानंतर नुकसान भरपाईच्या 22 लाख 50 हजार रु. रकमेवर शिक्कामोर्तब झाले. ते झाल्यानंतर अपर जिल्हाधिका-यांनी जिल्हाधिका-यांकडे अहवाल सादर केला. जिल्हाधिका-यांचे त्या अहवालाच्या बाबतीत वेगळे मत होते. म्हणून उत्तर "अंशत: खरे आहे" असे देण्यात आलेले आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : रायगड जिल्हयामध्ये गेल कंपनीची गॅस पाईप लाईन गेल्यामुळे अनेक शेतक-यांचे नुकसान झालेले आहे. ही गॅस पाईप लाईन रायगड जिल्ह्यामधून जात असताना स्थानिक रायगडवासीयांना गॅस कनेक्शन दिलेले नाही. मात्र शेतक-यांचे नुकसान केलेले आहे. जिल्हा कृषी अधिकारी, तलाठी, खार जमीन विकास अधिकारी यांच्या संयुक्त पथकाने शेतक-यांच्या नुकसनाची पाहणी करुन त्यासंबंधीचा अहवाल जिल्हाधिका-यांकडे दिला आणि जिल्हाधिका-यांनी आपला अहवाल गेल कंपनीला दिनांक 29 जुलै 2009ला दिला, हे खरे आहे काय ? असल्यास संबंधित शेतक-यांना नुकसान भरपाई दिली जाईल काय ?

श्री. सचिव अहिर : ही गोष्ट खरी आहे की, हे सर्व पंचनामे गेल कंपनीच्या व्यवस्थापनाकडे पाठविले. गेल कंपनीच्या जनरल मॅनेजरने, हे झालेले नुकसान गेल कंपनीच्या पाईप लाईनमुळे झालेले नाही, त्यामुळे अशा प्रकारे नुकसान भरपाई देता येत नाही, असा निष्कर्ष काढला.

डॉ. दीपक सावंत : शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याच्या संदर्भात शेतकरी आणि गेल कंपनीचे महाव्यवस्थापक यांच्यामध्ये सरकार मध्यस्थी करणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : याबाबतीत सरकार निश्चितपणे मदत करील. त्यादृष्टीने जिल्हाधिक-यांनी सर्व संबंधितांच्या एकत्रित बैठका घेतल्या. या बैठकीमध्ये अशा प्रकारे संबंधित शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे काय यासंबंधीची माहिती घेण्यात आली. गेलच्या संबंधित लोकांनी असे सांगितले की, विशिष्ट गोष्टीमध्ये मदत केली नाही पण अन्य गोष्टींसाठी मदत केलेली आहे. जिल्हाधिका-यांनी असा निष्कर्ष काढला की, गेल कंपनीच्या पाईप लाईनमुळे

..3.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

शेतक-यांचे नुकसान झालेले नसल्यामुळे नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता नाही, त्यामुळे प्रकरण दप्तरबंद करण्यात यावे. तरीही शेतक-यांवर अन्याय होऊ नये या दृष्टीकोनातून शासनाने याबाबतीत मदत करण्याची भूमिका ठेवलेली आहे.

श्री. कपिल पाटील : नवीन प्रोजेक्टला विरोध करण्याचा प्रश्न नाही किंवा शेतक-यांच्या नुकसान भरपाईचा प्रश्न नाही. माझा एकच प्रश्न आहे की, ज्या भागातून पाईप लाईन जाते त्या भागातील लोकांना त्याचा उपयोग झाला पाहिजे. तेव्हा रायगड जिल्ह्याच्या ज्या भागातून पाईप लाईन जात आहे तेथे टॅपिंगची व्यवस्था करण्यात येणार आहे काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा आणि चांगला प्रश्न विचारलेला आहे. रायगड जिल्हयातून गेलची पाईप लाईन जात असताना त्याचा फायदा स्थानिक उद्योजकांना होत नाही असा त्यांचा प्रश्न आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, एमआयडीसीने एसव्हीपी कंपनी स्थापन केलेली आहे. ही कंपनी आणि गॅस प्रोव्हायडर कंपन्या उदा. गेल, रिलायन्स, ओएनजीसी यांच्याबरोबर एक समझोता करण्याच्या स्तरापर्यन्त आम्ही आलो आहोत.

.....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा.. ता.प्र.क्र.117..

आणि मला खात्री आहे की, लवकरच एमआयडीसी आणि गेल यांच्या एकत्रित येण्यामुळे याला टॅपिंग मिळेल आणि त्या भागातील उद्योजकांना निश्चितपणे फायदा होईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्हयातील 8 तालुक्यातील 3063 शेतकऱ्यांची 21118 हेक्टर जमीन संपादन झाल्यामुळे त्यांचे 2.75 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. महसूल व कृषि विभागाने संयुक्त पाहणी केल्यानंतर ही माहिती उघड झाली आहे हे खरे आहे काय? मघाशी मंत्रीमहोदयांनी सांगितले की, शेतकरी बाधित झाले नाहीत. मंत्रीमहोदय हे मुंबई शहरात राहतात. मुंबई शहर हे अलिबागच्या लगत आहे. या भागातून जी पाईपलाईन जाते त्यामुळे शेतीचे नुकसान होत आहे. शेतीचा बांध फुटतो आणि शेत जमिनीचे नुकसान होते. जिल्हाधिकारी व प्रांत यांच्यामध्ये मतभेद असल्याचे दिसून येते. त्यामुळे या प्रकरणाची उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडून वेगळी पाहणी करुन तेथील शेतकऱ्यांना न्याय दिला जाईल काय?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ज्या ज्यावेळी अशा घटना घडतात त्यावेळी सक्षम प्राधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यानंतर त्याची त्वरित दखल घेतली जाते. गेल कंपनी पाईपलाईन टाकण्याचे काम करीत असताना खारबांध तुटल्यामुळे शेतामध्ये खारे पाणी घुसल्याची तक्रार आल्यानंतर त्वरित गेल कंपनीकडून तुटलेले बांध पुन्हा बांधून घेण्याचे काम केले आहे. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे विभागीय आयुक्तांकडे हे संपूर्ण प्रकरण देऊन प्रांत, जिल्हाधिकारी यांचे म्हणणे आणि सर्वच बाबीची पाहणी करुन शेतकऱ्यांचे नुकसान झाले असेल तर त्यांना योग्य पध्दतीने न्याय देण्याचे काम शासनाकडून केले जाईल.

-----

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**औरंगाबाद-पैठण या अपूर्ण असलेल्या रस्त्याच्या पथकर वसुलीस महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने मान्यता दिल्याबाबत**

**(२) * २१८९ श्री. किसनचंद तनवाणी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद-पैठण या रस्त्याचे काम पुर्ण न करता महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने पथकर वसुलीची निविदा काढून पथकर वसुलीस मान्यता दिली असल्याचे प्रकरण दिनांक १२ ऑक्टोबर, २००९ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक वर्षांपासून अपुर्ण केलेल्या रस्त्यावर पथकर वसुल करण्यात येत आहे तसेच अपूर्ण राहिलेला रस्ता पूर्ण करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, अद्याप कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.जयदत्त क्षीरसागर** : (१) नाही

(२) औरंगाबाद शहर व परिसरातील रस्ते विकास योजनेअंतर्गत हाती घेतलेल्या कामांसाठी पथकर वसूली करण्यात येत आहे. खाजगीकरणांतर्गत औरंगाबाद-पैठण रस्त्याचे (चौपदरी) कामास शासनाने मान्यता दिलेली असून निविदेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.किसनचंद तनवाणी : सभापती महोदय, ता.प्र.क्र.2189.

श्री.जयदत्त क्षीरसागर : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. पहिल्या प्रश्नाचे उत्तर "नाही" ऐवजी "पथकर वसुली करण्यात येत आहे" असे वाचावे. उर्वरित उत्तर छापल्याप्रमाणे.

श्री.किसनचंद तनवाणी : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने औरंगाबाद ते पैठण या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामाला 2000 साली मान्यता दिली होती. एकूण 48 कि.मी. लांबीपैकी फक्त 15 कि.मी.लांबीचा रस्ता पूर्ण झाल्यानंतर टोल वसुली केली जात आहे. उर्वरित काम केव्हा पूर्ण होणार आहे? उर्वरित रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर त्या कामाबाबत वेगळा टोल वसूल केला जाणार आहे काय?

श्री.जयदत्त क्षीरसागर : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने रस्त्याचे दोन टप्पे, भाग- 1 व 2 पूर्ण केले आहेत. त्याची लांबी 17.5 कि.मी. आहे. पहिला टप्पा औरंगाबाद ते नक्षत्रवाडी आणि दुसरा टप्पा नक्षत्रवाडी ते बिडकी हा 17.5 कि.मी.लांबीचा रस्ता महामंडळाने तयार केला. उर्वरित रस्त्याच्या कामाबाबत राज्याच्या मंत्रिमंडळ पायाभूत

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयदत्त क्षीरसागर... ता.प्र.क्र.2189

सुविधा समितीने 2007 मध्ये औरंगाबाद ते पैठण हा 48 कि.मी.लांबीचा रस्ता खाजगीकरणातून करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी 145 कोटी रुपयांची किंमत निश्चित केली असून शासनाचा सहभाग 56 कोटी रुपये असणार आहे. दिनांक 12 डिसेंबर, 2009 रोजी या कामाची निविदा प्रसिध्द झाली आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, अशाच पध्दतीने राज्यात अनेक ठिकाणी टोल वसूल केला जात आहे. प्रश्नाधीन रस्ता पूर्ण होण्यापूर्वीच 2002 पासून टोल वसूल केला जात आहे. 2002 पासून जो टोल वसूल केला गेला आहे तो संबंधितांकडून परत घेतला जाणार आहे का? 17.5 कि.मी.लांबीचा रस्ता पूर्ण झाल्यानंतर 48 कि.मी.लांबीचा चार्ज लावून जनतेकडून टोल वसूल केला जात आहे त्याबद्दल संबंधितांवर दंडात्मक कारवाई केली जाईल का?

श्री.जयदत्त क्षीरसागर : सभापती महोदय, एकात्मिक रस्ते विकास योजना औरंगाबाद शहर आणि परिसरातील रस्त्यांकरिता राबविली जात असून त्या अंतर्गत 3 पथनाके आहेत, त्या ठिकाणी टोल बसविण्याचा शासन निर्णय 2001 मध्ये झाला व 2004 मध्ये टोल बसविण्याचे नोटिफिकेशन निघाले आहे.

(नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.2189....... श्री. जयदत्त क्षीरसागर....

आणि नक्षत्रवाडीला जो पथनाका आहे त्यावर वसूल होणारा टोल हा फक्त तेवढया रस्त्यापुरताच मर्यादित नसून त्यामध्ये अजून तीन टोल अंतर्भूत आहेत त्यातून जो पैसा उपलब्ध होईल त्यात औरंगाबाद शहरातील रस्त्यांबरोबरच तीन रस्ते व 5 उड्डाण पूल आणि ॲरो ब्रिजचा समावेश असून त्यावर हा खर्च होणार आहे. औरंगाबाद-पैठण तसेच नक्षत्रवाडीपुरता संबंध जोडता येत नाही.

श्री. अरविंद सावंत : महोदय माननीय मंत्री महोदयांनी मूळ प्रश्न विचारला होता की औरंगाबाद-पैठण या 48 कि.मी. च्या रस्त्यावर आपण टोल वसुली सुरु केली आहे परंतु त्यातील 14 कि.मी. या रस्त्याचे काम पूर्ण न करताच ही टोल वसुली सुरु केली आहे. तसेच हा 48 कि.मी. चा रस्ता केव्हा पूर्ण करणार असाही प्रश्न त्यांनी विचारलेला आहे. त्यानंतर शासन या रस्त्यावर अजून टोल नाके सुरु करणार काय ?

श्री. जयदत्त क्षीरसागर : सभापती महोदय, मी पुन्हा सभागृहाला सांगू इच्छितो की, औरंगाबाद-पैठक रस्त्यावरील टोल नाका व त्यातून उपलब्ध होणाऱ्या पैशाचा स्त्रोत हा केवळ त्याच रस्त्यावर खर्च व्हावा असे अभिप्रेत नाही. शासनाने 176.80 कोटीचा रस्ते विकास प्रकल्प औरंगाबाद शहर व परिसरातील रस्ते यासाठी स्वीकारलेला आहे आणि त्यातून जो टोल वसूल होईल ती रक्कम याच रस्तावर खर्च न करता इतरही कामे त्यात आहेत. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने या संपूर्ण 48 कि.मी. रस्त्याचे टेंडर कोड केलेले आहे.

श्री. अरविंद सावंत : महोदय, प्रश्न एवढाच आहे की, या रस्त्यावर आणखी टोल नाके चालू करणार काय ?

श्री. जयदत्त क्षीरसागर : सभापती महोदय, हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाचा असून त्यांनी या रस्त्याचे टेंडर कोड केलेले आहे. त्यात कोणत्या अटी टाकलेल्या आहेत त्यासंबंधीची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, या पैशाचा उपयोग केवळ त्याच रस्त्यासाठी नसून त्यात इतरही विकास कामे आहेत. नॉर्मली टोलची संकल्पना म्हणजे जे लोक रस्ता वापरतात त्यांच्याकडून त्या सुविधेपोटी टोल वसूल करणे. परंतु येथे तर रस्त्याचे काम पूर्ण होण्यापूर्वीच टोल वसुली सुरु केलेली आहे त्यालाच आक्षेप आहे.

....2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2189..... श्री. विनोद तावडे .....

आमचे म्हणणे असे आहे की, जेवढा रस्ता पूर्ण झाला त्याचाच टोल घेतला जातो येथे मात्र रस्ता पूर्ण न होताच संपूर्ण रस्त्याची टोल वसुली सुरु झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी आणखी असेही विचारले की, या रस्त्यावर अजून टोल नाके सुरु करणार काय ? ज्याप्रमाणे पुण्याला येताना तीन ठिकाणी टोल भरावा लागतो त्याप्रमाणे येथे सुरु होणार काय ?

श्री. जयदत्त क्षीरसागर : महोदय, आतापर्यंत जी 30 कामे औरंगाबाद शहर व परिसरात घेण्यात आली त्यातील 7 कामे पूर्ण झाली.....अडथळा....परंतु जी कामे पूर्ण करण्यात आली त्यातील हे 17.50 कि.मी. च्या रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे आणि त्यावर 11.73 कोटी रुपये खर्च झाले आहेत. तसेच सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे या 48 कि.मी. च्या रस्त्यावर फक्त एकच टोल नाका राहणार आहे.

----------

....३

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**बोईसर (जि.ठाणे) व वाशी येथे मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने केलेली कारवाई**

**(3) * 1640 श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री. चरणसिंग सप्रा , श्री.सय्यद जमा** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बोईसर (जि.ठाणे) व वाशी येथे माहे नोव्हेंबर, 2009 मध्ये वा त्यादरम्यान मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने सुमारे 25 लाख रुपयांच्या गांज्यासह 6 जणांना अटक केली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, पोलिसांनी सुमारे साडे बारा क्विंटल गांजाचा साठा जप्त केला, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, या प्रकरणातील अन्य आरोपी फरार असून त्यांच्या अटकेसाठी पोलिसांनी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) व (2) होय,

(3) व (4) ॲन्टी नारकोटीक सेल, कांदीवली युनिट मुंबई येथे गु.र.नं.443/09 एनडीपीएस ॲक्ट, 1985 चे कलम 8(क) (स) 20,29 प्रमाणे गुन्हा दाखल असून पुढील तपास सुरु आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 1640...

श्री. सय्यद ज़मा :सभापति महोदय, माननीय मंत्री जी ने जो जवाब दिया है वह स्टेटस रिपोर्ट है. उन्होंने यह स्वीकार किया है कि ठाणे एवम् वाशी क्षेत्र में बड़े पैमाने पर गांजा जब्त किया गया है और इस मामले में ॲन्टी नारकोटीक सेल जांच कर रहा है. पिछली जुलाई महीने से कम से कम अब तक 400 लोगों को गिरफ्तार किया गया है और 1400-1500 किलोग्राम से ज्यादा मादक पदार्थ जब्त किया गया है. मैं यह जानना चाहता हूं कि ये मादक पदार्थ कहां से आता है, कौन लोग इसमें शामिल है और इसमें किसका नेक्सेस है, क्या इस के बारे में जांच की गई है और इस प्रकार के अवैध व्यवसाय को रोकने के लिए क्या कोई ठोस उपाय किए गए है ?

श्री. रमेश बागवे :सन्माननीय सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत. हे संपूर्ण अंमली पदार्थ राजस्थान, मध्यप्रदेश आणि हरियाणा मार्गे येतो आणि त्या ठिकाणी गांजापासून औषध बनवले जाते याला परदेशात याला परवानगी आहे. अंमली पदार्थाचा साठा ओरिसा मार्गे आंध्रप्रदेशातून इतर ठिकाणी पोहचता केला जातो व या अवैध मालाची विक्री होत असते.

श्री. सय्यद ज़मा :सभापति महोदय, इस अवैध व्यवसाय को रोकने के लिए सरकार ने क्या योजना बनाई है ?

श्री. रमेश बागवे : माननीय सभापती महोदय, या गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन एटीएसकडे अशा प्रकारच्या गुन्हयांवर शासन करण्यासाठी अधिकार दिलेले आहेत. या गुन्हयामध्ये अतिरेक्यांचा हात असण्याची फार मोठी शक्यता असते. तसेच नार्कोटिक ॲक्ट खाली एनडीपीएस ॲक्ट,1985 चे कलम 8 (क) (स)20,29 प्रमाणे कारवाई केली जाते. या धंद्याला आळा बसावा यासाठी नारकोटीक सेल सुध्दा निर्माण करण्यात आला आहे.

श्रीमती नीलम गो-हे : सभापती महोदय, प्रश्नात विचारले आहे की, या गुन्हयातील आरोपी फरार आहे काय ? त्यामुळे गुन्हयातील आरोपींना पकडण्यात आले आहे की, ते आरोपी जामिनावर सुटले आहेत? अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमध्ये गांजा पिकवला जातो हे संपूर्ण जगाला माहीत आहे. त्यामुळे त्या ठिकाणी निर्माण होणा-या गांज्याचे वितरण संपूर्ण महाराष्ट्रभर टोळया आहेत. त्यामुळे या गुन्हयामधील आरोपींना अजामीनपात्र गुन्हा लावणे किंवा मोक्का लावला

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 1640...

श्रीमती नीलम गो-हे.....

जाणार आहे काय ? तसेच या गुन्हयामधील आरोपींच्या मागे कोण सूत्रधार आहे याचा शोध घेण्यासाठी विभागाने कोणती पावले उचलली आहेत? तसेच या गुन्हयामधील आरोपी आता कुठे आहेत?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, या गुन्हयामध्ये एकूण 7 आरोपींचा समावेश असून 1 ते 6 आरोपींना मानखुर्द येथील एका गाडीतून अटक करण्यात आलेली आहे, एका आरोपीला घरी पकडण्यात आलेले असून या गुन्हयातील 4 आरोपी फरार आहेत.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, या गुन्हयामध्ये ज्या आरोपींना अटक करण्यात आलेली आहे त्या आरोपींना यापूर्वी याच गुन्हयाखाली किती वेळा अटक झालेली आहे ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय,या गुन्हयाखाली अटक करण्यात आलेल्या आरोपींना यापूर्वी या गुन्हयाखाली पकडण्यात आले नव्हते. जे फरार आरोपी आहेत त्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत. श्री. राजीव रेड्डी-आंध्र प्रदेश, रवी- कन्याकुमारी,नाथमाने-भोईसर व गणेश खेवंडे याचा पत्ता प्राप्त झालेला नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे काय आहेत? तसेच फरारी असलेले आरोपी पकडण्यासाठी पोलिसांनी कोणती मोहीम उघडली आहे? ज्या आरोपींना पकडण्यात आलेले आहेत ते आरोपी कोठडीत आहेत की, जामिनावर सुटले आहेत?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, या गुन्हयामध्ये एकूण सात आरोपी असून 1) शाजीन जाकलीन वलसलाम, 2) रिंकू त्रिभुवनसिंग 3) बीज्जू रामनेशन नडार 4) बलवंदरसिंग संतोषसिंग 5) गुरुमेनसिंग इश्वरसिंग हसंराज 6) श्रीमती शाहिदा सुलतान उर्फ सिमरन यासीम शेख अशी आरोपींची नावे असून त्यांना अटक झालेली आहे. नार्कोटिक ॲक्ट,एनडीपीसी ॲक्ट प्रमाणे कारवाई देखील करण्यात आलेली आहे.

---------

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे येथे ४६ कोटीचे बनावट डिमांड ड्राफ्ट तयार करुन अनेक बँकांना फसविणाऱ्या टोळीवर करावयाची कारवाई**

**(४) * ३०९ श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. चरणसिंग सप्रा , श्री. अरविंद सावंत , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथे ४६ कोटीचे बनावट डिमांड ड्राफ्ट तयार करुन अनेक बँकांना फसविणाऱ्या टोळीला दिनांक १८ सप्टेंबर, २००९ रोजी वा त्या सुमारास पकडण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर टोळीवर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच राज्यात वारंवार घडत असलेल्या फसवणूकीच्या प्रकरणाला आळा घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रमेश बागवे, श्रीआर.आर.पाटील यांच्याकरिता:** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) या प्रकरणी नौपाडा पो.स्टे.गु.र.नं.३९३/०९ भादंविक ४६५,४६७,४६८,४७२,४७४ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात आठ आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे. सर्व आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून रु.१,८५,३५,७६,८६०/- इतका रकमेचे बनावट डी.डी.,बॅकर्स चेक, पे ऑर्डर आणि सुमारे २,८८,१२०/- रुपयांचे अन्य साहित्य जप्त करण्यात आले आहे. आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, हे प्रकरण अत्यंत भयानक स्वरुपाचे आहे. ठाणे येथे 46 कोटीचे बनावट डिमांड ड्राफ्ट तयार करुन बॅकांना फसविण्याच्या संदर्भात मी प्रश्न विचारला होता परंतु उत्तरात असे म्हटले आहे की,"आरोपीकडून 185 कोटी 35 लाख 76 हजार 860 इतक्या रकमेचे बनावट डी.डी., बॅकर्स चेक, पे ऑर्डर आणि सुमारे 2 लाख 88 हजार 120 रुपयांचे अन्य साहित्य जप्त करण्यात आलेले आहे" मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, या प्रकरणातील सर्व गुन्हेगारांना अटक करण्यात आली आहे काय, सध्या ते कस्टडीमध्ये आहेत की जामिनावर सुटलेले आहेत याबाबतच्या चौकशीत पुढे काही निष्पन्न झालेले आहे काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय या गुन्हयात एकूण आठ आरोपी आहेत व या आठही आरोपीना अटक करण्यात आली असून त्यांच्यविरुध्द कारवाई करण्यात आलेली आहे.त्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत 1)श्री. विजू हरीनंदन व्दिवेदी, लोखंडवाला कॉम्पलेक्स, अंधेरी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.309 श्री.बागवे...

2) श्री.राजासिंग सुरेशप्रसादसिंग, गोरेगाव, मुंबई 3) श्री.लालचंद तिवारी,कल्याण, जिल्हा ठाणे 4)श्री रामचद्र सदाशीव पाटील, वाशी, नवीन मुबई 5)श्री. प्रभाकर विठ्ल मुसोळगी,तालुका खालापूर जिल्हा रायगड 6) श्री. प्रभू उर्फ शंकर जयकिसन रामसैनी ,दातिवलीरोड, ठाणे पूर्व 7) श्री.अनथोनी पॉल जीवराज, मुलुंड रेशनिग ऑफिसच्या मागे 8 )आशा चरने या सर्व आरोपींना अटक करण्यात येऊन त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

श्री.अरविंद सावंत : हे आरोपी कस्टडीमध्ये आहेत की त्यांना जामिनावर सोडून देण्यात आले आहे ?

श्री.रमेश बागवे : हे सर्व आरोपी मॅजेस्ट्रियल कस्टडीमध्ये आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील :ज्या बॅकेने खोटे चेक काढले वा चेक वटवले आहेत त्या बॅकेचे नाव काय आहे आणि या बॅकेत हे सगळे व्यवहार झालेले आहेत त्यामुळे या बॅकेतील अधिकारी आणि कर्मचारी त्यामध्ये सामील होते काय ?

श्री.रमेश बागवे : या बॅकेचा काहीही सबंध नाही. त्यामुळे बॅकेच्या अधिका-यांना अटक करण्यात आलेली नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : बॅकेचे अधिकारी आणि कर्मचारी यामध्ये सामील असल्याशिवाय हे व्यवहार होणार नाहीत.

श्री.रमेश बागवे :सभापती महोदय, देना बॅक, अंबरनाथ शाखा, बॅन्क ऑफ बडोदा अशा निरनिराळया बॅकेतून सुमारे 185 कोटी 35 लाख 76 हजार 886 रुपयांचे डिमाड ड्राफट काढण्यात आलेले आहेत. त्यामध्ये कॅश काहीही नाही.

श्री.जयंत प्र पाटील : बॅकेच्या शाखेचे नाव काय आहे ?

श्री.रमेश बागवे :देना बॅक, अंबरनाथ शाखा, बॅक ऑफ इडिया, मुलुंड शाखा, बॅन्क ऑफ बडोदा मुलुंड शाखा अशा वेगवेगळया शाखा आहेत.आरोपीची नावे मी मघाशी वाचून दाखवली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : बॅकेच्या अधिका-यांना का अटक केलेली नाही. ?



ता.प्र.क्र.309......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश बागवे . बॅकेत व्यवहार झालेला नसल्यामुळे त्यांना अटक केलेली नाही.

श्री.परशुराम उपरकर : या प्रकरणात आतापर्यंत किती चेक वटविण्यात आले आणि त्या चेकची रक्कम किती होती ?

श्री.रमेश बागवे : सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर मी या पूर्वीच दिलेले आहे. कोणत्याही बॅकेत हा व्यवहार झालेला नाही. पोलिसांना जी माहिती मिळाली होती त्या अनुषंगाने नौपाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत शिवप्रसाद हॉटेल समोर गाडीत सर्व आरोपींना अटक करण्यात आली होती आणि या प्रकरणातील सर्व डी.डी. जप्त करण्यात आले आहेत.

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 309 ...

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार सध्या बँकांना मायकर सिस्टीमचे चेक्स वापरावे लागतात आणि या सगळ्या बनावट पे ऑर्डर्स, डीडी, चेक्समध्ये मायकर सिस्टीम वापरली होती काय ? नसेल तर आपण काय कारवाई करणार आहात ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, ही मायकर सिस्टीम प्रत्येक राष्ट्रीयीकृत बँकेत वापरली जाते.

**

.... जीजी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 13:25

**नागपूर येथील समता बँकेच्या प्रशासनाने केलेला भ्रष्टाचार**

**(5) * 1699 श्री.सय्यद जमा, श्री. चरणसिंग सप्रा** : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागपूर येथील समता बँकेचे विलीनीकरण राष्ट्रीयकृत बँकेत करण्याबाबत मा.सहकार मंत्र्यांनी आदेश देवूनही सहकार सचिव व सहकार आयुक्त यांची उदासीनता व समता बँकेच्या प्रशासकाने भ्रष्टाचाराचा कळस गाठून करोडो रुपयांची जमीन कवडीमोल भावात विकल्याने बँकेच्या कर्मचाऱ्यांनी दिनांक 18 सप्टेंबर, 2009 रोजी वा त्या सुमारास धरणे, आंदोलने केलेली आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(3) कोणतीही चौकशी केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (1) नागपूर येथील महिला व समता सहकारी बँकेच्या विलीनीकरणा संदर्भात झालेल्या दि.13.7.2009 च्या बैठकीनंतर समता सहकारी बँकेच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव बँक ऑफ इंडिया व कोटक महिंद्रा या दोन बँकांना सादर करण्यात आलेला आहे.
दोन वर्षापासून रोखून ठेवलेली वेतनवाढ मिळणेकरीता बँक कर्मचाऱ्यांनी दि.17.9.2009 रोजी निदर्शने केली आहेत. तथापि याबाबत कोणतेही रितसर निवेदन बँक प्रशासकाचे कार्यालयास प्राप्त झालेले नाही.
(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री सय्यद ज़मा : सभापति महोदय, अभी नागपुर विभाग के बैंकों के बारे में चर्चा हो रही थी कि बैंकों से लोग कितनी आसानी से गलत ढंग से पैसे निकाल लेते हैं. उसी प्रकार का यह प्रश्न है. नागपुर स्थित महिला व समता सहकारी बैंक में भी ऐसा ही हुआ है और यह बैंक दिवालिया होने की कगार में है. आज यह बॅक बंद है. इस बैंक को चलाने के लिए शासन ने इसी वर्ष जुलाई में एक बैठक ली थी लेकिन उसके बाद इस मामले में कोई प्रगति नहीं हुई है. सहकार विभाग की आरे से एक प्रस्ताव भेजा गया है. महिला सहकारी बँक को दिवालिया घोषित करने की प्रक्रिया चालू हो गई है लेकिन समता सहकारी बैंक के बारे में अभी इस संबंध में प्रक्रिया चालू नहीं हुई है. माननीय मंत्री जी ने जो उत्तर दिया है वह समाधानकारक नहीं है. इस मामले में देरी होगी या समयबध्द कार्यवाही नहीं होगी तो उससे हल निकलने में देरी होगी. इसलिए शासन को तेजी से कार्यवाही करनी चाहिए ताकि बँकों का कारोबार पुन: सुचारु रुप

........3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ SBT/ KTG/ श्री. गायकवाड नंतर --- 13:25

ता. प्र. क्र. 1699 ........

श्री.सय्यद जामा.......

से शुरु हो सके. इस जिले में रिजर्व बैंक के फ्लाइंग स्कवॉड ने 130 करोड़ रुपये का मामला पकड़ा जिसकी वजह से ये बैंक बंद हैं. यह मामला जांच के लिए सी.आई.डी. को सौपा गया है. पिछले डेढ़ साल में रेगूलर प्रोसेस छोड़कर शासन ने बैंकों के डायरेक्टर, अधिकारी-कर्मचारी और जिन लोगों ने आसानी से लोन लिया है, उनके खिलाफ क्या कार्रवाई की है और शासन इनके खिलाफ क्या कार्रवाई करना चाहता है, क्या इसके बारे में मंत्री महोदय जानकरी देंगे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या संदर्भातमध्ये नुकतीच, आता सीआयडीकडून देखील काही माहिती प्राप्त होत आहे आणि या बँकेवर जो प्रशासक नेमला आहे या संदर्भात मी सन्माननीय सदस्यांबरोबर देखील बैठक घेतली होती. सभापती महोदय, या बँकेबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, जवळ जवळ 100 एनपी झालेले आहेत. यामध्ये आम्ही पुन्हा रिझर्व्ह बँकेला विनंती केली आहे. या बँकेच्यासंदर्भात बँकेचे लायसेन्स रद्द का करू नये अशी नोटीस सहकार विभागाला प्राप्त झालेली आहे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यात निश्चितच तथ्य आहे, याला विलंब लागतो आहे. यातील काही विषय हायकोर्टातदेखील गेलेले आहेत त्यामुळे साधारणत: आता दोन अडीच महिन्याच्या आत कारवाई करण्याबाबत आम्ही धोरण स्वीकारले आहे आणि या बाबतीत परवाच मी अधिकाऱ्यांची बैठक घेतली असून लवकरच आपण सांगितले त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

***

..... जीजी 4 ...

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

## सागरी सुरक्षेसाठी मागविण्यात आलेल्या बोटी पडून असल्याप्रकरणी करावयाची कारवाई

**(6) * 475 श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. नितीन गडकरी, श्री. विनोद तावडे** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सागरी मार्गाने होणाऱ्या संभाव्य अतिरेकी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठी मागविण्यात आलेल्या सुरक्षा बोटींबाबतची कागदपत्रे मुंबई पोलीसांकडून कस्टम विभागाला न दिली गेल्याने त्या बोटी दिनांक 10 नोव्हेंबर, 2009 पर्यंत बंदरातच पडून होत्या, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या बोटींची संख्या किती आहे व त्या खरेदी करण्याचा निर्णय केव्हा घेण्यात आला होता व त्या मुंबई किनारपट्टीवर केव्हा आल्या होत्या,
(3) या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(4) या बोटी मुंबईच्या सुरक्षा व्यवस्थेत दाखल करण्यात आल्या आहेत काय, असल्यास केव्हा?

**श्री. रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) मुंबई पोलीस दलासाठी मे.सिलेग्ज इंटरनॅशनल लि.न्युझीलंड यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या 4 नग सिलेग्ज ॲम्फीबियस मरीन क्राफ्ट दि.5.9.2009 रोजी जे.एन.पी.टी. नवी मुंबई या बंदरात पोहोचल्या. त्याबाबतची बिल ऑफ एन्ट्री दि.15.9.2009 रोजी सादर केल्यानंतर सदर चारही बोटी कस्टम विभागाने दि.18.9.2009 रोजी मुक्त केल्या.

तसेच मे.ऑन्टॅरिओ ड्राईव्ह ॲन्ड गियर लि.कॅनडा यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या 18 नग ऑल टेरेन ॲम्फीबियस व्हेईकल दि.19.9.2009 रोजी मुंबई बंदरात पोहोचली. त्याबाबतची बिल ऑफ एन्ट्री दि.18.10.2009 रोजी कस्टम विभागास सादर करुन सदर वाहने दि.31.10.2009 रोजी मुक्त करण्यात आली.
(2) 4 नग सिलेग्ज ॲम्फीबियस मरीन क्राफ्ट व 18 नग ऑल टेरेन ॲम्फीबियस व्हेईकल खरेदी करण्याचा निर्णय दि.13.3.2009 च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. सदर 4 नग सिलेग्ज ॲम्फीबियस मरीन क्राफ्ट दि.5.9.2009 रोजी व 18 नग ऑल टेरेन ॲम्फीबियस व्हेईकल दि.19.9.2009 रोजी मुंबई बंदर येथे पोहोचली.
(3) या प्रकरणी कस्टम विभागास कागदपत्रे सादर करण्यास कोणताही विलंब झालेला नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(4) होय. सदर 4 नग सिलेग्ज ॲम्फीबियस मरीन क्राफ्ट दि.6.11.2009 रोजी व 18 नग ऑल टेरेन ॲम्फीबियस व्हेईकल दि.26.11.2009 रोजी मुंबईच्या सुरक्षा व्यवस्थेत दाखल करण्यात आले आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सागरी मार्गाने होणाऱ्या संभाव्य हल्ल्यासंदर्भातील हा प्रश्न आहे. या संदर्भात शासनाने 13 मार्च 2009 ला निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे मुंबई पोलीस दलासाठी मे. सिलेग्ज इंटरनॅशनल लि. न्यूझीलंड आणि मे.ऑन्टॅरिओ ड्राईव्ह ॲण्ड

..... जीजी 5 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 475 ......

गियर लि.,कॅनडा या कंपन्यांकडून काही मरीन क्राफ्टस् खरेदी केल्या. 13 मार्च नंतर या बोटी मुंबई बंदरामध्ये, जेएनपीटी,नवी मुंबई या बंदरामध्ये 5.9.2009 रोजी पोहोचल्या परंतु त्याची बिल ऑफ एंट्री ही 15.9.2009 सादर केल्यानंतर या बोटी कस्टम विभागाने 18.9.2009 रोजी मुक्त केल्या. ..

( यानंतर श्री. सरफरे ... एचएच 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 475..

श्री.पांडुरंग फुंडकर...

त्याचप्रमाणे "मे. ऑन्टॅरिओ ड्राईव्ह ॲन्ड गियर लि. कॅनडा यांच्याकडून खरेदी करण्यात आलेल्या 18 नग ऑल टेरेन ॲम्फीबियस व्हेईकल्स दि.19.9.2009 रोजी मुंबई बंदरात पोहोचली. त्याबाबतची बिल ऑफ एन्ट्री दि.18.10.2009 रोजी कस्टम विभागास सादर करुन सदर वाहने दि.31.10.2009 रोजी मुक्त करण्यात आली." याचा अर्थ यामध्ये दोन महिन्यांचा कालावधी गेला. सागरी मार्गाने मुंबईवर अतिरेक्यांचा हल्ला होणार आहे अशाप्रकारचा आय.बी. चा अहवाल असतांना शासनाने 13.3.2009 ला निर्णय घेतला. आणि सहा महिन्यानंतर बोटी आल्या. त्या बोटी दोन-दोन महिने बंदरात उभ्या रहात असतील तर आपण किती जलद गतीने मुंबईच्या सागरी हद्दीची सुरक्षा करीत आहात हे दिसून येते. त्यामुळे या विलंबाची कारणे काय? आणि त्याला जबाबदार कोण आहे?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत मी आपल्यामार्फत सभागृहास सांगू इच्छितो की, याठिकाणी कोणताही विलंब झालेला नसून बोटीची कस्टम डयुटी माफ करण्यासाठी खात्यामार्फत पत्र व्यवहार सुरु होता. त्या बोटींच्या टेस्टींगकरिता 15 दिवस लागतात, म्हणून त्या धरमतर खाडीमध्ये 15 दिवस होत्या. सुरक्षेच्या दृष्टीने त्या बोटींची अत्यंत आवश्यकता आहे. म्हणून खात्यामार्फत त्या बोटी खरेदी केल्या आहेत. या बोटींवर 13 टक्के इतकी कस्टम डयुटी लावण्यात आली असल्यामुळे ती माफ करण्यासाठी पत्र व्यवहार करण्यात येत होता. त्या अनुषंगाने बॉंडची प्रक्रिया पूर्ण करावयाची असल्यामुळे त्याला वेळ लागला. त्याशिवाय अन्य कारणांसाठी वेळ लागलेला नाही.

श्री. दिवाकर रावते :माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आतंकवाद्यांचा हल्ला सागरी मार्गाने होणार असल्याचा उल्लेख केला. अतिरेक्यांच्या हल्ल्यानंतर प्रधान समिती नियुक्त करण्यात आली. या बोटी सप्टेंबरमध्ये बंदरात आल्या. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या बोटी आल्यानंतर आपण त्या 15 दिवसात नेव्हीच्या ताब्यात दिल्या. प्रधान समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार या बोटी खरेदी करण्यात आल्या काय?

श्री.रमेश बागवे : तसे काही सांगता येणार नाही, आणि तशाप्रकारचा उल्लेखही नाही. या बोटी आल्यानंतर त्यांचे टेक्निकल असेंब्लींग करणे आणि टेस्टींग करणे यासाठी 15 दिवस लागले..



ता.प्र.क्र. 475..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रधान समितीचा अहवाल आमच्याकडे नाही व आपल्याकडेही नाही हे मान्य आहे. प्रधान समितीच्या अहवालामध्ये काहीतरी शिफारशी केल्या असणार. तो अहवाल आपण सील करुन ठेवला आहे,टाळे मारुन ठेवला आहे. त्या अहवालातील शिफारशींवर काहीतरी कारवाई होणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रधान समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार या बोटी खरेदी करण्यात आल्या काय? आपणास हे माहीत नसेल तर ही गंभीर बाब आहे.

श्री.रमेश बागवे : सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या फायबरच्या बोटी आहेत. त्यामुळे त्या संरक्षण करण्याच्या दृष्टीने असमर्थ आहेत याची सरकारला जाणीव आहे काय? फायबरच्या बोटी 10 नॉटिकल मैलाच्या खोल समुद्रामध्ये जाऊ शकत नाहीत, याचा शासनाने अभ्यास केला होता काय?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, यासंबंधी माहिती घेऊन ती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मुंबईच्या किनारपट्टीचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. या फायबर बोटीसंबंधी माझा थोडासा अभ्यास आहे. या फायबर बोटीवर अतिरेक्यांनी गोळीबार केल्यानंतर त्या दहा मिनिटात बुडू शकतात. त्याकरिता ॲल्युमिनियमच्या बोटींची आवश्यकता असते याची शासनाला जाणीव आहे काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:35

ता.प्र.475 . . . .

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

सभापती महोदय, जगामध्ये कोस्टलचे संरक्षण करण्याच्या बाबतीतील निर्णय घेणारी ॲथॉरिटी आहे, तेथे फायबरच्या बोटी वापरल्या जात नाहीत. त्यादृष्टीने शासन अभ्यास करणार आहे काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे, मी त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, अत्यंत महत्वाची बाब म्हणूनच या बोटी घेण्यात आलेल्या आहेत. यासाठी टेक्नीकल समिती असते आणि या समितीने अहवाल ओ.के. केलेला असून, त्या अनुषंगाने खरेदी केली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, राम प्रधान समितीचा कृती अहवाल सदनामध्ये सादर झालेला आहे. त्या अहवालामध्ये म्हटले आहे की, 46 बोटी भाडयाने घेण्यात आलेल्या आहेत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी जो प्रश्न विचारला की, राम प्रधान समितीचा अहवाल आम्हाला मिळालेला नसला तरी कृती अहवालानुसार 46 बोटी भाडयाने घेतलेल्या आहेत. या बोटी पर्यायी व्यवस्था म्हणून घेतलेल्या आहेत काय ? या बोटींची संख्या किती आहे ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांचा प्रश्न हा वेगळया स्वरुपाचा आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, राम प्रधान समितीच्या अहवालाच्या संदर्भातील विषय हा वेगळा प्रश्न आहे. पण याठिकाणी ज्या 29 बोटी खरेदी करण्यात आल्या आहेत, त्यासाठी 53 कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. तसेच मुंबईसाठी 37 कोटी रुपयांचा खर्च केला आहे आणि त्यानुसार बोटी खरेदी केलेल्या आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी प्रश्न विचारला होता की, या बोटी फायबरच्या आहेत काय ? याठिकाणी तत्कालीन मंत्री श्री.जयंतराव पाटील यांनी या बोटी कशा असतील, कशा प्रकारे बुलेटप्रुफ असतील, ॲल्युमिनिअम कसे लावलेले असेल, याबाबतीत माहिती दिली होती आणि ते सांगत असताना ते अशा प्रकारे हातवारे करुन दाखवत होते की, जणुकाही ते बोट बनवित आहेत की काय. म्हणून

. . . .2 आय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.475 . . . .

श्री.दिवाकर रावते . . . .

आमचा प्रश्न असा आहे की, त्यांनी सदनामध्ये जे सांगितलेले आहे, त्याप्रमाणे त्या बोटी आहेत का? हे आम्ही पडताळून पहात आहोत. तसे नसेल तर आम्ही त्यांच्याविरुध्द हक्कभंग प्रस्ताव आणू. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर मिळालेच पाहिजे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, ऑर्डर दिल्याप्रमाणे 8 बोटी आल्या आहेत, त्यामध्ये दोन मोठया आणि सहा लहान बोटी आहेत. तसेच अजून 20 बोटी यावयाच्या आहेत. या ठिकाणी टेक्नीकल समिती नेमली होती, त्या समितीच्या अहवालाप्रमाणे बोटी घेतलेल्या आहेत. या टेक्नीकल समितीच्या अहवालाची सविस्तर माहिती घेऊन मी ती पटलावर ठेवेन.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,मघाशी सन्माननीय सदस्य सर्वश्री.जयंत प्र.पाटील आणि दिवाकर रावते साहेबांनी एक सोपा प्रश्न विचारला होता आणि माननीय मंत्री महोदयांनी त्याचे उत्तर द्यावयास हवे होते. हा प्रश्न असा होता की, या बोटीची क्वॉलिटी कशा प्रकारची आहे म्हणजे ही बोट फायबरची आहे की ॲल्युमिनिअमची आहे की बुलेटप्रुफ आहे ? हे सभागृहाला समजले पाहिजे. याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी 53 कोटी रुपयांच्या खर्चाबाबत सांगितले आणि मघाशी त्यांनी उत्तरामध्ये 22 बोटींच्या बाबतीत उल्लेख केला आणि आता सांगितले की, 8 बोटी आणल्या आहेत. मग यातील खरे उत्तर कोणते आहे ? यासंबंधात गस्त घालणे, माहिती घेणे इ.कारवाई सुरु झालेली आहे काय ? याअनुषंगाने कोणाला ट्रेनिंग दिलेले आहे काय ? हे देखील समजले पाहिजे. माननीय मंत्री महोदयांनी अगोदर बोटीच्या क्वॉलिटी बाबत उत्तर द्यावे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, याबाबतीत जी कमिटी आहे त्यामध्ये नेव्हीचे अधिकारी, केंद्र शासनाचे अधिकारी,तज्ज्ञ यांनी या बोटी बुलेटप्रुफ असल्याचे पाहिलेले आहे. शत्रूपासून संरक्षण करुन, त्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी या बोटी सक्षम आहेत

-----

. . . .2 आय-3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील विशेषत: ठाणे जिल्ह्यातील वसई येथील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहतीतील जुनाट व मोडकळीस आलेल्या इमारतींची करावयाची दुरुस्ती**

**(7) * 2114 श्री. संजय पाटील,श्री. सतीश चव्हाण** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील विशेषत: ठाणे जिल्ह्यातील वसई तालुक्यातील पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहतीतील जुनाट व मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतींच्या दुरुस्तीसाठी 66 लाख 55 हजार रुपयांचा निधी माहे नोव्हेंबर, 2008 मध्ये मंजूर होऊन देखील सदरचा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे माहे ऑगस्ट, 2009 अखेर पर्यंत जमा झालेला नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर पोलीस कर्मचाऱ्यांच्या वसाहतीत पायाभूत सुविधा युक्त जुन्या घरांची दुरुस्ती करुन देण्याच्या संदर्भात राज्याच्या पोलीस गृहनिर्माण विभाग तसेच मा.मंत्री (गृह) पोलीस महासंचालक तसेच प्रधान सचिव (गृह विभाग) यांच्या दिनांक 31 ऑगस्ट, 2009 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आणून देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, इमारतीच्या दुरुस्तीच्या कामास प्रत्यक्षात केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे,

(4) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती आणि सदर पोलीस वसाहतीतील जुनाट व धोकादायक इमारतीची दुरुस्ती किती कालावधीत पूर्ण केली जाणार आहे ?

**श्री.रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) मुंबई वगळता उर्वरित महाराष्ट्रातील पोलीस विभागाच्या जुन्या व धोकादायक निवासी व बिगर निवासी इमारतींच्या दुरुस्तीच्या रु.126.31 कोटी इतक्या रक्कमेच्या कामाच्या अंदाजपत्रकास दि.14.11.2008 च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, त्यामध्ये ठाणे जिल्ह्यातील वसई तालुक्यातील पोलीसांच्या निवासी इमारतींच्या रु.66.50 लाख इतक्या रक्कमेच्या दुरुस्तीच्या कामाचा समावेश आहे. या कामासाठी निधी अर्थसंकल्पीत झाला असून, अद्याप निधी मुक्त केलेला नाही. निधी मुक्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(2) होय.

(3) निधी उपलब्ध होताच इमारतींच्या दुरुस्तीच्या कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

(4) निधी उपलब्ध न झाल्यामुळे दुरुस्तीच्या कामांना विलंब झालेला आहे. लवकरच निधी उपलब्ध होऊन माहे मार्च, 2009 अखेरपर्यंत दुरुस्तीची कामे पुर्ण केली जाणार आहेत.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना या प्रश्नाच्या उत्तरामध्ये बदल करावयाचा आहे काय ?

श्री.संजय पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात जे उत्तर दिलेले आहे, त्यामुळे माझे समाधान झालेले आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/ 13:40

ता.प्र.क्र.2114....

श्री. अरविंद सावंत :सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 1 च्या उत्तरात असे म्हटले आहे की,"त्यामध्ये ठाणे जिल्हयातील वसई तालुक्यातील पोलीसांच्या निवासी इमारतींच्या रु.66.50 लाख इतक्या रक्कमेच्या दुरुस्तीच्या कामाचा समावेश आहे.या कामासाठी निधी अर्थसंकल्पीत झाला असून, अद्याप निधी मुक्त केलेला नाही. निधी मुक्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

शेवटच्या उत्तरात असे म्हटले आहे "की, निधी उपलब्ध न झाल्यामुळे दुरुस्तीच्या कामांना विलंब झालेला आहे. लवकरच निधी उपलब्ध होऊन माहे मार्च, 2009 अखेरपर्यंत कामे पूर्ण केली जाणार आहेत." या कामासाठी पैसे उपलब्ध नाहीत आणि मार्च 2009 हा महिना सुध्दा गेलेला आहे. माझा प्रश्न असा की, उत्तरात काही सुधारणा करावयाची आहे काय? नसल्यास याबाबतीत छपाईमध्ये चूक झाली असेल तर तसे सांगावे. मार्च, 2009 पर्यंत कामे पूर्ण करणार की, मार्च 2010 पर्यंत पूर्ण करणार, याचे उत्तर मिळाले पाहिजे. नाही तर रेकॉर्डवर चुकीचे राहील.

श्री. रमेश बागवे : सदर कामे मार्च, 2009 ते मार्च,2010 या कालावधीत पूर्ण होतील. सभापती महोदय, उत्तरामध्ये छपाईमध्ये चूक झालेली आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील वसईच काय पण ठाण्यातील वर्तकनगर व अन्य भागातील इमारती नादुरुस्त आहेत व मोडकळीस आलेल्या आहेत. हे काम मार्च, 2010 पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे म्हणजे हे काम पुढच्या वर्षापर्यंत जाईल. तोपर्यंत काही इमारती पडतील. प्रशासकीय मंजुरी आणि त्यानंतर प्रत्यक्ष निधी उपलब्ध झाल्यानंतर त्या बांधकामाला सुरुवात होईल. माझा स्पेसिफिक प्रश्न वर्तकनगर येथील पोलिसांच्या वसाहतीच्या संदर्भात आहे. या वसाहतींची अतिशय वाईट स्थिती आहे. सरकारचा निधी बाजूला राहू द्या आम्ही कॉन्ट्रीब्युशन काढून या इमारतीची दुरुस्ती करतो अशा प्रकारची मागणी तेथील पोलीस करीत आहेत. यासंदर्भात गेल्या दोन अधिवेशनात मी याचा पाठपुरावा केलेला आहे तेव्हा याला शासन मान्यता देईल काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

SMT/ KGS/ ST/

ता.प्र.क्र.2114....

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, राज्यामधील पोलीस इमारतींच्या दुरुस्तीसाठी एकूण 126 कोटी रुपयाची मागणी केली होती. त्या अनुषंगाने जून 2009 ला 75 काटी रुपयांची मागणी मान्य झाली त्यातील 20 कोटी रुपये केवळ मुंबईतील निवासासाठी उपलब्ध करुन दिलेले आहेत. उर्वरित 55.44 कोटी इतका निधी इतरत्र सार्वजनिक बांधकामास उपलब्ध करुन देऊन पी.डब्ल्यू. डी.च्या अनुषंगाने या सर्व वसाहतीं दुरुस्त केल्या जातील. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचा जो मुद्दा आहे, त्याबाबतीत या निधीच्या अनुषंगाने तशाच पध्दतीने दुरुस्ती केली जाईल.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/ 13:40

**पिंपरी मेघे (जि.वर्धा) येथील श्री.शंकरराव घुमे यांचा जिल्हा कारागृहात झालेला संशयास्पद मृत्यू**

**(८) * १३७९ श्री. व्ही.यु. डायगव्हाणे , श्री.कपिल पाटील , श्री. जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ५०४३३ ला दिनांक ५ जून, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुगार अधिनियम, कलम १२ (अ) खाली दिनांक १४ एप्रिल, २००८ रोजी अटक केलेल्या श्री.शंकर दादाजी घुमे या निरपराध व्यक्तिचा वर्धा कारागृहात दिनांक १७ ऑगस्ट, २००८ रोजी झालेल्या मृत्यू प्रकरणाच्या उपविभागीय दंडाधिकारी हिंगणघाट यांनी केलेल्या चौकशीचा अहवाल तयार झाला आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी अहवालात काय आढळून आले आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रमेश बागवे श्री.आर.आर.पाटील यांच्या करिता** : (१) होय,

(२) व (३) चौकशीमध्ये श्री.शंकर दादाजी घुमे यांचा मृत्यू हा यकृताच्या आजारपणामुळे (Cirrhosis of Liver With chronic Venous Congestion) झाल्याचे उपविभागीय दंडाधिकारी यांनी स्पष्ट केले आहे. तथापि मृतक श्री.शंकर दादाजी घुमे यांचे वय, प्रकृती त्यांस असलेले आजार इत्यादी सर्व विचारात घेवून योग्य ते उपचार तो कस्टडीत असतांना पोलीस विभागाकडून वेळीच केल्या गेले असते तर आणि त्याकडे योग्य ते लक्ष वेळीच पुरविल्या गेले असते तर कस्टडीतील मृत्यू टाळता येण्याजोगा होता. असे उपविभागीय दंडाधिकारी यांनी चौकशी अहवालात नमूद केले आहे.

श्री. व्ही.यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, अतिशय गंभीर प्रकरण आहे. घुमे नावाची सेवानिवृत्त झालेली व्यक्ती लघुशंकेसाठी गेलेली होती. त्याठिकाणी पोलिसांच्या आशिर्वादाने जुगार अड्डा चालू आहे. ते तेथून बाहेर आल्यानंतर हेच जुगार अड्डयातून बाहेर आले म्हणून त्यांना अटक केली आणि पोलीस कस्टडीत टाकले. त्यानंतर दोन दिवसांनी त्यांचा मृत्यू झाला. यासंदर्भात या सभागृहात दोन-तीन वेळा प्रश्न उपस्थित केल्यानंतर याबाबतीत अंशत: न्याय मिळाला आहे. शासनाने त्याबातीत उप विभागीय दंडाधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली. या चौकशी समितीने जो रिपोर्ट दिलेला आहे, त्यामध्ये स्पष्टपणे असे म्हटले आहे की, श्री. घुमे यांचे वय, प्रकृती, त्यास असलेले आजार इत्यादी सर्व विचारात घेऊन योग्य ते उपचार कस्टडीत असताना पोलीस विभागाकडून वेळीच केले गेले असते आणि याकडे वेळीच योग्य लक्ष पुरविले असते तर कस्टडीतील मृत्यू टाळता येण्याजोगा होता. म्हणजे पोलीस या मृत्युला दोषी आहे. म्हणून नेमके दोषी कोण ? या दोषींवर काय कारवाई करण्यात येईल?

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1379....

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, याठिकाणी जी व्यक्ती मयत झालेली आहे. त्याला व इतर १९ लोकांना जुगाराच्या प्रकरणामध्ये अटक करण्यात आली होती. ज्यावेळी हे कैदी तुरुंगात आले होते त्यावेळी त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली होती. वैद्यकीय सहाय्यक अधिकाऱ्याने त्याला पूर्व आजार नाही अशा तऱ्हेचा दाखला दिलेला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्याच्या दाखल्यानुसार त्याला कोणताही आजार नव्हता. तसेच श्री. घुमे यांनी सकाळी नास्ता केला, चहापाणी केले, दुपारचे जेवण घेतले. रात्री मित्राबरोबर गप्पा मारल्या.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1379 ..... श्री. रमेश बागवे......

आणि सकाळी त्याचा लिव्हरच्या आजाराने मृत्यू झाला असे वैद्यकीय तपासणीमध्ये आलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पहिल्यांदा ही व्यक्ती निरपराध होती आणि त्याला अटक केली. तो खरोखर त्या सट्टयामध्ये होता की नव्हता हे माहीत नाही पण त्याला पकडून नेले. दुसरा बाब अशी की, आपल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तो फिट असल्याचे सर्टिफिकेट दिले. शासनाच्या उत्तरामध्ये त्यांचा मृत्यू "Cirrhosis of Liver With chronic Venous Congestion" यामुळे झाला असे म्हटले आहे. बहुतेक दारुच्या अतिसेवनामुळे ज्या लोकांचे पोट खराब होते त्यातून होणारा हा रोग आहे. याबाबत डॉक्टर अधिक सांगू शकतील. या ठिकाणी अशा माणसाची जेव्हा वैद्यकीय तपासणी होते तेव्हा त्याच्या प्रकृतीवरुन हा रोग नक्की लक्षात येतो. कारण त्याच्या पुष्कळ गोष्टी फेल झालेल्या असतात. मग जेलमधल्या आपल्या डॉक्टरने तो फिट असल्याचे जे सर्टिफिकेट दिले त्यांनी ज्याचा मृत्यू झाला त्याच्या बाबतीत तो फिट असल्याचे सर्टिफिकेट कसे दिले ? याची शासनाने चौकशी केली का ? यामध्ये गंभीर मुद्दा असा आहे की, कोणी गुन्हेगार असो किंवा नसो, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तो त्या ठिकाणी सट्टा खेळणाऱ्या कंपूसमोर लघवी करण्यासाठी गेला आणि तो हातात सापडल्यामुळे त्याला पकडले. असे जर असेल तर ते आणखी दुर्दैवी आहे. म्हणजे ज्याचा गुन्ह्याशी संबंध नाही त्याला पकडावयाचे, त्याच्यावर वेगवेगळी कलमे लावावयाची आणि त्याची अशा प्रकारे हेळसांड करुन त्यामध्ये त्याचा मृत्यू होणे ही बाब अमानवी आहे. मानवाधिकार आयोगाकरिता ही केस फिट आहे. पण पुन्हा अशा घटना घडू नये म्हणून या ठिकाणी पोलीस विभागाकडून त्याला ताबडतोब दवाखान्यात नेण्याच्या बाबतीत किंवा त्याचा मृत्यू होईपर्यंत त्याची बरोबर दखल घेतली गेली नाही हे उत्तरामध्ये शासनाने मान्य केलेले आहे. डॉक्टरने चुकीचा रिपोर्ट दिला हेही यातून सिध्द होते. याबाबतीत शासन काय कारवाई करणार आहे ? पुढे अशी घटना घडू नये म्हणून कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, या ठिकाणी डॉक्टरच्या सर्टिफिकेटमध्ये असे आलेले आहे की, no any previous history of illness. त्या अनुषंगाने त्याची तपासणी केलेली आहे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1379 ..... श्री. रमेश बागवे......

आणि संबंधित व्यक्तीला जुगाराच्या केसमध्ये अटक केलेली आहे आणि त्याच्यावर कलम 151(1), कलम 107 आणि कलम 116 अन्वये कारवाई केलेली आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, तो जुगाराच्या अड्डयावर होता हे सिध्द झाले आहे काय ?

**सभापती** : मी आपल्याला नंतर प्रश्न विचारण्याची परवानगी देतो.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, त्या ठिकाणी कलम 151(1), 107 आणि 116(3) जुगाराच्या केसमध्ये त्याला अटक केलेली आहे. पोलिसांनी अटक करुन त्यांच्यावर केस केलेली आहे. त्या ठिकाणी जुगाराच्या खेळामध्ये एकूण 20 आरोपी होते त्यातील हा एक आरोपी होता. त्याच्यावर केस केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत सांगू इच्छितो की, 5 जानेवारीला मानवी हक्क आयोगासमोर त्याची सुनावणी आहे आणि मानवी हक्क आयोग जो निर्णय देईल त्या अनुषंगाने कार्यवाही होईल.

श्री. नितीन गडकरी : मला एवढेच विचारावयाचे आहे की, आरोपीला जेव्हा पकडण्यात आले तेव्हा आपले डॉक्टर असा रिपोर्ट देतात की, तो मेडिकली फिट आहे. या उत्तरामध्ये मृत्यूचे कारण "Cirrhosis of Liver With chronic Venous Congestion" असे दिलेले आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत याबाबत जास्त सांगू शकतील. साधारणत: असा माणूस शुष्क झालेला असतो. त्याला हा आजार आहे हे सगळे माहीत असताना त्यांनी असा रिपोर्ट कसा दिला? तो व्यक्ती नंतर मरतो. हा रिपोर्ट देणारा डॉक्टर सांगतो की, ही केस मेडिकली फिट आहे. आपल्याला हे पटते काय ? त्या डॉक्टरने जो रिपोर्ट दिला तो बरोबर आहे की नाही ? त्याच्या मृत्यूनंतर याबाबत आपण चौकशी करावयास पाहिजे होती ती का केली नाही ? जर चौकशी केली असेल तर त्यामध्ये काय दिसून आले ? मी पोलिसांना एकदम सस्पेंड करा असे काही म्हणणार नाही. कारण अशा लहानसहान गोष्टींकरिता पोलिसांना सुध्दा वेठीस धरु नये. पण मानवीय दृष्टीकोनातून जर पोलीस स्टेशनमध्ये एखाद्या माणसाची प्रकृती बिघडली तर त्याला ताबडतोब

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 1379 ..... श्री. नितीन गडकरी .....

योग्य डॉक्टरकडे पोलीस बंदोबस्तात नेणे हे काम त्वरेने व्हावयास पाहिजे होते. आपणच उत्तरामध्ये सांगितले आहे की, ते केले असते तर त्याचे प्राण वाचले असते. एस.डी.ओ. यांनी जी चौकशी केली त्याबाबत त्यांनी आपल्या रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की, त्याचे प्राण वाचले असते. मग ज्यांनी हे केले नाही त्यांना सस्पेंड करा किंवा कारवाई करा परंतु त्यांनी हे का केले नाही याबाबत विचारावे आणि भविष्यामध्ये असे होणार नाही याबाबत पोलिसांना सूचना द्याव्यात. नाही तर लोक किडा-मुंगीसारखे मरत आहेत त्याबाबत आपण शासन म्हणून निर्णय घेणार की नाही ?

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1379....

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सिव्हिल हॉस्पिटलने त्यांना फिटनेस सर्टिफिकेट दिलेले होते. त्यांना आजाराची पूर्व कल्पना देण्यात आली होती. ही बाब या व्यक्तीने डॉक्टरांच्या निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे होती, परंतु त्यांनी दिली नाही. भविष्य काळामध्ये अशाप्रकारच्या केसेस होऊ नये याची दक्षता शासन घेईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये मृत्यूचे कारण दिलेले आहे. त्यात असे म्हटलेले आहे की, "Cirrhosis of Liver chronic Venous Congestion." क्रॉनिक या शब्दाचा अर्थ त्यांना कित्येक दिवसापासून आजार होता. It is not active condition. जर एखाद्या व्यक्तीला सिरॉसिस ऑफ लिव्हर हा आजार असेल तर त्याचा लिव्हर पालपेबल असतो किंवा नाही ते सांगावे. त्यामुळे त्या व्यक्तीची तपासणी योग्य झाली नाही. केवळ कागदावर रिपोर्ट दिला गेला. अशाप्रकारचा रिपोर्ट देणाऱ्या डॉक्टरांवर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, संबंधित आरोपीने आपल्याला कोणता आजार होता त्याची माहिती डॉक्टरांना देणे आवश्यक होते, परंतु त्यांनी ती दिली नाही.....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा एका वाक्याचा प्रश्न आहे. डॉक्टरांनी पोटाची तपासणी करताना पोट दाबून पाहिले असेल. पोट दाबून पाहिल्यावर सिरॉसिस ऑफ लिव्हरचा आजार असल्याचे त्यांना जाणवले असेल, त्यांच्या हाताला तशी कडा लागली असेल, मंत्रिमहोदयांनी त्याच्या हिस्ट्रीमध्ये जाऊ नये.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, सिव्हिल हॉस्पिटलने त्यांना फिटनेस सर्टिफिकेट दिलेले होते. तसेच या प्रकरणाची मानवी हक्क आयोगाकडे दिनांक 5 जानेवारी, 2010 रोजी सुनावणी होणार आहे. आयोगाच्या निदेशानुसार शासन कार्यवाही करील.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांच्या उत्तरातूनच दोन गोष्टी सिध्द झ ालेल्या आहेत. या इसमावर जुगार खेळण्याचा आरोप सिध्द झालेला नाही. 19 आरोपींपैकी तो एक आरोपी होता. पोलिसांनी मनात आणले तर कोणालाही आरोपी ठरवू शकतात. शासनाने दिलेल्या लेखी उत्तराच्या विपरित कोण प्रमाणपत्र देत असेल तर त्याला फाशी द्यावी. परंतु योग्य

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1379.... प्रा.बी.टी.देशमुख.....

वेळी या आरोपीकडे लक्ष दिले गेले असते तर कस्टडीतील हा मृत्यू टाळता आला असता. हे शासनाच्या लेखी उत्तरातच नमूद केलेले आहे. या लेखी उत्तरातूनच निर्माण झालेला प्रश्न मी विचारत आहे. कारण माणसांनी किडया मुंग्यासारखे मरावे हे योग्य नाही. म्हणून या मृत्यूला जे जबाबदार असतील त्यांच्याविरुध्द कारवाई करावी आणि त्यांच्या कुटुंबियांना शासनाने मदत करावी अशी मी मागणी करतो, शासन ती देईल काय असे माझे दोन प्रश्न आहेत.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे दिनांक 5 जानेवारी, 2010 रोजी मानवी हक्क आयोगाकडे सुनावणी आहे. मानवी हक्क आयोगाकडून निदेश दिले जातील त्याप्रमाणे शासन कार्यवाही करील.

**सभापती** : मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, या प्रश्नासंबंधी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. हे प्रकरण गंभीर आहे. लेखी उत्तरातही असे म्हटलेले आहे की, " याबाबतीत थोडी दक्षता घेतली असती तर हे टाळता येण्यासारखे होते." याचा अर्थ हा मृत्यू टाळता येणे शक्य होते. It is the commitment on behalf of the Government. म्हणून आपण स्वत: याबाबतीत लक्ष घालावे आणि याबाबतीतील वस्तुनिष्ठ परिस्थिती जाणून घ्यावी. यामध्ये जे दोषी असतील त्यांच्याबाबत कठोर कारवाई करावी.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे कारवाई केली जाईल.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, प्रश्न के उत्तर में मंत्री महोदय ने जबाब दिया है कि यह मामला मानवाधिकार आयोग के पास सुनवाई के लिए जाएगा. लेकिन मेरा प्रश्न यह है कि मृत व्यक्ति के वारिसों को शासन कम्पेनसेसन देगा या नहीं देगा ? :

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**वरळी, मुंबई येथून एका महिन्यात दुप्पट रक्कमेच्या योजनेत फसवणूक करण्याऱ्या दोन जणांना अटक केल्याबाबत**

**(९) * ८२१ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी, मुंबई येथून एका महिन्यात दुप्पट रक्कमेच्या योजनेत सुमारे २ हजार जणांची सहा कोटी रुपयांना फसवणुक करणाऱ्या दोन जणांना माहे ऑक्टोबर, २००९ मध्ये वा त्या दरम्यान अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यांत आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार अटक केलेल्यांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) नाही.

(२),(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ऑक्टोबर महिन्यामध्ये ही घटना घडली असून त्याला अडीच महिन्याचा कालावधी झालेला आहे. या प्रकरणातील 4 आरोपींची नावे काय आहेत आणि पाचवा आरोपी फरार झालेला आहे त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांचे काय प्रामाणिक प्रयत्न चालले आहेत ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, श्री.मनीष महादेव दळवी, श्री.शेखर संपत साळुंखे, श्री.संदिप सदानंद पडवळ, श्री.समीर रमाकांत खोत अशी या चार आरोपींची नावे आहेत. त्यांना दिनांक 14.12.2009 पर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवलेले आहे. पाचवा फरारी आरोपी अब्दुल वहिदुल्ला खान याचा तपास चालू आहे.

-----

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री.खंदारे 13:55

**मुंबई-नाशिकला जाताना कसारा घाटातली वाहतूक कोंडी टाळण्याबाबत करावयाची उपाययोजना**

**(१०) * ७७९ श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. भगवान साळुंखे , श्री. चंद्रकांत पाटील** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिकला जाताना कसारा घाटातली वाहतूक कोंडी टाळण्यासाठी बांधण्यात येत असलेला रस्ता पावसाच्या तडाख्याने खचला असून, नवीन रस्त्याचे बांधकाम निकृष्ट दर्जा असल्याचे माहे जुलै, २००९ च्या अखेरीस निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अब्दुल सत्तार, श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता** : (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सय्यद पाशा : नाशिक मुंबई रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम सुरु आहे. हे काम किती दिवसात पूर्ण होईल ? या कामाच्या संदर्भात अनेक तक्रारी आहेत. हे काम निकृष्ट दर्जाचे आहे. तेव्हा या कामाच्या संदर्भात चौकशी करण्यात येईल काय ?

श्री. अब्दुल सत्तार : हा रस्ता चालू झालेला आहे. मध्ये ३०० मीटर रस्ता खराब होता. घाटकटींग होते. रस्ता दुरुस्त होऊन सुरळीत चालू झालेला आहे...

श्री. छगन भुजबळ : हा रस्ता केन्द्र शासनाच्या माध्यमातून सुरु आहे. घाटातील रस्ता जेव्हा सुरु केला त्यावेळी रस्ता पूर्ण झालेला नव्हता. पावसाळयामध्ये एकाच मार्गाने होणारी वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी काही काळाकरिता नवीन रस्त्यावर वाहतूक सोडलेली होती. दरम्यानच्या काळामध्ये तीन पदरी वनवे पूर्ण करण्यात आलेला आहे. हे काम निकृष्ट दर्जाचे झ ाालेले नाही असा तज्ज्ञांचा रिपोर्ट आलेला होता. भिवंडीपासूनचा संपूर्ण रस्ता पूर्ण होण्यासाठी शहापूर आणि इतर भागामध्ये अडचणी निर्माण झाल्या होत्या. मी आजच्या त्या संदर्भत संबंधितांशी बोललो. हा साधारणत: ९९.५ कि.मी. लांबीचा रस्ता २१.४.२०१०ला पूर्ण होईल.

----

...२...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नायगांव येथील सशस्त्र पोलीस दलात केलेल्या बदल्या प्रशासकीय न्यायाधिकरणाने बेकायदा ठरवून रद्द केल्याबाबत**

**(११) * १३१८ श्री. अनिल परब , श्री.किरण पावसकर , श्री.परशुराम उपरकर** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलीस आयुक्त, मुंबई यांनी दिनांक १५ जून, २००९ रोजी वाहतूक शाखेतील ४१ पोलीस शिपायांच्या नायगांव येथील सशस्त्र पोलीस दलात केलेल्या बदल्या प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिनांक ३० ऑक्टोबर, २००९ रोजी वा त्या सुमारास बेकायदा ठरवून रद्द केल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १५ जून, २००९ च्या आदेशानुसार एकूण १२७ पोलीस शिपायांच्या झालेल्या बदल्यामध्ये ६९ शिपायांनी वरिष्ठांच्या वतीने हप्ते गोळा करणारे "कॅशिअर" म्हणून काम केले असल्याचे कारण देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ४१ शिपायांच्या न्यायालयीन प्रकरणात तसे शपथपत्रही सादर करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हप्ता गोळा करणे प्रकरणी शासनाने स्वतंत्र अशी चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सर्व संबंधितांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील** : (१) होय.
(२) बदली करण्यात आलेल्या १८६ कर्मचाऱ्यांपैकी ८३ पोलीस कर्मचारी काही आस्थापनाधारकांकडून हप्ते गोळा करीत असल्याचे गुप्त चौकशीत निष्पन्न झाले होते.
(३) सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे वस्तुस्थितीवर आधारीत शपथपत्र दाखल करण्यात आले होते.
(४) व (५) सदर प्रकरणात पोलीस उपआयुक्त (शहरे), वाहतूक, मुंबई हे चौकशी करीत आहेत.

श्री. किरण पावसकर :नायगांव येथील सशस्त्र पोलीस दलात पोलीस कर्मचा-यांच्या बदल्या केल्यानंतर न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्या रद्द करण्यात आल्या. 186 कर्मचा-यांपैकी 83 पोलीस कर्मचारी काही आस्थापनाधारकांकडून हप्ते गोळा करीत असल्याचे गुप्त चौकशीत निष्पन्न झाले होते, असे छापील उत्तर देण्यात आलेले आहे. ज्या पोलीस कर्मचा-यांनी न्यायालयामध्ये शपथपत्र दाखल करुन ज्यांच्यासाठी हप्ते गोळा करण्यात येत होते त्या वरिष्ठांची नावे सांगितलेली आहेत. त्या वरिष्ठांवर काय कारवाई करण्यात आलेली आहे ? हप्ते गोळा करणा-यांचे नाव कॅशिअर असे ठेवलेले आहे. हे नाव सरकारमान्य आहे काय ?

...3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे : वाहतूक शाखा ही स्वतंत्र विंग आहे. 1959साली या विंगची स्थापना झाली. सन्माननीय सदस्यांनी कॅशिअर असा शब्द प्रयोग केला. ही गोष्ट खरी आहे की, त्या ठिकाणी त्यांना कॅशिअर म्हणून संबोधले जाते. याबाबतीत लेखी किंवा तोंडी तक्रार उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द प्रशासकीय कारवाई करणे अडचणीचे आहे. अशा या कर्मचा-यांची बदली करण्यात आली होती.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1318..

श्री. नितीन गडकरी : 186 कर्मचाऱ्यांपैकी 83 पोलीस कर्मचाऱ्यांनी काही आस्थापना धारकांकडून हप्ते गोळा केले याबाबत गुप्त चौकशी केल्यानंतर वस्तुस्थिती खरी असल्याचे निष्पन्न झाले. यांना कॅशिअर म्हणून ओळखले जात होते. ते हप्ते गोळा करुन कोणाला देत होते? न्यायालयासमोर शासनाने शपथपत्र सादर केले आहे. आता चौकशी कशासाठी केली जात आहे? हे सगळे हप्ते कोणाला दिले जात होते? मंत्र्यांकडे जात होते का? राज्यमंत्र्यांकडे जात होते का? कमिशनरपर्यंत जात होते का? याची खरी माहिती काय आहे? श्रीमंतांकडून पैसे घेता. लक्ष्मीपुत्र तुमच्यामध्ये आहेत. परंतु गरीब लोकांकडून हप्ते का घेतले जातात? पुरावा असूनही कारवाई का केली जात नाही? या प्रकरणी त्वरित कारवाई करणार आहात का?

श्री.रमेश बागवे : मुंबईचे पोलीस आयुक्त यांना चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : मंत्रीमहोदय, हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. या अनुषंगाने आपण पोलीस आयुक्त, मुंबई यांना जरुर या प्रकरणाची चौकशी करण्यास सांगितले आहे. परंतु मला वाटते की, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी अँटी करप्शन ब्यूरो यांच्याकडून करण्याची व्यवस्था करावी.

श्री.रमेश बागवे : होय.

श्री.नितीन गडकरी : या संदर्भातील कारवाई करुन पुढील अधिवेशनात सभागृहासमोर अहवाल ठेवावयास सांगावे.

**सभापती** : कारवाई करुन अहवाल सभागृहापुढे ठेवावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मॅटमध्ये या संदर्भातील प्रश्न उपस्थित झाला होता. पोलीस हप्तेखाऊ आहेत. त्यांना शिक्षा काय झाली? बदली करण्याची कारवाई केली गेली. मॅटमध्ये शासनाने शपथपत्र दाखल केल्यानंतरही संबंधित कर्मचारी तेथेच बसले आहेत. कॅशिअर म्हणून जमविलेले हप्ते त्यांच्या वरिष्ठांपर्यंत पोहोचले का? मॅटमध्ये न्यायालयाप्रमाणे न्यायाधीश नेमले जात नसून निवृत्त आय.ए.एस.अधिकारी तेथे कार्यरत आहेत. शपथपत्र सादर करुनही त्यांनी निर्णय दिला नाही. शासनाने शपथपत्र दाखल केले असतानाही शासनावर त्यांचा विश्वास नाही का?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1318..

**सभापती** : मंत्रीमहोदय, पुढील अधिवेशनात या प्रश्नाच्या अनुषंगाने ज्यावेळेला आपण केलेल्या चौकशीचा अहवाल या सदनामध्ये द्याल त्यावेळी त्या अहवालामध्ये सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विचारलेल्या प्रश्नाचा सुध्दा अंतर्भाव करावा.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, होय.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आज माझ्याकडे सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील व सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांचे औचित्याचे मुद्दे प्राप्त झालेले आहेत. विशेष बाब म्हणून हे तीनही औचित्याचे मुद्दे स्वीकारले आहेत. औचित्याचे मुद्दे शुक्रवारी मांडण्याची संधी दिली जाते. परंतु हे मुद्दे अत्यंत महत्वाचे असल्यामुळेच मी आज मांडण्याची परवानगी देत आहे.

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी एक महत्वाची बाब आपल्या नजरेसमोर आणू इच्छितो. बांधकाम व्यावसायिक श्री.अनिल ऊर्फ ए.व्ही.सेवलेकर यांनी आपल्या निवासस्थानी सकाळ वृत्तपत्राचे संपादक, पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री.योगेश खुटे, बातमीदार श्री.संदीप जगदाळे यांना आपल्या घरात तीन तास डांबून ठेवले, त्यांना मारहाण केली. मारहाणीचे कारण काय होते? बांधकाम व्यावसायिक श्री.सेवलेकर यांनी मुंढवा, जि.पुणे येथे फ्लोरिडा इस्टेट सोसायटीचे बांधकाम केले, ते बांधकाम निकृष्ट दर्जाचे होते अशा प्रकारची बातमी वृत्तपत्रात छापल्यामुळे त्यांनी खुलासा करण्यासाठी दोन बातमीदारांना घरी बोलावले. त्यांना तीन तास डांबून ठेवले. 5-6 हस्तकांकरवी मारहाण केली. त्यांचा गळा दाबला आणि त्यांना सांगितले की, तुम्हाला मारुन टाकू. त्यांचे कपडे उतरविण्यात आले, मोबाईल काढून घेतले, त्यांचे फोटो काढण्यात आले, त्यांची ओळखपत्रे ताब्यात घेतली आणि दोन्ही पत्रकारांना खुनाची धमकी दिली. श्री.सेवलेकर यांनी स्वतःच्या घरामध्ये त्यांना तीन तास डांबून ठेवले होते. ही बातमी पुणे शहरामध्ये वाऱ्यासारखी पसरली आणि चारशे-पाचशे लोक त्याठिकाणी एकत्र आले. त्यांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करुन सुध्दा ते आरोपी पकडले गेले नाहीत.

(नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

या राज्यामध्ये पत्रकारांवर अशा प्रकारचे हल्ले होणे ही आता नित्याचीच बाब झालेली आहे. म्हणून मी आपल्या माध्यमातून शासनाला अशी विनंती करतो की, याप्रकरणी गुन्हेगार असलेल्या बांधकाम व्यावसायिकाविरुध्द गुन्हा दाखल करुन त्याला ताबडतोब अटक करावी.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून अत्यंत गंभीर विषय सभागृहासमोर आणला आहे. या मुद्याला पाठिंबा देताना मी एवढेच म्हणेन की, अगदी काल परवाचीच ही घटना आहे व या घटनेत श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आणि माझे मित्र श्री. योगेश कुटे हे स्वत: अपंग आहेत. एक अपंग असलेला व अनुभवी असा पत्रकार, तसेच श्रमिक पत्रकार संघाचे ते अध्यक्ष सुध्दा आहेत. त्यांना एखाद्या बिल्डरने बोलावून तीन तास डांबून ठेवणे ही गंभीर घटना आहे. या घटनेच्या विरोधात पत्रकारांनी पुण्यात निदर्शने सुध्दा केली की, पोलिसांनी या बिल्डरला अटक करावी परंतु अद्यापही त्याला अटक झालेली नाही, तो हॉटेल मालक व बिल्डर हा मोकळाच आहे. म्हणून यासंदर्भात शासनाने ताबडतोबीने कारवाई करावी, अशी या निमित्ताने मी विनंती करतो.

---------------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अत्यंत गंभीर घटनेकडे सभागृहाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधलेले आहे. या विधिमंडळाच्या आवारात यापूर्वी देखील कधी घडले नाही अशा प्रसंगाला आज सामोरे जावे लागत आहे. कारण सर्व पत्रकार विधान भवनाच्या पायऱ्यांवर बसून शासनाडे दाद मागत आहेत की, हल्लेखोरांना पकडले पाहिजे. श्रमिक पत्रकार संघाच्या अध्यक्षांना हॉटेल मालक व बांधकाम व्यावसायिक असलेल्या व्यक्तीने बोलावून मारहाण केली परंतु त्याला आजतागायत अटक केलेली नाही किंवा गुन्हा सुध्दा दाखल केला नाही. याप्रकरणी या बिल्डरच्या चार लोकांनाच अटक झालेली आहे परंतु मूळ मालकावर गुन्हा दाखल झालेला नाही अथवा त्याला अटक सुध्दा झालेली नाही, याचा अर्थ शासन त्याला संरक्षण देण्याचा प्रयत्न करीत आहे की काय हेच समजत नाही. अशा प्रकारे वारंवार पत्रकारांवर जे हल्ले होत आहेत त्यांना आळा बसावा म्हणून, ते हल्ले बंद करण्यासाठी कायद्यामध्ये दुरुस्ती करण्याची गरज आहे. तसेच पत्रकारितेचे काम करीत असताना जर पत्रकारांवर अशा प्रकारचा हल्ला झाला तर त्या कायद्याच्या अंतर्गत जामीन सुध्दा मिळता कामा नये अशी तरतूद या कायद्यात करावी लागेल. तसेच अशा मारहाण करणाऱ्या लोकांना संरक्षण न देता ताबडतोब अटक करावी असे आदेश शासनाला द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

----------

....4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी औचित्याच्या मुद्याच्या निमित्ताने जो प्रश्न उपस्थित केला आहे ती घटना गंभीर स्वरुपाची आहे आणि ही घटना सभागृहाच्या लक्षात आणून देण्यासाठी त्यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे. यासंदर्भात शासनाने तात्काळ दखल घेऊन कारवाई केली पाहिजे तसेच काय कारवाई केली त्यासंबंधीचा अहवाल सुध्दा सभागृहाला समजला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

----------

....5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ज्या ठिकाणी पत्रकार दाद मागण्यासाठी बसलेले आहेत त्या ठिकाणी अर्ध्या तासापूर्वी मलाही बोलावले होते. मी त्यांना भेटलो तसेच नंतर माननीय मुख्यमंत्री सुध्दा तेथे आले. ही घटना अतिशय गंभीर आहे. एका पत्रकार संघाच्या अध्यक्षांना अशा प्रकारे कपडे उतरवून मारण्यापर्यंत या लोकांची हिंमत वाढलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी कायद्यात दुरुस्ती करण्याची सूचना केली आहे परंतु केवळ कायद्यात दुरुस्ती करुन होणार नाही कारण पत्रकारांवरील हल्ल्यांच्या संदर्भातील क्रिमीनल प्रोसिजर कोड वेगळे आहे. यासंबंधीची तरतूद करावयाची असेल तर शासनाला सभागृहातच बिल आणावे लागेल आणि त्यात शिक्षेसंबंधीची तरतूद करावी मग ती बेलेबल अथवा नॉन बेलेबल असेल याचाही उल्लेख त्यात असेल. अशा प्रकारचे बिल आणल्यानंतर आम्ही देखील त्याचे समर्थन करण्यास तयार आहोत. कारण कोणीही उठावे आणि पत्रकारांना मारावे आणि त्यात चौथा स्तंभ असलेल्या वर्तमानपत्रावर अशा प्रकारचे हल्ले होणे ही समर्थनीय बाब असू शकत नाही. माझी विनंती अशी आहे की आज सभागृहाची बैठक संपण्यापूर्वी असे विधेयक शासनाने आणावे अन्यथा म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावतो असे होऊ नये म्हणून याबाबत लवकरात लवकर बिल आणण्याच्या संदर्भात आपण माननीय मुख्यमंत्र्यांना आदेश द्यावेत अशी मी विनंती करतो.

--------

. . . OO - 6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, माननीय विरोधी पक्ष के नेता और अन्य माननीय सदस्यों ने जो भावनाएं व्यक्त की हैं, मैं उनका समर्थन करता हूँ. संबंधित व्यक्ति पर कार्रवाई होनी चाहिए. जैसा कि माननीय सदस्य श्री. कपिल पाटील और श्री. गडकरी जी ने कहा है कि इस बारे में पत्रकारों को राइट ऑफ फ्रीडम मिलना चाहिए और इसके लिए विशेष कानून बनाने के लिए सभागृह में बिल पेश करना चाहिए. पत्रकार कुछ भी लिखें, लेकिन उनके साथ इस तरह का अमानवीय व्यवहार नहीं होना चाहिए. जिन्होंने यह व्यवहार किया है, उनके ऊपर जल्दी से जल्दी कार्रवाई की जाए, ऐसी मेरी मांग है.

. . . . . .

. . .नंतर श्री. जुन्नरे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड : माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी पत्रकारावरील हल्ल्याच्या संदर्भात अतिशय गंभीर विषय या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. या विषयावर सभागृहात चर्चा होत असतांना पत्रकारांना संरक्षण देण्याच्या संदर्भात कायदा करणे अत्यंत आवश्यक आहे. या प्रकारचा कायदा केला तर त्याला संपूर्ण सभागृह एकमताने संमती देईल त्यामुळे पत्रकांराना संरक्षण देण्याच्या संदर्भात कायदा करण्याचा प्रस्ताव शासनाने आणावा अशी माझी सूचना आहे.

---------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ ST/

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, ज्या पध्दतीने आपण डॉक्टांच्या संदर्भातील एक विधेयक मंजूर केले त्याच प्रमाणे पत्रकारांना सरंक्षण देण्याच्या दृष्टीने विधेयक केले तर पत्रकारांच्या संरक्षणाचा प्रश्न मिटू शकेल. हा प्रश्न केवळ कायद्याने मिटेल असे मी म्हणणार नाही परंतु त्यासंदर्भातील मानसिकताही निर्माण करणे आवश्यक आहे. तथापि पत्रकारांना संरक्षण देण्याच्या संदर्भात कायदा करणे अत्यंत गरजेचे असून हे विधेयक या सत्रात आणले गेले तर आमचाही या विधेयकाला पाठिंबा राहील एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

-------

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकार आणि वर्तमानपत्राकडे पाहिले जाते. आपण सर्व लोकशाही मूल्ये जपणारी मंडळी आहोत. असे असतांना प्रगतीशील महाराष्ट्रामध्ये पत्रकारांवर हल्ले होणे ही बाब महाराष्ट्राला भुषणावह नाही. या प्रकरणात एका धनिकाने एका पत्रकाराला चार तास कोंडून ठेऊन त्याला मारहाण केलेली आहे. अशी माहिती मिळालेली आहे. त्यामुळे ही बाब सर्वांना भूषणावह आहे असे मला स्वत:ला तरी वाटत नाही तसेच सभागृहाला सुध्दा वाटणार नाही. पत्रकारांना संरक्षण देणारा कायदा शासनाने आणला तर त्या कायद्याला दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचा एकमताने पाठिंबा राहील. परंतु ज्याने पत्रकांराला कोंडण्याचे आणि मारण्याचे काम करुन घेतले त्याच्यावर आपण कठोर कारवाई करणार आहात की, नाही याची माहिती देण्याची गरज आहे असे मला वाटते.

-----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ ST/

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. फुंडकर साहेबांनी औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात पत्रकारावरील हल्ल्याच्या संदर्भात सदर बाब सभागृहात उपस्थित केलेली आहे. या बाबतीत सभागृहातील सर्व सदस्यांच्या भावना एक सारख्याच आहेत. या ठिकाणी जे मुद्दे उपस्थित झालेले आहेत त्याबाबत शासनाने निवेदन करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पत्रकारांना संरक्षण देण्याच्या संदर्भात आपण जो कायदा आणणार आहोत त्याविषयाची माहिती निवेदनामध्ये दिली पाहिजे व पत्रकारांना संरक्षण देण्याच्या संदर्भात कायदा आणावा अशा माझ्या दोन बाबी असून त्याचा खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

-----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ ST/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सभागृहाच्या दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांचे पत्रकारांना संरक्षण देण्याच्या संदर्भात कायदा आणण्यासाठी एकमत आहे. तसेच हे बील हे अधिवेशन संपण्याच्या आधी आले पाहिजे अशी सर्व सदस्यांची भावना आहे. माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे की, आजच्या आज या घटनेच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले पाहिजे तसेच हे बील हे अधिवेशन संपण्याच्या आत आणू असे सांगून सभागृहाला माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वस्त केले पाहिजे.

------

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी पत्रकारांना जी मारहाण झाली त्या बाबीच्या संदर्भात औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून जो उल्लेख केलेला आहे ती बाब अत्यंत गंभीर आहे. लोकशाहीमध्ये वर्तमानपत्राला चौथा स्तंभ मानले जाते. या चौथ्या स्तंभाला संरक्षण देणे हे आपले सर्वांचे काम आहे. पुण्याच्या श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष आणि त्यांचे अन्य सहकारी यांच्या बाबत पुण्यामध्ये ज्या पध्दतीचा भ्याड हल्ला करण्यात आला त्याचा केवळ निषेध करुन भागणार नाही. या ठिकाणी महसूलमंत्री श्री. नारायण राणे उपस्थित आहेत त्यांना मी सांगू इच्छितो की, पत्रकांरावर जो भ्याड हल्ला झाला त्या बाबीचे गांभीर्य लक्षात घ्यावे. ज्यांनी या पध्दतीचा हल्ला केला त्याच्यांवर कठोर कारवाई करावी. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी पत्रकारांना योग्य संरक्षण देण्याबाबत चर्चा केलेली आहे. याच अधिवेशनामध्ये अशा पध्दतीचे एखादे शासकीय विधेयक आणले तर दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य त्या विधेयकाला एकमताने पाठिबा देतील. मी सन्माननीय राणे साहेबांना विनंती करतो की, आजच या गंभीर बाबीच्या संदर्भात शासनाने निवेदन करावे. या बाबीच्या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा आपण आजच सभागृह संपण्याच्या आत निवेदन करावे .

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 14.15

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, विरोधी पक्षाचे नेते माननीय श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याच्या मुद्याव्दारे पुणे येथे पत्रकारांवर जो हल्ला झाला होता त्यासंबंधी आपले विचार येथे मांडले आहेत आणि आणि त्या सबंधीच्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्याचबरोबर पत्रकारांवर ज्यांनी हल्ला केला होता त्यांच्यावर तातडीने कठोर कारवाई करावी अशी मागणी सदनातील अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. सभापती महोदय, आपण सुध्दा या घटनेची् दखल घेऊन शासनाने कारवाई करावी आणि पत्रकाराच्या संदर्भात जे विधेयक आणावयाचे आहेत ते त्वरित चर्चेसाठी सभागृहात आणावे आणि मंजूर करुन घ्यावे असे सांगितलेले आहे. मी सदनाला एवढेच संगतो की, पुणे येथे पत्रकारावर जो हल्ला झाला त्या संबंधीची त्वरित दखल घेऊन संबंधितावर कारवाई केली जाईल. माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी आल्यानंतर त्याबद्दल ते निवेदन करतील वा विचार मांडतील. परंतु सरकारच्या वतीने मी सांगू इच्छितो की, या प्रकरणाची योग्य ती दखल घेऊन त्वरित कारवाई करण्यात येईल. त्याचबरोबर विधेयक आणण्याच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन त्यासबंधी सभागृहाला माहिती दिली जाईल.

----

2..

14-12-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) QQ2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.मंदा म्हात्रे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. नागपूर शहरामध्ये विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे आणि सदनातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य पोट तिडकीने शेतक-यांचे प्रश्न मांडत आहेत ..शेतक-यांचे अतिवृष्टीमुळे नुकसान होत असते तेव्हा या शेतक-यांना तसेच काही शेतकरी आत्महत्या करतात तेव्हा त्यांच्या वारसांना मदत मिळावी म्हणून सरकारकडून सुध्दा विविध पॅकेजेसच्या मार्फत लाभ देण्याचा प्रयत्न केला जातो असे असतांना शासनातील एका अधिका-याने काल जे वक्तव्य केले होते त्यासंबंधीची बातमी आजच्या "पुण्य नगरीमध्ये "आली आहे. "शेतकरी हरामाचे पैसे घेतात "अशा प्रकारचे वक्तव्य त्याने केलेले आहे त्यामुळे सर्व प्रथम या अधिका-याचा मी निषेध करते.

काही सन्माननीय सदस्य : त्याचे नाव काय आहे ?

श्रीमती मंदा म्हात्रे: अमरावती जिल्हयातील परतवाडा - अचलपूर या भागातील कृषी अधिका-याचे नाव श्री.अनिल मावदे असे असून या अधिका-याविरुध्द कोणती कारवाई करावयाची आहे हे या सभागृहानेच ठरवावयाचे आहे.

सभापती महोदय, या वर्तमानपत्रात असे म्हटलेले आहे की, "एका बाजूला नैसर्गिक संकटाने वैफल्यग्रस्त शेतकरी कृषी कार्यालयातील कर्मचा-यांच्या बेबंदशाहीने हवालदिल झाला आहे. त्यात शेतकरी हरामाचे पैसे घेतात असे म्हणून कृषी अधिकारी श्री. अनिल मावंदे यांनी आपल्या अकलेचे तारे तोडलेले आहेत. कृषी कार्यालयात मंडल कृषी अधिकारी म्हणून ते काम करीत आहेत. श्री.अनिल मावंदे याने शेतक-याला मिळत असलेल्या पॅकेज अंतर्गत पैसा हरामाचा असल्याचा उल्लेख करुन शेतक-यांची नुसतीच खिल्ली उडवलेली नाही तर त्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केलेले आहे. विशेष म्हणजे शेतक-याच्या आत्महत्याग्रस्त असलेल्या अमरावती जिल्हयातील हा प्रकार उघडकीस आलेला आहे." मी या सदनाच्या निदर्शनास ही बाब आणून दिलेली असून अशा अधिका-याच्या विरुध्द कडक कारवाई करावयास पाहिजे. तेव्हा आपणच या सबंधीचा निर्णय घ्यावा अशी मी आपल्याला नम्र विनंती करते.

3..



VTG/ KGS/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 14.15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, शेतक-यांच्या संदर्भात एखादा अधिकारी अशा प्रकारे उद्दामपणाने उल्लेख करीत असेल तर त्याच्यावर कठोर कारावाई करणे गरजेचे आहे याची आपण गांभीर्याने नोंद घ्यावी आणि कृषी विभागाला या दृष्टीने सूचना देण्यात यावी.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण सांगितल्या प्रमाणे या प्रकरणाची मी नोंद घेत असून याबाबतीत चौकशी करुन संबंधिताविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4..

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,माझा औचित्याचा मुद्दा आहे.सभापती महोदय,आपल्या संमतीने आणि आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, सोमवारी प्रधान समितीच्या अहवालाच्या संदर्भात सभागृह सुरु होतांना निवेदन करतो आज प्रश्नोत्तराचा तास झाला ...

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ ST/ KGS/ श्री. गायकवाड नंतर --- 14:20

श्री. रावते ....

आता पुढील कामकाज चालू झाले आहे. पण ते निवेदन केव्हा केले जाणार आहे हे सभागृहाला आपण अवगत करावे अशी विनंती मी आपल्यामार्फत शासनाला करतो.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी प्रधान समितीचा अहवाल राज्य सरकार सभागृहाला केव्हा सादर करणार हे विचारले आहे. मी आपल्या नजरेस एवढीच माहिती उपलब्ध करून दऊ शकतो की, विधानसभेमध्ये जेव्हा आज हा प्रश्न उपस्थित झाला होता त्यानंतर सभागृहाची बैठक तहकूब झाली. दरम्यानच्या काळात माननीय विधानसभा अध्यक्षांच्या दालनामध्ये विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही सभागृहांचे माननीय विरोधी पक्षनेते आणि दोन्ही सदनातील दोन्ही बाजूंचे पक्षनेते यांना बोलाविण्यात आले होते व तेथे एक बैठक घेण्यात आली. त्या बैठकीस सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते उपस्थित होते. त्या सर्वांच्यासमवेत या विषयावर चर्चा झाली आणि त्या ठिकाणी राज्याच्या गृहमंत्र्यांनी सांगितले की, येणाऱ्या सोमवारी हा अहवाल आम्ही सादर करू आणि मग त्यासंबंधात काय करायचे यासंबंधीही चर्चा झाली. सभापती महोदय, या बैठकीला या सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभागृहाबाहेर काय चर्चा होते हा मुद्दा वेगळा आहे. या ठिकाणी सभागृहाच्या बाहेर एखादी बैठक झाली असेल आणि त्यात काय चर्चा झाली वगैरे गोष्टी या सभागृहात सांगावयाच्या असतील तर ते बरोबर नाही. त्यातही पहिली गोष्ट अशी की, अशा प्रकारे त्याचा उल्लेख येथे करणेही अनुचित आहे. ..

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मला एवढेच म्हणावयाचे आहे की, सन्माननीय सदस्यांनी ज्या अहवालासंबंधात माहिती येथे विचारली त्यासंबंधी स्वत: गृहमंत्री येथे येतील आणि आजच त्याबाबत काय ते सांगतील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे तसेच येथील रेकॉर्ड देखील दुरूस्त करावे अशी माझी आपणास विनंती आहे. याच अधिवेशनामध्ये यापूर्वी जेव्हा हा विषय सभागृहामध्ये उपस्थित केला गेला होता त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहाच्या रेकॉर्डवर सांगितले आहे, आश्वासन दिलेले आहे की, खालच्या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.सुभाष देसाई आणि या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मला प्रधान

..... आरआर 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी .....

समितीच्या अहवालाची प्रत दिली आहे, ती मी माननीय गृहमंत्र्यांकडे पाठविली आहे आणि ती प्रत कितपत सत्य आहे ही बाब ती तपासून माननीय गृहमंत्री सोमवारी सभागृहात निवेदन करतील. आता हे निवेदन माननीय गृहमंत्री करतील तर तो त्यांचा अधिकार आहे. मात्र त्यासंबंधात या सभागृहाबाहेर काय बैठक झाली, काय चर्चा झाली, त्या बैठकीस सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, मी स्वत: तसेच माननीय मंत्री श्री.नारायण राणे हेही उपस्थित होते हे सत्य असले तरी त्या बैठकीत काय घडले वगैरे बाबत येथे सांगण्याचा अधिकार मला नाही तसेच माननीय मंत्री श्री.राणे यांनाही नाही. तो माननीय गृहमंत्र्यांचाच अधिकार आहे. माननीय मंत्री श्री.राणे यांनी त्याबद्दल सांगणे बरोबर नाही. माननीय गृहमंत्र्यांनीच याबद्दल सांगितले पाहिजे. सभागृहातील कामकाज त्यांच्या उत्तराशी संलग्नित आहे. माननीय मंत्री श्री.राणे यांनी त्याची जबाबदारी स्वत:वर घेऊ नये. त्यांनी सभागृहाच्या बाहेर काय झाले हे जे येथे सांगण्याचा प्रयत्न केला तो बरोबर नाही एवढेच मला सांगावयाचे आहे.

**सभापती** : ठीक आहे.

***

.... आरआर 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : लेखी उत्तरे.

**मु.शी.** : अतारांकित प्रश्नोत्तराची अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी व पंधरावी यादी सभागृहासमोर ठेवणे.

सचिव : महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी व पंधरावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची अकरावी, बारावी, तेरावी, चौदावी व पंधरावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात. )

..... आरआर 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा सन 2007-08 चा हिशेब व हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : हिशेब तपासणी अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2008-09 चा नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने कापड बाजार आणि दुकाने मंडळ, मुंबई (बृहन्मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांकरिता) यांचा सन 2002-03 व 2003-04 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

( यानंतर श्री.सरफरे ...एसएस 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:अल्पसंख्यांक कल्याण समिती गठीत करणे

**मु.शी.**: अल्पसंख्यांक कल्याण समिती गठीत करण्याबाबत संसदीय कार्यमंत्र्यांचा प्रस्ताव

श्री. भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्यमंत्री): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील अल्पसंख्यांकांच्या (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी व जैन) विकासासाठी राज्य शासन राबवित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व परिणामकारकरित्या संनियंत्रण करुन या समाजाचा सर्वांगीण विकास साधणे तसेच शासनाच्या विविध योजनांची संबंधित क्षेत्रीय स्तरावरील कार्यालयामार्फत प्रभावी अंमलबजावणी होऊन या समाज घटकातील लोकांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या योजनांचा लाभ झाला किंवा कसे याची तपासणी करणे, शासन राबवित असलेल्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या, निर्धारित उद्दिष्ट साध्य झाले किंवा कसे इत्यादी बाबींचा सर्वंकष आढावा घेऊन या विषयीची माहिती व अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करण्याच्या दृष्टीने तसेच महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगाचा अहवाल विचारात घेऊन त्यावर शासनाला सुनियोजित अशी उपाय योजना सुचविण्याच्या दृष्टीने अल्पसंख्यांक कल्याण समिती या नावाची विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती गठीत करण्यात यावी.

सदर समितीत एकूण सदस्य संख्या 15 असावी. या समितीवर विधानसभेतील 11 सदस्य असतील. त्यापैकी 6 सदस्य अल्पसंख्यांक समाजातील असतील. उर्वरित सदस्यांपैकी एक महिला सदस्या अल्पसंख्यांक समाजातील असतील. अल्पसंख्यांक समाजातील महिला सदस्य नसल्यास खुल्या प्रवर्गातील महिला सदस्य असतील. समितीवर विधानपरिषदेतील 4 सदस्य असतील. त्यापैकी 1 सदस्य अल्पसंख्यांक समाजातील महिला सदस्य असतील. अल्पसंख्यांक महिला सदस्य नसल्यास खुल्या प्रवर्गातील महिला सदस्य असतील. या समितीवर विधानसभेतील अल्पसंख्यांक समाजातील सदस्य समिती प्रमुख राहतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/ KGS/ ST/

श्री. भास्कर जाधव..

समितीची कार्यकक्षा व नियम ठरविण्याची बाब विधानसभेच्या नियम समितीकडे सुपूर्द करण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी. :**
**मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना.**

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री अनिल परब, परशुराम उपरकर, डॉ.दीपक सावंत यांनी "वांद्रे-वरळी सी-लिंक मार्गावर दि. 8 डिसेंबर, 2009 रोजी दोन वाहनांमध्ये टक्कर होऊन दोघे जण जागीच ठार होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "कार्यकारी अभियंता, नागपूर यांनी अंकित कंस्ट्रक्शन नावाच्या एकाच कंपनीला एकाच महिन्यात विविध कामांचे सुमारे 1.60 कोटी रक्कम अदा केलेले असतांना 150 ते 200 कंत्राटदारांना त्यांनी केलेल्या कामाचे पैसे न देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामनाथ मोते, संजय केळकर, भागवान साळुंखे यांनी "शासनाने राज्यात मराठी माध्यमाच्या हजारो शाळांना सन 2008-09 या वर्षापासून नवीन शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत मराठी शाळांना परवानगी न देता इंग्रजी शाळांचे प्रस्ताव मंजूर करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. संजय केळकर, मधुकर चव्हाण, विनोद तावडे यांनी "जागतिक तापमान वाढीमुळे समुद्राच्या पाण्याची उंची वाढत असून किनाऱ्यावरील सुरुची झाडे/तिवराची जंगले उद्ध्वस्त करत भरतीचे पाणी लगतच्या गावात शिरत असल्यामुळे जमीन नापीक होणे"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** . . . .

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "शासकीय वैद्यकीय रुग्णालय, औरंगाबाद येथे ऑगस्ट 2009 मध्ये शासनाने सुमारे 6 कोटी रुपये खर्च करुन नवजात शिशु अतिदक्षता विभाग व ट्रामा केअर सेंटरचे उद्घाटन करुनही डॉक्टरांची पदे न भरल्याने रुग्णांना सेवेचा लाभ न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, नितीन गडकरी, जयंत प्र.पाटील यांनी "दिनांक 12 डिसेंबर 2009 रोजी पुण्यातील बांधकाम व्यवसायिक अनिल उर्फ ए.व्ही. सेवलेकर, यांनी पत्रकारांना आपल्या निवासस्थानी बोलावून घेऊन बांधकामाबाबत बातमी छापल्या संदर्भात कोंडून त्यांना जीवे मारण्याची धमकी देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. आज आपण सदरहू विषयावर औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून चर्चा केलेली असून, तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांनी "दिनांक 21-11-2009 रोजी आर.सी.एफ. थळ (जि.रायगड) येथील अमोनिया प्लॅन्टचा कुलींग टॉवर अचानक कोसळून कंपनीचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होणेबाबत." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "निविदे प्रक्रियेची पध्दत न अवलंबिता महावितरण कंपनीने राज्यात वीज वितरण यंत्रणेत सुधारणा व वीज गळती रोखण्याच्या कामात ठेकेदाराबरोबर सुमारे 8 ते 9 टक्के जादा दराने निविदा देण्याचा घेतलेला निर्णय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदूर्ग जिल्ह्यात फयान वादळामुळे नुकसान झालेल्या मच्छिमारांसाठी 4 कोटींचा निधी प्राप्त झाला असून सदर निधी शासनाने जुन्या निकषानुसार वाटप करण्याचा निर्णय घेतल्यामुळे सुमारे 2.90 कोटी रुपये परत ...

. . . .2 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जाणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कळणे मायनिंगच्या झालेल्या जनसुनावणी संबंधी पर्यावरण अहवाल चुकीचा व विसंगत असल्यास त्याबाबत लोकांना माहिती देऊन पुन्हा जनसुनावणी घेण्यात येईल असे शासनाने जाहीर करुनही त्यावर कारवाई न होणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 12 डिसेंबर 2009 रोजी मुंबईसह पश्चिम महाराष्ट्रात 5.1 रिश्टर स्केल इतक्या तीव्रतेचा भूकंप होऊन त्याचा केंद्रबिंदू कोयना नगर असल्याने सदर धक्क्याने लोकांत घबराट पसरणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "आंध्र प्रदेश-महाराष्ट्र सीमा वादाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या 1997 च्या निर्णयानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील 14 गावे दुर्गम भागात असल्याने या गावांचा वसुलीयोग्य खातेदार नसल्याने महसूल जमा होत नसल्याने सदर गावे विकासापासून वंचित असणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, धन्यवाद.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.व्ही.यू.डायगव्हाणे, जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी "राज्यातील शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू न केल्यामुळे दि.4 ऑगस्ट 2009 पासून बेमुदत उपोषण करणे, त्यांच्या रास्त मागण्यांसाठी दि.16 डिसेंबर 2009 पासून नागपूर येथे आंदोलन करण्याचा दिलेला इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

. . . .2 टी-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री.विनोद तावडे,चंद्रकांत पाटील,मधुकर चव्हाण,रामनाथ मोते,संजय केळकर यांनी "मुंबई-गोवा महामार्गावर गेल्या 11 महिन्यांच्या कालावधीत 837 अपघातांमध्ये 141 पेक्षा अधिक जणांचा मृत्यू होणे व 280 जण जखमी होणे,सदरहू महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी सतत पाठपुरावा करुनही त्याकडे झालेले अक्षम्य दुर्लक्ष."या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "नागपूर येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात 23 वर्षीय रुपाली शेषराव काथोटे हिचा स्वाईन फ्ल्यूमुळे मृत्यू झाल्याची दि.12-12-2009 रोजी घडलेली घटना."या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.तो नियम 93 चा विषय होत नसल्याने,मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, धन्यवाद.

**सभापती** : इतर सूचनांना मी माझ्या दालनात अनुमती नाकारली आहे.

----

. . . .2 टी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना रेशनकार्ड देण्यात न येणे.

**मु.शी.**: सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना रेशनकार्ड देण्यात न येणे याबाबत श्री.परशुराम उपरकर वि.प.स.यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना रेशनकार्ड देण्यात न येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो."

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 टी- 5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे 2002 मध्ये सर्वेक्षण झ ाल्यानंतर हाय कोर्टाकडून स्थगिती देण्यात आली होती. नंतर 2006 मध्ये ही स्थगिती उठल्यानंतर देखील सिंधुदूर्ग जिल्ह्यातील 71 हजार दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना शिधावाटप पत्रिका प्राप्त झ

ालेली नाही. त्यामुळे त्यांना धान्य मिळत नाही. माझा प्रश्न असा आहे की, या कुटुंबांना शिधावाटप पत्रिका देण्यासाठी शासन उपाययोजना करणार आहे काय ? तसेच याचे फेर सर्वेक्षण कधीपासून करणार आहे ?

यानंतर कु.थोरात ....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, फेर सर्वेक्षणाचा प्रश्न उद्‌भवत नाही. याचे कारण असे की, त्याचा आता नवीन सर्व्हे होणार असल्यामुळे फेर सर्व्हेचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या कुटुंबांना जवळ जवळ सात वर्षापासून शिधा वाटप पत्रिका न मिळाल्यामुळे शिधा वाटप दुकानावरील अल्प दरात मिळणारे धान्य त्यांना मिळत नाही. त्यामुळे शिधा वाटप पत्रिका त्यांना कधी मिळणार आहेत?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, बी.पी.एल.ची यादी अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे पाठविण्यात येणार आहे. अन्न व नागरी पुरवठा विभाग त्यांना लवकरात लवकर शिधा वाटप पत्रिका उपलब्ध करुन देणार आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, ही गरीब कुटुंबे आहेत त्यांना पिवळया शिधापत्रिका मिळणार आहेत. त्यांच्याकडे शिधावाटपपत्रिका नसल्यामुळे गेले कित्येक वर्षे शिधावाटप केंद्रातून त्यांना अन्नधान्य घेता येत नाही. शासन याबाबत फेर सर्व्हे करणार नसून पुन्हा नव्याने सर्वेक्षण करणार आहे. पुन्हा नव्याने सर्वेक्षण करण्यात येणार असेल तर ते करण्यासाठी किती कालावधी लागणार आहे? तो पर्यंत या लोकांनी काय करायचे? परप्रांतीयांना मुंबईत पाहिजे तेवढया बोगस शिधावाटपपत्रिका मिळतात. ही सिंधुदुर्ग जिल्हयातील गरीब, वंचित माणसे आहेत त्यांना तातडीने शिधावाटप केंद्रावर अन्न-धान्य मिळण्याच्या दृष्टीने शिधा वाटप पत्रिका देण्याच्या दृष्टीने काय व्यवस्था करण्यात येणार आहे?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हा प्रश्न केवळ सिंधुदुर्ग जिल्हयाचा नाही तर संपूर्ण राज्याचा आहे. कालच या प्रश्नाच्या संदर्भात सभागृहात एक लक्षवेधी सूचना झालेली आहे. ज्या ज्या सदस्यांनी हा प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यांच्याबरोबर सगळया मंत्र्यांची बैठक सुरु आहे. बी.पी.एल.ची पूर्ण यादी अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे देण्यात येणार आहे.त्यानंतर अन्न व नागरी पुरवठा विभाग लवकरात लवकर शिधापत्रिका वितरित करणार आहे.

**सभापती** : खरे म्हणजे नियम 93 अन्वयेच्या निवेदनावर विधानसभेमध्ये फक्त निवेदन देण्यात येते चर्चा होत नाही. विधानपरिषदेत प्रश्न विचारण्याची प्रथा ठेवलेली आहे. याचा अर्थ यावर फक्त एक किंवा दोन प्रश्न होतील. त्याप्रमाणे दोन प्रश्न झालेले आहेत.

---





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ KTG/

<u>**निवेदन क्रमांक 2 बाबत**</u>

**सभापती** : निवेदन क्रमांक 2 च्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी मला विनंती केलेली आहे की, सदर निवेदन नंतर चर्चेसाठी घेण्यात यावे. त्याप्रमाणे हे निवेदन नंतर घेण्यात येईल.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सहकारी साखर कारखान्यांनी ऊस तोडणी कामगारांची टोळी स्वत: तयार करुन ट्रक ऊस वाहतूकदारांना पुरविण्याची होत असलेली मागणी

**मु.शी.**: सहकारी साखर कारखान्यांनी ऊस तोडणी कामगारांची टोळी स्वत: तयार करुन ट्रक ऊस वाहतूकदारांना पुरविण्याची होत असलेली मागणी या बाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील, भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. हर्षवर्धन पाटील ( सहकार व पणन मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री चंद्रकांत पाटील, भगवान साळुंके यांनी "सहकारी साखर कारखान्यांनी ऊस तोडणी कामगारांची टोळी स्वत: तयार करुन ट्रक ऊस वाहतूकदारांना पुरविण्याची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

**( प्रेसव : येथे सोबतचे निवेदन छापावे )**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, पूर्वी ऊस तोडणी मजुरांच्या सोसायटयांबरोबर कारखाना करार करायचा आणि त्या सोसायटया ऊसतोड करण्यासाठी बांधील असायच्या. आता ट्रक वाहतूक करणाऱ्या ट्रक मालकावर ही जबाबदारी टाकण्यात आली आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदनामध्ये, "असे झालेले नाही" असे म्हटलेले आहे. त्यांनी ठामपणाने असे म्हटले असले तरी प्रत्येक कारखान्यामध्ये ऊस तोडणी करणाऱ्या मजुरांची जबाबदारी ट्रक मालकांवर टाकण्यात आलेली आहे, त्यामुळे ट्रक मालक अडचणीत आलेले आहेत. याबाबत शासनाची कय भूमिका आहे?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ऊसतोडणी कामगारांची महाराष्ट्रातील संख्या मोठी आहे असे निवेदनामध्ये म्हटले आहे. वर्षानुवर्षे हे ऊस तोडणी कामगार साखर कारखान्यामध्ये ऊस तोडण्यासाठी त्या त्या सिझनमध्ये येतात.पूर्वीच्या काळामध्ये कारखान्याच्या वतीने हे करार केले जायचे. मध्यंतरीच्या काळामध्ये काही न्यायालयीन बाबी निर्माण झाल्यामुळे हार्वेस्टिंग आणि ट्रान्स्पोर्टेशनचा करार वाहनधारक त्याला लागणाऱ्या ऊस तोडणी कामगारांच्या टोळयांशी स्वत: करार करीत असतो. हा करार त्यांच्या स्तरावर होतो: हा करार केल्यानंतर या कामगारांना लागणारा ॲडव्हान्स वाहन मालक ऊस तोडणी मुकादमाला देत असतो अशी साधारणत: प्रचलित व्यवस्था आहे. या बाबतीत परवा जी मिटिंग झाली त्यामध्ये ऊसतोडणी कामगारांच्या मजुरीमध्ये दरवाड करणे याबाबतचा विषय होता ती वाढ देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. प्रत्यक्षामध्ये कारखान्याची ऊस वाहतूक करणारी जी यंत्रणा आहे, त्या यंत्रणेचा आणि ऊस तोडणी करणाऱ्या टोळयांचा करार असतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड...

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, पूर्वी सोसायट्यांशी करार व्हावयाचे. त्या ठिकाणी ट्रक मालक नव्हते. ते फक्त वाहतुकीसाठी आहेत. ते टोळ्यांच्या शोधासाठी कोठे फिरणार ? पूर्वीच्या पध्दतीप्रमाणे ट्रक मालक आणि तोडणी सोसायट्यांशी करार करावयाचे. वाहतूकदार टोळ्यांच्या शोधासाठी कोठे फिरणार ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण कारखान्याचे जे बायलॉज आहेत ते पाहिले तर शेतकऱ्यांनी स्वत: ऊस तोडून आणून कारखान्याला घालावा असे आहे. आपण त्या ठिकाणी व्हायामेडिया काढलेला आहे. त्या बायलॉजप्रमाणे करावयाचे असेल तर तसे करावे लागेल. आपल्याकडे मॉडेल बायलॉज आहेत. पण आपण ही व्यवस्था केलेली आहे. ते शेतकरी कारखान्याचे सदस्य असतात आणि त्यांची वाहने असतात, ते करार करतात. म्हणून आपण ती इन्डिव्हिज्युअल यंत्रणा उभी केलेली आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वन मजुरांना कायम करण्याच्या बाबतीत होत असलेला विलंब

**मु. शी.** : वन मजुरांना कायम करण्याच्या बाबतीत होत असलेला विलंब याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. भास्कर जाधव ( वने राज्यमंत्री ) : सभापती महोदय, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "वन मजुरांना कायम करण्याच्या बाबतीत होत असलेला विलंब" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या वन कामगारांच्या प्रश्नावर बऱ्याच वेळेला विधान परिषदेमध्ये आम्ही सातत्याने अनेक मुद्दे मांडलेले आहेत. हे निवेदन आज चर्चेसाठी आले असताना सन्माननीय वन मंत्री स्वत: या ठिकाणी उपस्थित आहेत आणि माननीय राज्यमंत्र्यांनी याचे उत्तर दिलेले आहे. निवेदनाच्या शेवटून दुसऱ्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, या वन मजुरांना नियमित करण्यासाठी कायदेशीर आणि आर्थिक बाबी तपासून मजुरांना नियमित करण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. माझा प्रश्न असा आहे की, आपण जी सगळी कायदेशीर कारणे सांगत आहात ही सगळी कायदेशीर कारणे असून देखील काही मजूर उच्च न्यायालयात गेल्यावर त्यांना कायम करण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे. म्हणून बऱ्याच वेळेला या वन मजुरांना नियमित करु नये म्हणून कायद्यातून काही पळवाटा काढल्या जात असतात. म्हणून कोणत्याही परिस्थितीमध्ये पुढील एक महिन्याच्या आत त्यांना नियमित करण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेऊन आर्थिक तरतूद करणार काय ?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, यासंबंधी निरनिराळया पाच माननीय मुख्यमंत्र्यांनी या कामगारांच्या संघटनांशी चर्चा केलेली आहे. मी स्वत: 4 तारखेला मंत्रालयात सर्व संघटनांची बैठक घेतलेली आहे. परवा 11 तारखेला सन्माननीय सदस्य डॉ. नीलमताई गोऱ्हे सुध्दा बैठकीला आलेल्या होत्या. कोर्टाचा निर्णय या मजुरांच्या विरोधात गेलेला आहे तरी सुध्दा 10 हजार मजुरांना नियमित केलेले आहे. पुढच्या मजुरांना कसे नियमित करता येईल यादृष्टीने इतर खात्यामध्ये काय नियम आहेत याचा विचार करुन ॲडव्होकेट जनरल यांच्याकडे ही बाब रेफर केली होती आणि त्यांनी यासंबंधी पॉझिटिव्ह असे उत्तर दिलेले आहे. तेव्हा सुप्रीम कोर्ट, ॲडव्होकेट जनरल आणि एकंदर परिस्थितीचा विचार करुन सरकार या प्रश्नाकडे पॉझिटिव्ह दृष्टीने पाहील.

----

..4......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT

**पृ. शी.** : शालेय शिक्षण विभागांतर्गत सर्व स्तरावरच्या शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करताना देण्यात आलेली भेदभावपूर्ण वागूणक

**मु. शी.** : शालेय शिक्षण विभागांतर्गत सर्व स्तरावरच्या शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करताना देण्यात आलेली भेदभावपूर्ण वागूणक याबाबत प्रा. वसंतराव खोटरे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. दिलीपराव सोनवणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. फौजीया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, प्रा. वसंतराव खोटरे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. दिलीपराव सोनवणे यांनी "शालेय शिक्षण विभागांतर्गत सर्व स्तरावरच्या शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करताना देण्यात आलेली भेदभावपूर्ण वागूणक" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझा हरकतीचा मुद्दा हा माननीय मंत्रिमहोदयांनी काय उत्तर द्यावे याबाबत नाही तर आपण निर्णय द्यावा यासाठी आहे. यामध्ये आमच्या नियम 93 च्या सूचनेतील एकाही मुद्याला उत्तर दिलेले नाही. आमचा यामधील एक मुद्दा असा आहे की, राज्य शासनाच्या डिसेंबर,1977 च्या धोरणात्मक निर्णयाशी विसंगत अशा प्रकारची कृती हकीम यानी केलेली आहे. उत्तर असे अपेक्षित होते की, राज्य शासनाचे हे धोरणात्मक निवेदन आहे आणि त्याप्रमाणे हे बरोबर झालेले आहे किंवा चुकीचे झालेले आहे, जे काय असेल त्याप्रमाणे उत्तर द्यावयास पाहिजे. धोरणात्मक माहिती माझ्याजवळ आहे पण ती माहिती आता आपल्याला वाचून दाखवून काय उपयोग होणार ? धोरणात्मक निर्णयाबाबतची बाब माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितली पाहिजे. दुसरा मुद्दा असा आहे की, या ठिकाणी हकीम समितीने स्वत: कोणतेही वाजवी कारण सांगितलेले नाही. त्यांनी एकही कारण दिलेले नाही याबाबत आम्ही या सूचनेमध्ये मुद्दा उपस्थित केलेला आहे. तुका म्हणे याप्रमाणे त्यांनी सुखथनकर म्हणे असे केलेले आहे. सुखटणकर अहवालाच्या परिच्छेद क्रमांक 4(21) आणि 4(26) मध्ये "त्यांनी सांगून ठेवलेलेच आहे की......" असा हकीम अहवालात उल्लेख केलेला आहे. त्यानंतर आमचा मुद्दा असा आहे, आमचे असे म्हणणे आहे की, सुखटणकर समितीचा रिपोर्ट मंत्रिमंडळाने फेटाळून लावला होता. बाळासाहेब, आपण ज्या ठिकाणी बसलेला आहात त्या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. सुधीरबाबू जोशी शिक्षण मंत्री म्हणून बसलेले होते. त्यांनी दिलेले उत्तर मी काढून आणलेले आहे. त्यांनी असे म्हटले होते की, आपण म्हणता ते मान्य आहे, चूक झालेली आहे आम्ही एक महिन्यात निर्णय घेऊ, काय निर्णय घेऊ हे मी आता सांगू शकत नाही, मंत्रिमंडळामध्ये आम्ही त्याचा विचार करुन निर्णय घेऊ. त्यानंतर मंत्रिमंडळाने सुखथनकर समितीचा रिपोर्ट फेटाळून लावला. सुखथनकर समितीच्या अहवालातील परिच्छेद 4.21 आणि 4.26 हकीम समितीने मंगल कलशासारखा आपल्या डोक्यावर घेतला. त्याबाबत शासन काहीच उत्तर देत नाही. सभापती महोदय, यामध्ये आणखी एक उद्धटपणाची गोष्ट आहे ती मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो आणि हरकतीच्या मुद्याव्दारे माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न न विचारता आपल्याला विनंती

RDB/ KTG/ SBT/

प्रा. बी. टी. देशमुख ....

करतो की, आमचे मुद्दे, त्यावर मंत्रिमहोरदयांनी दिलेले उत्तर व त्यानंतर आपण एक दोन प्रश्न विचारुन नियम 93 चे निवेदन बाजूला करतो. आमची तक्रार ही आहे की, त्यांनी एकाही मुद्याला उत्तर दिलेले नाही मग एक दोन गोष्टी आम्ही काय विचारावयाच्या ? या ठिकाणी एकाही मुद्याला उत्तर दिलेले नाही. सभापती महोदय, महत्वाची बाब अशी आहे की, आम्ही आधी 2 जून, 2009 ला प्रश्न विचारला होता की,"राज्य वेतन सुधारणा समितीने आपल्या अहवालामध्ये सर्व स्तरावरच्या शिक्षकांसाठी सहाव्या वेतन आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेण्यामध्ये श्रेणी वेतनात मोठ्या प्रमाणामध्ये कपात केली आहे, ही गोष्ट खरी आहे काय ?" त्यावेळी उत्तर दिले की, "आपण त्रुटी समितीसमोर जावे."

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 14:45
प्रा.बी.टी.देशमुख....

दुसरा प्रश्न असा होता की, "असल्यास, माहे डिसेंबर, 1977 मध्ये राज्यात वेतन आयोग न बसविण्यासंबंधीच्या राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयाशी या शिफारशी विसंगत होत्या, हे खरे आहे काय," या प्रश्नाला असे उत्तर देण्यात आले की, "त्रुटी समितीसमोर जावे." त्यामुळे आम्ही हा प्रश्न यावेळी पुन्हा लावला आहे. त्यासंबंधी मी स्वत: आपल्याला भेटलो. "आम्हा सदस्यांना त्रुटी समितीसमोर पाठविण्याचे कारण काय ?" हा प्रश्न स्वीकृत झाला असल्यामुळे मंत्रिमहोदयांनी येथे उत्तर दिले पाहिजे. उद्या एखाद्या शिक्षक संघटनेच्या अध्यक्षांना वा सभासदाला सांगितले की, त्रुटी समितीसमोर जा तर ते आम्ही समजू शकतो. परंतु सभागृहाच्या सदस्यांना त्रुटी समितीसमोर जाण्यास सांगणे हे बरोबर नाही. यावेळी आम्ही दिनांक 11 डिसेंबर, 2009 रोजी असा प्रश्न विचारला होता की, "संदर्भाधीन प्रश्नाच्या संदर्भात उत्तर देण्याचे टाळून प्रश्नकर्त्या विधानमंडळ सदस्यांना वेतन त्रुटी समितीसमोर जाण्यास सांगण्याची कारणे काय आहेत," तो प्रश्न चर्चेला आला नाही, पण उत्तर असे आले की, "त्रुटी समितीसमोर जावे."

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना मी सांगू इच्छितो की...

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी एक मिनिटात पूर्ण करतो. आम्ही चार सदस्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून विनंती केली होती की, आम्हाला तो हकीम समितीचा रिपोर्ट पाहू द्यावा. आमचे म्हणणे ऐकून मग आपल्याला जो काही निर्णय घ्याववयाचा तो घ्यावा. परंतु निर्णय होईपर्यंत रिपोर्ट जाहीर झाला नाही. हा मुद्दा उपस्थित करण्यात आला त्यालाही उत्तर देण्यात आले नाही. अधिका-यांचा हा उद्धटपणा वाढत जाईल. म्हणून आपल्याला विनंती आहे की, आज हे निवेदन राखून ठेवावे. हे निवेदन उद्या ठेवावे. या सर्व प्रश्नांची उत्तरे त्यांनी दिली पाहिजेत मग त्याच्यावर चर्चा होईल. नाही तर आज आम्हाला 10 मिनिटांचा अवधी द्यावा. आम्ही प्रश्न विचारत आहोत, ते उत्तरच देत नाहीत. त्या प्रश्नाला अधिक वेळ मिळाल्यास उत्तरे तरी घेता येतील. नाही तर सूचना राखून ठेवावी व ती उद्या घेण्यात यावी.

**सभापती** : हे जे 93 चे निवेदन आहे ते मी राखून ठेवतो. या प्रश्नासंबंधी मी माझ्या दालनामध्ये 2-3 दिवसात शिक्षक प्रतिनिधी असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांची एक बैठक बोलवितो. त्याठिकाणी आपले समाधान झाले तर प्रश्नच नाही. त्यानंतर येथे सुधारित निवेदन वितरित करण्यात येईल.

-------

2.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

**पृ. शी.** : जैविक किटकनाशकांचा बोगस व गुणवत्ता नसलेला पुरवठा झाल्याने राज्यातील शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**मु. शी.** :जैविक किटकनाशकांचा बोगस व गुणवत्ता नसलेला पुरवठा झाल्याने राज्यातील शेतकऱ्यांचे झालेले नुकसान याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.बाळासाहेब थोरात ( कृषी मंत्री ) : सभापती महोदय, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "जैविक किटकनाशकांचा बोगस व गुणवत्ता नसलेला पुरवठा झाल्याने राज्यातील शेतकऱ्यांचे झालेले नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निवेदनामध्ये ज्या 4 कंपन्या नमूद केलेल्या आहेत त्यांनी गंभीर स्वरुपाच्या चुका केल्यामुळे त्यांच्याविरुध्द शासनाने कारवाई केलेली आहे. परंतु ज्यांनी या कंपन्यांना चुका करण्याची संधी दिली त्या अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कारवाई केलेली नाही. शासन या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करणार आहे काय ? निवेदनात असे नमूद केले आहे की, "कृषी आयुक्तालयातील दक्षता पथकामार्फत जैविक किटकनाशकाच्या पुरवठयाबाबत काही जिल्हयांची तपासणी करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत." शासनाने कोणकोणत्या जिल्हयांमध्ये दक्षता पथकांना पाठवून चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत आणि त्या अधिकाऱ्यांविरुध्द काय कारवाई करणार आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जिल्हयांची नावे सध्या माझ्याजवळ उपलब्ध नाहीत. परंतु सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. बायो पेस्टिसाईडच्या गुणवत्तेसंबंधी क्रॉस एक्झॅमिनेशन करण्यासाठी यंत्रणा आहे, हे काम अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून केले जाते. हे काम करीत असताना जेथे कोठे दोष झाले आहेत त्यांची प्रयोगशाळा वर्षभरासाठी निलंबित केलेली आहे. त्यामध्ये कोठे कोठे दोष झाले, कोणत्या अधिका-यांनी काम केले पाहिजे होते पण केलेले नाही त्याची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

-----

**सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.15 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 2.49 ते 3.15 पर्यंत मध्यंतर )

-------

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:15

**मध्यंतरानंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**लक्षवेधी सूचना क्रमांक (1) व (2) संदर्भात**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 1चे निवेदन मला मिळालेले नाही. विरोधी पक्षातील कोणत्याही सदस्यांना ते मिळालेले नाही.... आता हे निवेदन माझ्या हातात दिले जात आहे. मला हे निवेदन वाचावे लागेल. तेव्हा पहिल्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना उद्या ठेवावी अशी माझी आपणास विनंती.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक (2)च्या संदर्भात माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. परवा वर्तमानपत्रामध्ये वाचले की, मंत्री महोदय सभागृहामध्ये हजर रहात नाहीत म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी तंबी दिली. माननीय मुख्यमंत्र्यांचे राज्यमंत्री देखील ऐकत नाहीत....

**उपसभापती** : मंत्री महोदय येईपर्यन्त आपण तिस-या क्रमांकाची लक्षवेधी घेऊ.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील फणसाड अभयारण्य परिसराचा भाग पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून जाहीर करण्याचा केन्द्राचा प्रस्ताव

**मु. शी.** : मुरुड (जि.रायगड) तालुक्यातील फणसाड अभयारण्य परिसराचा भाग पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून जाहिर करण्याचा केन्द्राचा प्रस्ताव यासंबंधी सर्वश्री. जयंत प्र. पाटील व कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील फणसाड अभयारण्य परिसरातील सुमारे दीड किलो मीटर पर्यंतचा भाग पर्यावरण संवेदनशील क्षेत्र (इको सेन्सेटिव्ह झोन) म्हणून जाहिर करण्याचा केंद्र शासनाचा प्रस्ताव असणे, केंद्र शासनाचा हा प्रस्ताव मान्य झाल्यास मुरुड तालुक्यातील सुमारे ३० आणि रोहा तालुक्यातील सुमारे १२ गावातील जनजीवन विस्कळीत होणे, सद्य:स्थितीत मुरुड व रोहा परिसर हा पर्यटन विभागाला पूरक असून सदर प्रस्तावामुळे पर्यटन क्षेत्रावर सर्व बाजूनी निर्बंध येऊन रोजगार निर्मितीवर त्याचा गंभीर परिणाम होणे, फणसाड अभयारण्यापासून फक्त ४ किलोमीटर अंतरावर असणारा महत्वाचा विक्रम इस्पात कारखाना अन्यत्र हलविण्याची शक्यता निर्माण होणे, या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी सुमारे ४२ गावातील ग्रामस्थांनी दि. १६ नोव्हेंबर, २००९ रोजी हरकती नोंदविणे व ग्रामस्थांमध्ये मोठया प्रमाणात असंतोष निर्माण होणे, याप्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

श्री. भास्कर जाधव (वने राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:15

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील :मुरुड तालुका पर्यटनाच्या दृष्टीकोनातून शासन विकसित करीत आहे. या मुरुड तालुक्यामध्ये फणसाड अभयारण्य परिसरातील सुमारे दीड किलो मीटर पर्यतचा भाग इको सेन्सेटिव्ह झोन करुन त्या ठिकाणचा विकास थांबविण्याचे काम शासन करणार आहे काय ? त्या ठिकाणी विहीर खोदण्यासही बंदी करण्यात आलेली आहे. मुरुड तालुक्यामध्ये एकूण 60 गावे आहेत त्यापैकी 30 गावांचा परिसर सेन्सेटिव्ह झोन म्हणून जाहीर केल्यामुळे निम्म्या तालुक्यामध्ये विकास होऊ शकला नाही. तेव्हा या ठिकाणचा इको सेन्सेटिव्ह झोन शासन रद्द करील काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी शासनाची भूमिका थोडी विस्ताराने ऐकून घेतली तर ती आपल्याच बाजूची आहे हे त्यांच्या लक्षात येईल. हा भाग इको सेन्सेटिव्ह झोन म्हणून राज्य शासनाने जाहीर केलेला नाही. जी अभयारण्ये आणि राष्ट्रीय उद्याने आहेत त्यांच्या अवतीभोवतीचा 10 कि.मी.चा परिसर इको सेन्सेटिव्ह झोन म्हणून जाहीर करावा अशा प्रकारची भूमिका सर्वोच्च न्यायालय आणि केन्द्र शासनाने घेतली. याबाबत सन 2002मध्ये केन्द्र शासनाने राज्य शासनाचे मत मागविले. याबाबतीत राज्य शासनाने एकंदरीत अंदाज घेतल्यानंतर त्यास विरोध होऊ शकतो हे लक्षात घेऊन केन्द्र शासनाला मत कळविले नाही. सन 2006 मध्ये न्यायालयाने असे कळविले की, 4 आठवडयाच्या आत निर्णय घेतला नाही तर आम्हाला निर्णय घेऊन नोटिफिकेशन काढावे लागेल. न्यायालयाने असे कळविल्यानंतर संबंधित शेतक-यांची व व्यावसायिकांची अडचण होऊ नये म्हणून जनतेचे मत घेऊन राज्य शासनाची भूमिका कळविण्यात येईल, अशी भूमिका राज्य शासनाने घेतलेली आहे.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 15:20

श्री.भास्कर जाधव.. लक्षवेधी सूचना क्र.3..

राज्य शासनाने त्यानंतर आपला निर्णय कळविला आणि 71 अर्ज अशा प्रकारचे आले की, या संदर्भातील निर्णय घेतला तर खूप मोठी हानी होऊ शकते, खूप अडचणी येऊ शकतात, व्यवसायावर बंधने येऊ शकतात म्हणून या संदर्भातील निर्णय अद्याप न घेता किमान 10 कि.मी.ऐवजी 1.5 कि.मी. परिसरामध्ये इको सेस्नेटिव्ह झोन करता येईल का हे तपासण्याचे काम शासनाने सुरु ठेवले आहे. सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये भीती आहे की, त्याठिकाणच्या विक्रम इस्पात या प्रकल्पावर यामुळे बंधन येईल की काय? अशा प्रकारचे शासनाने धोरण नाही. 1.5 कि.मी.परिसरात इको सेन्सेटिव्ह झोन करता येईल का याची तपासणी करीत आहोत. अद्याप शासनाने निर्णय घेतलेला नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, लोकप्रतिनिधी आणि स्थानिक जनतेची जाहीर सुनावणी घेण्याचा शासन विचार करील काय?

श्री.भास्कर जाधव : यापूर्वीच शासनाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सुनावणी घेतली आहे. त्यामध्ये लोकप्रतिनिधी होते की नव्हते हे माहिती नाही. परंतु लोकांची सुनावणी घेण्याचे काम जिल्हाधिकाऱ्यांमार्फत झालेले आहे. सन्माननीय सदस्यांचे पुन्हा त्या संदर्भात म्हणणे असेल तर सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्यामधील सत्यता पडताळण्याची आवश्यकता लक्षात घेऊन तशा प्रकारच्या निर्णयाची आवश्यकता भासल्यास शासन तसा निर्णय घेईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील होमगार्ड संघटनेचे आधुनिकीकरण करणे व त्यांच्या मानधनात वाढ करणे

**मु.शी.**: राज्यातील होमगार्ड संघटनेचे आधुनिकीकरण करणे व त्यांच्या मानधनात वाढ करणे यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात होमगार्ड संघटनेची ६ डिसेंबर, १९४६ या दिवशी सर्वप्रथम स्थापना होणे, सदर संघटनेला साठ वर्षांचा कालावधी होऊनही होमगार्ड संघटनेत मात्र कोणत्याही प्रकारचे आधुनिकीकरण करण्यात आले नसणे, अद्याप होमगार्ड सैनिकांना अत्यंत अल्पश: मोबदल्यात पोलिसांच्या बरोबरीने काम करावे लागत असणे, महागाईच्या काळामध्ये होमगार्ड सैनिकांना २४ तास सामान्य नागरिकांचे संरक्षण करीत असतानाही त्यांना कुटुंबाचा चरितार्थ अल्पश: मानधनात चालविणे कठीण झाले असणे, होमगार्ड सैनिकांच्या मागण्या अनेक वर्षांपासून शासनस्तरावर प्रलंबित असणे, होमगार्ड सैनिकांना कायमस्वरुपी सेवेत सामावून घेणे, सेवाज्येष्ठता यादी लागू करणे, सेवानिवृत्ती वय निश्चित करणे, नि:शुल्क विमा पॉलिसी व इतर सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे, तसेच इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय सवलत उपलब्ध करुन देणे, इत्यादी प्रमुख मागण्यांसाठी राज्यातील होमगार्ड सैनिकांनी शासनाकडे नोव्हेंबर २००९ च्या दुसऱ्या आठवड्यात केलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रमेश बागवे (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, राज्यात 1946 साली होमगार्डची स्थापना झाली. लाखो लोक या होमगार्डमध्ये काम करतात. विशेषत: बिहार, उत्तरप्रदेश व अन्य राज्यांमध्ये होमगार्डना 11 महिने काम मिळते. महाराष्ट्र राज्यात मात्र फक्त गणपती उत्सवाच्या काळात एक महिना काम दिले जाते. त्या कामापोटी द्यावयाच्या भत्त्याची रक्कम मात्र पुढच्या वर्षीच्या गणपती उत्सवात मिळते. होमगार्डमध्ये काम करणाऱ्या लोकांची स्थिती अत्यंत वाईट आहे. 26.11 च्या घटनेत व्ही.टी.स्टेशनवर मुकेश भिकाजी जाधव या होमगार्डचा मृत्यू झाला. कारण त्याच्याजवळ बंदूक नव्हती. आज राज्यामध्ये आतंकवाद वाढीस लागला आहे. होमगार्डच्या माध्यमातून रेल्वे स्टेशन्स, बस स्थानकांची सुरक्षा राखली जाऊ शकते. परंतु त्यांना व्यवस्थित प्रशिक्षणाची सोय उपलब्ध नाही. केंद्र सरकारकडून प्रशिक्षणासाठी निधी उपलब्ध झाला परंतु प्रशिक्षण केंद्रासाठी जागा उपलब्ध न झाल्याने तो निधी खर्ची न पडता परत करण्यात आला. त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था नाही, तशी शासनाची इच्छाशक्ती दिसून येत नाही. त्यांना महिनाभर देखील काम मिळत नाही अशी स्थिती आहे. सरकार या विषयात गांभीर्याने लक्ष घालून विचार करणार आहे का नाही? आंतकवाद किंवा अन्य घटना घडतात त्यावेळी कायदा व सुव्यस्था राखण्याच्या दृष्टीने होमगार्डचा वापर करण्याबाबत सरकार विचार करणार आहे का? त्यांना मेडिकल इन्शुरन्स योजनेच्या माध्यमातून वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्याचा विचार करणार आहे का? त्यांना एक-एक वर्ष भत्त्याची रक्कम मिळत नाही. कमीत कमी इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफरच्या माध्यमातून त्यांचा चकरा न मारता भत्त्याची रक्कम मिळण्याची व्यवस्था केली जाईल का? आज रोजगार हमी योजनेवर मजुरीचा दर 125 रुपये प्रतिदिन करावा अशी आम्ही मागणी करतो. परंतु आठ ते बारा तास काम करणाऱ्या होमगार्डच्या दैनंदिन आहार भत्त्यात व धुलाई भत्त्यातशासन वाढ करणार आहे की नाही? होमगार्डच्या संदर्भात समिती नियुक्त करुन ही सेवा ज्या भावनेने तयार झाली त्यामध्ये गुणात्मक परिवर्तन होण्यासाठी व त्यांच्या प्रश्नामध्ये नीट लक्ष घालून ते प्रश्न सुटावेत यादृष्टीने शासन प्रयत्न करणार का? अनुकूल निर्णय घेण्यात येईल का?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, होमगार्ड संघटनेला जवळजवळ 60 वर्षे पूर्ण झाली आहेत. महाराष्ट्रामध्ये नैसर्गिक आपत्ती किंवा कोणतेही आकस्मिक संकट आले तर होमगार्डना पोलीस विभागाला मदत म्हणून पाचारण केले जाते. होमगार्डमध्ये तीन वर्षासाठी मानसेवी तरतूद आहे.

नंतर श्री.खर्चे..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे .......

पूर्वी होमगार्ड्सना जो 75 रुपये दैनिक भत्ता मिळत होता त्यात वाढ करुन आता दुप्पट म्हणजेच दर दिवसाला 150 रुपये करण्यात आला आहे. त्याचबरोबर आहार भत्त्यातही वाढ करुन ती रक्कम आता दर दिवसाला 50 रुपये अशा प्रकारे दर दिवशी 200 रुपये भत्ता आपण देतो. अशा प्रकारे वन विभाग, अग्निशमन दल किंवा विविध सरकारी कार्यालयात गरज पडेल त्यावेळे आपण होमगार्ड संघटनेकडून त्यांची मदत घेतो म्हणून शासनाने अशा होमगार्ड सैनिकांना अटी व शर्ती पूर्ण करुन नोकरीमध्ये सुध्दा 5 टक्के आरक्षण ठेवलेले आहे. त्याचप्रमाणे होमगार्डसाठी प्रशिक्षण केंद्रे व त्यांच्या आधुनिकीकरणासाठी शासनाने 18 कोटीची तरतूद केलेली आहे. त्यामधील 5 टक्के रक्कम आधुनिकीकरणासाठी सन 2003 पासून राखीव ठेवण्यात आली आहे. अशा प्रकारे राज्यातील संपूर्ण जिल्ह्यांमध्ये होमगार्ड प्रशिक्षण केंद्रे सुरु केली असून त्यांच्या आधुनिकीकरणासाठी चांगल्या प्रकारची उपाययोजना शासनाने केली आहे. चार ठिकाणी प्रशिक्षण केंद्रांची बांधकामे सुरु आहेत. त्यामध्ये संगणक फॅक्स, वॉटर प्युरिफायर आणि झेरॉक्स इ. सुविधाही आपण देण्याचे ठरविले आहे. त्याचबरोबर शासनाने माननीय गृह मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करुन आणखी ठोस उपाय करण्यासंबंधीची व्यवस्थाही केली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, होमगार्डला बारा महिन्यातून एक महिनाभर सुध्दा काम मिळत नाही. एका महिन्याचे मिळून 4500 रुपये इतकेच वेतन भत्त्यापोटी त्याला मिळते आणि त्यात संपूर्ण वर्षाचा खर्च त्याला करावा लागतो. एवढया कमी रकमेत तो कसे जीवन जगणार आहे. परिस्थिती अशी आहे की, हे पैसे सुध्दा वेळेवर मिळत नाहीत आणि याचे पुरावे माझ्याकडे आहेत. यावर्षीच्या गणपतीसाठी काम केलेल्या होमगार्डला पुढील वर्षी गणपती येतात त्यावेळेस मागील वर्षीचे पैसे मिळतात. याबाबतचाही विचार होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर त्यांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे, शस्त्रे देण्याची आवश्यकता आहे. सी.एस.टी. स्टेशनवर जो होमगार्ड शहीद झाला त्याच्याकडे शस्त्र असते तर कदाचित तो मेला नसता. आपण एका बाजूला पोलिसांचे आधुनिकीकरण करण्याचा विचार करतो, त्यांच्यामध्ये सुधारणा करतो आणि दुसऱ्या बाजूला त्यांनाच मदत करणारे होमगार्ड यांचाही विचार होणे आवश्यक आहे. कारण संपूर्ण

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .......

राज्यात होमगार्डची संख्या जवळपास 6-7 लाख असेल. एकट्या नागपूर शहरातच 12 हजार होमगार्ड कार्यरत आहेत. म्हणून माझी सूचना अशी आहे की, रिटायर्ड आय.जी.पी. दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून या संघटनेमध्ये गुणात्मक सुधारणा कराव्यात व आवश्यक त्या सर्व ठिकाणी त्यांचा उपयोग करुन घ्यावा. मग त्यात कायदा व सुव्यवस्था असेल अथवा अन्य छोटे छोटे प्रसंग असतील त्या कामात त्यांचे सहकार्य घ्यावे. तसेच त्यांच्या मेडिकल इन्शुरन्सच्या दृष्टीने काय करता येईल याबाबतचाही विचार शासनाने करावा. अशी समिती शासन नेमणार काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, राज्यात एकूण 43 हजार होमगार्ड कार्यरत आहेत. त्यांची मदत कायदा व सुव्यवस्था हाताळण्यासाठी आपण घेत असतो. तसेच या संघटनेतील लोक आपली नोकरी अथवा व्यवसाय सांभाळून हे काम करीत असतात, त्यांच्यावर कंपल्शन नसते, केवळ पर्याय म्हणून ते स्वखुशीने येतात.

श्री. नितीन गडकरी : महोदय, बरेच लोक केवळ यावरच अवलंबून असतात, सर्वांचे व्यवसाय अथवा नोकरी नाही.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, पोलिसांना सहाय्य करण्यासाठी ज्यांची काम करण्याची इच्छा आहे अशा व्यक्तिनाच यामध्ये समाविष्ट करुन घेतले जाते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश बागवे ......

3 वर्षासाठी मानवसेवा स्वरुपात भरती केली जाते. शिक्षक, डॉक्टर, वकील,व्यापारी, औद्योगिक क्षेत्रातील कामगार, ध्येयवादी मुले-मुली या सर्वांकडून या क्षेत्रात स्वयंस्फुर्तीने, ऐच्छिक काम केले जाते. पूर्वी होमगार्डचा जो भत्ता दिला जात होता त्या भत्त्यात आता दुपटीने वाढ केलेली आहे. माननीय गृहमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली होमगार्डसच्या संदर्भात एक कमिटी स्थापन करण्यात आली असून त्यांना आधुनिकतेचे शिक्षण कसे दिले जाईल तसेच त्यांच्या उणीवांकडे लक्ष देऊन त्यांना अधिक सुखसोयी पुरवण्याच्या संदर्भात सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

----------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 5 बाबत</u>**

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 5 चे उत्तर पाणी पुरवठा खात्याने दिलेले असून या लक्षवेधी सूचनेचे उत्तर कृषी-जलसंधारण खात्याने देणे आवश्यक आहे. यासंदर्भात मी माननीय कृषी मंत्र्यांशी चर्चा केली असून ते या लक्षवेधी सूचनेला उद्या किंवा परवा उत्तर देणार आहेत.

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक 5 अगोदरच पुढे ढकलण्यात आलेली आहे.

---------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :कापसाच्या खरेदी कररिता तसेच अन्यबाबी संदर्भातील जाचक अटी वगळून दीर्घ मुदतीचे नियोजन करण्याबाबत.

**मु. शी.** : कापसाच्या खरेदी कररिता तसेच अन्यबाबी संदर्भातील जाचक अटी वगळून दीर्घ मुदतीचे नियोजन करण्यासंबंधी सर्वश्री माणिकराव ठाकरे,डॉ.एन.पी हिराणी,सर्वश्री जैनुद्दी जव्हेरी, विक्रम काळे, श्रीमती उषा दराडे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ. एन.पी.हिराणी ( यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्याच्या कापूस उत्पादक विभागातील विशेषत: विदर्भ व मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढलेले प्रमाण कमी व्हावे म्हणून केंद्र शासन व राज्य शासनाच्या वतीने होणारे प्रयत्न, केंद्रीय स्तरावर कापडाचे उत्पादन करणाऱ्या उद्योगपतींकडून कापसाची निर्यात बंद करण्याकरिता होणारा प्रयत्न, कापूस खरेदी करिता असणाऱ्या नाफेड व सी.सी.आय.कडून फक्त एफ.अे.क्यू. दर्जाचा कापूस खरेदी करण्याचा निर्णय, शेतकऱ्यांचा एफ.के.क्यू. दर्जाच्या खालील फेअर व फडतर दर्जाचा कापूस व्यापाऱ्यांनी मनमानी किंमतीमध्ये खरेदी करु नये म्हणून राज्य शासनाने उक्त कापूस योग्य दरात खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना दिलासा देण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे सहकार क्षेत्रातील कापसावर प्रक्रिया करणारे उद्योग (जिनींग प्रेसिंग) तोटयात येऊ नयेत म्हणून सदरहू उद्योगांना शासनाकडून मदत मिळण्याची आवश्यकता, तसेच कापसाच्या खरेदीकरिता प्रतिवर्षी वेगवेगळे नियम तयार करुन लादलेल्या शेतकऱ्यांवरील जाचक अटी वगळून दीर्घ मुदतीचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता यासाठी करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व याबाबत शासनाची भूमिका."

श्री. हर्षवर्धन पाटील ( पणन मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे ) ..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, डॉ. हिराणी साहेब हे कापूस पणन महासंघाचे अध्यक्ष आहेत त्यामुळे डॉ. हिराणी साहेब या लक्षवेधी सूचनेवर कसे काय प्रश्न विचारु शकतात ?

डॉ. हिराणी : सभापती महोदय, मी प्रथम कापूस उत्पादक शेतकरी असून कापूस उत्पादक शेतक-यांचा प्रतिनिधी आहे. फेडरेशनचा अध्यक्ष असल्यामुळे मला या लक्षवेधी सूचनेवर बोलण्याचा अधिकार आहे, एवढेच नाही तर या विषयावर बोलण्याचा माझा अधिकार कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. आमदार म्हणून इतरांना जे हक्क आहेत तेच हक्क मला सुध्दा आहे. मला या विषयावर बोलण्याचा अधिकार आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, डॉ. हिराणी यांना कॅबिनेट दर्जा दिलेला असून त्यांना कापूस पणन महासंघाचे अध्यक्षपद सुध्दा दिलेले आहे. डॉ. हिराणी कापूस केंद्राचे उद्‌घाटन करत फिरतात, फोटो छापून आणतात आणि त्यांनीच परत कापसावर प्रश्न विचारावयाचा हे बरोबर नाही. सभागृहात मंत्र्यांनी प्रश्न विचारण्यासारखाच हा प्रकार आहे. डॉ. हिराणी या लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारु शकत नाहीत.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहात मंत्रीच प्रश्न विचारावयास लागले तर ते योग्य होईल काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, डॉ. हिराणी यांना लक्षवेधी सूचनेवर प्रश्न विचारावयाचा असेल तर प्रथम त्यांचे कापूस पणन महासंघाचे अध्यक्षपद काढून घेतल्यानंतरच त्यांना प्रश्न विचारु द्यावेत.

**उपसभापती** : या ठिकाणी मी चौथी लक्षवेधी सूचना पुकारलेली आहे. जेव्हा ही लक्षवेधी सूचना संबंधितांनी दिली त्यावेळी डॉ. हिराणी यांचे नाव सुध्दा देण्यात आले होते. सन्माननीय सदस्यांनी लक्षवेधीच्या संदर्भात प्रश्न विचारु नयेत असे सन्माननीय सदस्यांना वाटते तर सन्माननीय सदस्य डॉ. हिराणी यांच्या नावाची लक्षवेधी सूचना स्विकारलीच कशी काय गेली हा प्रश्न त्यामुळे निर्माण होतो. ज्याअर्थी डॉ. हिराणी यांच्या नावाने लक्षवेधी सूचना स्विकारलेली आहे याचा अर्थ त्यांना लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात प्रश्न विचारण्याचा पूर्ण् हक्क पोहचतो. यासंदर्भात मी निर्णय दिलेला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ. हिराणी हे लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात प्रश्न विचारु शकतात.

...5...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी.हिराणी : सभापती महोदय, खूप खूप धन्यवाद. या लक्षेवधी सूचनेच्या माध्यमातून......

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कापूस पणन महासंघाच्या अध्यक्षांना कॅबिनेट दर्जा दिलेला असल्यामुळे त्यांनी कापसाच्या संदर्भात प्रश्न विचारणे बरोबर नाही. कापूस केंद्राचे उद्‌घाटन करावयाचे आणि फोटो छापून आणावयाचे आणि वरुन कापसाच्या संदर्भात प्रश्न विचारावयाचे हे काही बरोबर नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या हरकतीच्या मुद्यावर मी माझा निर्णय दिलेला आहे. आता सन्माननीय सदस्य डॉ. हिराणी साहेबांनी प्रश्न विचारण्यास सुरुवात करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कापूस पणन महासंघाच्या अध्यक्षांना कॅबिनेट दर्जा दिलेला असल्यामुळे त्यांनी कापसाच्या संदर्भात प्रश्न विचारणे बरोबर नाही. कापूस केंद्राचे उद्‌घाटन करावयाचे आणि फोटो छापून आणावयाचे आणि वरुन कापसाच्या संदर्भात प्रश्न विचारावयाचे हे काही बरोबर नाही. यासंदर्भात आम्ही विरोध नोंदवून सभात्याग करतो.

( शिवसेना पक्षाचे सर्व सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. हिराणी यांनी लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात प्रश्न विचारावेत.

डॉ. एन.पी.हिराणी : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मी 3-4 प्रश्न उपस्थित केलेले आहेत. मंत्रीमहोदयांनी त्यांच्या लेखी उत्तरात माझ्या फक्त एकाच प्रश्नाचे उत्तर दिलेले असून ते सुध्दा मोघम असे दिलेले आहे. माझा पहिला प्रश्न असा होता की, "केंद्र शासनाचा कापूस निर्यातीवर बंदी आणण्याचा विचार सुरु आहे". कापूस निर्यातीवर बंदी आणली गेली तर शेतक-यांवर फार मोठा अन्याय होईल म्हणून

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 15.35

डॉ.एन.पी.हिराणी...

ही बाब मी विशेष करुन शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे. कापसाला 3 हजार रुपयाचा भाव देण्याचा केन्द्र सरकारने दोन वर्षापूर्वी निर्णय घेतल्याबद्दल मी केन्द्र सरकारला धन्यवाद देतो त्याचबरोबर केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनाही धन्यवाद देतो .केन्द्र सरकारच्या या निर्णयामुळे शेतक-यांच्या खिशात चार पैसे यावयास लागले आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली आहे. अशा परिस्थितीमध्ये कापूस निर्यात बंदी सबंधीचा विषय चर्चेला येत असेल तर ते योग्य होणार नाही. दुर्देवाने केन्द्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांच्या बाबतीत असे सांगण्यात येते की,ते वस्त्रोद्योग लॉबीचे आहेत आणि ही लॉबी शेतक-यांच्या विरोधात उभी राहिली आहे आणि त्यांचा असा प्रयत्न आहे की, कापसाच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली पाहिजे परंतु असे व्हावयास नको असे मला सांगावयाचे आहे. महाराष्ट्र शासनाने या बाबतीत लवकरात लवकर कॅबिनेटमध्ये चर्चा करुन एक ठराव केला पाहिजे आणि तो केन्द्र सरकारकडे पाठविला पाहिजे.तेव्हा अशा प्रकारचा ठराव केन्द्र सरकारला पाठविण्यात येणार आहे काय ? त्याचबरोबर माझा दुसरा प्रश्न असा आहे की,एफएक्युच्या खालच्या प्रतीचा कापूस विकत घेऊ नये असे नाफेडकडून आदेश काढण्यात आलेले आहेत तेव्हा एफएक्युच्या खालच्या प्रतीचा कापूस विकत घेतला गेला नसेल तर या शेतक-यांनी हा कापूस कोणत्या ठिकाणी विकावयाचा ? हा कापूस जर आपण विकत घेतला नाही व व्यापारी या शेतक-यांची लुबाडणूक करावयास लागले तर त्यास कोण जबाबदार आहे.? एफएक्युच्या खालच्या प्रतीचा जो कापूस आहे त्याला " फेअर, फरटल, कवडी " असे म्हटले जाते तेव्हा हा कापूससुध्दा खरेदी करणे् आवश्यक आहे. 3 मायक्रोनियरच्या खालचा कापूस सुध्दा विकत घेण्यात येऊ नये असा नाफेडनें आम्हाला आदेश दिला आहे.तेव्हा अशा प्रकारचा कापूस सुध्दा खरेदी करण्यात आला पाहिजे व त्यासाठी राज्य सरकार प्रयत्न करणार आहे काय ?या कापसाच्या खरेदीसाठी जो काही पैसा लागणार आहे तो राज्य शासनाला उभा करावा लागणार आहे.या खरेदीमुळे नफा होण्याची शक्यता फारच कमी आहे. कदाचित नफा आणि नुकसान बरोबरीनेच होण्याची शक्यता आहे म्हणून यासाठी लागणारा पैसा राज्य सरकार उपलब्ध करुन देणार आहे काय ? यानंतर माझा तिसरा प्रश्न असा आहे की......

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी एका वेळी अनेक प्रश्न न विचारता नंतर इतर प्रश्न विचारावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.एन.पी. हिराणी यांनी एक प्रश्न उपस्थित केला आहे. कापसाच्या निर्यातीच्या बाबतीत केन्द्र सरकार बॅन आणत आहे अशी त्यांना शंका आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की,कॅबिनेटच्या बैठकीत यासबंधीची चर्चा झाली असून कोणत्याही परिस्थितीत कापसाच्या निर्यातीवर बंदी आणता कामा नये या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून केन्द्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे . आज कापसाचे आंतरराष्ट्रीय मार्केट चांगले आहे त्यामुळे शेतक-याच्या कापसाला चांगला भाव मिळत आहे म्हणूनच कापसाची निर्यात करण्यास बंदी घालण्यात येऊ नये अशी राज्य सरकारने आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये केन्द्र सरकारने कापसाच्या निर्यातीवर बंदी आणू नये अशा प्रकारचे पत्र दिलेले आहे. त्याचबरोबर दिनांक 17 डिसेंबर 2009 रोजी माननीय मुख्यमंत्री दिल्लीला जाणार आहेत आणि त्यावेळी सुध्दा यासंबंधीचा प्रयत्न होणार आहे सन्माननीय सदस्यांनी मायक्रोनियर च्या संदर्भात जो दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, नाफेडचे सब एजंट म्हणून आता आपण काम करतो. म्हणूनच सुपर फाईनचा कापूस घ्यावा असे धोरण त्यांनी स्वीकारलेले आहे.मायक्रोनियरच्या बाबतीत त्यांनी नवीन अट टाकलेली आहे आणि ही अट थोडीशी अडचणीची आहे.त्या बाबतीत सुध्दा केन्द्र सरकारला राज्य सरकारने अशी विनंती केलेली आहे की, ही अट शिथिल करण्यात यावी .आजचे कापसाचे मार्केट जर आपण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की,एमएसपी पेक्षासुध्दा ओपन मार्केटमध्ये कापसाचे भाव चांगले आहेत.त्यामुळे शेतक-यांच्या कापसाला चांगला भाव मिळत नाही म्हणूनच यासबंधीची विनंती राज्य शासनाच्या वतीने पुन्हा नाफेडला करण्यात येईल.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सुंबरे

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ ST/ KGS/ श्री. गायकवाड नंतर --- 15:40

श्री. अरूण गुजराथी : सभापती महोदय, शेतकऱ्यांना अधिक चांगला भाव मिळण्यासाठी, स्पर्धा वाढविण्यासाठी सीसीआय म्हणजेच कॉटन कार्पोरेशन ऑफ इंडियामार्फत जास्तीत जास्त खरेदी वेगवेगळ्या भागामध्ये वेगवेगळ्या केंद्रावर करण्यासाठी शासन त्यांना विनंती करील काय ? तसेच नाफेडच्या माध्यमातून भाव वाढवून देण्यात येतील काय ? त्यानंतर दुसरा माझा प्रश्न असा आहे की, यावेळी कापसाचे उत्पादन कमी झालेले आहे, आंध्र, गुजराथमध्ये फार मोठ्या प्रमाणावर कापूस जातो आहे, तेव्हा आपल्याकडील जिनिंग, प्रेसिंग इंडस्ट्रीजसाठी या संदर्भात जो वायएमसी आहे, म्हणजे इअरली मिनिमम चार्जेस जे आहेत ते द्यावे लागतात ते कमी करण्याच्या संदर्भात शासन काही सहकार्य करील काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आता सध्या सीसीआय मार्फत आपली 21 केंद्रे महाराष्ट्रात चालू आहेत आणि त्यांनी जवळपास 26 हजार क्विंटल कापसाची खरेदी केलेली आहे. आपण सबएजंट म्हणून कापूस पणन महासंघामार्फत 89 खरेदी केंद्रे सुरू केली आहेत आणि त्यावर 12 हजार क्विंटल कापूस खरेदी झालेली आहे आणि जी खाजगी खरेदी आहे ती साधारणत: 64 लाख क्विंटल झालेली आहे. सभापती महोदय, कापूस खरेदीच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.गुजराथी यांनी जो प्रश्न केला आहे त्यांना मी सांगू इच्छितो की, आपण यासाठी जवळपास 243 केंद्रे सुरू करण्याचा एक मास्टर प्लॅन कापूस पणन महासंघाच्या मार्फत केलेला आहे. आता कापसाला भाव वाढवून द्यावा अशीही त्यांची मागणी आहे. परंतु आपले धोरणच असे आहे की, आपण एमएसपी प्रमाणे खरेदी करतो आणि आताच्या एमएसपी सुपर फाईन क्वालिटीला साधारणत: तीन हजार रूपये क्विंटलमागे भाव आहे. दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी जिनिंग-प्रेसिंगच्या संदर्भात उपस्थित केला आहे तर ती बाब तपासून घेतली जाईल आणि त्या संदर्भात योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, फेअर आणि फडतर असा जो कापूस आहे यांची खरेदी शासन योग्य भावात करील काय आणि दुसरा माझा प्रश्न असा आहे की, सध्या मार्केटमध्ये अधिक प्रमाणात जास्त भावाने व्यापारी कापूस खरेदी करीत आहेत आणि फेडरेशनचे हमी भाव हे त्या मानाने फार कमी आहेत. साधारणपणे 3000 किंवा त्यापेक्षाही कमी भाव शासनाचे आहेत. त्यामुळे शासनाकडे फारच कमी कापूस येतो आहे. अगदी 12 हजार क्विंटल इतकाच कापूस आतापर्यंत शासनाकडे आलेला आहे असा उल्लेख मंत्री महोदयांनी आताच केला

.... 3सी 2 ..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे ....

आहे. मला वाटते की, 36 लाख क्विंटल कोठे आणि 12 हजार क्विंटल कापूस कोठे हे आपण लक्षात घ्यावे. तेव्हा एकाधिकार योजनेच्या माध्यमातून किंवा फेडरेशनच्या माध्यमातून कापसाची खरेदी ही भाव कमी असल्यामुळे जवळजवळ बंदच झालेली आहे. परंतु मागील काही वर्षांपासून काही अतिरिक्त बोनस देण्याची पद्धत बंद केल्यामुळे देखील बरीचशी तफावत यात वाढली आहे. परिणामी फेडरेशनच्या लोकांना जवळजवळ काही कामच नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तेव्हा हे जे भाव आहेत ते अतिरिक्त बोनसच्या स्वरूपात वा इतर वेगळ्या माध्यमातून देऊन शासनाचे भाव आणि व्यापाऱ्यांचे भाव यामध्ये फारसे अंतर राहणार नाहीत किंवा सध्याच्या स्थितीत मार्केटमध्ये जे भाव आहेत त्यामध्ये आणि आपल्या भावामध्ये फार अंतर राहणार नाही अशा भावाने राज्य सरकार कापूस खरेदी करील का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मुळातच ही योजना मिनिमन सपोर्ट प्राईसच्या आधारित योजना आहे. उद्या मार्केटमध्ये एमएसपीपेक्षा कमी भाव असेल तर त्यावेळी कापसाला हमी भाव देण्याची जबाबदारी आपली आहे. आजचे मार्केट आपण पाहिले तर ॲव्हरेज साडेबत्तीसशे रूपये ओपन मार्केटमध्ये कापसाचा भाव चालला आहे. काही ठिकाणी हा भाव 3400 रूपयेदेखील व काही ठिकाणी 3100 रूपये देखील आहे. शेवटी शेतकऱ्यांना चार पैसे मिळण्यासाठी म्हणून तर आपण सारी धडपड करीत आहोत, तेव्हा आज मार्केटमध्ये त्याला चांगले पैसे मिळत असतील अशा वेळी आपण नाफेडचे सबएजंट म्हणून काम करीत आहोत आणि आपल्याकडे कापूस कमी आला तरी उद्या एखादे वेळी सुपर फाईन क्वालिटीचा कापूस संपल्यानंतर बाकीचा राहिलेला कापूस आपल्याकडे म्हणजेच कापूस पणन महासंघाकडे येणारच आहे. तेव्हा ही जी व्यवस्था आपण केलेली आहे ती शेतकऱ्याला चार पैसे अधिक मिळाले पाहिजेत यासाठीच. दुसरे असे की, भाववाढीच्या बाबतीत आपले धोरण नेहमीच हे ठरले आहे आणि ते म्हणजे एमएसपीशी आपले भाव लिंकअप आहेत.

डॉ. एन.पी.हिराणी : सभापती महोदय, आपण मला पुन्हा एकदा प्रश्न विचारण्यास संधी देत आहात त्याबद्दल मी आपला आभारी आहे. माझा तिसरा प्रश्न असा आहे की, आपल्या महाराष्ट्रात सहकार क्षेत्रात जवळपास 160 जिन होते त्यापैकी 103 जिन दुर्दैवाने आज बंद आहेत. सध्या जे चालू असलेले 57 जिनस् आहेत त्यापैकी 26 कंपोझिट आहेत आणि सिंगल

.... 3सी 3 ..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. हिराणी ....

युनिटस् 31 आहेत. नाफेडच्या नियमाप्रमाणे केवळ कंपोझिटमध्येच आपण कापूस खरेदी करू शकतो. सिंगल युनिटमध्ये खरेदी करू शकत नाही. आता याचा अर्थ असा होतो की, कालांतराने ही सिंगल युनिटस् देखील बंद होण्याच्या मार्गावर येणार आहेत. कारण त्यांना कापसावर प्रक्रियाच करता येणार नाही. अशा या जिनिंगला सपोर्ट करण्यासाठी महाराष्ट्र शासन पुढे येणार आहे का ? त्यांना आर्थिक पाठबळ देणार आहे का ? त्यांनी कंपोझिट युनिट उभारावे म्हणून त्यांना प्रेसिंगची व्यवस्था करण्यासाठी जे काही आर्थिक पाठबळ लागेल ते शासन देणार आहे काय ? आणि जे बंद झालेले 103 जिन आहेत त्यांनादेखील पुनरूज्जीवित करण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय?

( यानंतर श्री. सरफरे ... 3डी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन. पी. हिराणी..

सभापती महोदय, चौथा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. तो असा की, नाफेडबरोबर आपण प्रत्येक वर्षी करारनामा करणार आणि दरवर्षी नाफेड नवीन अटी घालणार. त्यामुळे वेळेवर कापूस खरेदी केंद्रे सुरु होत नाहीत. म्हणून महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून केंद्र सरकारने डायरेक्ट कापूस पणन महासंघाला नोडल एजन्सी म्हणून नेमण्याची व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्र सरकार केंद्र सरकारकडे प्रयत्न करणार काय? तसेच, ही कापूस खरेदी केंद्रे सुरु करण्यासाठी व शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी शासन लॉंग टर्म प्लॅनिंग करण्याचा प्रयत्न करणार काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जिनिंग व प्रेसिंगच्या संदर्भातील पहिला प्रश्न उपस्थित केला. ही गोष्ट खरी आहे की, कापूस ते कापड ही योजना केंद्र सरकारची होती. म्हणून आपण दरवर्षी ही केंद्रे सुरु व्हावी याकरिता प्रयत्न करण्यापलिकडे काही केले नाही. म्हणून वस्त्रोद्योग विभागाच्या माध्यमातून जिनिंग प्रेसिंगच्या बाबतीत विदर्भ आणि मराठवाडयासाठी नवीन धोरण आणावे लागेल. त्यासाठी माझ्या विभागाचा सकारात्मक दृष्टीकोन राहील. आणि म्हणून कापसावर प्रक्रिया करण्याच्या बाबतीत आऊटसोर्सिंग करणे आवश्यक आहे. त्यासाठी सकारात्मक धोरण स्वीकारण्यात येईल. दुसरा प्रश्न यासंबंधी दीर्घकाळ धोरण स्वीकारण्यासंबंधी विचारण्यात आला आहे. याबाबत आपणाबरोबर एकदा बैठक झाली होती. तरीसुध्दा याबाबत आपण पुन्हा एकदा बैठक घेऊ. माननीय सदस्य मला नेहमी भेटतात, परंतु त्याबाबत चर्चा झालेली नाही. म्हणून याबाबत एक व्यापक दृष्टीकोन स्वीकारुन दीर्घकालीन उपाय योजना स्वीकारणे आवश्यक आहे.म्हणून माझ्या विभागाचा प्रमुख म्हणून या प्रश्नाबाबत कायम स्वरुपी धोरण स्वीकारण्याच्या बाबतीत माझी सकारात्मक भूमिका राहील.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचना क्र. 5 बाबत

उपसभापती : आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दर्शविण्यात आलेली पाचव्या क्रमांकावरील लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>विशेष उल्लेख</u>

**पृ.शी.**: घरेलू कामगार विधेयकांतर्गत नियम तयार करण्यास होत असलेला विलंब
**मु.शी.**: घरेलू कामगार विधेयकांतर्गत नियम तयार करण्यास होत असलेला विलंब याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"शासनाने मोलकरणी (घरेलू कामगार) विधेयक गेल्या वर्षी दोन्ही सभागृहात संमत केले परंतु अद्याप सदर अधिनियमांतर्गत नियम तयार केलेले नाहीत. त्यामुळे घरेलू कामगारांसाठी निर्माण करण्यात येणारे मंडळही अद्याप अस्तित्वात आलेले नाही. मोलकरणी भगिनींना त्यांचे हक्क व न्याय मिळण्यास त्यांनी सातत्याने केलेला रस्त्यावर संघर्ष, मोलकरणींची आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून विविध सामाजिक संस्थांनी घेतलेला पुढाकार, सदर विधेयकांतर्गत शासनाने नियम तयार करण्यास केलेला अक्षम्य विलंब, परिणामी हजारो घरेलू कामगारांना मिळणारे आर्थिक फायद्यापासून त्यांना एक वर्षापेक्षा अधिक काळ वंचित रहावे लागत आहे. मोलकरणींच्या हक्क व न्याय्य मागण्यांकडे होत असलेल्या दिरंगाईमुळे मी विशेष उल्लेखांची सूचना देत आहे".

सभापती महोदय, असंघटीत क्षेत्रातील महत्वाच्या भागीदार व मनुष्यबळ विकासात महत्वाच्या भूमिका बजावणाऱ्या मोलकरणींची अक्षम्य उपेक्षा हे शासन करीत आहे. गेल्या 2002 च्या अधिवेशनामध्ये 29 डिसेंबरला मोलकरणींसाठी घरेलू कामगार संरक्षण विधेयक मंजूर झाले. परंतु 1 वर्ष झाले तरी या मोलकरीण भगिनींना औषध सेवा, निवृत्ती वेतन, स्मार्ट कार्ड या नोंदीसाठी घर कामगारांच्या प्रश्नांसाठी बोर्ड तयार होणार होते, ते बोर्ड तयार केले गेले नाही. विदर्भ मोलकरीण संघटनेच्या अध्यक्षा डॉ. रुपा कुलकर्णी यांनी या प्रश्नांवर सातत्याने परिषदा, मोर्चे आयोजित केले. अनेक मंत्र्यांनी या कार्यक्रमात जाऊन या भगिनींना आश्वासने दिली. शिवसेनेचे माजी आमदार श्री.देवेंद्र साटम यांच्या नेतृत्वाखाली मधू बिरमोळे या भगिनींनी शेकडो महिलांना संघटीत केले आहे. 65 वर्षावरील घरेलू कामगारांना 600 रुपये महिना पेंन्शन मिळावे, बी.पी.एल. ची कार्डे या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ KGS/

डॉ. नीलम गोऱ्हे..

सर्व घरेलू कामगारांना मिळावीत. अनेक सर्व्हेक्षणात या महिलांच्या आरोग्याकडेही लक्ष देण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. आणि म्हणून शासनाने या गोरगरीब घरेलू कामगारांचे बोर्ड त्वरीत तयार करावे,त्याकरिता आर्थिक व्यवस्था करावी. त्यामध्ये घरेलू कामगार महिला, घर कामगारांच्या संघटनांच्या प्रतिनिधींना स्थान देण्यात यावे. सर्व घरेलू कामगारांना वैद्यकीय विम्याचा लाभ मिळावा. याकरिता मी विशेष उल्लेखाव्दारे शासनाकडे मागणी करते.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कोकणामध्ये नदी काठी, खाडीवर त्वरीत संपर्क साधण्यासाठी लहान बोटी खरेदी करणे

**मु.शी.**: कोकणामध्ये नदी काठी, खाडीवर त्वरीत संपर्क साधण्यासाठी लहान बोटी खरेदी करणे याबाबत श्री. संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"कोकणातील चारही जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती, समुद्र, खाडया, नद्या व डोंगर दऱ्या लगत आलेली लोकवस्ती जिल्हयात विविध ठिकाणी असलेले अनेक प्रकारचे उद्योगधंदे जिल्हयातून जाणारे राष्ट्रीय महामार्ग तसेच राज्याच्या तुलनेत कोकणातील सर्व जिल्हयात मोठया प्रमाणात पडणारा पाऊस यामुळे या जिल्हयांना नैसर्गिक आपत्तीचा मोठा इतिहास आहे याची प्रचिती जुलै 2005 च्या महापुराने आलेली आहे. या महापुराचा अनुभव लक्षात घेता पूरबाधित जनतेचा शोध घेणे व त्यांना सुरक्षित स्थळी हलविणे हे शासनाचे प्रथम कर्तव्य ठरते व त्यासाठी जिल्हयातील महत्वाच्या नदीकाठी तसेच खाडीवर अत्यावश्यक ठिकाणी त्वरीत संपर्क साधण्यासाठी लहान बोटींची व्यवस्था केल्यास त्यांचा चांगला उपयोग होईल. तरी कोकण जिल्हयाची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन अशा छोटया आकाराच्या बोटी खरेदी करणे शासनाचे कर्तव्य आहे. याकरिता अशा बोटी खरेदीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सदरची बाब मी विशेष उल्लेखाव्दारे सभागृहात मांडीत आहे. धन्यवाद.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ठाणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयातील समस्यां-
मुळे मनोरुग्णांच्या आरोग्यावर होणारा अनिष्ट
परिणाम.

**मु. शी.** : ठाणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयातील समस्यां-
मुळे मनोरुग्णांच्या आरोग्यावर होणारा अनिष्ट
परिणाम याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे,वि.प.स.यांनी
दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यां□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे.त्यां□ ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे(विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडते.

"ठाणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयातील समस्या पत्रकार व सामाजिक संस्थांकडून दिनांक 2-12-2009 च्या दरम्यान केलेल्या पहाणीत आढळून येणे, मनोरुग्णालयातील रुग्णांना कच्चे व निकृष्ट भोजन देणे, रुग्णांना देण्यात येणारे भोजन लाकडांवर तयार केले जात असल्याने ते कच्चे राहणे, रुग्णांना बोअरिंगचे पाणी पिण्यास देणे, तसेच संपूर्ण रुग्णालय परिसरात व स्वयंपाकगृहात उंदीर व धुशींचे साम्राज्य असणे, त्यामुळे रुग्णांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होणे, एकूण प्रकारामुळे जनमानसात व रुग्णांच्या नातेवाईकांमध्ये पसरलेला असंतोष व चिडीचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची व केलेली उपाययोजना व शासनाची भूमिका."

सभापती महोदय, आपल्याला ठाणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयातील रुग्णांच्या समस्यांची माहिती आहे.गेल्या वेळेस देखील मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मनोरुग्णांच्या या समस्यांकडे लक्ष वेधलेले आहे. येथील मनोरुग्णांना कच्चे व निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जाते. याबाबतीत सदनामध्ये प्रत्येक वेळी प्रश्न मांडलेला आहे. दि.2-12-2009 रोजी काही पत्रकार व सामाजिक संस्था यांनी तेथे भेट दिली असता, त्यांना देखील असे दिसून आले की, या मनोरुग्णांना देण्यात येणारे भोजन हे निकृष्ट दर्जाचे असून ते लाकडावर शिजवण्यात येते. यासंदर्भातील सर्व माहिती मागविलेली असून सदनापुढे सादर करीत आहे. सभापती महोदय, तेथील रुग्णांना जेवणाच्या बाबतीत किंवा औषधांच्या बाबतीत किंवा इतर जे प्रॉब्लेम आहेत, मी त्यासंबंधातील पत्र आपल्याकडे

. . . .3 ई-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे . . . .

पाठविते.आपल्या तसेच शासनाच्या माध्यमातून तेथील जे निरीक्षक किंवा इतर अधिकारी आहेत, त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी. तसेच सभापती महोदय, हा विषय ठाण्यातील आहे. आपल्याला देखील सर्व माहिती आहे. त्यामुळे याबाबतीत आपण देखील लक्ष दिले तर बरे होईल.

-----

. . . .3 ई-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सरस्वती विद्यामंदिर,आमटेम,ता.पेण,जि.रायगड या शाळेतील एका शिक्षकांनी गेल्या 5 दिवसापासून सुरु केलेले उपोषण

**मु. शी.** : सरस्वती विद्यामंदिर,आमटेम,ता.पेण,जि.रायगड या शाळेतील एका शिक्षकांनी गेल्या 5 दिवसापासून सुरु केलेले उपोषण याबाबत श्री.रामनाथ मोते वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्य श्री.रामनाथ मोते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"सरस्वती विद्यामंदिर आमटेम, ता.पेण, जि.रायगड हे 6 दिवसांपासून उपोषणास बसले आहेत. वरिष्ठ वेतनश्रेणी न देणे, 5 व्या व 6 व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती न करणे, थकबाकी न देणे इ.विषयांबाबत जिल्हा शिक्षणाधिकारी, रायगड यांनी सूचना देऊनही कार्यवाही होत नसल्याने एक मागासवर्गीय शिक्षक उपोषण करीत आहे. कुणीही लक्ष देण्यास तयार नाही. शासनाने तातडीने दखल घ्यावी यासाठी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

सभापती महोदय, सरस्वती विद्यामंदिर, आमटेम, ता.पेणे.जि.रायगड या शाळेतील एक शिक्षक श्री.रोडगे हे सहा दिवसापासून जिल्हा शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसलेले आहेत. हे मागासवर्गीय शिक्षक या शाळेमध्ये गेले 21-22 वर्षे काम करीत आहेत. संस्थेकडून होणाऱ्या अन्यायाच्या बाबतीत त्यांनी वारंवार तक्रारी करुनही त्यांना सेवा पुस्तक न देणे, थकबाकी न देणे, राज्यात सहावा वेतन लागू झाला, पण पाचव्या वेतन आयोगाची वेतन निश्चिती न करणे असे प्रकार सुरु आहेत. हे शिक्षक अत्यंत गरीब असून ते आजारी आहेत, त्यांची बायपास सर्जरी झालेली आहे आणि उपोषण करुनही संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष न दिल्यामुळे, संस्थेने सहकार्य न केल्यामुळे या शिक्षकाला आज सातव्या दिवशी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले आहे. हा अतिशय गंभीर विषय आहे. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून या गरीब शिक्षकाची समस्या सोडविण्यासाठी आपण शासनाला आदेश द्यावेत आणि संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने त्या गरीब

. . . .3 ई-4



श्री.रामनाथ मोते . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिक्षकाच्या कामाच्या बाबतीत हालचाल करावी, त्याचे उपोषण सोडवावे या दृष्टीकोनातून मी आपल्याला विनंती करीत आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी आपल्याला एकच गोष्ट सांगू इच्छितो की, या शिक्षकाची परिस्थिती अत्यंत खालावलेली आहे. त्यांच्या उपोषणाला सहा दिवस झालेले असून, त्यांना सध्या रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलेले आहे. त्यांची बायको आणि मुले तेथे बसलेली आहेत.

**उपसभापती** : संबंधित जिल्ह्याच्या माननीय पालकमंत्र्यांनी ताबडतोब लक्ष घालून याबाबत कार्यवाही करावी.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या शिक्षकाचे उपोषण सुटणे अत्यंत आवश्यक आहे.

(माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे खाली बसून बोलतात.)

**उपसभापती** : माननीय महसूल मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, मी याबाबतीत कलेक्टर साहेबांशी बोलतो.

श्री.रामनाथ मोते : ठीक आहे. धन्यवाद.

----

. . . .3 ई-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : अधिव्याख्याता पदासाठी नेट सेट अर्हताधारक उमेदवार न मिळणे.

**मु. शी.** : अधिव्याख्याता पदासाठी नेट सेट अर्हताधारक उमेदवार
न मिळणे याबाबत श्री.केशवराव मानकर वि.प.स.यांनी
दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण विभागाव्दारे मान्यताप्राप्त शासकीय व अशासकीय महाविद्यालयात राखीव जागांवर (अनुसूचित जाती, जमाती इ.) अधिव्याख्याता पदाच्या नियुक्तीसाठी नेट-सेट अर्हताधारक उमेदवार न मिळाल्यास बिगर नेट-सेट अर्हताधारक उमेदवारांची कंत्राटी पध्दतीवर दोन वर्षाकरिता नियुक्ती केली जात असणे, सध्या अशा नियुक्त्यांवर शासनाव्दारे एप्रिल 2008 पासून बंदी घालण्यात आली असल्याचे पत्र नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाला प्राप्त होणे, त्यामुळे अशा नियुक्त्यांना विद्यापीठाने मान्यता देणे बंद करणे, परंतु पात्रताधारक उमेदवार मिळत नसल्यामुळे विषय शिकविण्यासाठी महाविद्यालयात अधिव्याख्यात्यांची नियुक्ती न होणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा परिणाम आणि अधिव्याख्याता पदासाठी नेट सेट अर्हताधारक उमेदवार मिळत नसेल तर, बिगर नेट सेट अर्हताधारक उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याची आवश्यकता, तसेच नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थ्यांनी वाममार्गाचा वापर करु नये यासाठी नक्षलभागात प्राधान्याने बिगर नेट सेट अर्हताधारकांची नियुक्ती करण्याची आवश्यकता."

----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: : अलिबाग (जि. रायगड) तालुक्यातील सारळ ग्रामपंचायत हद्दीतील म्हात्रोळी येथे स्मशानभूमी बांधणे.

**मु.शी.**: अलिबाग (जि. रायगड) तालुक्यातील सारळ ग्रामपंचायत हद्दीतील म्हात्रोळी येथे स्मशानभूमी बांधणे याबाबत श्री. जयंत प्र.पाटील यांनी दिलेली विशेष उललेखाची सूचना.

**उपसभापती** :सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील ( विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित): महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबधीची सूचना मांडतो.

"अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील सारळ ग्रामपंचायत हद्दीतील म्हात्रोळी ग्रामस्थांनी म्हात्रोळी येथे स्मशानभूमी बांधून मिळण्याबाबत शासनाकडे वेळोवेळी मागणी करणे, सारळ ग्रामपंचायतीने म्हात्रोळी गावालगत गट नं.260 क्षेत्र 0-07-0 इतकी जागा स्मशानभूमीसाठी राखीव ठेवणे व नमुना नं 7/12 उताऱ्यावर तशी नोंद असणे, बाधंकामास ग्रामपंचायतीचा ना हरकत दाखला प्राप्त होणे, असे असतानाही शासनाकडून या ठिकाणी स्मशानभूमी बांधणेस अद्यापही परवानगी न मिळणे."

सभापती महोदय, याबाबत जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांना मी स्वत: दि.23-8-2008 व दि.19-9-2008 रोजी निवेदन दिले असता त्यांचेकडून कोणतीच कार्यवाही न झाल्याचे कळणे अगर पत्राला उत्तरही न मिळणे, सध्या वापरात असलेली स्मशानभूमी अन्य ग्रामपंचायत हद्दीत असून म्हात्रोळी गावापासून सुमारे 4 ते 5 किलोमीटर अंतरावर असणे, त्यामुळे वयोवृध्द नागारिकांना अतिशय त्रास होणे, यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये अतिशय संतापाची भावना निर्माण होणे, सबब शासनाने या संबंधी त्वरित कार्यवाही करुन निर्णय घेण्यासाठी व शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा विशेष उल्लेख करीत आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांना हे माहीतच असेल की, पूरक मागण्यांवरील चर्चेसाठी दोन दिवस म्हणजे सोमवार, दि. 14 आणि मंगळवार, दि. 15 डिसेंबर, 2009, हे दिलेले आहेत. आज कार्यक्रमपत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा व्हावयाची आहे, पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्यांने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रीनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्रिमहोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.अन्यथा आज राहिलेल्या पूरक मागण्या व मंगळवार दि. 15 डिसेंबर, 2009 करिता असलेल्या सर्व मागण्यांवरील चर्चा मंगळवार,दिनांक 15 डिसेंबर, 2009 रोजी पूर्ण करावी लागेल.

**विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या**

**उपसभापती** :खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील :-

(1) मुख्य मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या क्रमांक ए-1,ए-2,ए-3,ए-4,ए-5,ए-6,एफ-2, एफ-4,,झेड-डी-2

(2) महसूल व खार जमीन आणि अतिरिक्त कार्यभार पुनर्वसन व मतद कार्य व भूकंप पुनर्वसन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - सी-1,सी-5,सी-6,सी-10

(3) वने मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - सी-7.

(4) सामाजिक न्याय, विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण व व्यवसनमुक्ती कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक -एन-1, एन-3,

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**......

(5) जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) आणि ऊर्जा मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - आय-3,आय-4,आय-5, के-6

(6) परिवहन व बंदरे आणि अतिरिक्त कार्यभार विधी व न्याय मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - जे-1,

(7) ग्राम विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - एल-2, एल-3, एल-6

(8) सहकार, पणन व संसदीय कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - व्ही-2, व्ही-5,

(9) कृषी, जलसंधारण, रोजगार हमी योजना आणि अतिरिक्त कार्यभार शालेय शिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक - डी-3,ई-2,एल-7,

(10) वैद्यकीय शिक्षण, फलोत्पादन व पर्यटन मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या क्रमांक - डी-3,एस-1

(11) वित्त व नियोजन मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - जी-1, जी-3, जी-5, जी-6, ओ-7, ओ-15, ओ-16, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-20, ओ-21, ओ-22, ओ-23, ओ-24, ओ-25, ओ-26, ओ-27, ओ-28, ओ-29, ओ-30, ओ-31, ओ-32, ओ-33, ओ-34, ओ-35, ओ-36, ओ-37, ओ-38, ओ-39, ओ-40, ओ-41, ओ-42, ओ-43, ओ-44, ओ-45, ओ-46, ओ-47,

(12) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पर्यावरण, राजशिष्टाचार आणि अतिरिक्त कार्यभार क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या क्रमांक - ई-3, आर-1.

सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत आता चर्चेला सुरुवात करतील.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावरील चर्चेच्या निमित्ताने अनेक विषय आज एकाच दिवशी चर्चेला घेतले आहेत पण त्यातील जे काही महत्वाचे वाटतात त्यावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 2 पृष्ठ क्रमांक-5, लोकसभा व राज्य विधानसभा निवडणूक 2009 घेण्यासाठी तरतूद करणे, ही तरतूद दत्तमत्त असली तरी ही तरतूद ज्या कारणासाठी होते, त्या कारणासाठी त्याचा विनियोग करताना अनेक गोष्टींच्या त्रुटी आजही तशाच राहिल्या आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

मी माझा व्यक्तिगत अनुभव सांगतो. माझ्याकडे निवडणूक आयोगाचे जुने छायांकित ओळखपत्र आहे. मी दोन वेळा जाऊन छायाचित्र काढूनही मला आजपर्यंत नवीन ओळखपत्र मिळालेले नाही. मतदार यादीमध्ये नावे व्यवस्थित नसणे, यादीमध्ये नाव नसणे, नावे गहाळ होणे या बाबी निवडणुकीच्या वेळी नेहमीच पहावयास मिळतात. हा सगळा खर्च आपण करतो आणि तरीही अशा बाबी होतात. मूळ मुद्दा असा आहे की, हे जे डॉक्युमेंट आहे आणि खासकरुन निवडणूक आयोगाचे ओळखपत्र हे अत्यंत महत्वाचे गणले जाते. पासपोर्ट काढण्यासाठी किंवा इतर काही गोष्टींसाठी ते महत्वाचे डॉक्युमेंट आहे. त्या ओळखपत्राची आज एवढी किंमत असताना ते ओळखपत्र वेळेवर मिळत नाही. बोगस ओळखपत्रे मिळतात. आपल्याला कल्पना आहे की, एवढे होऊन सुध्दा आजही ओळखपत्रावरच निवडणूक होईल असे सांगितले जात नाही. ऐनवेळी रेशन कार्ड चालेल, ड्रायव्हींग लायसन्स चालेल किंवा नागरिकांकडे ज्या ज्या गोष्टी उपलब्ध असतील त्या चालतील असे सांगितले जाते. मागे निवडणुकीच्या काळामध्ये बोगस रेशन कार्ड पकडले. त्याचे पुढे काय झाले हे माहीत नाही. ते रेशन कार्ड धारण केलेले लोक त्या ठिकाणी राहतात की नाही याचा तपास केला जात नाही. काही दिवसांनी ती माणसे अधिकृत म्हणून गणली जातील. आम्ही नेहमी परप्रांतीयांचा विषय काढतो. अनेक बांगलादेशी लोक आलेले आहेत. एवढे पैसे यावर खर्च होतात. पुरवणी मागण्यांव्दारे एवढी मोठी तरतूद आपण मागतो त्याचा विनियोग खरोखरच नागरिकांसाठी केला जातो काय हा प्रश्न आहे. मूळ प्रश्न असा आहे की, यापुढे सरकारने ठामपणे सांगितले पाहिजे की, हा खर्च केल्यानंतर पुढची निवडणूक कोणत्याही परिस्थितीमध्ये निवडणूक आयोगाने वितरित केलेल्या ओळखपत्रावरच होईल. कोणतेही कारण किंवा कोणतीही सबब न सांगता किंवा रेशन कार्ड वा अन्य पुरावे ग्राह्य धरले जाणार नाहीत. हे केले तर योग्य काम होईल. नाही तर पैसेही जातील. बोगस रेशन कार्ड मिळतील. कालांतराने ती रेशन कार्डे अधिकृत होतील आणि त्याव्दारे ओळखपत्र मिळतील, पासपोर्ट मिळतील. त्यातून या देशाच्या सुरक्षेला बाधा निर्माण होईल. परंतु याची चिंता आपण करीत नाही.

सभापती महोदय, दुसरा विषय कदाचित केंद्र शासनाकडे येतो. एका बाजूला आपण विधानसभेच्या निवडणुकीसाठी 10 लाख रुपये खर्च करतो पण आता श्री. पी. साईनाथ यांचा

....2..

RDB/ ST/ KGS/

श्री. अरविंद सावंत ....

जो लेख आलेला आहे तसेच महाराष्ट्र टाईम्समध्ये श्री. गोविंद तळवलकर यांनी जो लेख लिहिलेला आहे तो सगळ्यांना अंतर्मुख करावयास लावणारा आहे. सर्वसामान्य माणूस आता पुढची निवडणूक लढवू शकणार नाही. समाजातील चांगली माणसे विधान परिषदेमध्ये आणावयाची असतील तर कदाचित राज्यपाल नियुक्त सदस्यांची संख्या वाढवावी लागेल. विधान परिषदेच्या निवडणुकांची परिस्थिती ही विधानसभेच्या निवडणुकीपेक्षाही भयानक झालेली आहे. हे जे निवडणुकीचे चित्र आपण पाहतो तेव्हा त्याबाबतीत कधी कधी आश्चर्य वाटते. एकदा माननीय मंत्रिमहोदय श्री. आर. आर. पाटील यांचे भाषण ऐकत होतो. त्यांनी सांगितले की, विधान परिषदेची निवडणूक आली की मला दडपण येते. महापालिकेमधून किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधून निवडून यावयाचे असेल तर आता पळवापळवीचे प्रकार सुरु झाले आहेत. ते जर थांबवावयाचे असेल तर जसे आपण महापालिकेमध्ये हात वर करुन मतदान करण्यास सांगतो तसे करावे. मग पक्ष कोणताही असू द्या. बाजारबुणग्यांचा जो रोग सर्व सिस्टिमला लागलेला आहे तो दूर करण्याचा विचार शासन करणार की नाही ? आपण निव्वळ पैसे खर्च करतो परंतु ओळखपत्रे छापली जातात की नाही हे माहीत नाही. त्यामुळे याचा सुध्दा विचार या निमित्ताने केला जावा. या ठिकाणी मागणी केली जाते परंतु त्या मागणीचा विनियोग कसा झाला याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मला सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 10 बाबत बोलावयाचे आहे. महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाच्या आंदोलनातील हुतात्म्यांच्या कुटुंबीयांना निवृत्तिवेतन देणे यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. ही चांगली बाब आहे. ते दिले पाहिजे परंतु आपण किती वर्षे हेच करत बसणार आहात ? केंद्र सरकारने काल जे धोरण जाहीर केले, खासकरुन अर्थमंत्री श्री. प्रणव मुखर्जी यांनी असे सांगितले की, आता तेलंगणाचा विषय झाला, यापुढे दुसऱ्या कोणत्याही राज्याच्या निर्मितीसाठी आग्रह धरु नये. असे त्यांनी ठामपणे सांगितले.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

सभापती महोदय, माझा महाराष्ट्र शासनाला प्रश्न आहे, माझा माननीय मुख्यमंत्र्यांना प्रश्न आहे. या प्रश्नाबाबत आपल्या सरकारची भूमिका काय आहे ते सांगावे. आम्ही वेगळया राज्याची मागणी करीत नाही. आमचा प्रश्न वेगळा आहे. श्री.प्रणव मुखर्जी असे म्हणाले की, तेलंगणाचा प्रश्न 60 वर्षे जुना आहे. मग तेलंगणाचा प्रश्न 60 वर्षे जुना असेल तर महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न किती जुना आहे ते मी सांगण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. हा प्रश्न किती जुना आहे ते संपूर्ण देशाला माहीत आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने हुतात्म्यांच्या कुटुंबियांना निवृत्तीवेतन देण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. त्या हुतात्म्यांना सुध्दा वाटेल की, होय, माझे हौताम्य सत्कारणी लागले. सभापती महोदय, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये ज्यांनी भाग घेतला त्यांना सुध्दा मान्यता द्यावी. नव्या पिढीला संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा इतिहास माहीत नाही, तो त्यांचा दोष नाही, कारण त्यांचा जन्म नंतर झाला आहे. त्यामुळे या पिढीला काही वाटणार नाही. तसेच या पिढीला बेळगाव इकडे राहिला की तिकडे राहिला काही फरक पडणार नाही. सभापती महोदय, आंध्र प्रदेशच्या सीमेला लागून 14 गावे आहेत. त्या भागातील लोकांना आंध्र प्रदेश सरकारकडून रेशन कार्ड दिली जातात. त्यांच्या जमिनीची कागदपत्रे दिली जातात. ते लोक सुध्दा सोयीस्करपणे इकडे मतदान करतात आणि तिकडे सुध्दा मतदान करतात. या विषयी मी वेगळया माध्यमातून प्रश्न उपस्थित करणार आहे. कारण त्या सरकारने मराठीबद्दल भयानक उद्‌गार काढले आहेत. केंद्र सरकारने आपली भूमिका विशद केली आहे त्याबद्दल महाराष्ट्र सरकारची भूमिका काय आहे ते कळले पाहिजे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांना सांगू इच्छितो की, पुरवणी मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. त्यामुळे प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी इतर सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल अशा पध्दतीने आपले विचार मांडावेत.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, यानंतर ती बाब क्रमांक 33, पृष्ठ क्रमांक 23, अंतर्गत कोकण विकास पॅकेज अन्वये गाळ उपसणी यंत्राची खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकरिता 3 वर्षांसाठी 60 कोटींची तरतूद केलेली आहे. सभापती महोदय, कोकणामध्ये आधीच

2...

14-12-2009 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3H-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

धरणे नाहीत. या यंत्रणाचा बंदरातून गाळ काढण्यासाठी वापर केला जाणार आहे. हे यंत्र कोठे कोठे वापरले जाणार आहे ? हे यंत्र खरेदी करण्यासाठी तरतूद केली जात आहे, त्याची किंमत किती आहे, हे यंत्र केव्हा खरेदी केले जाईल, त्याचे लाईफ किती वर्षे असेल ते कळले पाहिजे. त्याचप्रमाणे 20 कोटी रुपये प्रति वर्ष असे 60 कोटी रुपये खर्च होणार आहेत. इतक्या मोठया रकमेतून किती गाळ काढला गेला, त्यामुळे पाण्याचा साठा किती वाढला, किती बंदरांची सोय झाली, माशांचे उत्पादन किती वाढले हे देखील समजणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर बाब क्रमांक 47, पृष्ठ क्रमांक 37 यावर मी माझे विचार व्यक्त करीत आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना वित्तीय सहाय्य करण्याच्या संदर्भात ही तरतूद केलेली आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 16:10

(श्री. अरविंद सावंत....

यापूर्वी हा विषय झालेला असल्यामुळे आता पुन्हा त्यावर मी बोलणार नाही. परंतु निदान या शेतक-यांना यापुढे दारुडा ठरवून त्यांना कोणत्याही मदतीपासून वंचित करु नका अशी विनंती करतो. शेतक-यांच्या जखमेवर मीठ चोळू नका. बाहेर उग्र आंदोलन सुरु आहे. खास करुन आत्महत्त्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबांची अवस्था आज काय आहे ? त्यांना सरकारने दिलेली मदत मिळालेली आहे की नाही ? यासंबंधी शक्य झाले तर सरकारने अहवाल सादर करावा.

सभापती महोदय, पान क्रमांक 38 वरील बाब क्रमांक 47मध्ये पुरेशा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या बाबीचे मी खेदपूर्वक स्वागत करतो. खेदपूर्वक असा शब्दप्रयोग मी जाणीवपूर्वक केलेला आहे. याचे कारण असे की, 60 वर्षानंतर देखील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटलेला नाही. टंचाईग्रस्त गावांना पुरेशा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, कोकणामध्ये प्रचंड पाणी आहे. आता पाण्यासाठी आंदोलने सुरु झालेली आहेत. गेली कित्येक वर्षे कोयनेचे पाणी वाया जात आहे. हे वाया जाणारे पाणी चिपळून कडून दक्षिणेकडील कोकणात घेऊन जाण्यासंबंधी किंवा ते मुंबई शहरामध्ये आणण्यासंबंधीचा विषय या सभागृहामध्ये मी सातत्याने मांडलेला आहे. हा विषय मांडल्या नंतर प्रत्येक अधिकारी हे फिझिबल नाही असे सांगतात आणि कोणताही प्रश्न सुटत नाही. अमेरिकेमध्ये धरणे बांधताना पुढील 100 वर्षे पाणी कसे उपयोगी पडेल या एकाच गोष्टीचा विचार केला गेला. म्हणून मी हे सांगत आहे की, केवळ नॉट फिझिबल या दोन शब्दांमुळे ते पाणी वर्षानुवर्षे वाया जात आहे. सावित्री नदीचे पाणी वर्षाचे 365 दिवस वाया जात आहे. वशिष्ठी देखील वाहत असते. तेव्हा कोयनेच्या पाण्याचा विनियोग करता येईल का याचा शासनाने विचार करावा. आज राज्यामध्ये सर्वत्र अशी परिस्थिती आहे की, कितीही खोल बोअर मारली तरी पाणी लागत नाही. कोकणामध्ये 300-350 मीटरवर बोअरला पाणी लागत नाही. एखाद्या ठिकाणी पाणी लागले तर ते पिण्यायोग्य नसते. तेव्हा ही स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी करण्यात आलेली तरतूद हास्यास्पद वाटते. या ठिकाणी सभागृहामध्ये माननीय महसूल मंत्री उपस्थित आहेत. मी सांगू इच्छितो की, पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात आपण अतिशय दूरगामी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. मी सातत्याने या सभागृहामध्ये कोकणाच्या संदर्भातील

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत....)

निकष बदलण्याची आग्रही मागणी करीत आलो आहे. पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत मी एकवेळ समजू शकतो. परंतु सिंचनाच्या बाबतीतही तीच परिस्थिती आहे. संपूर्ण कोकण हा डोंगराळ भाग आहे. एका बाजूला सह्याद्रीच्या रांगा आणि दुस-या बाजूला सागरी किनारपट्टी आहे. या डोंगराळ भागातील जे पाणी 365 दिवस वाया जात आहे त्याचा विनियोग मात्र सातत्याने विनंती करुन देखील केला जात नाही. निवडणुकीच्या आधी कोकणामध्ये मंत्रिमंडळाची एक बैठक झाली. त्या बैठकीमध्ये कोकणातील पिण्याच्या पाण्याच्या संदर्भातील आणि सिंचनाच्या संदर्भातील निकष बदलण्यासंबंधी घोषणा करण्यात आली. आज कोकणातील अनेक नळ पाणी पुरवठा योजना बंद आहेत. कोल्हापूर बंधारे तुटलेले फुटलेले आहेत. जलसंपदा विभागाच्या पुरवणी मागण्यावर मी या विषयी बोलेन. मला एवढेच विचारावयाचे आहे की, कोकणामध्ये निकष बदलण्याच्या संदर्भात काय केले हे समजण्याची आवश्यकता आहे. फयान वादळच्या संदर्भात या सभागृहामध्ये विस्तृत चर्चा झालेली असल्यामुळे मी त्या विषयावर बोलणार नाही.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, पुरवणी मागण्यावरील चर्चेवर बोलत असताना मी केवळ सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यानांच नाही तर सभागृहातील अन्य सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी वस्तुनिष्ठ माहिती सांगावी, मोघम माहिती सांगू नये अशी माझी विनंती आहे. आता कोल्हापुरी बंधारे फुटलेले असतील तर ते कुठे कुठे फुटलेले आहेत ते सांगावे एखाद्या ठिकाणी बोगस रेशन कार्डे असतील तर ती कोणत्या ठिकाणी आहेत त्या गावाचे नाव सांगावे. या सभागृहामध्ये कोणतीही माहिती देत असताना किंवा सरकारवर आरोप करीत असताना सन्माननीय सदस्यांनी त्यासंबंधी नावासहीत पुरावा देण्याची प्रथा आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मी मंत्रीमहोदयांचे आव्हान स्वीकारतो. मी कोणावरही आरोप केले नव्हते. बोगस रेशन कार्डाच्या संदर्भात केंद्रीय कृषिमंत्री श्री.शरद पवार यांनी सांगितले होते की, राज्यात दीड कोटी बोगस रेशन कार्डे आहेत. हे विधान त्यांनी केले असल्यामुळे त्यांनाच विचारावे. सन्माननीय मंत्री श्री.गणेश नाईक यांच्यावर बोगस रेशन कार्डाच्या संदर्भात केस दाखल झाली.

सभापती महोदय, माझ्या आमदार निधीतून 10 लाख रुपये खर्चून बंधारा बांधण्यात आला. पैसे शासनाचे खर्च झाले असले तरी जीव जळतो. शासनाने 10 लाख रुपये खर्चून बंधारा बांधला. परंतु वर्षातून एकही दिवस तो वाहिला नाही. अत्यंत निकृष्ट दर्जाचे काम केले गेले म्हणून हे स्पेसिफिक उदाहरण देत आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, आपण आतापर्यंत 16 मिनिटांचे भाषण केलेले आहे. अनेक सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत व ज्या विभागाच्या मागण्या आज चर्चेला आहेत त्या चर्चेवरील उत्तरे आजच पूर्ण व्हावयाची आहेत. त्यामुळे मला सभागृहाने सहकार्य करणे अपेक्षित आहे.

श्री.अरविंद सावंत : मी माननीय मंत्रीमहोदयांचे आव्हान स्वीकारतो. सभापती महोदय, बाब क्रमांक-117 जल व भूमी व्यवस्थापन अंतर्गत 119 लहान पाटबंधारे व 126 चंद्रभागा बंधारे बांधण्यात येणार आहेत. यापैकी किती बंधारे कोकणात बांधण्यात येणार आहेत? जल व भूमी व्यवस्थापन अंतर्गत किती धरणे बांधून पूर्ण झाली त्याची माहिती सभागृहाला द्यावी. त्या संदर्भात किती तरतूद केली जाणार आहे याची माहिती द्यावी एवढे बोलून माझे भाषण वेळेअभावी पूर्ण करतो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 8, पृष्ठ क्रमांक 6 वर सामान्य प्रशासन विभागाने राष्ट्रपुरुष व थोर व्यक्ती यांची स्मारके किंवा पुतळे यांच्या बांधकामासाठी निधीची तरतूद केली आहे. मी आपल्यामार्फत एक बाब शासनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, राष्ट्रपुरुष व थोर व्यक्ती यांचे पुतळे बांधल्यानंतर ते संरक्षित असले पाहिजेत, त्यांची देखभाल झाली पाहिजे. या पुरवणी मागणीद्वारे शासनाने शहाजी भोसले यांच्या स्मारकाचे बांधकाम करण्यासाठी 1.5 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

सभापती महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभूमी येथील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाचे काम अपूर्ण राहिले आहे. चैत्यभूमीशेजारी इंदू मिलची जागा भारत सरकारच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाकडून मागून घ्यावी व त्यासाठी तरतूद उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 33, पृष्ठ क्रमांक 23 वर कोकण पॅकेजमधून मेरिटाईम बोर्डाला तलावातील गाळ काढण्यासाठी तरतूद केली गेली आहे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये छोटी छोटी अनेक तळी आहेत. त्यातील गाळ उपसण्याची आवश्यकता आहे. गाळ उपसताना अनेक तांत्रिक अडचणी येतात. धामापूर येथील शिवकालीन तलावातील गाळ काढण्याची नितांत गरज आहे. हा गाळ काढण्याचा निर्णय घेतल्यानंतर तो गाळ नेऊन प्रत्येक शेतामध्ये टाकणार कोण? त्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम जाहीर करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 46, पृष्ठ क्रमांक 38 द्वारे राज्यातील विविध ठिकाणच्या दंगलग्रस्त भागातील झळ पोहोचलेल्यांना मदत देण्यासाठी तरतूद केली आहे. अमरावती शहर, सोलापूर शहर, लातूर शहर येथील दंगलग्रस्तांचे प्रथम सर्व्हेक्षण अद्याप पूर्ण झालेले नाही. ते सर्व्हेक्षण योग्यरित्या पूर्ण करावे आणि तरतुदीमध्ये आणखी 10 लाखाची वाढ करावी असे सूचित करतो.

(नंतर श्री.खर्चे...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .......

महोदय, महसूल विभाग, बाब क्र. 47, पान क्र. 38-कोकणातील टंचाईग्रस्तांना पिण्याच्या पाण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून 40 कोटीचा निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. या निमित्ताने मी सभागृहाला निदर्शनास आणून देणार आहे की, कोकणातील विशेषकरुन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील खेड्यांमध्ये होणाऱ्या अनियमित पावसामुळे पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागते. गेली दोन तीन वर्षे सतत होणाऱ्या अवेळी पावसामुळे पाणी साठविण्यासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी ठराविक कार्यक्रम आखण्याची गरज आहे, याबाबत शासनाने विचार करावा.

यानंतर त्याच विभागाच्या बाब क्र.48, पान क्र. 39 वर बोलत असताना चक्रीवादळ आणि अवकाळी पावसामुळे जे नुकसान झालेले आहे त्यासाठी साधारणपणे 2.46 कोटी रुपयाची तरतूद केली असून ही तरतूद करीत असताना माझी अशी मागणी आहे की ही रक्कम कमी जरी असली तरी त्यासाठी मार्गदर्शक तत्वे ठरवावी लागतील आणि त्यांचा आधार घेऊन शेतीसाठी पीक विमा उतरवावा लागेल. कारण अवेळी पाऊस किंवा थंडीमुळे आंब्याचा मोहोर गळतो म्हणून यासाठी विशेष कार्यक्रम किंवा आराखडा तयार करणे गरजेचे आहे.

यानंतर बाब क्र. 57 पान क्र. 47, कृषी व पशुसंवर्धन विभागाच्या मागणीच्या अनुषंगाने प्रामुख्याने अनुसूचित जातीच्या कुटुंबांना विशेष घटक योजनेच्या माध्यमातून अर्थसहाय्य करण्यासाठी ही तरतूद शासनाने केली आहे. परंतु कुटुंबातील व्यक्तिमध्ये दिवसेदिवस वाढच होत आहे. त्याचप्रमाणे नवीन विहिरींचा विशेष कार्यक्रम घ्यावा लागेल तसेच या अनुषंगाने जी तरतूद केली आहे त्यात आणखी 50 टक्के वाढ करावी अशी मी सूचना करतो.

यानंतर बाब क्र. 60, पान क्र 48 या पुरवणी मागणीच्या अनुषंगाने शासनाला राज्यातील कृषी महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांच्या फीमध्ये वाढ करावयाची आहे. शासनाने 8.58 कोटीची मागणी या निमित्ताने केली आहे पण राज्याची कृषी उत्पादनक्षमता वाढविण्याचे शिक्षण घेणाऱ्या शासकीय कोट्यातून प्रवेश घेतलेल्या आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी सध्या जी तरतूद केली आहे ती कमी आहे. त्यात 10 कोटीपर्यंत वाढ करावी, अशी माझी या पुरवणी मागणीच्या अनुषंगाने विनंती आहे.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ...

सभापती महोदय, बाब क्र 62, पान क्र. 49-मत्स्यव्यवसाय व पशुसंवर्धन विभागाच्या पुरवणी मागणीवर मी बोलणार आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या मच्छिमारांना अर्थसहाय्य करण्यासाठी ही पुरवणी मागणी आलेली आहे. त्यात मच्छिमारांची मासे पकडण्याची जाळी, बोटी, जहाज इ. च्या नुकसानीमध्ये विक्रमी वाढ झालेली आहे. दारिद्र्यरेषेखालच्या कुटुंबांमध्ये जी वाढ केली आहे त्या अनुषंगाने शासनाने विचार करावा.

महोदय, बाब क्र. 65, पान क्र 58 - राज्यात पोषण आहार कार्यक्रमाअंतर्गत मध्यान्ह भोजन योजना सुरु केली असून त्यासाठी या पुरवणी मागणीच्या निमित्ताने तरतूद करण्यात आली आहे. राज्यात पोषण आहार बनविण्याचे कंत्राट बचत गटांना दिले जाते परंतु त्यांना मंजूर करण्यात आलेले दर अतिशय कमी असल्याने निकृष्ट दर्जाचे अन्न पुरविले जाते हे निदर्शनास आले आहे. असे प्रकार उघडकीस आल्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने ते अत्यंत घातक आहे म्हणून या निधीमध्ये आणखी 35 ते 50 टक्क्यांनी वाढ करावी अशीही माझी सूचना आहे.

सभापती महोदय, बाब क्र. 119, पान क्र. 125-जलसंपदा विभागाच्या संदर्भात माझी अशी सूचना आहे की, लहान पाटबंधारे प्रकल्पांना धरण व दुरुस्तीच्या कामासाठी अतिरिक्त निधीची तरतूद यामध्ये केली आहे. ही तरतूद साधारणपणे 26 लाख एवढी आहे. सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून माननीय मंत्री महोदय श्री. नारायणराव राणे यांच्या नेतृत्वातून जाहीर झालेला आहे. त्यातील धामापूर म्हणून जे गाव आहे तेथील तलावाच्या संदर्भात या विभागाने एक आराखडा तयार केला असून त्याचे एस्टीमेंट झाले असून टेंडर द्यावयाचे आहे. त्यासाठी अंदाजपत्रकात काही प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ...

सभापती महोदय, हा तलाव शिवकालीन असून हा तलाव 500 वर्षापूर्वी बांधण्यात आलेला आहे.या शिवकालीन तलावाच्या पाटाच्या संदर्भातील उल्लेख 7/12 मध्ये दिसून येतो. त्यामुळे या तलावाचा आणि तलावाच्या पाटाचा जिर्णोध्दार होण्याची आवश्यकता आहे. या शिवकालीन तलावाच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे या तलावाच्या दुरुस्तीसाठी शासनाने ठोस असा निधी देण्याची आवश्यकता आहे. हा जुना तलाव असल्याने शासनाने अधिकाधिक या तलावासाठी 50 लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मागणी करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महसूल खात्याच्या बाब क्रमांक 44, पृष्ठ क्रमांक 37 वर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे. या बाबीमध्ये मुंबई येथे झालेल्या रेल्वे बॉम्बस्फोटातील बाधित व्यक्तींना वित्तीय सहाय्य देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मुंबईतील रेल्वे मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटाच्या संदर्भात मानव अधिकार आयोगाने यासंदर्भात आदेश दिलेले असतांना सुध्दा शासनाने अजूनपर्यंत श्री. आल्वीन डिकोना यांना 3.5 लक्ष रुपये, श्री. अंकुश थापा यांना 7 लक्ष रुपये आणि परेश अमलाणी यांना किती रक्कम द्यावयाची याबद्दल माझ्याकडे माहिती नाही परंतु या सर्वांचा हॉस्पिटलचा खर्च शासनाने अद्यापही दिलेला नाही. त्यामुळे या लोकांना आपण जर निधी उपलब्ध करुन दिला तर आपण ज्या काही घोषणा करतो त्या पूर्ण करतो असे जनतेला नक्की वाटेल.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 64 च्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. एसएससी बोर्ड, आयसीएसई आणि सीबीएसईचा घोळ डिसेंबर मध्ये ख-या अर्थाने मिटवला पाहिजे. नाही तर आपल्याकडे जो अतिरिक्त भार आहे तो मार्च महिन्यात कोणाकडे तरी जाईल आणि नवीन आलेला मंत्री अजून काही तरी नवीन भानगडी करेल, पुन्हा हे प्रकरण कोर्टात जाईल, ऑनलाईन-ऑफलाईन भानगडी पुन्हा सुरु होतील. त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांनी सर्व संबंधितांना बोलावून जानेवारी 2010 सुरु होण्याच्या आत यासंबंधी धोरणात्मक भूमिका स्पष्ट करावी अशी सामान्य जनतेची आणि पालकांची अपेक्षा आहे. त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी आज काही सांगितले तर बरे होईल.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. अरविंद सावंत )**

सभापती महोदय, दुष्काळामध्ये परीक्षा शुल्कात शासन सवलत देत असते त्यामुळे यावेळी आलेल्या अवकाळी पावसामुळे तसेच फयानच्या वादळात सुध्दा परीक्षा शुल्कात सवलत द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, नगरविकास खात्याच्या संदर्भात बोलतांना मुंबईतील पवई येथील नो डेव्हलपमेंट झोन मधील जमीन पवई-सीटीएस नंबर 23, व्हीलेज पवई ही नो डेव्हलपमेंटची जमीन आहे. या ठिकाणी 33(10) च्या डीसीआर रुल प्रमाणे प्रोजेक्ट अफेक्टेड पर्सन्ससाठी टीडीआर 3.11 खाली मिळतो तो यामध्ये देण्याचा प्रयत्न झाला आहे. युएलसी रद्द करण्याच्या नावाखाली

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

अनेकांच्या जमिनी आपण ताब्यात घेतल्या आणि अनेकांच्या जमिनी सोडल्या सुध्दा आहेत. मुंबईतील पीएपी साठी अतिरिक्त जमीन युएलसीच्या नावाखाली भरपूर आहे. असे असतांना सुध्दा पवई येथील नो डेव्हलपमेंट झोनचा जो डोंगराळ एरिया आहे, जी पर्यावरणाच्या दृष्टीने चांगली जमीन आहे ती आपण रेसिडेन्शियलसाठी दिलेली आहे. ही जमीन देतांना 3.11 चा नियम असा आहे की, त्या जमिनीवर आपण जेवढा पीएपी बांधला तर तेवढाच टीडीआर मिळतो. परंतु या ठिकाणी अगोदर टीडीआर मिळाला व त्यानंतर निम्मे निम्मे विभागण्यात आले. निम्म्यावरच तुम्ही प्रोजेक्ट अफेक्टेड बांधा आणि निम्म्यावर सेल कंपोनन्ट बांधा. मी मागच्या वेळेस बोललो होतो की, या शासनाचे "जय हो" चे नारे चालले आहे. त्याठिकाणी एक शहा नावाची व्यक्ती होती त्यानंतर पाटील नावाची व्यक्ती आली व ते या प्रोजेक्टमध्ये आल्यानंतर त्यांची पार्टनरशिप झाली.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ ST/ SBT/ KGS/ ST/ प्रथम श्री.जुन्नरे 16.30

श्री.विनोद तावडे .....

जवळ जवळ 1400 कोटी रुपयांचा हा प्रकल्प होणे आवश्यक नाही,बाकीच्या ठिकाणीसुध्दा जमिनी आहेत. माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे या प्रकल्पाचा फाईल क्रमांक टीबीपी/4308/396/प्रकरण 47/08/युडी 11 असा असून ही फाईल श्री करीर साहेबांच्या टेबलवर सही करुन पडलेली आहे. 1400 कोटी रुपयांच्या संदर्भात मी अतिशय स्पेसिफिक उदाहरण दिलेले असून स्पेसिफिक उत्तराची मला अपेक्षा आहे. मी या ठिकाणी आवर्जून उल्लेख केला आहे. या प्रकल्पामध्ये कोणी तरी श्री. पाटील आले होते त्यानंतर कोणी तरी श्री. जयंत शहा आले होते. त्यानंतर यामध्ये काही तरी घडले आहे. मुंबईमध्ये नो डेव्हलमेन्ट झोनमध्ये काही करावयाचे नसतांना ही डेव्हलपमेन्ट का होत आहे ? या बाबतीत श्री. विलासराव देशमुख यांनी एक मार्ग करुन दिला होता. नो डेव्हलपमेन्ट म्हणजे नेव्हर डेव्हलपमेन्ट नाही.वगैरे वगैरे अनेक गोष्टी त्यामध्ये आहेत. यामध्ये काही तरी करण्यात येईल अशी माझी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, यानंतर मला जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 126 संबंधी बोलावयाचे आहे. महाराष्ट्र शासनाच्या मंत्रीमंडळाचा असा निर्णय झाला होता की,25 कोटी रुपयांच्या वरचे कोणतेही प्रकल्प आले तरी ते इनफ्रास्ट्रक्चर सब कमिटीकडे गेले पाहिजेत. आणि त्या समितीने मान्यता दिली पाहिजे.सार्वजनिक बांधकाम आणि उद्योग विभागाचे प्रकल्प त्या कमिटीकडे जातात परंतु पाटबंधारे विभागातील गेल्या पाच वर्षातील एकही 25 कोटी रुपयाच्या वरचा प्रकल्प इनफ्रास्ट्रक्चर सब कमिटीने सॅक्शन केलेला नाही. आता ही दादागिरी कोण चालवत होते , दादागिरी कोण चालवून घेत होते,हे कोण करीत होते या विषयाची स्पष्टता होणे आवश्यक आहे. पाटबंधारे विभागातील 25 कोटी रुपयांच्या वरील प्रकल्पाच्या संदर्भातील पत्र क्रमांक वगैरेसंबंधीचा उल्लेख करावयाचे असेल तर त्यात आणखी वेळ जाईल. परंतु सन्माननीय मंत्री महोदय श्री नारायण राणे यांनी सांगितले की, स्पेसिफिक उदाहरण द्यावे म्हणून मी त्याही बाबतीत स्पेसिफिक उदाहरण देतो. शासनाचे पत्र क्रमांक खाक्षेस/2004/106/ रस्ते असे आहे. हे पत्र जर सन्माननीय मंत्र्यांना हवे असेल तर ते मी देऊ शकतो. सभापती महोदय, पाटबंधारे खात्याला इनफ्रास्ट्रक्चर सब कमिटीकडे जाण्याची गरज नाही अशी काही खास सुविधा दिली होती काय? कोटयावधी रुपयांचे प्रकल्प पूर्ण झाले होते त्यात लक्ष्मीदर्शन झाले होते याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी आणि इतरही सान्माननीय सदस्यांनी उल्लेख केला असल्यामुळे त्याच्या खोलात मी जात नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे .....

सभापती महोदय, यानंतर विधि व न्याय विभागाच्या बाब क्रमांक 135 संबंधी मला बोलावयाचे आहे ठाणे जिल्हयात उत्तन येथे न्यायिक अकादमी घाईमध्ये उभारण्यात आली होती माननीय राष्ट्रपतींनी त्याचे उद्घाटन केले होते त्यानंतर एक वर्षभर ही अकादमी सुरुच झाली नाही.त्या ठिकाणच्या बांधकामाच्या काही भानगडी आहेत त्यासबंधी चौकशी केली जाईल असे सांगण्यात आले होते परंतु त्याचे पुढे काय झाले यासबंधीची काही माहिती नाही.तेव्हा त्यासंबंधी देखील खुलासा करावा अशी मी विनती करतो.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागातील बाब क्रमांक 170 संबंधी मला बोलावयाचे आहे. दलित वस्तीसंबंधी ही पूरक मागणी करण्यात आली होती. एका अर्थसंकल्पाच्या वेळी मी माननीय श्री. आर. आर. पाटील आणि श्री छगन भुजबळ यांचे स्टेटमेन्ट ऐकले होते आमचा अर्थसंकल्प सामाजिक न्यायाला गती देणारा आहे असे त्यांनी सांगितले होते त्यावेळी त्यांनी अशी घोषणा केली होती की, दलित समाजातील व्यक्तींना ग्रामीण क्षेत्र, नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रामध्ये घरे बांधण्यासाठी त्यांचा पाच टक्के हिस्सा असेल आणि शासनाचा 95 टक्के हिस्सा असेल त्यानुसार यासाठी लागणारे पैसे देण्यात आले होते 2008-2009 साली 292 आणि 2009-2010 साली 634 कोटी रुपये अशा प्रकारे 997 कोटी रुपये देण्यात आले होते सामाजिक न्याय विभागाचे मंत्री कोण आहेत हे मला आता माहीत नाही परंतु 997 कोटी रुपये मंजूर होऊन त्या खात्याकडे पडलेले आहेत परंतु सामान्य माणसाला घर देण्याची व्यवस्था यातून झालेली नाही .सभापती महोदय, यानंतर सामाजिक न्याय विभागातील दुसरा एक मुद्दा मला मांडावयाचा आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकराच्या चरित्र साधनाच्या प्रकाशनासबंधीचा मुद्दा मी गेल्या वेळी मांडला होता . पाच वर्षापासून हे काम बंद पडले असून यासबंधी नेमण्यात आलेल्या समित्यांच्या बैठकासुध्दा होत नाहीत. खंड प्रकाशनासाठी नागपूर येथे एक कार्यालय सुरु करण्यात आले होते. बाबासाहेबांच्या सर्व साहित्यांचे प्रकाशन करण्यात यावे अशा प्रकारच्या घोषणा करण्यात आल्या होत्या. माननीय श्री.आर. आर. पाटील आणि माननीय श्री. अजित पवार यांचे प्रत्येक भाषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,शाहू, फुले यांच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होत नाही परंतु पाच वर्षा पासून साहित्य खंडासंबंधी नेमण्यात आलेल्या कमिटीची बैठक होत नाही तेथे कोणतेही काम होत नाही. याकामासाठी पैसे दिलेले आहेत ...

नंतर श्री. सुंबरे

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

आणि तरीही यामध्ये पूर्ण दुर्लक्ष झालेले आहे हा एक माझा मुद्दा आहे. त्यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागासंबंधीचा एक मुद्दा मला येथे मांडावयाचा आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाची बाब क्रमांक 213, पृष्ठ क्र.197 यावर मी बोलू इच्छितो. हे जे रेट कॉंट्रॅक्टचे प्रकरण आहे त्यासंबंधी मला माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधावयाचे आहे. माननीय मंत्री नवीन आहेत पण त्यांना या 'रेट कॉंट्रॅक्ट'संबंधी जास्त माहिती नसेल, पण हळूहळू त्यांना कळेलच. सभापती महोदय, डीएमइ मधील रेट कॉंट्रॅक्ट कमी आहे पंरतु कोल्हापूरचे जिल्हा रूग्णालय आहे त्याचे रेट कॉंट्रॅक्ट अधिक पैशाचे आहे. त्यामुळे गेल्या पाच वर्षामध्ये कोल्हापूरच्या रेट कॉंट्रॅक्टच्या आधारे सातत्याने मोठ्या प्रमाणात खरेदी झालेली आहे. महाराष्ट्र शासनाचे रेट कॉंट्रॅक्टचे दर कमी आहेत व कोल्हापूरचे रेट कॉंट्रॅक्टचे दर जास्त आहेत. त्यामुळे 80 टक्के खरेदी ही कोल्हापूरच्या रेट कॉंट्रॅक्टच्या आधारे खरेदी झाली आहे. ...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मला या ठिकाणी दोन मिनिटांमध्ये एक निवेदन करावयाचे आहे. राम प्रधान समितीच्या अहवालासंबंधात हे निवेदन मी करणार आहे. तरी आपण मला त्यासाठी वेळ द्यावा, परवानगी द्यावी.

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना मी विनंती करतो की, मंत्री महोदयांना दोन मिनिटांचे निवेदन करून परत खालच्या सदनामध्ये जावयाचे आहे. तरी आपण थोडा वेळ खाली बसल्यास, मंत्री महोदय निवेदन करू शकतील. त्यानंतर आपण पुन्हा आपले भाषण पुढे सुरू करावे. ... मंत्री महोदयांना निवेदन करण्यास मी परवानगी देत आहे.

..... 3एन 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राम प्रधान समितीचा अहवाल सभागृहास सादर करण्यासंबंधात गृहमंत्र्यांचे निवेदन**

श्री. आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये राम प्रधान समितीचा अहवाल शासनाने सभागृहाच्या पटलावर सादर करावा अशी मागणी होती. या संदर्भात माननीय सभापती, विधान परिषद आणि माननीय अध्यक्ष, विधानसभा यांच्या बरोबरच दोन्ही सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेते तसेच पक्षीय गट नेते तसेच माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांच्या सह एक बैठक घेण्यात आली आणि त्यामध्ये हा अहवाल सभागृहामध्ये सादर करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली आहे. तेथे झालेल्या चर्चेप्रमाणे सोमवारी हा अहवाल पटलावर ठेवण्यात येईल आणि त्या अहवालावरील चर्चा दोन्ही सभागृहातील विरोधी पक्षनेते तसेच पक्षांचे गटनेते आणि 15 जणांची एक संयुक्त समितीपुढे सविस्तरपणे करण्यात यावी असे ठरले आहे. त्या बैठकीत ठरल्याप्रमाणे राम प्रधान समितीचा अहवाल सोमवारी सभागृहाला सादर करण्यात येईल.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सन 2009-10 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

(चर्चा पुढे सुरू...)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी पुरवणी मागण्यांवरील आपले भाषण पुढे सुरू करावे. मात्र मी त्यांना विनंती करतो की, त्यांना दिलेला वेळ संपलेला आहे, त्यांना 15 मिनिटांचा वेळ दिला होता.तरी आता त्यांनी थोडक्यात आपले मुद्दे मांडून भाषण संपवावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्यांवर मला माझे काही मुद्दे येथे मांडावयाचे आहेत. वस्तुतः मी माझे भाषण करतान अत्यंत कमी शब्दात आणि नेमके मुद्दे मांडले आहेत. दुसरे असे की, सार्वजनिक आरोग्य विभागात 40 कोटीचा भ्रष्टाचार झालेला आहे, तो बाहेर काढण्यासाठी आपण मला 2-4 मिनिटे जास्त दिल्यास बरे होईल. येथे सत्तारूढ पक्षाचे सदस्यच जास्त बोलतात पण त्याबद्दल काही सांगितले जात नाही. असो. वाटल्यास मी या भ्रष्टाचारासंबंधातील डिटेल्स मंत्री महोदयांकडे देतो जेणे करून त्यांना त्याबाबत येथे उत्तर देणे सोयीचे होईल.

सभापती महोदय, त्यानंतर पर्यावरणाशी संबंधित एक मुद्दा मला येथे उपस्थित करावयाचा आहे. मोबाईल्स आणि एमएमचे टॉवर्स आपल्याकडे सर्रास उभे केले जात आहेत पण त्याचे रेडिएशन होते आणि ते आरोग्याला धोकादायी आहे, डब्ल्यूएचओ कडून देखील याबाबत सांगितले गेले आहे. या संदर्भात महापालिकेचे नियम आहेत की 127 फूटाच्या वर हे टॉवर असले पाहिजे. परंतु आरोग्य खात्याचे मात्र याबाबत काहीही नियम वा निकष नाहीत. त्यामुळे हे टॉवर असणे मानवी जीवनाला, आरोग्याला धोकादायक आहे किंवा काय, त्याचा आरोग्यावर काय परिणाम होतो, होत असल्यास त्याची तपासणी कोण करणार ? याबद्दल काहीच आरोग्य खाते विचार करीत नाही. कालच या संदर्भात मुंबईतील शिवाजी पार्कवर एक बैठक झाली. त्यात मला यामुळे कॅन्सर झाला, मला अमुक रोग झाला वगैरे त्याच्या पुष्ट्यर्थ मेडिकल अहवाल घेऊन लोक आले होते. तेव्हा या विषयी शासनाने आपले स्वतःचे असे काही धोरण निश्चित केले पाहिजे. तसे शासनाने करावे अशी अपेक्षा मी करतो आणि माझे भाषण आटोपते घेतो.

*** (यानंतर श्री.सरफरे ...3ओ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्याकरिता याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 8 वरील बाब क्रमांक 10 मध्ये महाराष्ट्र-कर्नाटक सीमावादाच्या आंदोलनातील हुतात्म्यांच्या कुटुंबियांना निवृत्ती वेतन देण्याची योजना शासनाने जाहीर केली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु दुर्दैवाने असेही म्हणावेसे वाटते की, गेल्या 50 वर्षाच्या काळात हा सीमा भाग अजूनपर्यंत महाराष्ट्रामध्ये समाविष्ट झाला नाही. सन्माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीमध्ये होत असते. दरवर्षी भाषणाच्या शेवटी सीमा प्रश्नाचा उल्लेख होऊन ते भाषण संपते. या अभिभाषणामध्ये उल्लेख करणे एवढयापुरती या सीमा प्रश्नाची दखल घेतली जाते असे मला वाटते. याठिकाणी हुतात्म्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देत असतांना बेळगाव, कारवार, निपाणी हा भाग महाराष्ट्रामध्ये आला पाहिजे. यासाठी शासनाने कोणत्याही परिस्थितीत ठोस अशाप्रकारचे धोरण जाहीर केले पाहिजे असे मला सुचवावेसे वाटते.

सभापती महोदय, महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 30 वरील बाब क्र. 37 मध्ये निकामी झालेल्या जुन्या वाहनांच्या ऐवजी 40 नवीन वाहने खरेदी करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. माझ्या रायगड जिल्हयातील आठ तहसीलदारांना वाहन नाही. माननीय श्री. अजितदादा पवार साहेबांच्या कृपेने अर्थ खाते माझ्या जिल्हयामध्ये आले आहे. त्यामुळे रायगड जिल्हयासाठी खजिना कमी पडणार नाही, वाहने खरेदी करण्यासाठी भरपूर आर्थिक तरतूद होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 36 व बाब क्रमांक 41 मध्ये नवी मुंबईतील प्रशासकीय इमारत, कोकण भवन या इमारतीच्या थकीत वीज देयकांच्या व इतर देयकांच्या प्रदानासाठी तरतूद करण्यात आली आहे. यानिमित्ताने मला सूचना करावीशी वाटते की, कोकण भवनच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी विशेष तरतूद केली पाहिजे. गेल्या 30 वर्षापूर्वी बांधलेल्या इमारतीच्या खिडक्या, दरवाजे तुटले आहेत, इमारतीला रंग लावलेला नाही. याकरिता इमारतीची तातडीने दुरुस्ती करण्याची गरज आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/ SBT/

श्री. जयंत प्र. पाटील...

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या पान क्रमांक 59,बाब क्रमांक 66 मध्ये उच्च माध्यमिक शिक्षकांच्या नव्याने निर्माण केलेल्या पदांच्या वेतनाचा खर्च भागविण्याकरिता तरतूद केली आहे. आपल्या शासनाकडे कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्यासाठी पैसे नाहीत. रायगड जिल्हयात सुधाकर एज्युकेशन सोसायटीच्या 14 शाळांमध्ये 150 बोगस शिक्षक भरले आहेत. त्याकरिता शासनाच्या अनुदानापोटी 16 कोटींचा निधी या संस्थेने हडप केला आहे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संघटनेकडून प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन त्याकरिता तपासणी पथक नियुक्त करण्यात आले. त्या पथकाने चौकशी करुन हा भ्रष्टाचार बाहेर काढला. एकीकडे आदिवासी विभागातील शाळांचे अनुदान देण्यासाठी आपल्याजवळ पैसे नाहीत. असे असतांना याठिकाणी बोगस शिक्षक भरुन शासनाचे 16 कोटी रुपये हडप केले जातात. त्याबाबत या सभागृहामध्ये वारंवार चर्चा केली जाते, परंतु त्याची दखल घेतली जात नाही. तेव्हा या संस्थेकडून आपण ताबडतोब 16 कोटी रुपये वसूल केले पाहिजे. तसेच, बोगस शिक्षक भरणाऱ्या या संस्थेवर ताबडतोब कारवाई केली पाहिजेत आणि आदिवासी भागातील शाळांकडे ते वर्ग केले पाहिजेत.

सभापती महोदय, मागील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी शासनाने कायम विनाअनुदानित तत्वावरील शाळांना अनुदान देण्याच्या बाबतीत धोरण जाहीर केले होते. आता माननीय प्रा. फौजिया खान, यांच्या रुपाने शालेय शिक्षण खात्याला नवचैतन्य लाभले आहे. त्यामुळे या खात्याला एक नवीन प्रेरणा मिळेल अशी मी आशा व्यक्त करतो. आणि कायम विना अनुदानित तत्वावरील शाळा अनुदान तत्वावर आणण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी करतो. आज मी 40 शाळा कायम विना अनुदानित तत्वावर चालवितो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

आणि त्यांना दर महिन्याला पगार देतो. मी ही बाब अनेक वेळा सदनामध्ये मांडलेली आहे. या सर्व शाळा आदिवासी, डोंगरी भागामध्ये असून त्या दलित वस्तीमध्ये चालवित आहे आणि त्या चालवित असताना मी गरीब माणसांना वर आणण्याचे काम मी करीत आहे म्हणून वेगळा अनुभव उपभोगतो. आता आपण या शासनामध्ये गेल्यामुळे याची तातडीने दखल घ्यावी आणि ही बाब मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मांडून या शाळांना ताबडतोब अनुदान सुरु करावे अशी अपेक्षा मी व्यक्त करतो.

सभापती महोदय, बाब क्र.73, बाब क्र.61 ही शालेय आणि क्रिडा विभागाच्या संबंधात आहे. कबड्डी या खेळाला जागतिक दर्जा प्राप्त होण्याच्या दृष्टीने शासनाने खास तरतूद करावयास पाहिजे. माननीय मंत्री महोदय श्री.अजितदादा पवार हे राज्य कबड्डी असोसिएशनचे अध्यक्ष आहेत. खरे म्हणजे कबड्डी हा खेळ गरीबांचा आणि कष्टकऱ्यांचा आहे. आमच्या कोकणातील शेतकरी व गरीब लोक हा खेळ खेळतात आणि रायगड जिल्ह्यातून आमचे खेळाडू हे जागतिक पातळीवर देखील पोहोचलेले आहेत. मी माझ्या आमदार फंडातून आमच्या भागामध्ये जे क्रिडांगण आहे, तेथे लोकांना रात्री देखील खेळता यावे म्हणून तीन-चार ठिकाणी दिव्यांची सोय केलेली आहे आणि पुढील तीन वर्षाच्या कारकिर्दीमध्ये आणखी देखील सोय करण्याचे मी जाहीर केलेले आहे. म्हणून कबड्डी या खेळाला जागतिक दर्जा आणि दर्जेदार खेळ बनविण्याच्या दृष्टीकोनातून बजेटमध्ये याकरिता खास तरतूद केली पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, पान क्र.65, बाब क्र.75 ही नगरविकास विभागाच्या संदर्भातील आहे. या शासनाने कोकणातील जिल्ह्याच्या ठिकाणी ज्या नगरपालिका आहेत, त्यांना खास अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. अलिबाग नगरपालिकेचे 1 कोटी 75 लाख रुपयांचे अनुदान केवळ ती विरोधी पक्षाची नगरपालिका आहे म्हणून मिळालेले नाही हे मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

श्री.अजित पवार (खाली बसून) : कशावरुन ?

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 2004 मध्ये कोकणामध्ये मंत्रिमंडळाची बैठक झाली होती. कोकणातील जिल्हा मुख्यालयाच्या ज्या नगरपालिका आहेत, त्यांना खास अनुदान देण्याच्या बाबतीत निर्णय घेण्यात आला होता. फक्त अलिबाग नगरपालिकेला 50 लाख रुपये देण्याचे ठरले होते.रत्नागिरीसाठी सर्व निधी मिळाला. पण पाच वर्षे झाली तरी अजूनपर्यंत अलिबाग नगरपालिकेल

. . . .3 पी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

काहीही निधी मिळालेला नाही. माननीय मंत्री महोदय हे कोकण विभागातील असून ते नगरविकास मंत्री आहेत, त्यामुळे सदरहू निधी मिळावा अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि नगरपालिकांची निवडणूक झाल्यानंतर को-ऑप्शनच्या जागा भरण्याचा निर्णय घेण्यात आला. याबाबतीत शासनाने वेगवेगळे असे दोन निर्णय घेतले. मग आम्ही हाय कोर्टामध्ये गेलो. हाय कोर्टाने या जागा तातडीने भरण्याच्या बाबतीत निर्णय दिला. परंतु अजूनपर्यंत या जागा भरल्या जात नाहीत. आता केवळ दीड वर्षाची मुदत राहिलेली आहे. त्यामुळे या को-ऑप्शनच्या जागा सुध्दा लवकरात लवकर भरण्याच्या बाबतीत परवानगी शासनाने द्यावी.

सभापती महोदय, बाब क्र.119,पान क्र.121 ही जलसंपदाच्या संबंधातील आहे.रायगड जिल्ह्यातील लघुसिंचन पाटबंधाऱ्याच्या तलावाबाबत आहे. कोकण पॅकेजबाबत सांगावयाचे तर निवडणुकीपूर्वी गेल्या आघाडी शासनाने वेगवेगळया ठिकाणी कॅबिनेट बैठका घेतल्या आणि पॅकेज जाहीर केली. पाच हजार कोटीचे, सात हजार कोटी रुपयांचे पॅकेज वगैरे. कोकणातील पाटबंधाऱ्यासाठी पाच हजार कोटीचे पॅकेज जाहीर केले. दरवर्षी 700 कोटी रुपये दिले जातील असे सांगितले. पण त्याबाबतीत पुरवणी मागण्यांमध्ये कुठेही उल्लेख करण्यात आल्याचे दिसत नाही. मी ही बाब दोन-तीन वेळा वाचण्याचा प्रयत्न केला. तसेच मी माझ्या सहकाऱ्यांना देखील विचारले की, तुम्हाला यामध्ये मागणी केल्याचे दिसत आहे काय ते पहावे. पण त्यांना देखील तसे काही दिसून आले नाही. निवडणुकीपूर्वी कोकणवासियांना जे आश्वासन दिले होते, ते पूर्ण करण्यात यावी अशी मी या चर्चेच्या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय,पान क्र.131, बाब क्र.129 ही विधी व न्याय विभागाशी संबंधित असून याबाबत सांगावयाचे तर रायगड जिल्ह्यातील जिल्हा शस्त्र न्यायालय हे अलिबागला आहे. पण कामगार न्यायालय महाड येथे आणि बाल सुधार न्यायालय कर्जत मध्ये आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

या दोन्ही बाबी एकत्र अलिबागला आणाव्यात जेणेकरुन वकीलवर्ग जिल्हयाच्या मुख्य ठिकाणी असेल व येणारी जिल्हयातील सर्व जनता किंवा नागरिक यांना सर्व कार्यालयांना एकत्रित वेळ देता येईल या दृष्टिकोनातून ही दोन्ही न्यायालये अलिबाग या जिल्हयाच्या ठिकाणी करण्यात यावीत अशी मागणी करतो. अलिबागच्या न्यायालयातील वकिलांची बार रुम व्यवस्थित वातानुकुलीत आणि सुसज्ज अशी करावी अशी मी याठिकाणी मागणी करतो. सभापती महोदय, या कामासाठी शासनाला पैसे कमी पडत असतील तर माझ्या आमदार फंडातून त्यासाठी पैसे देण्यासाठी मी तयार आहे, ही गोष्ट मी मुद्दाम या ठिकाणी नमूद करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 174 पान क्रमांक 162 सामाजिक न्याय. मागासवर्गीय उमेद्वार निवडणुकीसाठी उभे राहिल्यानंतर त्यांचे जातीचे दाखले पेंडिग ठेवले जातात. सभापती महोदय, आपण सुध्दा याठिकाणी या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. या विभागाचे मंत्री कार्यक्षम असतांना हे जाणूनबुजून केले जाते. गरिबांनी त्या ठिकाणी निवडणुका लढवावयाच्या नाहीत काय? विधानसभेची निवडणूक पार पडल्यानंतर ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या वेळी मी स्वत: कोकण भवनला गेलो होतो. तेथे एका मागासवर्गीय उमेदवाराचा दाखला घेण्यासाठी 17 हजार रुपये रोख मी भरलेले आहेत. मी त्या ठिकाणी सांगितले की, मी आमदार आहे आणि याबाबतीत मी सभागृहात बोलणार आहे. तेव्हा ते म्हणाले, सभागृहात आमचेच राज्य आहे. सभापती महोदय, आमदाराला जेथे किंमत नाही तेथे राज्य कोणाचे आहे?

**तालिकासभापती** ( श्री. अरविंद सावंत) : आपण 17 हजार रुपये लाच दिली आहे काय?

श्री. जयंत प्र. पाटील : होय, लाच दिली.

श्री. दिवाकर रावते (बसून) : लाच घेणारा आणि देणारा दोघेही दोषी आहेत. त्यासाठी शिक्षा होऊ शकते.

श्री. जयंत प्र. पाटील : मी दोषी असलो तरी निवडणुकीसाठी उमेदवार उभा करावयाचा होता. त्या दोषासाठी मला शिक्षा झाली तर ती मी स्वीकारावयाला तयार आहे. श्री. रावते साहेब, यासाठी मला शिक्षा झाली तर मी ती स्वीकारावयाला तयार आहे. सभापती महोदय, ही गोष्ट मी या सभागृहात दुसऱ्यांदा सांगत आहे. लिफ्टमनपासून सर्वांनी माझ्याकडून लाच घेतलेली आहे.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

माननीय मंत्रिमहोदया, श्रीमती वर्षा गायकवाड, मागासवर्गीय माणसाला ग्रामपंचायतीत सदस्य म्हणून निवडणुकीसाठी उभे राहण्यासाठी जातीचा दाखला द्यावा लागतो तो मिळविण्यासाठी या राज्यामध्ये 17 हजार रुपये मला द्यावे लागले आहेत.मागासवर्गीय उमेदवारांनी निवडणूक लढवू नये काय? निवडणुकीला उभे राहू नये असे या शासनाचे धोरण आहे काय? हे कळले पाहिजे. सभापती महोदय, याबाबतीत मला दु:ख होते. चिड येते. संताप येतो. मला स्वत:ला आमदार म्हणून या ठिकाणी ही गोष्ट सांगताना लाज वाटते. मग आम्ही आमचे हे दु:ख कोठे व्यक्त करायचे हा खरा प्रश्न आहे. ( तालिका सभापती वेळ संपल्याची घंटा वाजवितात) सभापती महोदय, बाबीवर बोलावयाचे नाही. बजेटवर बोलावयाचे नाही, आपण बिलावर बोलू देणार नाही मग आमदार म्हणून आम्ही कुठे बोलायचे? आमदार म्हणून आम्ही काय काम करायचे? हा खरा सवाल या निमित्ताने आहे. सभापती महोदय, याला कुठे तरी वाचा फुटली पाहिजे. मी आजच वर्तमानपत्रात यासंबंधीची बातमी वाचली आहे. सन्माननीय नामदार मोघे साहेबांनी आम्ही ऑन लाईन पध्दत सुरु करु असे म्हटले आहे. ज्या फाईल्स पेंडिग ठेवल्या आहेत, त्याची चौकशी करुन ज्या अधिकाऱ्यांनी या पेंडिग ठेवल्या आहेत त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि पुढील अधिवेशनामध्ये मंत्रिमहोदयांनी याबाबतचा खुलासा केला पाहिजे असे मला वाटते. सभापती महोदय, याबाबतीत निश्चितपणे धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये आम्ही नाही. पण या बाबीच्या माध्यमातून या महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न सोडवत असताना आम्हाला वेळ कमी पडतो. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती करतो की, किमान पुरवणीमागण्यांच्या बाबींवर बोलण्यासाठी दिवस वाढवून दिले पाहिजेत. चटावरचे श्राद्ध उरकण्यासाठी हे सभागृह नाही. त्या दृष्टिकोनातून मी नम्रपणे सांगतो की, जनतेचे प्रश्न सोडवत असताना या ठिकाणी आमच्या बोलण्यावर मर्यादा घालण्यात येत असतील तर ते कुठे तरी थांबले पाहिजे. (तालिका सभापती वेळ संपल्याची घंटा वाजवितात) सभापती महोदय, नागपूरमध्ये हे अधिवेशन सहा-सहा आठवडे चालत होते हे मी माझ्या काकांबरोबर नागपूरमध्ये आलो असताना पाहिलेले आहे. परंतु आता हे अधिवेशन सहा दिवस सुध्दा चालत नाही. आम्हाला बोलण्यासाठी वेळ मिळत नाही हे बरोबर नाही. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी थोडा जास्त वेळ दिला त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो व माझे विचार संपवितो.

----

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी एक व्यथा मांडलेली. ती मांडताना संबंधित अधिकाऱ्याचे नाव त्यांनी सांगितलेले नाही. या ठिकाणी नाव सांगण्याची आवश्यकता आहे.सभापती महोदय, फुले, आंबेडकर आणि शाहू यांना आपली मान खाली घालावी लागली असेल. ज्यांच्या नावाने राज्य चालते त्या राज्यामध्ये, याबाबतीत सरकारचा संबंध आहे, मंत्र्यांचा संबंध आहे असे मी म्हणणार नाही. एवढया खालच्या पातळीवर जर प्रशासन अशा प्रकारचे चालत असेल तर ते अत्यंत गंभीर आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी त्यांचे नाव सांगितले पाहिजे तरच माननीय मंत्र्यांना त्यासंबंधात कारवाई करतो असे म्हणता येईल.(अडथळा) मंत्रिमंडळाला कारण नसताना दोषी धरावे लागते. मंत्रिमंडळाची पकड नाही, वचक नाही असे होते म्हणून या ठिकाणी संबंधित व्यक्तीचे नाव सांगण्याची आवश्यकता आहे.

---

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहासमोर चर्चेसाठी असलेल्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रथम मी सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 6 वरील बाब क्रमांक 5 बाबत बोलू इच्छिते. यामध्ये सह्याद्री आणि नंदगिरी या राज्य अतिथीगृहाच्या नुतनीकरणासाठी 5 कोटी 90 लाख 76 हजार रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. माझी अशी मागणी आहे की, नवी मुंबईमध्ये राज्य शासनाचे बचत भवन आहे. आज आपल्याला कोकणातून किंवा पश्चिम महाराष्ट्रातून किंवा मराठवाड्यातून मुंबईमध्ये यावे लागते. मध्ये कोठेही अतिथीगृह किंवा विश्रामगृह नाही. नवीन मुंबईतील बचत भवनाची इमारत पूर्णपणे मोडकळीस आलेली आहे. ही जागा हायवेवर असल्यामुळे बेलापूर, सीबीडी येथील शासकीय बचत भवनाच्या जागी नवीन इमारत बांधावी. त्या ठिकाणी नवीन इमारत बांधण्यासाठी तरतूद केली तर बरे होईल. त्याचप्रमाणे जर शासनाला त्यासाठी तरतूद करता येणार नसेल तर शासनाने बीओटी तत्वावर जरी इमारत बांधली तरी पश्चिम महाराष्ट्रातून, कोकणातून येणाऱ्या लोकांना त्या ठिकाणी बैठका घेता येतील. त्या ठिकाणी कोकण भवन आणि इतर मोठमोठी कार्यालये आहेत. त्या ठिकाणी सिडको भवन तसेच महापालिकेचे कार्यालय आहे. सगळयांना मुंबईमध्ये बैठकीसाठी यावे लागते. कोकणातून तसेच पश्चिम महाराष्ट्रातून येणारे माननीय मंत्रिमहोदय असतील त्याची सुध्दा गैरसोय दूर होईल.

सभापती महोदय, यानंतर मला महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 39 वरील बाब क्रमांक 48 बाबत बोलावयाचे आहे. फयान वादळामध्ये अनेक लोकांचे नुकसान झालेले आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण शेतकऱ्यांना जे अनुदान किंवा मदत वगैरे देणार आहोत त्यासाठी ज्या अटी आहेत त्या शिथिल करण्यात याव्यात. 50 मि.मि.पाऊस पडला पाहिजे किंवा 65 मि.मि.पाऊस पडला पाहिजे अशा अटी घातल्या तर कोणत्याही शेतकऱ्याला फायदा होणार नाही. शेतकऱ्यांबरोबरच जे मच्छिमार बांधव असतील किंवा विटभट्टी सारखा उद्योग व्यवसाय करणारे असतील त्यांना सुध्दा जास्तीत जास्त मदत देण्यात यावी.

सभापती महोदय, यानंतर मला ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 149 वरील बाब क्रमांक 157 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये जवळपास 277 कोटी 89 लाख रुपयांची

..2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ SBT/ KTG/ SBT/

श्रीमती मंदा म्हात्रे .....

तरतूद विशेष घटक योजनेखाली इंदिरा आवास योजनेसाठी करण्यात आली आहे. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देते. परंतु मला असे वाटते की, शासनाने दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचा नव्याने सर्व्हे करावा आणि या योजनेचा लाभ खऱ्या लाभार्थ्यांना मिळेल याची दक्षता घेतली पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी बोगस रेशन कार्डचा मुद्दा मांडला. नको ते लाभार्थी लाभ घेतात. त्यामुळे मला शासनाला अशी विनंती करावयाची आहे की, पुन्हा एकदा दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचा सर्व्हे करावा.

सभापती महोदय, यानंतर मला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 161 वरील बाब क्रमांक 171 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये आश्रमशाळा चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी 19 कोटी 16 लाख 17 हजार रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. त्याबद्दल मी शासनाचे आभार मानते. परंतु परवा मला शिक्षकांचे एक शिष्टमंडळ येऊन भेटले. केंद्राकडून ज्या आश्रमशाळा चालविल्या जातात त्या आश्रमशाळांच्या संचालकांना गेली कित्येक वर्षे अजिबात अनुदान मिळालेले नाही. गेल्या दहा वर्षापासून ते कसे तरी आश्रमशाळा चालवित आहेत. त्याचप्रमाणे तेथील शिक्षकांचे गेली सात ते आठ वर्षे पगार होत नाहीत. परवा त्यांचे शिष्टमंडळ मला येऊन भेटले. ते उपोषणाला बसलेले आहेत.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KTG/ SBT/ SBT/ पूर्वी श्री.बरवड 17:00

श्रीमती मंदा म्हात्रे....

मला असे सुचवावयाचे आहे की, या आश्रमशाळेबद्दल शासनाने विचार केला तर चांगले होईल. कारण या आश्रमशाळेत अनेक विद्यार्थी शिकत आहेत. म्हणून या मागणीचा विचार होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 173, पृष्ठ क्रमांक 161 वर माझे विचार व्यक्त करते. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी व परीक्षा फी देण्यासाठी 18 कोटी 23 लाख रुपयांची मागणी करण्यात आली आहे, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देते. सभापती महोदय, रायगड जिल्हयातील खारघर येथे सत्याग्रह विद्यालयाचे बीएड कॉलेज आहे. त्या विद्यार्थ्यांना समाजकल्याण विभागाकडून फीचे पैसे न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेचा फॉर्म भरता आलेला नाही. त्या विद्यार्थ्यांनी फी भरली नाही तर त्यांना परीक्षेला बसता येणार नाही. त्यासाठी देखील शासनाने तरतूद करावी अशी विनंती करते.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 213, पृष्ठ क्रमांक 197 वर माझे विचार मांडते. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत राज्यातील स्वाईन फ्ल्यू या रोगावर नियंत्रण ठेवण्यासाठी औषधे व इतर सामग्री खरेदी करण्यासाठी 5 कोटींची तरतूद केली आहे. सभापती महोदय, मला शासनाला असे सुचवावयाचे आहे की, स्वाईन फ्ल्यू, बर्ड फ्ल्यू सारखी साथ सातत्याने येते. या साथीला आटोक्यात आणण्यासाठी आपली यंत्रणा कमी पडते. म्हणून यासाठी स्वतंत्र विभाग असणे आवश्यक आहे. सध्याच्या यंत्रणेची साथ आल्यावर धावपळ होते. पुण्यामध्ये पालक वर्ग त्रस्त झाला होता, मुलांना शाळेत पाठवावयाचे की नाही असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला होता. म्हणून या यंत्रणेसाठी भरीव तरतूद करुन कायम स्वरुपी यंत्रणा निर्माण करुन त्यासाठी मोठया प्रमाणावर निधीची तरतूद करावी अशी मी मागणी करते.

सभापती महोदय, यानंतर मी बाब क्रमांक 216, पृष्ठ क्रमांक 202 वर बोलते. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये या विभागाच्या अंतर्गत राज्यातील विविध शासकीय वैद्यक महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये रुग्णालय व्यवस्थापन व माहिती यंत्रणा प्रकल्पासाठी 12 कोटी 16 लाखांची तरतूद

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे....

केली आहे, याबद्दल मी शासनाला धन्यवाद देते. मला असे वाटते की, निम्म्यापेक्षा जास्त शासकीय रुग्णालयामध्ये यंत्रसामग्री बंद असते. मग सोनोग्राफी मशिन असेल, एक्स-रे मशिन असेल. परवा एक लक्षवेधी सभागृहात आली होती, त्याला शासनाला उत्तर दिले होते. परंतु ग्रामीण रुग्णालयातील मशिनरीची अवस्था वाईट आहे, तेथे अद्ययावत मशिनरी बसविण्याची आवश्यकता आहे, त्यासाठी ठोस तरतूद करण्यात यावी अशी मी मागणी करते आणि या मागण्यांचे समर्थन करते व आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपविते.

----

3...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/ KTG/ SBT/ SBT/

श्री.राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 3, पान क्रमांक 6, स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी ही तरतूद केलेली आहे. यानिमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, एमपीएससी व युपीएससी या परीक्षांची राज्यातील विद्यार्थ्यांना माहिती व्हावी व जास्तीत जास्त विद्यार्थी या परीक्षेला बसण्यासाठी शासनाने जास्तीत जास्त तरतूद करावी. जेणे करुन ग्रामीण भागातील विद्यार्थी या परीक्षेत पास होऊ शकतील आणि पुढे येतील.

सभापती महोदय, बाब क्र.38, पान क्र.31 अंतर्गत महसूल मंडलाच्या प्रमाणपध्दतीत बदल झाल्यामुळे नवीन 542 महसूल मंडल अधिकाऱ्यांची पदे निर्माण केलेली आहेत. यासाठी 80 लाखाची तरतूद केली आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. त्याचप्रमाणे राज्यातील कोतवालांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा देण्यासाठी देखील तरतूद करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 48, पान क्रमांक 39, चक्रीवादळ आणि अवकाळी व वादळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी 246 कोटींची तरतूद केलेली आहे. या अवकाळी व वादळी पावसामुळे शेतकऱ्यांचे व मच्छिमार बांधवांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे, त्यांना शासनाने मदत जाहीर केली आहे, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. सभापती महोदय, सध्याच्या नियमानुसार मातीच्या घराची एक भिंत पडली तर त्यासाठी 2400 रुपयांची मदत दिली जाते. पण महिना दोन महिन्याने ते घर संपूर्णपणे कोसळते. म्हणून शासनाने मातीच्या घराची एखादी भिंत पडली तरी संपूर्ण घर कोसळले आहे असे गृहित धरुन आपद्ग्रस्तांना मदत दिली पाहिजे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, गृह विभागाच्या अंतर्गत बाब क्र.33, पान क्रमांक 23 वर गाळ उपसणी करण्यासाठी यंत्राच्या खरेदीसाठी 3 वर्षाकरिता 60 कोटींची तरतूद केली आहे. माझी शासनाला विनंती आहे की, हे काम लवकरात लवकर सुरु करावे व बंदरातील, खाडयांमधील गाळ काळण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखावा. त्याचप्रमाणे विजयदुर्ग, रेड्डी या जेट्टीच्या दुरुस्तीचे काम लवकर कसे पूर्ण होईल यादृष्टीने प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे पर्यटनाचा विकास होण्यासाठी जलवाहतूक सुरु करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा.

---

यानंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजन तेली....)

सभापती महोदय, नगर विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 65 वरील बाब क्रमांक 75च्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, राज्यातील नगरपरिषदांना सहायक अनुदान देण्याच्या बाबतीत तरतूद करण्यात आलेली आहे. कोकणामध्ये कणकवली ही "क" वर्ग नगरपरिषद असून तिचे उत्पन्न केवळ 45 लाख रु. असल्यामुळे तेथे कोणतीही विकासाची कामे करता येत नाही. विकासासाठी जे भूखंड आवश्यक आहेत ते ताब्यात घेण्यासाठी विशेष बाब म्हणून नगरपरिषदेला मदत करावी अशी मी विनंती करतो.

बाब क्रमांक 106, पृ.क्र. 100. राज्यातील नवीन शासकीय तंत्रनिकेतनांच्या बांधकामांचा खर्च भागविण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, जी शासकीय तंत्रनिकेतन आणि आयटीआय आहेत त्याठिकाणी विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी शिक्षक नाही. पर्यटन विषय शिकविण्यासंबंधी शिक्षक नसल्यामुळे त्या विषयाच्या अभ्यासक्रमाला विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला नाही. तेव्हा आयटीआय आणि तंत्रनिकेतनात शिक्षकांची नेमणूक करावी.

बाब क्रमांक 123, पृ.क्र.126. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान देण्याकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. कोकणामध्ये 11मध्यम, 4 मोठे आणि 75 लघु असे एकूण 90 प्रकल्प आहेत. या प्रकल्पांची कामे गेल्या तीन वर्षापासून बंद आहेत. माझ्या माहितीप्रमाणे या वर्षी 7578 कोटी रुपयांची तरतूद बजेटमध्ये कण्यात आलेली आहे. कोकणातील हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी 3700 कोटी रुपये लागतील. जर प्रत्येक वर्षी एक हजार कोटी रुपये कोकणातील प्रकल्पासाठी उपलब्ध करुन दिले तरच ते पूर्ण होऊ शकतील.

बाब क्रमांक 157. पृ.क्र. 149. विशेष घटक योजनेखाली इंदिरा आवास योजनेकरिता तरतूद करण्यात आलेली आहे. ग्रामसेवकांच्या चुकीमुळे संपूर्ण लाभार्थींची यादी न झाल्यामुळे अनेकांना इंदिरा आवास योजनेंतर्गत घरे मिळालेली नाही. ही सर्व माणसे दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी आहेत. तेव्हा यादी पूर्ण करुन सर्व पात्र लाभार्थींना इंदिरा आवास योजनेचा लाभ द्यावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

बाब क्रमांक 114. पृ.क्र. 121. ज्याप्रमाणे विदर्भ पाणलोट विकास कार्यक्रम राबविण्यात आला आहे त्याप्रमाणे कोकण पाणलोट विकास कार्यक्रम राबवावा अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

.2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. राजन तेली....)

बाब क्रमांक 66. पृ.क्र. 59. उच्च माध्यमिक शिक्षकांची नव्याने पदे निर्माण करण्याच्या संदर्भात तरतूद केल्या बद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये गट शिक्षणाधिकारी आणि उपशिक्षणाधिका-यांची बरीचशी पदे रिक्त आहेत. ही पदे भरावीत अशी मी मागणी करीत आहे. तसेच मागील दोन अधिवेशनामध्ये कोकणासाठी एस.एस.सी.आणि एच.एस.सी. मंडळ स्थापन करण्यासंबंधी शासनाने आश्वासन दिलेले आहे. हे मंडळ केव्हा स्थापन करण्यात येणार आहे हे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले तर बरे होईल. सभापती महोदय, मला या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता ) : सभापती महोदय, सन 2009-2010च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमकांक 43, पृ.क्र.37. आत्महत्या केलेल्या वारसांना वित्तीय सहाय्य देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मी या विषयावर फार बोलणार नाही. परंतु दोन-तीन गोष्टी या निमित्ताने मला शासनाच्या नजरेस आणून द्यावयाच्या आहेत. आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या वारसांना मदत देण्यासंबंधीचे निकष बदलण्याची गरज आहे. विदर्भातील शेतक-याने आपली शेती अजूनही आपल्या मुलाच्या नावावर करुन दिलेली नाही. शेतकरी म्हातारा झाल्यानंतर कारभार मुलाच्या हातात जातो. मुलगा कारभार करीत असताना, घर चालवित असताना कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करतो. परंतु शेती त्याच्या नावावर नसल्यामुळे त्याला मदत मिळत नाही. हा निकष दुरुस्त झाला पाहिजे. दुसरा निकष असा आहे की, बँकेचे कर्ज घेतलेल्या शेतक-यालाच अनुदान दिले जाते. खाजगी सावकाराकडून कर्ज घेतलेल्या शेतक-यांने आत्महत्या केली तर त्याच्या कुटुंबाला अनुदान दिले जात नाही.

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

आणि म्हणून या दोन निकषात शासनाने बदल केला पाहिजे. निकषात आवश्यक तो बदल करुन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांचा विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 48, पृष्ठ क्रमांक 39 वर नैसर्गिक आपत्तीसाठी 246 कोटी रुपयांची मागणी सादर केली आहे. नुकतेच राज्यात फयान हे चक्रीवादळ झाले. त्या चक्रीवादळात सापडलेल्यांना व अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्यांना मदत देण्यासंबंधीची घोषण राज्य शासनाने केलेली आहे. मी माननीय मंत्रीमहोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, अवकाळी पाऊस आणि हवामानातील बदल यामुळे विदर्भातील कापूस उत्पादक आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या पिकावर लाल्या व करप्या रोगाचा प्रादुर्भाव होऊन त्यांची संपूर्ण शेती उद्ध्वस्त झाली. लाल्या आणि करप्या रोगाच्या प्रादुर्भावाने संपूर्ण कपाशीची शेती नष्ट झाली. पानगळ होऊन बोंडे गळून गेली. आता फक्त काड्या शेतामध्ये उभ्या आहेत. लाल्या रोगामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले. त्या शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करुन महाराष्ट्र शासनाने रोगराईच्या निमित्ताने नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांचे उत्पादन घटल्यामुळे त्यांना नुकसान भरपाई दिली पाहिजे.

सभापती महोदय, मागील वर्षी रेणापूर तालुक्यात लष्करी अळीचा प्रादुर्भाव होऊन संपूर्ण सोयाबीनचे पीक उद्ध्वस्त झाले होते. रेणापूर तालुक्यातील लष्करी अळीने नुकसान झालेल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना महाराष्ट्र शासनाने 15 दिवसात मदत जाहीर केली आणि 15 दिवसात मदतीचे वाटपही झाले होते. अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ या पश्चिम विदर्भातील कापूस उत्पादक जिल्हयांमध्ये लष्करी अळीचा प्रादुर्भाव होऊन सोयाबीन पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांची ज्वारी काळी पडली. ज्वारी माणसांना खाण्यालायक राहिलेली नाही. अशा सर्व शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करुन त्यांना मदतीचा हात देण्याची गरज आहे. मला आशा आहे, महसूलमंत्री श्री.राणे साहेब निश्चितपणे या बाबीचा विचार करुन शेतकऱ्यांना मदत देण्यासंबंधीचे शासनाचे धोरण आखतील.

सभापती महोदय, बाब क्रमांक 216, पृष्ठ क्रमांक 202 वर वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांसाठी आरोग्य व रुग्णालयीन व्यवस्थापन व माहिती यंत्रणा यांची अंमलबजावणी करणे या शिर्षाखाली 12.17 कोटी रुपयांची पुरवणी मागणी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

सादर केली आहे. वैद्यकीय महाविद्यालये व संलग्न रुग्णालयांमध्ये आरोग्य व रुग्णालयीन व्यवस्थापन या संदर्भात काय दुर्दशा आहे याची खोलात जाऊन पाहणी करण्याची आवश्यकता आहे. शासनाकडून रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांना निधी दिला जातो, त्या निधीचा विनियोग कशा पध्दतीने होतो हे पाहिले जात नाही. त्यामुळे त्या रुग्णालयांची अवस्था अत्यंत वाईट होते. एकेकाळी मुंबईतील जेजे रुग्णालय हे संपूर्ण देशात नावाजलेले रुग्णालय होते. देशभरातून मोठया विश्वासाने रुग्ण उपचार घेण्यासाठी या रुग्णालयात येत असतात. तज्ज्ञ डॉक्टर, आजाराचे अचूक निदान व अचूक उपचार, स्वच्छता आदीबाबत या रुग्णालयाची ख्याती होती. मागील काळात विविध प्रकारच्या रुग्णांना भेटण्याच्या माध्यमातून या रुग्णालयात जाण्याचा मला योग आला. विदर्भातील रुग्ण असल्यामुळे त्यांना भेटण्यासाठी म्हणून दर आठ दिवसांनी मला तिथे जाण्याची संधी मिळत गेली. परंतु तेथील परिस्थिती पाहिल्यानंतर गेल्या काही वर्षात हा नावलौकिक या रुग्णालयाने धुळीस मिळविला आहे असे खेदाने म्हणावे लागते.

नंतर श्री.खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ........

असे अनेक गैरव्यवहार, भ्रष्टाचार, अस्वच्छता आणि बेपर्वाई अशा अनेक प्रकारच्या व्याधींनी या रुग्णालयाचे आरोग्य साफ बिघडले आहे. या गैरव्यवहाराचे ढीगभर पुरावे माझ्याकडे आहेत पण वेळेअभावी मी ते येथे ठेवणार नाही तर माननीय मंत्री महोदयांच्या दालनात त्यांच्याशी चर्चा करुन बैठक घेऊन त्यांनाच सादर करणार आहे. या रुग्णालयामध्ये प्रशासन किंवा व्यवस्थापन अस्तित्वातच नाही असेच वाटते. जैविक, वैद्यक टाकाऊ पदार्थांची व्यवस्थित विल्हेवाट न लावल्यास सर्वांच्या आरोग्याला गंभीर धोका पोहचू शकतो हे येथील व्यवस्थापनास माहीत नसावे याचे आश्चर्य वाटते. इतके मोठे हॉस्पिटल आहे पण ज्या पध्दतीचे वातावरण हॉस्पिटलमध्ये आहे त्याकडे व्यवस्थापन लक्ष देण्यास तयार नाही. हा धोका टाळण्यासाठी केंद्राने बायो-मेडिकल वेस्ट मॅनेजमेंट अँड डिस्पोझल रुल्स सन 1998 मध्ये निर्गमित केले आहेत. राज्यातील सर्व रुग्णालयांना हे रुल्स लागू असून त्यांचे पालन केले नाही तर एचआयव्ही, एड्स तसेच एचसीव्ही सारखे गंभीर व असाध्य असे रोग होऊ शकतात. हे माहीत असताना सुध्दा याकडे रुग्णालयाच्या व्यवस्थापनाचे दुर्लक्ष झालेले आहे. सन 2006 च्या सुमारास उच्च न्यायालयात एक जनहित याचिका यासंदर्भात दाखल झाली होती. ती याचिका सुनावणीसाठी आली असता शासनाने सहा महिन्याच्या कालावधीत उपरोक्त नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, असे शपथपत्र न्यायालयात दाखल केले होते. हा सहा महिन्यांचा कालावधी 20 सप्टेबर 2007 रोजी समाप्त झाला. त्यानंतर उच्च न्यायालयाचे न्यायालय आयुक्त यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन 31 जानेवारी, 2008 रोजी या रुग्णालयांमध्ये या नियमांचे असमाधानकारक रित्या पालन होत असल्याचा अहवाल दिला. उच्च न्यायालयाच्या ही बाब निदर्शनास आल्यानंतर, शासनाने स्वत: उच्च न्यायालयात शपथपत्र सादर केल्यानंतर सुध्दा पूर्वीच्या परिस्थितीत कोणताही फरक झालेला नाही. यामध्ये जे.जे. रुग्णालयाशी संलग्नित असलेले सेंट जॉर्जेस, जी.टी आणि कामा हॉस्पिटल या रुग्णालयांमध्ये सुध्दा अस्वच्छता व गलिच्छता दिवसेदिवस वाढत चालली आहे. जे.जे आणि संलग्नित रुग्णालयांमध्ये आरोग्याच्या दृष्टीने अतिशय घातक अशा अनेक बाबी निदर्शनास येतात. त्या म्हणजे शस्त्रक्रिया विभागात एखाद्या संसर्गजन्य रुग्णावर शस्त्रक्रिया केल्यानंतर डॉक्टरांचे दूषित रक्ताने माखलेले हॅन्डग्लोव्हज धुण्यासाठी धोबी डोक्यावरुनच रुग्णालयाच्या आवारातून

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .......

घेऊन जात असतो. अशा वेळेस त्याला व त्याच्या कुटुंबियांना अशा रोगाचा संसर्ग होण्याची दाट शक्यता असते तसेच रुग्णालयाच्या आवारातून जात असताना रस्त्यात व रुग्णालयात असलेल्या लोकांना देखील त्याची लागण होऊ शकते आणि याची पर्वा मात्र रुग्णालयाच्या अधीक्षकांना अथवा कोणत्याही अधिकाऱ्यांना नाही. मी त्या रुग्णालयातील अस्वच्छतेबाबतचे काही फोटोग्राफ्स सोबत आणलेले आहेत, ते आपल्याकडे पाठवितो. त्यावरुन लक्षात येते की, वॉर्डमधील फोटोमध्ये असे दिसते रुग्णाच्या खाटेखाली मांजर व कुत्रे बसलेले असतात आणि त्याच रुममध्ये रोग्यांना झोपविले जाते. तसेच एका फोटोमध्ये कुत्र्याची जोडी एका कॉटवरच झोपलेली दिसून येईल. अशा प्रकारे जे.जे. सारख्या मोठया रुग्णालयातील स्वच्छता लक्षात येते त्याचबरोबर रक्ताने माखलेले हॅन्डग्लोव्हज, दूषित रक्त काढलेल्या बॅग्ज् कशा पध्दतीने ठेवल्या जातात त्याचेही फोटो काढलेले आहेत. अशा पध्दतीने हे रुग्णालय सुरु आहे ही गंभीर बाब आहे. वॉर्डमध्ये माणसांनाच काय पण कुत्रे आणि मांजरांना तसेच रस्त्यावर भटकणाऱ्या प्राण्यांना सुध्दा प्रवेश मिळतो आणि हे अस्वच्छ प्राणी कॉटवर झोपलेले असतात....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

मी अन्यथा वैद्यकीय विषयाच्या संदर्भात जास्त काही बोलत नाही. वैद्यकीय विषयाच्या संदर्भात डॉ. दीपक सावंत हेच नेहमी आपले विचार मांडत असतात. परंतु या ठिकाणी मी काही गोष्टी पाहिल्या आणि प्रत्यक्ष अनुभवल्या त्यामुळेच हा विषय येथे उपस्थित केलेला आहे. या ठिकाणच्या घाणेरडया प्रकारांची व्यववस्थित नोंद सहा सहयोगी प्राध्यापकांनी केली त्यासंदर्भातील निवेदने माननीय मंत्रीमहोदय, राज्यमंत्री महोदय, सचिव-वैद्यकीय शिक्षण, अधीक्षक-सेंट जॉर्जेस रुग्णालय, जे.जे.रुग्णालय यांना फेब्रुवारी, 2009 मध्ये दिली होती तसेच तक्रार केली होती. तेथील परिस्थितीची नोंद घेऊन तेथील सहा सहयोगी प्राध्यापकांनी सचिवांच्याच नव्हेतर डीनच्या लक्षात ही बाब आणून दिली, शासनाच्या निदर्शनास ही बाब आणून दिल्यामुळे या सहा सहयोगी प्राध्यापकांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली तर नाही परंतु सहा पैकी दोन डॉक्टरांना निलंबित करण्याचे आदेश काढण्यात आले. या सहा सहयोग प्राध्यापकांनी जी काही सूचना केली होती त्याकडे लक्ष न देता, त्यांनी हॉस्पिटलची तक्रार केली म्हणून सहा पैकी दोघांना त्वरित निलंबित करण्यात आले. या प्रकरणाची चौकशी केली असता मला असे समजले की, या सहा सहयोगी प्राध्यापकांनी कारभारात सुधारणा झाली नाही तर कंडीशनल राजीनामा देऊ असे लिहिले होते त्यामुळे या सहा सहयोगी प्राध्यापकांपैकी दोघांना कामावरुन काढून टाकण्यात आले. खरे म्हणजे या सहयोगी प्राध्यापकांवर अन्याय आहे त्यामुळे मी माननीय मंत्रीमहोदयांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्रीमहोदयांनी या प्रकरणाची जातीने लक्ष घालून चौकशी करावी व ज्या सहयोगी प्राध्यापकांनी कारभाराच्या संदर्भात सूचना केली म्हणून त्यांना निलंबित करण्यात आले असेल तर त्यांच्यावर जो अन्याय झालेला आहे तो अन्याय दूर केला पाहिजे. त्यावेळचे वैद्यकीय शिक्षण औषधी द्रव्य विभागाचे सचिव यांचाच हा कारभार आहे. त्यांच्या काळात प्रशासनामध्ये जो काही कारभार झालेला आहे त्याला त्यावेळचे सचीवच श्री.गगराणी हेच जबाबदार आहेत. ज्या औषधाची किंमत प्रती नगास 370 रुपये होती अशी औषधे त्यांनी 2000 रुपये किमतीला रुग्णालयांसाठी खरेदी करण्याचे आदेश श्री. गगराणी यांनी काढले होते. म्हणजे पाचपट पेक्षा महाग औषधांची त्यांनी खरेदी केलेली आहे. औषधे खरेदी करतांना त्यांनी क्वालीटी पाहिली नाही. ही बाब रुग्णालयातील उपचार करणारा स्टाफ सुध्दा खाजगीत मान्य करतो.

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, या सचिवांनी दुसरा प्रताप असा केला आहे की, त्यांनी आपल्या पत्नीला जे. जे. रुग्णालयात पात्र नसतांना आपल्या पत्नीला अधिव्याख्याता पदावर प्रतीनियुक्ती दिली. एवढेच नाही तर त्यांच्या पत्नी अधिव्याख्याता म्हणून हॉस्पिटलमध्ये आल्या आणि त्या पुन्हा अधिनियुक्तीवर लंडन येथे खाजगी प्रॅक्टीससाठी निघून गेल्या. त्या लंडन येथे प्रॅक्टीस करतात परंतु पगार मात्र जे.जे. हॉस्पीटलमधून घेतात. यासंदर्भातील सर्व कागदपत्र माझयाकडे आहेत त्यामुळे याबाबत शासन काही कारवाई करणार आहे का ?

सभापती महोदय, यासंदर्भातील माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात दिली तर बरे होईल. त्यावेळचे सचिव श्री.गगराणी यांना आपल्या पदाची फार मस्ती चढली होती त्यामुळे संबंधित सचिवांची तसेच संबंधित हॉस्पीटलच्या डॉक्टरांची, प्राध्यापकांची तसेच हॉस्पिटलच्या स्टाफची चौकशी करण्यात यावी. हे प्रकरण वाटते तेवढे सोपे नाही. माणसांच्या जीवाशी खेळण्याचे हे प्रकरण आहे. त्यामुळे माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, त्यांनी या प्रकरणी जातीने लक्ष घालून चौकशी करावी व जनतेला न्याय मिळवून द्यावा. श्री. गगराणी यांची पत्नी लंडन येथे प्रॅक्टीस करीत असतील आणि

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ..

पगार मात्र जें.जे. हॉस्पिटलमधून महाराष्ट्र शासनाचा घेत असतील तर ते महाशय कोण आहेत यासंबंधीची चौकशी करण्यात यावी आणि संबंधिताविरुध्द योग्य कारवाई करण्यात यावी अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय,यानंतर मला दुसरा महत्वाचा मुद्दा मांडावयाचा आहे या रुग्णालयातील स्त्री रोग आणि प्रसुतीशास्त्र विभागात मोठया प्रमाणावर घोळ सुरु आहे. त्याठिकाणी मनमानी पध्दतीने भ्रष्टाचार सुरु आहे. या विभागात माता मृत्युचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे याच विभागातील अनेक वरिष्ठ महिला डॉक्टरांनी आपल्या मंत्रिमंडळातील मत्र्यांच्या आणि राज्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले होते . या संदर्भात मंत्रिमहोदयांनी काय कारवाई केली हे मला माहीत नाही. त्याठिकाणी अनधिकृतपणे गर्भपात केला जातो तसेच चुकीच्या पध्दतीने मुत्राशय कापले जाते आणि लैगिक छळ देखील केला जातो . या संदर्भात अनेक तक्रारी तेथील डॉक्टरांनीच केल्या आहेत . या विभागाच्या प्रमुख डा. रेखा डावर असून अत्यंत मनमानी पध्दतीने त्यांचा कारभार सुरु आहे.डॉ.रेखा डावर यांच्या पाठीमागे कोणाची जबरदस्त शक्ती आहे हे समजत नाही. डॉ.रेखा डावर प्राध्यापकांना , डॉक्टरांना त्रास देतात परंतु त्यांना कोणीही हात लावत नाही तेव्हा त्यांच्या बाबतीत हात लावण्याची हिंमत दाखवावी असे मला सांगावयाचे आहे. गेल्या दहा बारा वर्षापासून त्या एकाच पदावर एकाच ठिकाणी काम करीत आहेत. तरीसुध्दा त्यांना तेथून हलविण्यात येत नाही. त्यांच्याविरुध्द कितीही तक्रारी केल्या तरी त्यांची बदली होऊ शकत नाही एवढी एकाधिकारशाही त्यांनी निर्माण केलेली आहे.जे.जे.रुग्णालय हे फार मोठे नावाजलेले रुग्णालय आहे त्या ठिकाणी असे प्रकार सुरु असेल तर सरकारच्या दृष्टीने ती शरमेची बाब आहे म्हणून या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे काय ? या संबधातील सर्व पुरावे देण्यास मी तयार आहे. वेळ कमी असल्यामुळे सर्वच पुराव्यांचा मला उल्लेख करता येत नाही पंरतु मी सर्वच पुरावे देण्यास तयार आहे . या सर्व प्रकरणांची चौकशी करावी अशी मी माननीय मंत्र्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला जलसंपदा विभागाच्या पूरक मागण्यासंबंधी बोलावयाचे आहे बाब क्रमांक 123 पान नंबर 126 सबंधी मी प्रथम उल्लेख करतो. विदर्भ पाटबंधारे मंडळामध्ये जो्ड प्रस्तावाच्या नावाखाली मोठया प्रमाणावर कामे सुरु आहेत. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये जोड प्रस्तावाचे फार मोठे स्कॅन्डल आहे याची आपणास कल्पना आहेच.विदर्भ पाटबंधारे महामंडळ

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ..

हे एक स्वायत्त महामंडळ असून त्याला काही प्रमाणात स्वायत्तता आहे म्हणजे त्या महामंडळाला शासकीय नियम बंधनकारक नाहीत असे होत नाही. या स्वायत्त महामंडळाला शासनाचे नियम बंधनकारक असतातच .शासनाने शासकीय कामकाजात पारदर्शकता रहावी म्हणून अकाऊन्टस कोड प्रत्येक खात्यासाठी लागू केलेले आहे. पाटबंधारे महामंडळावरसुध्दा हे अकाऊन्टस कोड बंधनकारक आहे. पाटबंधारे महामंडळाने जोड प्रस्तावाच्या नावाखाली मोठया प्रमाणावर विना निविदा काम पूर्वीच्याच कंत्राटदाराला देण्याचा सपाटा लावला आहे. महाराष्ट्रामध्ये हे प्रकार थांबणार आहेत किंवा नाहीत ? कृष्णा खोरे विकास महामंडळ, मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, तापी खोरे विकास महामंडळ, विदर्भ विकास महामंडळामध्ये सुध्दा हेच प्रकार सुरु आहेत या चर्चेच्या निमित्ताने मी एक दोन उदाहरणे सांगणार आहे. बेंबळा नदी प्रकल्पातील मुख्य कालवा किलोमिटर क्रमांक 8470 वरील मंजुशा मोरीचे बांधकाम करण्यात आले असून मूळ करारनाम्यातील किंमत 94.38 लाख एवढी असून अतिरिक्त कामाची किंमत 110.86 लाख एवढी आहे. 94 लाख रुपयाच्या कामाचे टेंडर काढण्यात आले होते परंतु 110 लाख रुपयाच्या किंमतीचे टेंडर काढण्यात आले नव्हते. हे काम टेंडर न काढता देण्यात आले होते. त्याचबरोबर मुख्य कालवा किलोमिटर क्रमांक 1 ते 40 पर्यत बांधकामाचे सल्लागारा मार्फत संकल्पना,संकल्पचित्र व अंदाजपत्रक तयार करण्याचे काम करण्यात यावयाचे असून मूळ करारनाम्याची रक्कम 54.20 लाख एवढी असून अतिरिक्त कामाची किंमत 91.31 लाख एवढी आहे 54 लाख रुपयांच्या कामाचे टेंडर काढण्यात आले होते परंतु 91 लाख रुपये किंमतीचे टेंडर काढण्यात आले नाही.

सभापती महोदय, यानंतर आणखी एक उदाहरण मी देणार आहे.बुलढाणा जिल्हयातील खामगाव तालुक्यात ढोरपगाव लघु पाटबंधारे योजना असून हे काम तर माझ्याच मतदारसंघातील आहे.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ...

मूळ प्रकल्पाची किंमत 45लाख रूपये होती तिचे टेंडर निघाले परंतु जोड-प्रस्ताव नंतर केला गेला पण त्याचे टेंडर काही काढले नाही. 3.40 कोटीचे हे काम एकाच कंत्राटदाराला दिले गेले. पेनटाकळी, तालुका चिखली या प्रकल्पाचे मूळ काम 39.84 लाख रूपये किंमतीचे होते पण त्याचा जोड-प्रस्ताव मात्र 203 लाखाचा आहे. त्या जोड प्रस्तावाचे टेंडर काढण्यात आले नाही. केवळ मूळ कामाचे म्हणजे 39.84 लाखाचे टेंडर काढण्यात आले होते. तेव्हा जोड-प्रस्ताव ही काय भानगड आहे, असे करणे आपल्या नियमामध्ये बसते का? आपल्या अकौंट-कोडमध्ये बसते का ? सभापती महोदय, अशाच प्रकारे असे अनेक प्रकल्प आहेत, उदा. उतावळी नदी प्रकल्पाच्या मूळ कामाची किंमत 295 लाखाची असताना जोड-प्रस्ताव 654 लाखाचा बनवून ते विनाटेंडर करण्यात आले. काळ नदी प्रकल्पाचे मूळ काम 113 लाखाचे आहे पण जोड प्रस्ताव मात्र 211 लाखाचा आहे. अशा प्रकारे प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार या खात्यात चालला आहे. तेव्हा आपण या साऱ्या जोड-प्रस्तावांची चौकशी करणार का ? मूळ प्रस्तावानंतर जोड प्रस्ताव असतील तर त्या जोड प्रस्तावाच्या कामांची टेंडर्स का काढली जात नाहीत ? ही सारी कामे पारदर्शी का झाली नाहीत ? याची चौकशी झाली पाहिजे. यासाठी आपली कोणती समिती होती का ? असल्यास त्या समितीने याबाबत निर्णय घेतला होता काय ? असल्यास, समिती नियमानुसार हे निर्णय घेत होती काय ? याचीही चौकशी करण्याची गरज आहे. सभापती महोदय, पाटबंधाऱ्यांच्या नावाखाली विदर्भाला आपण पैसे देतो परंतु विदर्भातील प्रकल्पाच्या कामांमध्ये जोडप्रस्ताव आणून कामे केले जातात, त्यात मोठा भ्रष्टाचार केला जातो या साऱ्याची चौकशी होणे अत्यावश्यक आहे एवढे सांगून मी भाषण संपवितो.

***

..... 3वाय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, बाब क्र. 2, पृ.क्र.5 ही लोकसभा आणि विधानसभा निवडणूक विषयाची बाब आहे. ओळखपत्रे हा त्याचा विषय आहे. आपण ही ओळखपत्रे पाहिली तर ते ओळखपत्र ज्या प्लास्टिक कव्हरमध्ये टाकलेले आहे त्याचा एकूण दर्जा पाहिला तर तो अत्यंत खालच्या दर्जा असल्याचे आपल्या लक्षात येईल. पूर्वी जे ओळखपत्र आपल्याला दिले गेले होते वा जात होते ते पाहता आता जे ओळखपत्र दिले आहे त्याचा कागद अत्यंत साधा आहे आणि ते त्या प्लास्टिक कव्हरमधून काढले तर लगेच फाटते म्हणूनच ही ओळखपत्रे कोठे छापली गेली आणि कोणाच्या आदेशावरून छापली गेली याची चौकशी होणे आवश्यक आहे. या ओळखपत्रांवरील फोटो आहे तो आपलाच फोटो आपल्याला ओळखता येत नाही अशा स्वरूपाचा आहे. त्यामुळे या एकूणच ओळखपत्राचा दर्जा सुधारणे अत्यंत आवश्यक आहे. हे ओळखपत्राचे काम कंत्राटदाराकडून झालेले आहे आणि त्यात प्रचंड भ्रष्टाचार झालेला आहे असे माझे मत आहे, तरी त्या बद्दल चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, त्यानंतर बाब क्र.3, पृ.क्र.6 स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी तरतूद यासाठी ही पुरवणी मागणी आलेली आहे. सभापती महोदय, या स्पर्धा परीक्षांच्या संदर्भात मला आपल्याला सांगितले पाहिजे की, आयएएस आणि आयपीएस या स्पर्धा परीक्षांकडे आपण अतिशय गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. आपण इतर वेळी भाषणातून, मुलाखतींमधून, टीव्ही वर वगैरे ऐकतो, वाचतो की, मराठी मुले या स्पर्धा परीक्षांमध्ये मागे पडतात आणि त्यांची टक्केवारी ही या परीक्षांमध्ये दिवसेंदिवस घटत चालली आहे व बिहार व युपीची मुले मात्र या परीक्षांमध्ये पुढे जात आहेत. माझ्या ओळखीचे अनेक अमराठी लोक आहेत त्यांची मुले 12वी पर्यंतचे शिक्षण येथे घेतात आणि पुढील आयएएस, आयपीएस सारख्या स्पर्धा परीक्षांसाठी मात्र बिहार, युपीमध्ये जातात आणि तेथून या परीक्षा देतात. असे का होते ? याचा आपण शोध घेतला पाहिजे. माझ्या मते या मागील कारण असे आहे की, आपल्याकडे अशा स्पर्धा परीक्षांना बसण्यासाठी जे सराव वर्ग असायला पाहिजे ते नसतात, त्यांचे आयोजन केले जात नाही शहरात नाही आणि ग्रामीण भागात तर नाहीच नाही. तरी या स्पर्धा परीक्षांसाठी आपल्याकडे देखील चांगल्या प्रकारचे सराव वर्ग सुरू केले जावेत अशी मी या निमित्ताने आपल्याकडे मागणी करतो.

.... 3वाय 3 ...

डॉ. सावंत ....

सभापती महोदय, पृष्ठ क्र.58, बाब क्रमांक 65 ही शालेय आहारासंबंधीची बाब आहे. सभापती महोदय, शालेय पोषण आहाराबद्दल अनेकदा येथे चर्चा झालेली आहे. मात्र तरीही त्या आहारामध्ये काहीही फरक झालेला नाही. त्याचा दर्जा कसा आहे, त्याची क्वांटिटी किती आहे याबद्दल प्रश्नचिन्ह आहे. त्यामुळे हा पोषण आहार आहे की, कुपोषण आहार आहे असा प्रश्न आपल्या समोर उभा राहतो. ...

( यानंतर श्री.सरफरे ...3झेड 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ 17:35

डॉ. दीपक सावंत..

सभापती महोदय, या अन्नामध्ये अळया असल्याचे अनेक किस्से आपण सभागृहामध्ये ऐकले आहेत. त्याबाबत अनेक वेळा प्रश्न उपस्थित करण्यात आले. परंतु तरीसुध्दा या आहारामध्ये सुधारणा होत नाही. त्याकरिता माझी शासनाला विनंती आहे की, शालेय पोषण आहाराच्या बाबतीत एखादी दक्षता समिती शासनाने नेमणे अत्यंत आवश्यक आहे. त्यायोगे या योजनेचे मॉनिटरींग केले जाईल.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 195 वरील बाब क्रमांक 211 मध्ये कोल्हापूर येथील कामगार विमा योजना रुग्णालयासाठी 118 नवीन पदे निर्माण करण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. सभापती महोदय, केंद्र सरकारच्या विमा योजनेची अनेक हॉस्पिटल्स आपण पाहिली आहेत. माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे या सभागृहामध्ये सातत्याने मुंबईतील कामगार विमा योजनेच्या हॉस्पिटलविषयी बोलत असतात. त्यांनी याबाबत सांगितले होते की, आपण केंद्र सरकारकडे जाऊन या विमा हॉस्पिटल्सच्या पुर्नबांधणीसाठी किंवा पुनर्जीवनासाठी काहीतरी करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने आजपर्यंत या विषयावर अनेक वेळा चर्चा झाली, परंतु कोणताही कॉंक्रिट निर्णय झाला नाही. आपण केंद्र सरकारच्या कोर्टमध्ये बॉल टोलविता, केंद्र सरकार आपल्या कोर्टमध्ये बॉल टोलविते. याबाबत अनेक वेळा बैठक घेण्यात आली, त्या बैठकीला मी आणि माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हेसुध्दा उपस्थित होते. परंतु त्याबाबत अजून निर्णय झालेला नाही. माननीय केंद्रीय आरोग्य मंत्री मुंबईमध्ये आले असतांना आम्ही त्यांची भेट घेतली होती. अत्यंत प्राईम लोकेशनच्या जागेवर असलेल्या या कामगार हॉस्पिटलचे नेमके काय करावयाचे याबाबत गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. माननीय मंत्री श्री. सुरेश शेट्टी यांनी अंधेरीचा प्रोजेक्ट तयार केला. परंतु त्याचबरोबर मुंबईमधील कामगार हॉस्पिटलबाबत देखील विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 196 व बाब क्रमांक 212 च्या संदर्भात सांगू इच्छितो की, आज आपल्या राज्याच्या एकूण अर्थसंकल्पामध्ये 100 रुपये खर्च होतो, त्यापैकी आरोग्यावर किती खर्च होतो? आपण त्याचे प्रमाण पाहिले तर आरोग्यावर फक्त 2 रुपये खर्च होतो. स्वाईन फ्लूच्या बाबतीत मला आपल्याला विचारावेसे वाटते की, एकूण किती व्हेंटिलेटर खरेदी करण्यात आले? परवाच्या दिवशी माननीय श्री. सुरेश शेट्टी यांनी उत्तर देतांना 5 कोटींचे व्हेंटिलेटर खरेदी करणार असल्याचे सांगितले. सद्या स्वाईन फ्लूची साथ राज्यात सुरु असल्यामुळे हे व्हेंटिलेटर साथ संपल्यानंतर येणार आहेत की, पुढील वर्षी येणार आहेत? सन 2009-10 या वर्षीच्या आरोग्य



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. दीपक सावंत..

खात्याच्या अंदाजपत्रकामध्ये फार मोठी कपात करण्यात आली आहे. गेल्या वर्षी एनआरएचएमचे 800 कोटी रुपये आले होते. त्यामधील 200 कोटी रुपये आपल्या शासनाच्या नाकर्तेपणामुळे परत गेले, आणि 600 कोटी रुपये खर्च झाले. यावर्षीच्या अंदाजपत्रकामध्ये 800 कोटींपैकी फक्त 600 कोटी रुपये मंजूर झाले आहेत. त्यामध्येही कपात करण्यात आली आहे, याला जबाबदार कोण आहे? आपले अधिकारी कां पैसे खर्च करीत नाहीत? निवडणुकीची आचारसंहिता लागू होती असे कारण सांगितले जात असले तरी सार्वजनिक आरोग्य खात्याच्या नियोजनशून्य कारभारामुळे असे झाले आहे. सभापती महोदय, माझ्याकडे स्वाईन फ्लूच्या संदर्भातील वर्तमानपत्राचे कात्रण आहे. वर्तमानपत्रातील कात्रणांवर आपण कसे बोलता असे कदाचित माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे साहेब म्हणतील. परंतु वर्तमानपत्रातील बातम्यांव्यतिरिक्त आम्हाला माहिती कोठून मिळणार? यामध्ये व्हेंटिलेटर, औषधे, पीपीईपीसाठी 22 कोटींचा प्रस्ताव असतांना आपल्या अर्थसंकल्पात फक्त 15 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तेव्हा ही कपात कां करण्यात आली असा माझ्या मनामध्ये प्रश्न आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकार स्वाईन फ्लूच्या आजारासाठी टॅमिफ्लूच्या गोळया पुरविते. केंद्र सरकारकडून आलेल्या गोळया कमी पडल्या तर राज्य सरकारने त्या खरेदी कराव्यात अशाप्रकारचे मार्गदर्शक तत्व केंद्र सरकारने आखून दिले आहे. त्यामुळे आपल्याला खरोखरच टॅमिफ्लूच्या गोळया विकत घ्याव्या लागल्या काय? हा खरा प्रश्न आहे. आपण अजूनपर्यंत 5 कोटींचे व्हेंटिलेटर खरेदी केले नाही. तर मग स्वाईन फ्लूसाठी जी औषधे लागणार आहेत त्यामध्ये टॅमिफ्लूच्या गोळया आणखी विकत घेण्यासाठी हा खर्च करावा लागेल असे मला वाटत नाही. त्यामुळे हा 22 कोटींचा प्रस्ताव कसला? याचे आपण उत्तर द्यावे. सभापती महोदय, एन 95 मास्क खरेदी करण्यासाठी हा पैसा खर्च केला असे कदाचित आपण मला सांगाल. आज मुंबई, पुणे, नागपूर व नाशिकमधील हॉस्पिटलमध्ये प्रमुख डॉक्टरांशिवाय अन्य कुणाच्याही तोंडावर एन 95 चे मास्क नव्हते. तर मग बाकीचे मास्क कुठे गेले? आपण जर एन 95 हे मास्क खरेदी केल्याचे दाखविले असतील तर ते मास्क कुठे आहेत? हे आपण याठिकाणी सांगितले पाहिजे.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. दीपक सावंत..

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 202 व बाब क्रमांक 215 मध्ये अभियान प्रकल्पांतर्गत विद्यापीठातून रक्तदान शिबिरे आयोजित करणे याकरिता तरतूद करण्यात आली आहे. याचा अर्थ मला समजला नाही. तेव्हा विद्यापीठांतर्गत रक्तदान शिबिर म्हणजे काय? याचा अर्थ मंत्रिमहोदयांनी स्पष्ट करावा.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

आपण हा कार्यक्रम का राबवित आहोत ? कारण आपल्याला एखाद्या रक्तदान शिबिरातून जे रक्त मिळते, ते साठविण्यासाठी आपल्याकडे तेवढी युनिटस् आहेत काय ? रक्त संक्रमण परिषदेकडे तेवढी सोय आहे काय ? कारण जर विद्यापीठामार्फत कॅम्प घेणार असाल तर त्याला प्रचंड प्रतिसाद मिळतो.

सभापती महोदय, बाब क्र.216, पान क्र.202 बाबत मी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो. एकंदर जे.जे.हॉस्पिटलच्या माध्यमातून 32 पेरिमेडिसीन केंद्र उभारण्या बाबत यामध्ये उल्लेख केलेला आहे. माननीय विरोधी पक्षनेते श्री.पाडुंरंग फुंडकरसाहेब हे बोलले आहेत. त्यामुळे मी त्या विषयाला स्पर्श करणार नाही. परंतु जे.जे.च्या विषयासंबंधात बोलावयाचे असेल तर एक विषय माझ्याकडे आहे. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्याच साक्षीने पंतप्रधान ग्राम स्वास्थ्य सुरक्षा योजनेतून जे.जे.रुग्णालयासाठी 150 कोटी रुपये दिले होते आणि दुसरे 150 कोटी रुपये नागपूर येथील जी.व्ही.सी.ला दिले होते. आपलेच डॉक्युमेंट आहे. आपल्या परवानगीने मी त्यातील दोन ओळी वाचून दाखवितो. "सर ज.जी.समुह रुग्णालये, मुंबई यांनी संस्थेस मा.पंतप्रधान स्वास्थ्य सुरक्षा योजनांतर्गत प्राप्त झालेल्या 120 कोटी एवढया निधीतून रुग्णालयास आवश्यक अशी रु.60.08 कोटीची यंत्रसामुग्री खरेदी प्रक्रिया केंद्र शासनाकडून करण्यात येत आहे." हे पैसे 2007 मध्ये पास झालेले आहेत. पुढे असे म्हटलेले आहे की, "रु.25.95 कोटीची यंत्रसामुग्री खरेदी करण्याची प्रक्रिया राज्य शासनाव्दारे संस्था स्तरावर सुरु आहे.अद्यापपर्यंत या 25 कोटीतील रु.15,61,49,450/- इतक्या किंमतीच्या यंत्रसामुग्रीचे आदेश निगर्मित करण्यात आलेले आहेत व रु.10,33,50,550/- एवढया रकमेची खरेदी प्रक्रिया वर नमूद केल्याप्रमाणे सुरु आहे. तसेच प्रशासकीय इमारत व बांधकाम यासाठी 20 कोटी रुपये इतकी रक्कम प्रस्तावित आहे." केंद्र शासनाकडून 150 कोटी रुपये प्राप्त झाले आणि आपण याला एम्स्चा दर्जा देणार अशी तत्कालीन मंत्री महोदयांनी घोषणा केली होती. पण अजूनही काही झालेले नाही. अजूनही 150 कोटी रुपयांपैकी कोणतीही रक्कम मिळालेली नाही. माननीय मंत्री महोदय मला सांगावयास लाज वाटते. आपण जर रेकॉर्ड पाहिले तर आज आपल्या संपूर्ण राज्यामध्ये 8 ठिकाणी सिटी स्कॅनची व्यवस्था आहे आणि 6 ठिकाणी एम.आर.आय.ची व्यवस्था आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. नागपूर मेडिकल कॉलेजसाठी 150 कोटी रुपये देणार असे सांगितले होते.यासंदर्भात अनेक

. . . .4 ए-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

बैठका झाल्या. पण अजूनपर्यंत नागपूर मेडिकल कॉलेजसाठी देण्यात येणारे पैसे तसेच बासनात बांधलेले आहेत. हा निधी देण्याच्या दृष्टीने अजूनही कोणतीही प्रक्रिया सुरु झालेली नाही आणि त्यांना कोणत्याही प्रकारचे लेटर ऑफ इंटेट सुध्दा मिळालेले नाही. असे काय होते ? आय.जी. जी.एम.सी.म्हणजे इंदिरा गांधी मेमोरिअल हॉस्पिटल, ज्याला आपण मेयो हॉस्पिटल म्हणतो, त्याच्या व्हर्टीकल एक्सपांशनचा प्लॅन तयार केलेला आहे असे गेल्या वेळेस सांगण्यात आले. याबाबतीत मागील हिवाळी अधिवेशनामध्येच चर्चा झाली होती. त्यावेळी माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटीलसाहेब आणि माननीय मंत्री श्री.राजेश टोपेसाहेब या दोघांनीही याबाबतीत सांगितले होते की, याबाबतीत आमचा प्लॅन तयार आहे आणि येत्या वर्षापर्यंत व्हर्टीकल एक्सपांशन होईल. पण कॉन्ट्रॅक्टरच पळून गेला. तो का पळून गेला ? जर तुमच्याकडे पैसे तयार आहेत तर मग कॉन्ट्रॅक्टर का पळून गेला ?

सभापती महोदय, आपण सध्या नागपूर मध्ये आहोत म्हणून मी त्याविषयी बोलतो. उधारीच्या सॉफ्टवेअरवर कॅथ लॅग सुरु आहे. तसेच आपल्याकडे जी कॅथ लॅब आहे, ती कालबाह्य झालेली आहे. कारण येथे कोणीही मॉनेटरींग ॲथॉरिटी नाही. या नागपूर हॉस्पिटलमध्ये श्री.सुधीर गुप्ता आहेत, जे विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून काम करीत आहेत, पण ते पद सॅक्शन नाही. पण त्यांना या पदावर कार्यरत ठेवलेले आहे आणि ते नागपूर महाविद्यालयाचा व हॉस्पिटलचा कारभार पहात आहेत. नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये डॉक्टरांची तर जाऊ दे, पण वर्ग-4 मध्ये 300 कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. याठिकाणी माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणेसाहेब उपस्थित आहेत. आपण कणकवली येथे जिल्हा उप रुग्णालय सुरु केले. पण तेथे 13 डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. आपण पालकमंत्री असताना मी आणि सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर दोघांनी मिळून वारंवार याबाबत आवाज उठविला. पण दुर्दैवाने आजही ही पदे भरण्यात आलेली नाहीत. म्हणून माझी अशी विनंती आहे की, नागपूर मेडिकल कॉलेजप्रमाणे, कणकवली येथील हॉस्पिटल हे देवगड, मालवण या भागासाठी मध्यवर्ती ठिकाण आहे आणि त्याला उप जिल्हाधिकारी रुग्णालय म्हणून मान्यता दिलेली आहे, ट्रॉमा केअर म्हणून याला मान्यता दिलेली आहे ते सुरळीतपणे सुरु रहावे अशी देखील माझी विनंती आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ...

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपवितो. गेल्या अनेक वर्षापासून नागपूरसाठी हत्तीरोग आणि हिवताप याच्यासाठीचे 25 कोटी रुपयाचे अनुदान मिळाले नाही.हा महत्वाचा प्रश्न आहे. केंद्र शासनाचे हे अनुदान आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 267 आणि 245. याप्रमाणे या शासनाला खरोखरच आदिवासींचा प्रश्न सोडवावयाचा असेल तर चिखलदऱ्याला पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्यात यावे. आणि त्याच्या नॉर्म्सप्रमाणे त्याठिकाणी पैसे देण्यात यावेत. तेथील आदिवासींचा आपोआप विकास होईल, चिखलदऱ्याचा विकास होईल आणि त्याकडे एक वेगळे स्थान म्हणून पाहिले जाईल. सभापती महोदय, मला वेळ दिल्या बद्दल धन्यवाद. जय हिंद. जय महाराष्ट्र.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, महसूल व वन विभागाची बाब क्रमांक 43 पान क्रमांक 37. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदत. राज्य शासनाने महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना भरीव मदत केलेली आहे. या निमित्ताने मी राज्य शासनाला एक विनंती करु इच्छितो की, या प्रश्नाच्या बाबतीत काही संस्थांचा सर्वेक्षण अहवाल आलेला आहे. चार टक्के शेतकरी ज्या कारणास्तव आत्महत्या करतात ते कारण दूर करण्यासाठी राज्य शासनाने एक अभियान राबवावे. त्या अभियानाअंतर्गत हा बळीराजा व्यसनमुक्त होईल आणि महाराष्ट्राच्या उभारणीमध्ये त्याचा सिहाचा वाटा राहिलेला आहे त्यामध्ये आणखी भर पडेल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 46. पान क्रमांक 38. दंगलग्रस्त व्यक्तींना जी झळ पोहचलेली आहे त्या संदर्भातील हा मुद्दा आहे. महाराष्ट्रामध्ये दंगली घडविणारे कोण आहेत? दंगली घडविण्यासाठी हिरीरीने भाग घेणारे कोण आहेत? या व्यक्तींच्या चित्रफिती राज्य शासनाकडे तयार आहेत. त्यांच्यावर न्यायालयीन खटले चालतील तेव्हा चालतील पण या चित्रफितीवरुन दंगलीमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहभागी असणाऱ्या व्यक्ती किंवा समाजसमुह यांची सर्व मालमत्ता जप्त करण्याचा आदेश महाराष्ट्र शासनाने काढावा, अशा प्रकारची विनंती मी शासनाला करु इच्छितो. दंगली घडविणे आणि राजकारण करणे हा काही लोकांचा उद्योग आहे. या उद्योगाला आळा घालायचा असेल तर माझी शासनाला विनंती आहे की,त्यांची मालमत्ता जप्त करणे अतिशय आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 48, पान क्रमांक 39. चक्रीवादळामुळे महाराष्ट्रातील जे शेतकरी, शेतमजूर आणि नागरिक आपदग्रस्त झालेले आहेत त्यांना महाराष्ट्र शासनाने अतिशय सक्षमपणे मदत केलेली आहे. मी विशेषत: महसूल मंत्री श्री. नारायण राणे साहेबांना मनापासून धन्यवाद देऊ इच्छितो. त्यांनी स्वत:च्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करुन प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली आणि आपदग्रस्तांना मदत देण्याचे आदेश दिले. स्वत:च्या शरीर प्रकृतीकडे दुर्लक्ष केल्याचा परिणाम असा झाला की, अतिश्रमामुळे त्यांची अँजीओप्लॅस्टी झाली हे सर्वश्रृत आहे. राज्य शासन जर चांगले काम करीत असेल तर राज्य शासनाचे कौतुक करण्याची तयारी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी सुध्दा दाखविली पाहिजे. त्यांना माझी आग्रहाची विनंती आहे की, या निमित्ताने राज्य शासनाचे हे जे कौतुकास्पद कार्य आहे, याचे कौतुक करण्याचा मनाचा मोठेपणा दाखवावा.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

सभापती महोदय, यानंतर मला महसूल व वन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 40 वरील बाब क्रमाक 49 बाबत बोलावयाचे आहे. पूर, चक्रीवादळ व नैसर्गिक आपत्ती याकरिता तरतूद करण्यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. आता वैश्विक उष्मा वाढलेला आहे. वसुंधरेवर राहणाऱ्या अनेक जीवसृष्टीचे जीवनमान धोक्यात आलेले आहे. अशा परिस्थितीमध्ये वैश्विक उष्मा कमी करण्यासाठी राज्य शासनाने स्वत: काही प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. मला खात्री आहे की, राज्य शासन त्यादृष्टीने निश्चितपणे प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, यानंतर मला जलसंपदा विभागाच्या पृष्ठ क्रमांक 121 वरील बाब क्रमांक 114 बाबत बोलावयाचे आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये 20 हजार ते 25 हजार हेक्टर पाणलोट क्षेत्र निर्माण करण्याचा संकल्प राज्य शासनाने सोडलेला आहे. गेल्या दोन अधिवेशनात मी बीड मतदारसंघातील टुकूर मध्यम प्रकल्पाबाबतचा विषय मांडत आहे. मागच्या अधिवेशनामध्ये माननीय मंत्रिमहोदय श्री. अजित पवार यांनी आश्वासन दिले होते परंतु आतापर्यंत टुकूर प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात सुरु झालेले नाही. या टुकूर प्रकल्पाखाली जवळपास 15 ते 20 गावातील हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. सिंचनाचे क्षेत्र वाढणार आहे. त्या ठिकाणी सिंचनाचे क्षेत्र वाढवून मराठवाड्याचा सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी राज्य शासनाने प्रयत्न करावा अशी मी शासनाला आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 161 वरील बाब क्रमांक 170 बाबत बोलावयाचे आहे. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य हगणदारीमुक्त करणार अशी घोषणा केलेली आहे परंतु दुर्भाग्याची गोष्ट अशी आहे की, मनोरा आमदार निवासच्या बाजूला झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना उघड्यावर शौचाला बसावे लागते. त्यांची कोणत्याही प्रकारची व्यवस्था नाही. माझी राज्य शासनाला विनंती आहे की, मनोरा आमदार निवासच्या बाजूच्या परिसरातील लोक त्या ठिकाणी उघड्यावर शौचाला बसतात त्यांच्यासाठी अगोदर शौचालयाची व्यवस्था करावी त्यानंतरच हगणदारीमुक्त महाराष्ट्राच्या घोषणेमध्ये तथ्य राहू शकेल. म्हणून ही एक विनंती आपल्यामार्फत मी राज्य शासनाला करणार आहे.

सभापती महोदय, यानंतर मला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

प्रा. सुरेश नवले ...

161 वरील बाब क्रमांक 171 बाबत बोलावयाचे आहे. आश्रमशाळा चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्याकरिता ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. आपल्याला माहीत आहे की, बीड जिल्हा हा जास्तीत जास्त ऊसतोड कामगारांचा जिल्हा आहे. 100 ऊसतोड कामगारांची 100 मुले असतात. त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था होत नाही. त्यांचे विस्थापन होते. त्यांची मुले त्या ठिकाणी राहतात आणि आई-वडील ऊस तोडण्यासाठी जातात. त्यामुळे त्या मुलांकडे दुर्लक्ष होते. त्या मुलांच्या सर्व शैक्षणिक कार्याची जबाबदारी राज्य शासनाने घ्यावी अशी मी राज्य शासनाला आग्रहाची विनंती करतो. त्या ठिकाणी 100 मुलांच्या पाठीमागे 1 आश्रमशाळा या ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी द्यावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला कृषी, पशुसंवर्धन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 47 वरील बाब क्रमांक 58 बाबत बोलावयाचे आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेखाली ग्रामीण भागामध्ये 100 हेक्टरपेक्षा जास्त क्षमता असणारे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे शासन निश्चितपणे करु शकते. 100 हेक्टर, 200 हेक्टरपेक्षा जास्त क्षमतेचे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे करण्यासाठी शासनाने निश्चितपणे प्रयत्न करावा. त्यामुळे सिंचनाची क्षमता वाढेल. अशा साईट्स खूप आहेत. परंतु अशा साईट्सचे कोणत्याही प्रकारे सर्वेक्षण होत नाही. शासनाने अशा ठिकाणाचा सर्व्हे करुन कोल्हापूर पध्दतीचे बंधारे उभे करावे अशी मी राज्य शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 9 वरील बाब क्रमांक 11 बाबत बोलावयाचे आहे. लोकराज्य मासिकाच्या मुद्रणावरील अधिकचा खर्च भागविण्यासाठी ही पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. या लोकराज्य मासिकामध्ये भारतीय संस्कृतीविषयक एक धडा असणे आवश्यक आहे. आपल्याला आठवत असेल की, एक दोन वर्षापूर्वी माननीय मंत्रिमहोदय श्री. राणे साहेबांच्या मुलाचे लग्न होते. त्या लग्नाला जाऊ नका असे आदेश आमदारांना आणि नगरसेवकांना देण्यात आले होते. त्यांच्या लग्नपत्रिका गोळा करण्यात आल्या. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, लोकराज्य मासिकामध्ये भारतीय संस्कृतीविषयी एक पाठ असावा.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

म्हणजे जे कोणी विकृतपणे महाराष्ट्रामध्ये वागतात त्यांना खऱ्या अर्थाने संस्कृतीचे दर्शन घडेल. पूर्वीच्या काळात राक्षसांचे राज्य होते. राक्षस सुध्दा लग्न कार्याला जात होते. मंडपाच्या बाहेर उभे राहून राक्षस अक्षता टाकत असत. पण त्या राक्षसांना सुध्दा लाजवील अशाप्रकारचे कृत्य महाराष्ट्रात होत असेल तर मला आपल्यामार्फत शासनाला विनंती करावयाची आहे की, भारतीय संस्कृतीचा पाठ लोकराज्य या मासिकामध्ये समाविष्ट करावा. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य, अपरिग्रह, शोच, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वर, परिधान, या सर्व मूल्यांचे जतन करणारी भारतीय संस्कृती आहे. भारतीय संस्कृतीचे केवळ नाव घेऊन चालणार नाही तर भारतीय संस्कृतीप्रमाणे वागावे लागेल. हा आदर्श समोरच्या सन्माननीय सदस्यांनी घ्यावा अशी आपल्यामार्फत विनंती करतो आणि या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

ॲड.उषा दराडे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, मागण्यांना पाठिंबा देत असताना काही बाबींवर माझे विचार व्यक्त करणार आहे. सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्र.168, पान क्र.160 वर मी बोलते. महाराष्ट्र शासनाचा एक जी.आर.आहे त्यामध्ये ऊसतोड कामगारांच्या पाल्यांना शाळा येथून पुढील काळात देऊ नये असा नकारात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. हा जी.आर.रद्द करण्याची मागणी मी दोन वर्षापासून करीत आहे. त्याची फाईल दोन वेळा तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख आणि विद्यमान सन्माननीय मुख्यमंत्री यांच्याकडेही दोन वेळा गेलेली आहे. आजही ते प्रकरण प्रलंबित आहे. तेव्हा माझी शासनाला विनंती आहे की, तो जी.आर.ताबडतोब रद्द करावा आणि बीड जिल्हयातील ऊसतोड कामगार वर्ग आहे त्यांच्या पाल्यांना शिक्षणाचे दरवाजे मोकळे करावे. ओबीसी व भटक्या व विमुक्त विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक शिक्षणाची फी प्रलंबित आहे ती तात्काळ देण्यात यावी. ओबीसी या घटक वर्गातील अधिका-यांच्या व कर्मचाऱ्यांच्या नोकरी भरतीमधील व बढतीमधील फाईलवर माननीय मुख्यमंत्र्यांची सही झालेली नाही. ही फाईल ताबडतोबीने मंजूर करण्यात यावी अशी विनंती करते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 54, पृष्ठ क्रमांक 46 बाबत माझी आग्रहाची विनंती आहे. शासनाने कृषी धोरण लवकरात लवकर जाहीर करावे. त्याचप्रमाणे वर्तमानपत्रात असे वाचण्यास मिळाले की, मागील वर्षापासून कृषी खात्याची तरतूद 4.5 टक्क्यांवरुन 2.25 टक्क्यापर्यंत खाली आली आहे. ही वस्तुस्थिती असेल तर ती खेदाची बाब आहे. म्हणून कृषी विभागाची तरतूद 4 टक्के कायम ठेवावयाची असेल तर ती घसरुन चालणार नाही. म्हणून या विभागासाठी भरघोस तरतूद असावी आणि कमी झालेली तरतूद भरुन काढण्यात यावी. त्याचप्रमाणे सेंद्रीय खते हा विषय विद्यापीठांच्या अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट केला जाईल अशाप्रकारचे उत्तर सभागृहात माननीय कृषी मंत्र्यांनी दिले होते. या विषयाचा अभ्यासक्रमात समावेश झाला किंवा त्याचे विषय कशाप्रकारे ठरविले आहेत त्याची माहिती मिळालेली नाही. यासंबंधी माहिती मिळणे आवश्यक आहे. कृषी विषय हा शालेय अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट केला जाईल असे एका तारांकित प्रश्नाला उत्तर मिळाले होते. परंतु याही विषयाचा शालेय अभ्यासक्रमात समावेश झाला किंवा नाही ते समजलेले नाही.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

ॲड.उषा दराडे....

सभापती महोदय, बीड जिल्हयासाठी तुती संकुलासाठी जागा मिळण्याची मागील अनेक वर्षापासून मागणी आहे. हा प्रस्ताव जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे प्रलंबित आहे. तेथे मशिनरी आहे, पैसे आहे, पण काम करता येत नाही अशी परिस्थिती आहे, म्हणून जिल्हाधिकारी, बीड यांना शासनाने ताबडतोब निर्देश द्यावेत. सभापती महोदय, पूर्वी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोकांना व डीआरडीएच्या अंतर्गत येणाऱ्या शेतकऱ्यांना जवाहर विहिरी दिल्या जात होत्या. परंतु मध्यंतरी शासनाने एक जी.आर.काढून आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील लोकांना वगळले आहे. त्यांच्यावर हा अन्याय झाला आहे. सध्या केवळ डीआरडीएच्या अंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांना या विहिरी दिल्या जातात. पूर्वी आर्थिक दुर्बल घटकातील शेतकऱ्यांना या विहिरी दिल्या जात होत्या. त्यामुळे हा जी.आर.रद्द करण्यात यावा अशी मी मागणी करते.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड. उषा दराडे....

हा जी.आर. ताबडतोबीने परत घेऊन शेतक-यांना पूर्ववत विहीरी देणे गरजेचे आहे. शेतीला प्राधान्य देण्याचे केन्द्र शासनाचे निर्देश आहेत. परंतु आपण उद्योगाला प्राधान्य देत आहोत, शेतीला अजिबात प्राधान्य देत नाही. याबाबतीत शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे. सोयाबीन, कापूस आणि गूळ यावरील प्रक्रिया उद्योगासाठी मान्यता दिली जाणार नाही असा महाराष्ट्र शासनाचा जी.आर.आहे. हा जी.आर. ताबडतोब बदलणे गरजेचे आहे. कृषी शाळा काढायच्या असतील तर त्या प्रस्थापितांनाच काढता येतात. याचे कारण म्हणजे त्या संस्थेच्या मालकीची 100 एकर जागा असावी लागते. सर्वसामान्यांना देखील अशा प्रकारच्या शाळा काढता याव्यात यासाठी ही 100 एकर जमिनीची अट रद्द करावी, तसेच या शाळा काढण्यासाठी किरायाने जरी जागा घ्यावी लागत असेल तर तीसुध्दा घेता येईल अशा प्रकरची व्यवस्था करावी.

बाब क्रमांक 77, पान क्रमांक 70. परळी न्यायालयासाठी सिंचन भवनाची इमारत दिलेली आहे. सिंचन भवनाची इमारत न्यायालयाच्या ताब्यात देखील दिलेली आहे. परंतु त्या इमारतीची डागडुजी करणे गरजेचे असून त्यासाठी वित्त विभागाकडे 55 लाख रु.ची मागणी केलेली आहे. ही मागणी करुन एक वर्ष झालेले आहे. परळी न्यायालयामध्ये कर्मचा-यांनाच नाही तर न्यायाधीशांना सुध्दा बसण्यासाठी जागा नाही. तेव्हा वित्त विभागाने ही 55 लाख रु.ची मागणी मंजूर करावी अशी विनंती करते.

बाब क्रमांक 213, पृ.क्र.197. सिव्हील हॉस्पिटल, बीडमध्ये खोकल्याच्या गोळया आणि औषधांचा तुटवडा आहे. मी आपणास जाणीवपूर्वक सांगू इच्छिते की, गोळयांच्या खरेदीच्या बाबतीत आपण लक्ष देण्याची गरज आहे. कारण डयुप्लिकेट गोळया खरेदी केल्या जातात अशी माझी माहिती आहे. 29 जानेवारी 2009 चा एक जी.आर. आहे. त्यानुसार पीएचसीला मेडिकल ऑफिसर म्हणून बीएएमएस आणि एमबीबीएस झालेल्या डॉक्टरांची नेमणूक करण्यात येते. परंतु युनानी डॉक्टरांची मेडिकल ऑफिसर म्हणून नेमणूक करण्यात येत नाही. बीड जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी युनानीचे डॉक्टर्स असून जागा रिक्त आहेत. तेव्हा 29 जानेवारी 2009चा जी.आर. दुरुस्त करुन बीएएमएस आणि एमबीबीएस डॉक्टर्स बरोबरच युनानीच्या डॉक्टरांची देखील मेडिकल ऑफिसर म्हणून नेमणूक करावी अशी मी विनंती करते. पीएचसी सिरसाळा आणि पीएचसी,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड. उषा दराडे....)

पाहोनेर, तालुका परळी यांचे बांधकाम ताबडतोबीने करणे गरजेचे आहे. सभापती महोदय, आपण बेल वाजविल्यामुळे मी फक्त महत्वाचे एक दोन मुद्दे मांडते.

बाब क्रमांक 144, पान क्रमांक 142.देवपळ वनबावडी, ता. केज, जिल्हा बीड याठिकाणी एमआयडीसीचा सर्व्हे केलेला आहे. लिंबाची वाडी याठिकाणी 2 साठवण तलाव आहेत. लोकर वाडी येथे एक साठवण तलाव आहे. त्यामुळे केज तालुका आणि बीड जिल्हयाचा विकास होण्याची शक्यता आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय सभागृहामध्ये आलेले असल्यामुळे मी सभागृहाची माफी मागून एका मुद्याची पुनरावृत्ती करीत आहे. ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी शाळा द्यावयाच्या नाहीत असा नकारात्मक जी.आर.आहे. सदरहू जी.आर दुरुस्त करण्याची फाईल माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर प्रलंबित आहे. त्या फाईलवर त्यांनी सही करावी अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, शालेय शिक्षणाच्या संदर्भात सर्वांनीच मागणी केल्याप्रमाणे उच्चमाध्यमिकचा "कायमचा" शब्द काढून टाकण्यात यावा. परळी तालुक्यातील शाळांच्या परिस्थितीच्या संदर्भात आपण वेगळी बैठक घेतली तर त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, त्यांचा पोषण आहार, शाळेच्या इमारती हे प्रश्न मार्गी लागतील. बीड जिल्ह्यामध्ये दहावी आणि बारावीच्या परीक्षेच्या वेळी कॉपी करण्याचा प्रकार मोठया प्रमाणावर होतो. याला आळा घालण्यासाठी काय करता येईल ते आपण पहावे.

बाब क्रमांक 72, पान क्रमांक 60. बीडमध्ये स्टेडियममध्ये क्रीडास्पर्धा घेतल्या त्यावेळी खेळाडूंच्या जेवणात अळया आढळून आल्या. याबाबतीत संबंधिताविरुध योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

जलसंपदा विभागाच्या संदर्भात अत्यंत महत्वाच्या मागण्या अनेक वर्षापासून या ठिकाणी केल्या जात आहेत. गोदावरीचे पाणी माजलगाव धरणामध्ये टाकणे आणि माजलगाव धरणातून ते वान धरणामध्ये आणि मांजरा खो-यात टाकण्यासंबंधीची अनेक वर्षापासूनची मागणी आहे. ही मागणी लवकरात लवकर पूर्ण करावी. वंजारवाडी, ता. परळीच्या आणि वाघेबाभळगाव,ता.केज या धरणाची उंची वाढवावी. कासारी, बुटेनाथ कपिलदार या ठिकाणी ताबडतोबीने साठवण तलाव करावेत. मैंदवाडी,सारुकवाडी देवपळ वडमावली, काळेगाव,हनुमान गड, मांडवा, सारुकवाडी,

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ॲड. उषा दराडे...)

दौंडवाडी, लेंडेवाडी या तलावांच्या संदर्भात सकारात्मक भूमिका घेऊन सिंचनाचा अनुशेष दूर करण्याचा शासनाने प्रयत्न करावा अशी मी शासनाला विनंती करते आणि सर्व पुरवणी मागण्यांना पाठिंबा देऊन माझे भाषण संपविते.

-----

...नंतर श्री. भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, कृषि, पदुम विभागासाठी बाब क्रमांक 62, पृष्ठ क्रमांक 49 वर 15 कोटी रुपयांची पुरवणी मागणी सादर केली आहे. राज्यात नुकत्याच झालेल्या फयान चक्रीवादळामुळे ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या चार जिल्हयातील मच्छिमारांचे प्रचंड नुकसान झाले. त्यांना द्यावयाच्या आर्थिक मदतीसाठी भरीव तरतूद करणे आवश्यक आहे. फक्त 15 कोटी रुपयांची तरतूद ही अत्यंत अपुरी वाटते. किमान 50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी अशी मी शासनाला सूचना करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 213, पृष्ठ क्रमांक 197 वर 2210 वैद्यकीय सेवा या लेखा शिर्षाखाली सार्वजनिक आरोग्य विभागाची पुरवणी मागणी सादर करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने स्वाईन फ्लूबाबत चांगल्याप्रकारे काम केले. इतकेच नव्हे तर ही साथ आटोक्यात आणून लोकांना दिलासा मिळावा यादृष्टीने भरीव असे कार्य केले आहे. आज मुंबई शहरामध्ये सातत्याने लोकसंख्या वाढत आहे. सेंट जॉर्जेस रुग्णालय व जेजे रुग्णालय ही दोन मोठी सरकारी रुग्णालये अग्रक्रमाने समोर येतात. परंतु सध्याच्या परिस्थितीत रुग्णसेवेच्या बाबतीत ही दोन्ही रुग्णालये कमी पडत आहेत. मुंबईच्या उपनगराची लोकसंख्या विचारात घेता उपनगरामध्ये मोठे सरकारी रुग्णालय असणे ही आवश्यक बाब झाली आहे. या संदर्भात मी राज्याच्या आरोग्यमंत्र्यांना यापूर्वीच पत्र दिलेले आहे. मुलुंड येथे असलेले राज्य कामगार विमा योजनेचे रुग्णालय सध्या बंद अवस्थेत आहे. त्या रुग्णालयाची एकूण 13 एकर जमीन उपलब्ध आहे. त्यामुळे पूर्व उपनगरामध्ये मुलुंड येथे मोठे शासकीय रुग्णालय उभे करावे अशी मी शासनाला विनंती करते आणि मला हे दोन मुद्दे मांडण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपविते.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (ठाणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2009-2010 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 2, पृष्ठ क्रमांक 5 वर बोलत असताना राज्यात आणि ठाणे जिल्हयात मोठया प्रमाणात मतदार याद्यांमध्ये गोंधळ झालेला पहावयास मिळतो. यामुळे शासनाचे पैसे वाया जातात. अपुरे पत्ते, मतदारांच्या वयातील तफावत, फोटोमधील अदलाबदल असे अनेक प्रकारचे गोंधळ मतदार यादीमध्ये दिसून येतात. त्यामुळे निर्दोष मतदार यादी निर्माण करण्याच्या दृष्टीने शासनाने लक्ष द्यावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 3, पृष्ठ क्रमांक 6 वर मला सांगावयाचे आहे की, लोकसेवा आयोगाच्या परीक्षा आणि निकाल याचे टाईमटेबल असणे आवश्यक आहे. लोकसेवा आयोगाकडून परीक्षा घेतल्या जातात परंतु अनेक महिने त्या परीक्षांचे निकाल जाहीर होत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे भवितव्य व भविष्यातील नियोजन करणे अवघड जाते. विद्यार्थी सतत चिंतेत असतात. महाराष्ट्र व केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची पूर्वतयारी करण्यासाठी विभागवार प्रशिक्षण केंद्र, मार्गदर्शन केंद्र शासनाने सुरु केले तर निश्चितपणे महाराष्ट्रातील हुशार तरुणांना एमपीएससी व युपीएससी परीक्षांमध्ये चांगले यश प्राप्त करता येईल. ठाणे येथे सी.डी.देशमुख प्रशिक्षण केंद्रातून गेल्या दहा वर्षात 38 विद्यार्थ्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेमध्ये यश प्राप्त केले व आज हे विद्यार्थी आयएएस व आयपीएस पदावर कार्यरत आहेत.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 8, बाब क्रमांक 8 राष्ट्रपुरुषांचे पुतळे उभारण्यासाठी पूरक मागणी सादर केली आहे. संगमेश्वर येथे संभाजी महाराजांचे स्मारक उभारण्याचा पाच वर्षापूर्वी निर्णय झाला. संभाजी महाराजांना पकडले त्या ठिकाणची आठवण म्हणून ज्या संभाजी महाराजांनी आपला पराक्रम संपूर्ण देशाला दाखवून दिला त्याची आठवण म्हणून त्यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु त्या स्मारकाची स्थिती अत्यंत वाईट होती. आम्ही पाठपुरावा केल्यानंतर शासनाने तिकडे लक्ष दिले. ते स्मारक म्हणजे जुगाराचा अड्डा झाला होता.

4जी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .......

ते स्मारक उभारण्यासाठी जो निधी लागेल तो देऊन तातडीने उभारले पाहिजे आणि असे स्मारक उभारुन लोकांसमोर तसेच विद्यार्थ्यांच्या समोर एक आदर्श म्हणून कायम स्वरुपी आठवण राहील अशी व्यवस्था केली पाहिजे.

यानंतर बाब क्र 265 - पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या मागणीच्या अनुषंगाने माझी अशी सूचना आहे की, मराठी चित्रपट सृष्टीला शासन प्रोत्साहन देते ही चांगली गोष्ट आहे. परंतु राष्ट्रपुरुषांची आठवण रहावी म्हणून राष्ट्रपुरुषांच्या नावाने चित्रपट काढण्यासाठी सुध्दा निधी देण्याबाबत विचार करावा व आवश्यक ते अनुदान द्यावे अशी मागणी करतो.

महोदय, बाब क्र. 48, पृ.क्र. 39, महसूल विभागाच्या पूरक मागणीच्या अनुषंगाने मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, सभागृहात फयानच्या संदर्भात चर्चा झाली व त्या चर्चेला उत्तर देताना माननीय महसूल मंत्र्यांनी अनेक घोषणाही केल्या. त्यावेळेस मी मागणी केली होती आणि मंत्री महोदयांनी सुध्दा त्याला दुजोरा दिला होता की या वादळामध्ये तसेच त्यानंतर झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक शाळा व कॉलेजेसचे पत्रे व भिंती पडल्या. मागील वेळेस शासनाने मदत करावी अशी मागणी देखील करण्यात आली होती. आपत्तीत नुकसान झालेल्या घरांसाठी शासन मदत करते परंतु ज्या संस्थांचे, कॉलेजेसचे नुकसान होते त्यांनी काय पाप केले हे समजत नाही. त्यांना मदत दिली जात नाही. अशा संस्थांच्या शाळा कॉलेजेसचे नुकसान झाले असेल त्यांनाही नुकसान भरपाईपोटी अनुदान मिळावे. माननीय महसूल मंत्र्यांना मी विनंती केली असता ते मला अशा शाळांची यादी सादर करा असे म्हणाले त्यादृष्टीने विचार व्हावा अशी मी विनंती करतो.

महोदय यानंतर बाब क्र. 73, पान क्र. 61 क्रीडा विभागाच्या संदर्भात बोलत असताना जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या खेळाडूंना गरज असते त्यावेळेस जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडून प्रशस्ती प्रमाणपत्रे दिली जात नाहीत त्यामुळे त्यांना कॉलेजेसमध्ये ॲडमिशन घेताना अडचणी येतात तसेच त्याचा फायदाही त्यांना होत नाही. म्हणून अशा खेळाडूंचा योग्य वेळेत सन्मान करुन त्यांना असे प्रमाणपत्र देण्याबाबत सूचना कराव्यात. कारण ते आपल्या जिल्ह्याचा, राज्याचा तसेच राष्ट्राचाही दर्जा वाढविण्याचे काम करतात. तसेच सर्वांचे वेतन व भत्ते आपण वेळोवेळी वाढवितो परंतु निरनिराळ्या खेळाडूंना जे भत्ते मिळतात ते अत्यंत कमी आहेत, त्यात वाढ करण्याच्या संदर्भात मात्र दुर्लक्ष केले जाते. म्हणून हे भत्ते वाढविले पाहिजेत.

....2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

महोदय, यानंतर बाब क्र. 213, आरोग्य विभागाच्या पूरक मागणीच्या अनुषंगाने माझी अशी मागणी आहे की, स्वाईन फ्लू साठी विविध उपाययोजना शासन करते. या निमित्ताने मी लक्षात आणून देऊ इच्छितो की आज देखील नागपूरात दोन स्वाईन फ्लू चे रुग्ण आढळून आल्याचे मी वर्तमानपत्रातून वाचले. आपल्याला माहीत नाही की भविष्यात याची गरज कुठे कुठे लागणार आहे म्हणून या रोगाच्या रक्ताच्या तपासणीसाठी जे पाच-सहा दिवस लागतात त्यामुळे अनेक रुग्ण ट्रिटमेंटअभावी दगावतात. या निमित्ताने माझी अशी सूचना आहे की, प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी किमान विभागाच्या ठिकाणी अत्याधुनिक लॅबची निर्मिती करावी, जेणेकरुन त्याचा कायमस्वरुपी पुढील काळात उपयोग होईल.

सभापती महोदय, बाब क्र. 218, पान क्र. 203 वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या संदर्भात मला अशी सूचना करावयाची आहे की, ठाण्यात एकमेव असलेले राजीव गांधी महाविद्यालय सुरु झाले त्यावेळेस असा ठराव झाला होता की, या महाविद्यालयातील प्राध्यापकांना शासनाच्या धोरणानुसार व नियमानुसार वेतन भत्ते दिले जातील. परंतु दुर्दैवाने या महाविद्यालयातील प्राध्यापकांना अनेक आंदोलने करावी लागली, निवेदने द्यावी लागली आणि आजही त्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार सुध्दा वेतन व भत्ते मिळत नाहीत अशी स्थिती आहे. म्हणून माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, ठाणे महानगरपालिकेला निर्देश द्यावेत जेणेकरुन वेतन व भत्ते या प्राध्यापकांना मिळतील.

यानंतर जलसंपदा विभागाच्या बाब क्र. 120, पान क्र. 125, 2711-पूर नियंत्रण व जल नि:सारण या माध्यमातून जलनि:सारण योजनांच्या परिरक्षण व दुरुस्तीच्या कामासाठी ही मागणी करण्यात आली असून शासनाने नद्यांच्या विकासाच्या बाबतीत प्राधिकरण केले त्यावेळेस आमच्या वालधुनी नदीबाबतची सूचना केली असता वालधुनी नदीच्या विकासासाठी केवळ एक समिती नेमली असून त्या समितीच्या फक्त दोनच बैठका आतापर्यंत झाल्या. माझी मागणी अशी आहे की, वालधुनी नदीच्या विकासासाठी देखील शासनाने प्राधिकरण स्थापन करावे व आवश्यक निधीची व्यवस्था करावी, अशी सूचना करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : आता सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी आपले विचार मांडण्यास सुरवात करावी.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, मैंने कई बार आपका ध्यान आकर्षित किया है, लेकिन मेरा नम्बर नहीं आ रहा है. मुझे बोलने नहीं दिया जा रहा है.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे का भाषण होने के बाद आपको बोलने का अवसर दिया जाएगा.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, आप मुझे बोलने का अवसर नहीं दे रहे हैं. मैं सिर्फ नाम के लिए विधान परिषद सदस्य हूँ. मेरा कोई साथ नहीं देता है. इसलिए मैं सभात्याग करता हूँ.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे के भाषण के बाद मैंने आपको बोलने के लिए कहा है.

(सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी ने सभात्याग किया)

. . . 4 H 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, कृषी व जलसंधारण आणि रोजगार हमी योजनेच्या संदर्भात मी माझे विचार मांडणार आहे. बाब क्रमाक 55, पृष्ठ क्रमांक 46 मध्ये मोसंबी पिकाच्या नुकसानीसाठी व्यवस्था करण्यात आलेली आहे. खासकरुन जालना जिल्हयासाठी अनुदानही देण्यात आलेले आहे. विदर्भामध्ये अधिवेशन सुरु आहे. हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर संत्री आणि मोसंबी पिकाचे जे नुकसान झालेले आहे त्याबद्दल अनुदान मिळावे अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, महसुल व पुनर्वसन विभागाच्या संदर्भात बाब क्रमांक 43 मध्ये "आत्महत्या केलेल्या शेतक-यांना सहाय्य" असा उल्लेख आहे. मी आपले लक्ष वेधू इच्छितो की, वर्षानुवर्षे आपत्तीग्रस्तांना तसेच ज्या शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या असतात त्यांच्या कुटुंबाना मदत दिली जात असते. विविध कुटुंबामध्ये विविध प्रकारची परिस्थिती असते. आपण पाहिले आहे की, भूकंप आणि वादळानंतर आपदग्रस्तांना एकदम लाखांची मदत मिळते. परंतु हा पैसा आल्यानंतर त्या कुटुंबाच्या रचनेत एकदम फरक पडतो. त्यामुळे माझी अशी सूचना आहे की, शासन पुनर्वसनाच्या संदर्भात जी काही वेगवेगळी पॅकेजेस देते त्यासंदर्भात आपदग्रस्तांना मदत देतांना एक खास असे धोरण आखण्याची गरज आहे. युएनडीपी आणि युनायटेड नेशन यांच्या यासंदर्भात विविध गाईडलाईन्स असून त्यामध्ये मार्गदर्शक तत्वप्रणाली अधिका-यांनी समजून घ्यावी व त्यासंदर्भात प्रशिक्षण द्यावे मला वाटते. अन्यथा भूकंपानंतर मोठया प्रमाणात पैसा आल्यानंतर चुकीच्या पध्दतीने पैशांची विल्हेवाट लागते त्यामुळे असे होऊ नये यासाठी अधिका-यांना प्रशिक्षण देऊन त्याची माहिती आपदग्रस्तांना दिली तर त्या पैशाची चुकीच्या पध्दतीने विल्हेवाट लागणार नाही. महाराष्ट्रामध्ये आतापर्यंत जे घडले नाही त्यासंदर्भात मला असे वाटते की, पुनर्वसनाच्या पॅकेजेसमध्ये कुटुंबाना मार्गदर्शन करणारे धोरण शासनाने आखण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 49 च्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. याबाबीच्या संदर्भात आपत्तीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. मला अतिशय खेद होतो की, शुक्रवारी 11 डिसेंबर, 2009 रोजी कोयनेची भूकंप मापक यंत्रणा निकामी झालेली असल्यामुळे मी त्यासंदर्भात अशासकीय ठरावावर माझे विचार मांडणार होते व हा ठराव मांडण्यासाठी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. चंद्रकांत पाटील )

डॉ. नीलम गो-हे ....

आपली परवानगी पाहिजे होती परंतु सर्वांनी विनंती केल्यामुळे मला शांत रहावे लागले, मी अजूनही या अशासकीय ठरावाच्या संदर्भात ऑनलेग आहे. शनिवार दिनांक 12 डिसेंबर रोजी कोयनेच्या परिसरात 5.1 रिस्टर स्केलचा भूकंप झाला. त्यावेळी दीड ते दोन तास कोयनानगर मध्ये किती नुकसान झाले याची माहिती मिळत नव्हती. या ठिकाणी जी डिजीटल यंत्रणा आहे ती सुरु असली तरी ती यंत्रणा चालविणा-या कर्मचा-यांना तशा प्रकारचे प्रशिक्षण मिळालेले नाही. कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि मुंबई पर्यंत या भुकंपाचे धक्के बसलेले आहेत. त्यामुळे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे की, अजून फार मोठी आपत्ती येण्याची वाट न पाहता आपण लातूरच्या भूकंपातून धडा शिकलो पाहिजे. कोयना नगरवर भूकंपाची जी टांगती तलवार आहे त्यासंदर्भात माझी स्पेसिफिक मागणी आहे की, कोयना नगर परिसराचा आणि लातूरचा आढावा घेण्यासाठी शासनाने सहआयुक्त दर्जाचा अधिकारी नेमण्याची आवश्यकता आहे. कारण लातूर येथील भूकंप मापक यंत्रणा बंद पडलेली आहे. दर वेळेला 30 सप्टेंबरच्या सुमारास भूकंपाचे धक्के बसत असतात. कोयनेला तर एक लाखापर्यंत छोटे-मोठे धक्के बसून गेलेले आहेत. जिल्हाधिकारी स्तरावर आपत्ती निवारण आराखडा करण्यात आलेला आहे असे शासनाकडून सांगण्यात येते परंतु हा आराखडा पुरेसा नाही. यासाठी राजकीय इच्छाशक्ती याच्या पाठीमागे उभी राहण्याची गरज आहे.

सभापती महोदय, पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभाग हा माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे होता तोपर्यंत माननीय मुख्यमंत्र्यांचे या विषयाकडे बरेचसे लक्ष असायचे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे .....

परंतु आता मला असे दिसून येत आहे की,पूर्वीच्या घोषणांकडे दुर्लक्ष केले जात आहे. सन्माननीय मुख्यमंत्री सांस्कृतिक कार्य मंत्री म्हणून काम करीत असतांना ज्या घोषणा करण्यात आल्या होत्या त्याचे पुढे काय झाले आहे ? याची कोणालाही माहीत नाही. सातत्याने आम्ही वृत्तपत्रातून असे वाचत आहोत की,शासन सांस्कृतिक धोरण जाहीर करणार आहे. यासाठी शासनाने कोणाला विश्वासात घेतले आहे, कलाकारांशी सुसंवाद साधला गेला आहे काय, त्यासाठी या विषयाच्या अभ्यासकांकडून काही माहिती घेण्यात आली आहे काय , यासबंधीची माहिती माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावी. अनेक कलाकारांनी आपत्तीमुळे तसेच आजाराला कंटाळून कोल्हापूरमध्ये आत्महत्या केल्या आहेत. तेव्हा सांस्कृतिक धोरण जाहीर करणार आहात म्हणजे नेमके काय करण्यात येणार आहे हया बाबतीत माननीय मंत्र्यांनी खुलासा करावा अशी मी या निमित्ताने विनंती करते.

सभापती महोदय, यानंतर मला बाब क्रमांक 265 सबंधी बोलावयाचे आहे. दर्जेदार मराठी चित्रपटासाठी 10 लाख रुपया ऐवजी 20 लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, जे जुने हिंदी चित्रपट आहेत ते रंगीत करण्यात आले होते त्याप्रमाणे मराठी जुने चित्रपट जर एखाद्या दिग्दर्शकाला वा निर्मात्याला रंगीत करावयाचे असतील तर त्याच्या पुनर्निर्मितीसाठी देखील अनुदान देण्याची व्यवस्था झाली पाहिजे अशी मला या निमित्ताने शासनाला विनंती करावयाची आहे. असे करण्यात आल्यामुळे जुन्या मराठी चित्रपटाचे जतन करता येऊ शकेल

सभापती महोदय, यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाची बाब क्रमांक 212,213,214 संबंधी मला बोलावयाचे आहे. स्वाईन फ्ल्युच्या नियंत्रणासाठी शासनाने ही पूरक मागणी केलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे या रोगावरील व्हॅक्सीन पुढील वर्षभरामध्ये येणार आहे.परंतु हे व्हॅक्सीन उपलब्ध झाल्यानंतर वैद्यकीय सेवेत काम करणारे डॉक्टर्स, नर्सेस व सेवक इत्यादीसाठी ते प्रथम देण्यात आले पाहिजे जेणेकरुन स्वाईन फल्यूच्या धोकयापासून त्यांचे संरक्षण करता येईल. या संदर्भात जिल्हानिहाय आढावा घेण्यात येऊन स्वाईन फ्ल्युचे व्हॅक्सीन प्रत्यक्षात कसे उपयोगात आणले जाईल या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे .....

सभापती महोदय, यानंतर ग्राम विकास विभागाची बाब क्रमांक 158 पान नंबर 150 संबंधी मला बोलावयाचे आहे. मागासवर्ग क्षेत्र विकास निधीच्या संदर्भात येथे उल्लेख करण्यात आला आहे. केन्द्र सरकारकडून हा निधी आला असून त्याबाबतीतही सुसूत्रीकरण करणें गरजेचे आहे. गेल्या तीन वर्षापासून मराठवाडा,विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रातील बारा जिल्हयांना हा निधी मिळत असतो. त्यामध्ये वेगवेगळी विभागीय आयुक्तालये असल्यामुळे हा निधी पुरेशा प्रमाणात खर्च झालेला नाही. ज्या ठिकाणी कुपोषण होत आहे त्या ठिकाणी जर मोठया प्रमाणावर या निधीचा वापर करण्यात आला तर केन्द्र सरकारकडून अजूनही निधी मिळू शकेल असे मला वाटते तेव्हा त्या दृष्टीने हा निधी त्या भागात जास्तीत जास्त खर्च करण्यात यावा असे मला शासनाला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, ग्राम विकास विभागाच्या मागण्या क्रमांक 177 ते 202 सबंधी मला बोलावयाचे आहे . इंदिरा आवास योजनेसाठी त्या पूरक मागणीमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. ही बाब निश्चितपणें स्वागतार्ह आहे. परंतु ज्या कुटुंबामध्ये महिला कुटुंब प्रमुख आहेत, ज्या महिला विधवा आणि परित्यक्त्या आहेत त्यांनासुध्दा घरे मिळणे आवश्यक आहे.या संदर्भात शासनाने वेळोवेळी जी पावले उचलली आहेत त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर निर्णय घेण्यात आलेले आहेत परंतु त्या संदर्भात ग्राम विकास विभागाकडून किंती प्रमाणात अंमलबजावणी होत आहे याचा आढावा घेऊन निराधार महिलांना घर मिळणे आवश्यक आहे याकडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण, फलोत्पादन, पर्यटन विभागाच्या मागण्यांसबंधी मला बोलावयाचे आहे. बाब क्रमांक .219 आणि 220 मध्ये आयुर्वेद महाविद्यालयासाठी तरतूद करण्यात आली आहे.त्याबद्दल मी शासनाचे आभार मानते. मी स्वत: पोदार आयुर्वेदिक महाविद्यालयातून पदवी घेतली आहे. या महाविद्यालयाची सध्याची जी स्थिती आहे त्यात मोठया प्रमाणावर सुधारणा करणे गरजेचे आहे.राज्यामध्ये खाजगी ट्रस्टसुध्दा सेवा भावनेतून अनेक आयुर्वेदिक महाविद्यालये चालवत आहेत त्यांना देखील आधुनिकीकरणासाठी अधिकचे अनुदान देण्याच्या बाबतीत शासनाने विचार करावा अशी मला शासनाला विनंती करावयाची आहे.

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे .....

सभापती महोदय, यानंतर पर्यटन विभागा सबंधी मला बोलावयाचे आहे. या निमित्ताने मला माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की, शेगावच्या विकास आराखडयाच्या बाबतीत पुढे काय प्रगती झाली आहे ?अधिवेशन सुरु होऊन दहा दिवस होत आलेले आहेत तरी देहू, आळंदी, तुळजापूर,पंढरपूर यांच्यासाठी जे कोटयावधी रुपये दिले होते त्या निधीतून कोणती कामे झाली आहेत आणि शेगावच्या विकास आराखडयाच्या संदर्भात पुढे काय प्रगती झाली यासबंधी विधिमंडळाच्या अधिवेशनात लक्ष वेधण्यात आले नाही. मांढरदेवी येथे दुर्घटना घडल्यानंतर श्री. राजन कोचर याच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने ज्या सूचना केल्या होत्या त्या सूचनांची अंमलबजावणी प्रत्यक्षात झाली पाहिजे असे मला या चर्चेच्या निमित्ताने शासनाला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय,सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाची बाब क्रमांक 146 सबंधी मला बोलावयाचे आहे.प्राथमिक संस्थांना हातमाग कापडावर रिबेट देण्यासाठी शासनाने अनुदान देण्याचे ठरविले असून ही अत्यंत चांगली गोष्ट आहे . परंतु ही दुकाने चालविणा-याची अवस्था अत्यंत वाईट आहे. त्यांचे जागासंबंधीचे करार संपलेले आहेत. त्या दुकानातून विक्रीच्या व्यवस्थेसंबंधी जर त्यांना सहकार्य केले नाही आणि आधुनिकीकरण केले नाही तर ग्राहक त्या दुकानात माल विकत घेण्यासाठी जाणार नाहीत. म्हणून सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागाने या संदर्भात योग्य ती भूमिका स्वीकारावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते. धन्यवाद. जय महाराष्ट्र.

----

श्री.अरविंद सावंत :सभापती महोदय, देहू आळंदीच्या संदर्भात जी मागणी करण्यात आलेली आहे त्यासंबंधी अधिकृत घोषणा करण्यात यावी .संत तुकाराम महाराजांच्या 400 व्या पुण्यतिथीचे हे वर्ष असल्यामुळे शासनाने देहू गावच्या विकासाबाबत विचार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

नंतर श्री.सुंबरे

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेऊन मी ज्या बाबींवर बोलणार आहे त्यातील बाब क्र.63, पृ.क्र. 58 यावर मी प्रथम बोलणार आहे. सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाची ही बाब असून या ठिकाणी शिक्षकांच्या वेतनासाठी जवळजवळ 3 हजार कोटीची तरतूद केलेली आहे. सभापती महोदय, शासनाकडून जे काही अनुदान येते तेही संबंधित शाळांना वेळेवर दिले जात नाही. आमची अडचणी अशी असते की, एक तर शासनाकडून लवकर अनुदान मिळत नाही आणि मिळालेच तर संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी ते अनुदान संबंधित शाळांना देत नाहीत. हे अनुदान शाळांना, शिक्षकांना न देण्याचे कारण असे आहे की, त्या ठिकाणी विनाअनुदानित तुकड्या असतात त्या अनुदानावर आल्यानंतर म्हणजे मान्यता देताना प्रत्येक शिक्षकाकडून 50 हजार ते 1 लाख रूपये मिळाल्याशिवाय त्या शिक्षकांच्या पदांना मान्यता दिली जात नाही तसेच आलेले अनुदान देखील दिले जात नाही. या संदर्भात मी आमच्या ठाणे जिल्ह्याचे उदाहरण सांगू इच्छितो. ठाणे जिल्ह्यातील तुकड्यांचे अनुदान आले पण संबंधित शाळांना आणि शिक्षकांनी पैसे दिले नाहीत म्हणून संबंधित शाळेचे अनुदान 31 मार्च ला शासनाला सरेंडर झाले. शासनाला ते पैसे परत गेले पण त्या शाळेला अनुदान दिले गेले नाही, त्यातील शिक्षकांना वेतन मिळालेले नाही. ही अत्यंत गंभीर बाब आहे. सभापती महोदय, सध्या सहावा वेतन आयोग मंजूर झाल्यानंतर वेतन निश्चिती सुरू आहे. पण प्रत्येक शिक्षकाची वेतन निश्चिती करताना एका एका शिक्षकाकडून हजार ते बाराशे रूपये घेतले जातात आणि पैसे दिल्याशिवाय त्या ठिकाणी स्टँम्पिंग केले जात नाही. आज रायगड आणि ठाणे जिल्ह्यामध्ये किमान 50 लाख रूपयांची उलाढाल होणार आहे आणि या संबंधीचे पत्र मी चार महिन्यांपूर्वी विभागाच्या सचिव महोदयांना दिले पण त्यांच्याकडून मला काहीही उत्तर अद्याप आलेले नाही वा त्या संबंधात कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यामुळे आजही आमच्या या दोन्ही जिल्ह्यांमध्ये सर्रासपणे हजार-हजार, बारा-बाराशे रूपये प्रत्येकाकडून घेऊन वेतन निश्चिती सुरू आहे. तेथील संघटनेने तेथे आंदोलन केले तरीही फरक पडलेला नाही. सभापती महोदय, मी स्वत: या संबंधात त्या लेखा अधिकाऱ्यांशी बोललो. आमदार म्हणून मी त्यांच्याशी बोललो नाही तर शाळेच्या माध्यमातून मी बोललो की आमच्या शाळेची वेतन निश्चिती करायची आहे तर मी कधी येऊ ? त्यासाठी काय कागदपत्रे आणली पाहिजेत वगैरे. तर मला सांगण्यात आले की, यासाठी सगळी

..... 4जे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते ....

संबंधित कादपत्रे घेऊन या आणि सोबत प्रत्येक शिक्षकामागे बारा-बाराशे रूपये घेऊन या असा निरोप मला दिला गेला. या साऱ्याचे मी रेकॉर्ड करून ठेवले आहे, हवे तर मी ते सारे या सभागृहात देखील वाजवून दाखविण्यास तयार आहे. बारा-बाराशे रूपये दिल्याशिवाय वेतन निश्चिती होणार नाही अशा प्रकारचे विधान संबंधित अधिकारी करीत आहेत. ही अत्यंत गंभीर बाब आहे. या सगळ्या बाबींची चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, विना अनुदानित सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी, निवडश्रेणी साठी ग्राह्य धरली जाते. या बाबतीत माध्यमिक शाळा आणि माध्यमिक शिक्षकांचा विचार केला गेला. पण प्राथमिक शिक्षकांचा अद्यापही विचार केला गेलेला नाही. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा विचार झालेला नाही. उच्च माध्यमिक शिक्षकांचा देखील विचार झालेला नाही. एकदा एक धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर त्या क्षेत्रातील काम करणाऱ्या सगळ्यांसाठी लागू होणे आवश्यक आहे. तेव्हा या बाबतीतही विचार होणे आवश्यक आहे. अध्यक्ष महाराज, मी आता जो विषय मांडला आहे की, भ्रष्टाचार कसा होतो, शिक्षकांना कसे अडविले जाते, मग ते शाळांचे मूल्यांकन असेल, तुकड्यांचे मूल्यांकन असेल, वैयक्तिक मान्यता असेल, या अत्यंत गंभीर बाबी आहेत की ज्यामध्ये भ्रष्टाचार होतो आहे. अनेक संस्थांना आणि त्यातील शिक्षकांना नाहक या अधिकाऱ्यांकडून अडविले जाते. आमची प्रकरणे शासनाकडे आहेत, आम्ही तक्रारी केल्या आहेत पण त्यांची दखल घेतली जात नाही. ती दखल घेण्याची या निमित्ताने माझी आपल्याला आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 66, पृ. 59 - सध्या शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळांमध्ये पायाभूत पदांमध्ये वाढ झाली तर त्यास शासनाची मान्यता मिळाल्याशिवाय त्या शिक्षकांना मान्यता मिळत नाही, त्याचे वेतन शासनाकडून मिळत नाही. या ठिकाणी 3 पदांसाठी 5 लाख 40 हजार रूपयांचे अनुदान मंजूर केलेले आहे. या संबंधात विषय असा आहे की, ही केवळ 3 पदेच का ? या राज्यामध्ये 2005-06, 2006-07, 1007-08 आणि 2008-09 या चार वर्षांची पदे अद्यापही मंजूर झालेली नाहीत. मला या बाबत अतारांकित प्रश्नाला उत्तर देताना सांगितले गेले आहे की, 940 माध्यमिकची पदे, 777 उच्च माध्यमिकची म्हणजे अकरावी, बारावीची पदे गेल्या चार वर्षांपासून शासनाकडे प्रलंबित आहेत. ..

( यानंतर श्री. सरफरे .... 4के 1 ...

श्री. रामनाथ मोते...

ती पदे बाजूला ठेऊनकेवळ या तीनच पदांना अनुदान कां दिले? आपल्याकडील पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदे आहेत त्यांना आपण केव्हा मान्यता देणार? केवळ शासनाने मान्यता न दिल्यामुळे या शिक्षकांना वेतन मिळाले नाही. हे सर्व शिक्षक अनुदानित शाळांमध्ये काम करतात, अनुदानित तुकडयांवर काम करतात. चार-चार वर्षे झाली तरी त्यांना पगार दिला जात नाही. अनेक शिक्षकांची लग्ने झालेली नाहीत. लग्न झालेल्या शिक्षकांचे संसार उध्वस्त झाले, याची दखल शासन घेणार आहे की नाही? ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, पायाभूत पदांना त्याच वर्षीपासून मान्यता दिली जाते. परंतु त्यांनी मागील चार-पाच वर्षापासून केलेल्या सेवेचा कोणत्याही प्रकारचा मोबदला किंवा लाभ त्यांना मिळत नाही. याबद्दल शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, शिक्षण संचालकांनी दिलेल्या प्रस्तावाच्या आधारे मान्यता दिली जात असेल तर शासनाकडे मान्यतेचे प्रस्ताव येण्याची आवश्यकता काय? याबाबतीत अधिकाराचे विकेंद्रीकरण करुन संचालकांना किंवा आपण ठरवाल त्या अधिकाऱ्याला अधिकार द्यावेत. आणि अधिकाऱ्यांनी तपासणी करुन त्या त्या वर्षाची मान्यता द्यावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 74 व पृष्ठ क्रमांक 61 मध्ये माध्यमिक स्तरावरील अपंगांच्या एकात्मिक शिक्षणासाठी 10 कोटी 17 लाख रुपयांची तरतूद केली आहे. प्राथमिक स्तरावरील अपंग एकात्मिक योजना आता माध्यमिक स्तरावर हस्तांतरीत केली आहे. आतापर्यंत याकरिता केंद्र सरकारकडून निधी मिळत होता. केंद्र सरकारने गेल्या आठ महिन्यापासून हे अनुदान बंद केले असल्यामुळे हे अनुदान राज्य शासनाने दिले पाहिजे. आणि त्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या जवळ जवळ 528 शिक्षकांना गेल्या आठ महिन्यापासून वेतन मिळाले नाही. त्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. त्यामध्ये काही अपंग, अंध शिक्षक आहेत. त्यांचे शिष्टमंडळ शासनाला येऊन भेटले. मंत्रिमहोदयांना भेटले, सचिवांना भेटले. त्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला. म्हणून गेल्या आठ महिन्यापासून विशेष शाळांमध्ये काम करणाऱ्या 528 शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न तातडीने सोडविणे आवश्यक आहे.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 65,बाब क्रमांक 75 व 76 मध्ये नगर विकास विभागाचा प्रश्न आहे. राज्य शासनाने सर्व क्षेत्रामध्ये सहावा वेतन आयोग लागू केला. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व महाविद्यालयांना सुध्दा लागू केला. परंतु महानगरपालिकांच्या किंवा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. रामनाथ मोते...

नगरपालिकांच्या शाळांना अद्यापही सहावा वेतन आयोग लागू करण्याचा जी.आर. न निघाल्यामुळे त्याचा त्यांना लाभ मिळाला नाही, त्याबाबत विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 163 बाब क्रमांक .176 मध्ये अपंगाच्या शाळांसाठी विशेष अनुदान मंजूर करण्यात आले आहे. परंतु त्या शाळातील इतर कर्मचाऱ्यांची सुध्दा दखल घेण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, कृषी विभागाच्या बाब क्रमांक 54 ते 62 मागण्या आहेत. त्या संदर्भात शेवटचा मुद्दा असा की, अन्य विद्यापीठांना किंवा महाविद्यालयांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला. परंतु या राज्यातील कृषी विद्यापीठांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू झालेल्या नाहीत. तेव्हा या कृषी विद्यापीठातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना सुध्दा सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यासंदर्भात शासनाने निर्णय घ्यावा. व त्याचे उत्तर या पुरवणी मागण्यांवरील उत्तराच्या वेळी मिळावे अशी मागणी करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 18:35

श्री.किरण पावसकर (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, पान क्र.46, बाब क्र.55 बाबत मला सांगावयाचे आहे. जालना जिल्हयातील सुकलेल्या मोसंबीच्या झाडासाठी 6 कोटी 79 लाख 33 हजार रुपये 2008-2009 या वर्षाकरता अर्थसहाय्य म्हणून मंजूर करण्यात आलेले आहेत. उर्वरित 45 लाख रुपयांची तरतूद तात्काळ करण्यात यावी अशी विनंती आहे. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सिंधुदुर्ग मध्ये हत्तींच्या त्रासांमुळे दोडामार्ग व सावंतवाडी याठिकाणी फळबागा, माड यांचे जे नुकसान झालेले आहे, त्यासाठी जास्तीतजास्त तरतूद करण्यात यावी. त्याचप्रमाणे अवेळी पडलेल्या पावसामुळे आंबा, काजू या पिकाचे देखील नुकसान झालेले आहे, त्या शेतकऱ्यांना जास्तीतजास्त मदत करण्यात यावी. सिंधुदुर्ग मध्ये ज्या शेतकऱ्यांच्या झाडांचे नुकसान झालेले आहे ते पाहता त्यांना मिळत असलेली मदत फार अपूरी आहे. त्यामुळे 6 कोटी 80 लाख रुपयांची तरतूद नुकसान भरपाईसाठी केली जात असली तरी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांना देखील जास्तीतजास्त मदत करण्यात यावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, पान क्र.47, बाब क्र.57 यामध्ये शेतकरी कुटुंबांना, दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यासाठी अनुसुचित जाती व उपाययोजनांतर्गत सहाय्य दिले जाणार आहे.जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी नवीन विहिरी खोदणे, बैलगाडया, पंप संच, ठिबक सिंचन तसेच शेततळी बांधण्यासाठी 100 टक्के वित्तीय सहाय्य देण्यात येणार आहे. मला असे विचारावयाचे आहे की, आजपर्यंत शेततळयासाठी किती शेतकऱ्यांना 100 टक्के अर्थसहाय्य मिळालेले आहे ? कारण त्याची संख्या 39 कोटी 58 हजार इतकी आहे. मला असे वाटते की, जरी जिल्हावार शेततळी काढली तरी त्यासाठी एवढे अर्थसहाय्य पुरेसे होत नाही. ही फार कमी रक्कम आहे. आपण जिल्हावार शेततळयांसाठी मागणी करतो, त्यावेळी केवळ एक किंवा दोन मंजूर झालेली आहेत, बाकीची करता येणार नाहीत अशी शासनाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती दिली जाते.

सभापती महोदय, पान क्र.60, बाब क्र.51 यामध्ये क्रिडा संकुलाची स्थापना करण्याबाबत उल्लेख आहे. क्रिडा संकुलाच्या स्थापनेसाठी 2008 मध्ये भरविण्यात आलेल्या राष्ट्रकूल युवा स्पर्धा, आंतरराष्ट्रीय ज्युनिअर व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आणि त्या साठी 9 कोटी 95 लाख म्हणजे जवळजवळ 10 कोटी रुपये रुपये दाखविण्यात आलेले आहेत. माझी शासनाला अशी विनंती आहे की, कबड्डी या महाराष्ट्रातील खेळासाठी तेवढेच प्राधान्य द्यावे. कारण महाराष्ट्राचे भूषण असणारे अर्जुन अवॉर्ड विजेते आपल्याकडे आहेत, जे एअरइंडियासाठी....

. . . .4 एल-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर . . . .

फ्लाय करीत आहेत, पर्सर म्हणून काम करीत आहेत असे श्री.अशोक शिंदे, श्री.राजू भावसार आहेत, श्री.शेट्टी आहेत यांना केंद्र शासन सर्वतोपरी मदत करते. पण महाराष्ट्र राज्यानेही यांचा उपयोग खेळासाठी करुन घ्यावा. तसेच ज्यापध्दतीने क्रिकेटला आय.पी.एल.सारखे व्यवसायिक रुप दिलेले आहे, त्याचपध्दतीने कबड्डी या खेळासाठी न्याय द्यावा जेणेकरुन ग्रामीण भागातील युवकांना त्याचा जास्तीतजास्त फायदा होईल.

सभापती महोदय, बाब क्र.167, पान क्र.245 पर्यटनाविषयी आहे. पर्यटनासाठी मुलभूत सुविधा व पर्यटन केंद्र यासाठी 62 कोटी 50 लाखांची पूरक मागणी केलेली आहे. मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, शासनाकडून पर्यटन विभाग उपेक्षित राहिलेला आहे. महाराष्ट्रामध्ये पुष्कळ पर्यटन स्थळे आहेत आणि त्यामध्येही सिंधुदुर्ग जिल्हा हा "पर्यटन जिल्हा" म्हणून घोषित केलेला आहे, पण तो केवळ कागदावरच आहे. तेथे चौपदरी रस्ते नाहीत, तसेच पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी कोणतीही उपाययोजना आखलेली नाही. तसेच इको टुरिझमची योजना असेल पण त्याबाबतीत कोणत्याही सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. पर्यटन विकास महामंडळाच्या विश्रामगृहामध्ये रहाण्यासाठी चांगली व्यवस्था नाही त्याकडे लक्ष देण्यात यावे.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या पान क्र.136, बाब क्र.139 यामध्ये विधी सल्लागार, समुपदेशी व मुफसल अधिकारी यांच्यासाठी आणि सरकारी वकील, शहर दिवाणी न्यायालय, दिंडोशी,गोरेगाव व सरकारी वकील, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा यांच्या आस्थापनेवर नवीन पदे निर्माण करण्यासाठी 7 कोटी 11 लाख रकमेची पूरक मागणीव्दारे अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. मी एक सूचना करु इच्छितो की, न्यायालयाने निकाल दिल्यानंतर सरकारने जी अपिले केली आहेत, त्याचा आढावा घ्यावा. जी अनावश्यक अपिले आहेत, ती मागे घ्यावीत म्हणजे वकिलांच्या मानधनावरील खर्च कमी होईल. केंद्रीय कायदे मंत्री श्री.विरप्पा मोईली यांनी हेच धोरण ठरविलेले आहे, त्याचा महाराष्ट्र सरकारने विचार करावा एवढे सांगून मी माझे दोन शब्द संपवितो.

-----

यानंतर कु.थोरात . . . .

श्रीमती मधु जैन (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, मैं वर्ष 2009-10 की पूरक मांगों पर अपना समर्थन एवम् अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ी हूं. पिछले 5 सालों में हमारी कॉंग्रेस सरकार ने जो कार्य किए थे, उसका रिजल्ट हमें हाल ही में हुए चुनाव में देखने को मिला है.

सभापति महोदय, कई सारे मुद्दे है, बहुत सारी चीज़े हैं, मैं उन सारे मुद्दों को यहां न उठाते हुए कुछ विशेष मुद्दों के बारे में ही बोलना चाहूंगी. सबसे पहले मैं आइटम नंबर 47 तथा पेज नंबार 31 में दर्शायी गई पूरक मांग जो पीने के पानी के संबंध में है, उसके बारे में यह कहना चाहूंगी कि पीने के पानी की समस्या अभी भी बनी हुई है. यह नान रिकरिंग एक्सपेंडीचर है लेकिन फिर भी पीने के पानी की समस्या बनी हुई है. इस समस्या को हल करने के लिए हमेशा ही पूरक मांग रखनी पड़ती है. अत: पीने के पानी की समस्या को हल करने के लिए लॉंग टर्म पॉलिसी करने की जरुरत है. जलगांव जिले में और गांवों में पीने की पानी की समस्या बहुत गंभीर है. कुछ गांवों में जल प्रकल्प इसलिए अधूरे रह गए हैं, क्योंकि जिला परिषद ने कहा है कि प्रकल्प पूरे नहीं किए जाएंगे. पीने के पानी की व्यवस्था करने के लिए टँकर से जल पूर्ति की जाएगी. ऐसी व्यवस्था भ्रष्टाचार के कारण हो रही है. इसलिए मेरा यह सुझाव है कि जल की समस्या दूर करने के लिए लॉंग टर्म पॉलिसी की जाए.

सभापति महोदय, ग्लोबल वार्मिंग की समस्या भी गंभीर होती जा रही है. भूजल की सतह नीचे जा रही है. जलगांव में रावेर, यावल और चोपड़ा क्षेत्र को डार्क झोन घोषित किया गया है. इसलिए मेरा यह सुझाव है कि इस समस्या की ओर ध्यान देने के लिए लॉंग टर्म पॉलिसी बनाई जाए ताकि यह समस्या बार-बार पैदा न हो.

सभापति महोदय, आइटम नंबर 123-126, पेज नंबर 107 के अन्तर्गत मेजर और मायनर इरीगेशन प्रोजेक्ट के लिए जो केपिटल आउट-ले रखा गया है, इसके बारे में भी यही कहना चाहूंगी कि यह समस्या भी जल से संबंधित है. खानदेश में बहुत सारे इरीगेशन प्रोजेक्ट अधूरे पड़े हैं. मेरा यह सुझाव है कि इन अधूरे प्रोजेक्टों को पूरा करने के लिए विशेष ध्यान दिया जाए.

.......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT 18:40

श्रीमती मधु जैन .....

सभापति महोदय, आइटम नंबर 213-214, पेज नंबर 164 के अन्तर्गत स्वाईन फ्लू की बीमारी का उपचार करने के लिए औषधी खरीदने के लिए तथा अवेअरनैस के कार्यक्रम के लिए धनराशि उपलब्ध कराई जा रही है. मैं इस बारे में यह कहना चाहूंगी कि prevention is better than cure. रिसर्च पर जोर नहीं दिया गया है. इसलिए रिसर्च पर जोर दिया जाना चाहिए. वेक्सीन और अन्य कोई उपायों के संबंध में रिसर्च होना जरुरी है. अगर इस संबंध में रिसर्च पर जोर दिया जाएगा तो स्वाईन फ्लू के फैलने की स्थिति नहीं रहेगी.

सभापति महोदय, आइटम नंबर 217-218, पेज नंबर 168 के अन्तर्गत पूरक मांग रखी गई है. इस बारे में यह कहना चाहूंगी कि पैरा मेडिकल साईंस से संबंधित संस्थाओं को बढ़ावा देने की जरुरत है. उसी प्रकार से पैरा मेडिकल एक्सपर्ट और नर्स तथा अन्य स्टाफ की बहुत कमी है, ये सारा स्टाफ उपलब्ध करने के लिए ध्यान दिया जाए. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं.

.....

इसके बाद श्री उपरकर का भाषण

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ( विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, बाब क्रमांक 33. बंदरे व दीपगृहे यावर मी सर्वप्रथम बोलणार आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील देवगड बंदरावर असलेले दीपगृह हे ब्रिटिश काळात बांधलले आहे. या दीपगृहाचा प्रकाश 30 नॉटिकल माईल्सपर्यंत जावयास हवा.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

सध्याच्या परिस्थितीमध्ये 30 नॉटीकल माईल्सपर्यंत प्रकाश जात नसून फक्त 10 ते 15 नॉटीकल माईल्सपर्यंतच प्रकाश जात असल्यामुळे खोल समुद्रामध्ये असलेल्या बोटींना ज्या मार्गदर्शक सूचना मिळावयास पाहिजे त्या मिळत नाहीत. म्हणून त्या ठिकाणी प्रकाशाची क्षमता वाढावी यादृष्टीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 41 वरील बाब क्रमांक 51 बाबत बोलावयाचे आहे. आरोंदा हे ठिकाण गोवा हद्दीवर आहे. त्या ठिकाणी 800 ते 900 एकराचे एक बेट निर्माण झालेले आहे. त्या ठिकाणी कांदळवन आणि मॅनग्रोव्हची लागवड झालेली आहे. हायकोर्टामध्ये रिटपिटीशन क्रमांक 3246/4 च्या संदर्भात निर्णय झालेला आहे. हा निर्णय शासनाला बंधनकारक असताना वन विभागाने अद्याप त्या ठिकाणी असलेल्या कांदळवन आणि मॅनग्रोव्हची सातबारावर जी नोंद करावयास पाहिजे ती केलेली नसल्यामुळे त्या ठिकाणी तीनही बाजूला समुद्र असताना सीआरझेडचे उल्लंघन करुन 150 एकर जमीन बिगरशेती करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यासंदर्भात पूर्ण चौकशी करुन शासनाने त्या ठिकाणच्या असलेल्या जमिनीवरील कांदळवनाची नोंद करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 49 वरील बाब क्रमांक 62 बाबत बोलावयाचे आहे. फयान वादळाच्या अनुषंगाने नुकसानभरपाई देण्याच्या संदर्भात सुके मासे, मीठ, पांगारे, डिंगी अशा प्रकारच्या बाबींचा अंतर्भाव केलेला नाही. तो अंतर्भाव त्यामध्ये करण्यात यावा. त्याचप्रमाणे शासनाने 4 कोटी रुपयांची मदत सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी जाहीर केलेली आहे परंतु मदत मिळण्यासाठी जे पुरावे मागितलेले आहेत त्यामुळे 3 कोटी रुपये परत जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. म्हणून शासनाने हे नियम शिथिल करुन हे पुरावे न मागता त्या ठिकाणी वेगळी योजना करुन नुकसान भरपाई द्यावी.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 121 वरील बाब क्रमांक 114 बाबत बोलावयाचे आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 2 मोठे, 4 मध्यम आणि 15 लहान प्रकल्प असून त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. परशुराम उपरकर .....

ठिकाणी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 500 ते 600 कोटी रुपये लागणार आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये पॅकेजमध्ये 1200 कोटी रुपये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पांना देण्याचे शासनाने मान्य केले होते परंतु या पुरवणी मागण्यांमध्ये त्याबाबत कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. ती तरतूद करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, यानंतर मला सहकार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 169 वरील बाब क्रमांक 90 बाबत बोलावयाचे आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये भाई सावंत पतसंस्था आहे. त्यांनी 5 कोटी रुपयांची उचल केलेली असून त्याची परतफेड केलेली नाही. भाई सावंत पतसंस्थेचे चेअरमन हे सिंधुदुर्ग जिल्हा बँकेचे संचालक असून त्यांच्याकडून वसूली करण्यासाठी कोणत्याही प्रकारची उपाययोजना केली जात नाही. त्याबाबत उपाययोजना करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 216 वरील बाब क्रमांक 112 बाबत बोलावयाचे आहे. आरोग्याच्या संदर्भात ही बाब आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये आता लॅप्टोची साथ आहे आणि त्यामध्ये तीन रुग्ण दगावलेले आहेत. त्या ठिकाणी लॅप्टोची साथ सातत्याने तीन चार वर्षे येत असून त्यावर उपाययोजना करण्यासाठी शासनाने यंत्रसामुग्री दिलेली आहे. शासनाने 4 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु 7 लाख रुपयांची इमारत न बांधल्यामुळे आलेली सर्व यंत्रसामुग्री तशीच पडून राहिलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली रुग्णालयामध्ये गेले 9 महिने औषधांचा पुरवठा झालेला नाही. त्या ठिकाणी औषधे पुरविण्याची गरज आहे.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 232 वरील बाब क्रमांक 256 बाबत बोलावयाचे आहे.125 अर्धवेळ ग्रंथपालाचे पूर्णवेळ ग्रंथपाल करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे पडलेला आहे. तो प्रस्ताव लवकरात लवकर मार्गी लावून या 125 लोकांना न्याय देण्याचा शासनाने प्रयत्न करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास, वने, बंदरे आणि खार जमीन, क्रीडा व युवक कल्याण, माजी सैनिकांचे कल्याण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, याठिकाणी सन 2009-10 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत, सुभाष चव्हाण, विनोद तावडे, जयंत प्र.पाटील, राजन तेली, संजय केळकर या सदस्यांनी भाग घेतला आहे. सभापती महोदय, या चर्चेला एकत्रितपणे उत्तर देण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी असा उल्लेख केला की, महाराष्ट्र शासनाकडून नगरपालिकांना अनुदान दिले जाते. परंतु अलिबागची नगरपालिका विरोधी पक्षाकडे असल्यामुळे या नगरपालिकेवर अनुदान देण्याच्या बाबतीत जाणूनबुजून अन्याय केला गेला आहे अशाप्रकारची भावना त्यांनी व्यक्त केली. याबाबत मी माहिती घेतली असताना शासनाकडून अशाप्रकारे जाणीवपूर्वक त्या नगरपालिकेवर अन्याय झाल्याचे दिसून आले नाही. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता शासनाकडून त्या नगरपालिकेला देय असलेले उर्वरित अनुदान देण्याची दक्षता घेतली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी 'क' वर्ग नगरपालिकांची आर्थिक स्थिती चांगली नसल्यामुळे त्यांनी जे आरक्षण ठेवले आहे किंवा ज्या कारणासाठी भूखंड आरक्षित ठेवले आहेत त्यांचा विकास करता येत नाही म्हणून शासनाने या कामासाठी मदत करण्याची अपेक्षा व्यक्त केली. विकास योजना राबविण्यासाठी नगरपालिकांना शासनाच्या स्तरावरुन अनुदान दिले जाते. परंतु जिल्हा नियोजन विकास समितीचा आराखडा शासनाने दुपटीने वाढविला आहे. त्याच्याद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांना, नगरपालिकांना मदत होण्याच्या दृष्टीने विचार केला जाऊ शकतो. त्यासाठी स्थानिक आमदारांनी पुढाकार घ्यावा अशी मी सूचना करीन. यासंबंधी बसल्या बसल्या माननीय मुख्यमंत्र्यांनी एक महत्वाचा विचार मांडला आहे की, शासनाला यासंबंधी एखादी योजना आणावी लागेल, या योजनेचे निश्चित स्वरुप कसे असावे याबाबत विचार करता येईल. माननीय मुख्यमंत्री महोदयांनीच यासंबंधी आता पुढाकार घेतला आहे. नगरपालिकांना थोडेफार अनुदान देण्याऐवजी जेएनयुआरएम, युआयडीएसएसएमटी अंतर्गत देता येईल काय याबाबत विचार करता येईल किंवा त्यासाठी धोरण ठरविले तर नगरपालिकांना शासनाकडून मदत होईल असे त्यांनी मत व्यक्त केले आहे.

NTK/

श्री.भास्कर जाधव....

सभापती महोदय, नगरपालिकेने जकात कर वसूल करु नये असे शासनाने धोरण ठरविले, त्याचवेळी 1999 सालापासून शासन नगरपालिकांना त्यांच्या आस्थापना खर्चासाठी मदत करीत आहे. म्हणून त्यादृष्टीने सकारात्मक असा विचार भविष्यात करण्याचे विचाराधीन आहे असे सांगेन. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी एन.डी.झोनसंबंधीचा विषय उपस्थित केला. मी येथे बसल्या बसल्या त्यासंबंधीची माहिती तपासण्याचा प्रयत्न केला. मी सन्माननीय सदस्यांना सांगेन की, आपण अपुऱ्या माहितीच्या आधारे याठिकाणी विधान केले आहे. कोणत्याही फाईलवर माननीय मुख्यमंत्र्यांनी सही केलेली नाही. परंतु महानगरपालिकेकडून त्यासंबंधीची जी कायदेशीर बाब आहे की, त्यांनी तसा ठराव केला पाहिजे. तो ठराव करुनच त्यासंबंधीचा प्रस्ताव शासन स्तरावर आलेला आहे. परंतु त्यावर निर्णय झालेला नाही.

सभापती महोदय, ड्रेझरबाबत बऱ्यास सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत आणि शंकाही व्यक्त केल्या आहेत. शासनाने 3 वर्षांसाठी प्रति वर्षी 20 कोटी याप्रमाणे 60 कोटी रुपयांच्या ड्रेझर्सची खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. या ड्रेझर्सची खरेदी कशाप्रकारे केली जाणार आहे, ते कधी खरेदी केले जाणार आहेत, त्यांचे आयुष्यमान किती असेल असे प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी उपस्थित केले. त्यांना मी सांगू इच्छितो की, परदेशी बनावटीचे अतिशय चांगले ड्रेझर्स खरेदी करण्याचा शासनाचा विचार आहे.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:55

(श्री. भास्कर जाधव...

हे 20 कोटी रुपये केवळ एका ड्रेझरसाठी नाहीत. ड्रेझरसाठी प्रत्येक वर्षी 20 कोटी याप्रमाणे तीन वर्षामध्ये 60 कोटी रु.ची तरतूद करण्यात येणार असून योग्य त्या किंमतीचे ड्रेझर घेण्याचे शासनाने ठरविलेले आहे. पुरवणी मागण्यामध्ये त्यासाठी शासनाने तरतूद केलेली आहे. पुढील प्रोसेस होणे बाकी असल्यामुळे अद्यापपर्यन्त ड्रेझरची खरेदी झालेली नाही. ड्रेझरची आयुमर्यादा 25 वर्षाची असणार आहे. आपल्याकडे 64 सालामधील ड्रेझर आहेत. म्हणजे त्या ड्रेझरची आयुमर्यादा 50 वर्षापेक्षा अधिक झालेली आहे. अशा प्रकारचे ड्रेझर घेण्याचा शासनाचा विचार आहे. सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी वन विभागाच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले. काही प्रकरणी वन विभागाने नोंद घेतलेली नाही असे त्यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले. सभागृहाच्या साऊंड सिस्टिममध्ये काही दोष असल्यामुळे त्यांचे म्हणणे मला नीटसे समजलेले नाही. तरी देखील वन विभागाच्या संदर्भात त्यांचे नेमके म्हणणे काय आहे, कोणत्या त्रुटी राहिलेल्या आहेत ते त्यांच्याकडून समजून घेऊन त्या निश्चितपणे दूर करण्याची भूमिका राहील असे मी त्यांना सांगू इच्छितो.

क्रीडा खात्याच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकणी प्रश्न उपस्थित केले. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी अत्यंत महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यांनी सांगितले की, आपल्याकडे क्रीडा क्षेत्रामध्ये प्रावीण्य मिळविलेल्या, विविध पुरस्कार मिळविलेल्या माजी खेळाडूंचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे नवोदित खेळाडू निर्माण करण्यासाठी मार्गदर्शन घ्यावे. तेव्हा ज्या खेळाडूंना छत्रपती शिवाजी पुरस्कार, अर्जून पुरस्कार मिळालेले आहेत त्यांचे मार्गदर्शन चांगले खेळाडू निर्माण करण्यासाठी घेण्याबाबत शासन निश्चितपणे विचार करील.

सभापती महोदय, खेळाडूंचे कौशल्य आणि धाडस वाढण्याकरिता विविध प्रकारच्या प्रोत्साहनात्मक स्पर्धात्मक घेतल्या जातात. त्या संदर्भात खेळाडूंना सर्टिफिकेट वितरित करण्यात येतात. परंतु कळत न कळत आणि तांत्रिक कारणामुळे एखाद्या खेळाडूला सर्टिफिकेट द्यायचे राहून गेले असेल तर त्याही बाबतीत विचार केला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी कबड्डी खेळाला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत असे सांगितले. या संदर्भात आंतरराष्ट्रीय कबड्डी फेडरेशनने

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भास्कर जाधव...

ऑलंपिक फेडरेशनला प्रस्ताव सादर केला तर त्याबाबतीत शासन निश्चितपणे पाठपुरावा करील. नवीन क्रीडा धोरण आखण्याच्या बाबतीत शासन विचार करीत आहे. आज एशियन गेममध्ये या खेळाचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. खेळाडूंना शासकीय नोक-यांमध्येही तीन टक्के आरक्षण दिलेले आहेत. भविष्यामध्ये क्रीडा धोरण ठरविताना सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा निश्चितपणे उपयोग करुन घेतला जाईल.

....नंतर श्री. भोगले....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव .............

म्हणून या संदर्भातील जवळजवळ सर्वच सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा परामर्श मी याठिकाणी घेतलेला आहे. माझ्या विभागांतर्गत ज्या मागण्या आहेत त्या सभागृहाने एकमताने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : माननीय सभापती महोदय, महसूल, मदत व पुनर्वसन विभागासाठी रु.366 कोटी, 86 लाख, 30 हजार रुपये इतक्या रक्कमेच्या मागण्या आज सभागृहासमोर सादर केलेल्या आहेत. बाब क्रमांक 36 ते 49 व 53 या महसूल व मदत, पुनर्वसन विभागाच्या मागण्या आहेत. या मागण्यांवर बोलत असताना सुरुवातीला सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत आणि त्यानंतर सदनातील जवळपास 16 सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. या मागण्यांवर बोलताना अनेकांनी बाबींचा संदर्भ घेऊन अनेक चांगल्या सूचना व मार्गदर्शन करण्याचे काम केलेले आहे. काही त्रुटीही निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. या मागण्यावर चर्चा होत असताना जे मार्गदर्शन केले गेले, ज्या त्रुटी दाखविण्यात आल्या त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न सरकार नक्कीच करेल.

सभापती महोदय, मुख्यत: या मागण्यांवर चर्चा करीत असताना बाब क्रमांक 43, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या विषयावर अनेकांनी आपले विचार मांडले आहेत. बाब क्रमांक 47, 48 व 49 या नैसर्गिक आपत्तीमुळे मदत करण्यासाठी सादर केलेल्या मागण्यांवर बोलताना आपदग्रस्तांना अधिक मदत द्यावी अशा सूचना केलेल्या आहेत. अतिवृष्टी व अवेळी पाऊस आल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांची हानी झाली, त्यांना मदत देत असताना काही निकष बाजूला ठेवून मदत द्यावी अशा प्रकारच्याही मागण्या करण्यात आल्या. सन्माननीय सदस्यांनी बाब क्रमांक 43 वर बोलताना शेतक-यांच्या कुटुंबियांची सद्याची आर्थिक स्थिती काय आहे त्याची शासनाने माहिती घ्यावी अशीही सूचना केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी दंगलग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण झालेले नाही, त्या संदर्भात निधी वाढवून द्यावा अशी सूचना केली आहे. फयान चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीसंबंधी मदत देण्याबाबत मार्गदर्शक तत्वे ठरवावीत असे सांगून पीक विमा योजनेसंबंधी देखील मार्गदर्शन केलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी बाब क्रमांक 44 वर बोलताना रेल्वे बॉम्बस्फोटातील जखमींना अद्यापही आर्थिक मदत मिळाली नसल्याची बाब निदर्शनास आणली आहे. या मुद्याची नोंद घेण्यात आली आहे. जखमींना जरुर मदत देण्याचा प्रयत्न केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..

SGB/ 19:00

श्री.नारायण राणे................

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी रायगड जिल्हयातील तहसीलदारांना वाहन नसल्याची बाब निदर्शनास आणली आहे. रायगड जिल्हयातील तहसीलदारांना त्वरित वाहन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पावले उचलली जातील. कोकण भवन इमारतीच्या दुरुस्तीकडे देखील त्यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे. कोकण भवन इमारतीच्या दुरुस्तीसाठी निधी देण्यासंबंधी प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी शेतकऱ्यांना मदत देत असताना अटी घालू नयेत असे सांगितले आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी कोतवालांना चतुर्थश्रेणीचा दर्जा द्यावा अशा प्रकारची सूचना केली आहे त्याचबरोबर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी बाब क्रमांक-43 संबंधी बोलत असताना जे प्रचलित निकष आहेत त्यामध्ये बदल करावा, ज्यांच्या नावावर शेती नाही त्यांना मदत मिळत नाही, खाजगी सावकारांकडून घेतलेल्या कर्जाबद्दल मदत मिळत नाही असे विषय त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणले आहेत.

सभापती महोदय, मी एवढेच सांगेन की, जे मुद्दे मांडले आहेत, ज्या सूचना केलेल्या आहेत त्या शासन पडताळून पाहिल आणि योग्य दृष्टीकोनातून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांचे कशा स्वरुपात पुनर्वसन करता येईल, त्यांना कशी मदत करता येईल यादृष्टीने प्रयत्न केला जाईल.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ......

त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी बाब क्र. 43 च्या संदर्भात अशी सूचना केली की, काही जिल्ह्यांमध्ये 4 टक्के आत्महत्त्या होतात तर काही जिल्हयात हे प्रमाण 10 टक्के सुध्दा आहे आणि काही जिल्ह्यात जास्त आहे. यातील सामाजिक विषयामुळे ज्या आत्महत्त्या होतात त्याबाबत प्रबोधन करण्यासाठी एक अभियान राबवावे, याबाबत शासन जरुर विचार करील.

यानंतर बाब क्र. 48 च्या संदर्भात बोलत असताना फयान चक्रीवादळामुळे शाळांचे नुकसान झाले असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी उपस्थित केला. यापूर्वी सभागृहात चर्चा झाली त्यावेळेस देखील त्यांनी हा उल्लेख केला आणि मी त्यांना त्या दिवशी देखील सांगितले होते. यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी बाब क्र 43 बाबत बोलत असताना नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित झालेल्यांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात सांगितले. त्यांनी युनोच्या धर्तीवर पुनर्वसनाच्या संदर्भात आपल्या राज्यात सुध्दा एक धोरण असावे अशी सूचना केली. मी या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो की, युनोमध्ये जे पुनर्वसन विषयक धोरण आहे त्याचा अभ्यास करुन याबाबतचे धोरण ठरविले जाईल.

सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी देखील फयान चक्रीवादळाच्या संदर्भात विषय उपस्थित केला. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी फळबागांच्या नुकसानीबाबत विचार व्यक्त केले. यासंदर्भात ऑलरेडी शासनाने जाहीर केलेले आहेच त्यानुसार मदत देण्यात येईल. त्याचप्रमाणे झाडांच्या किंमतीचे व्हॅल्युएशन कृषी विभागाच्या माध्यमातून करुन मदत दिलेली आहे हे देखील मी सांगू इच्छितो. फयान चक्रीवादळ,आत्महत्त्या, अतिवृष्टी आणि अवेळी पाऊस या विषयावर जवळपास 10 सदस्यांनी विचार व्यक्त केले आहेत. या निमित्ताने मी सदनाला सांगू इच्छितो की, महसूल विभाग हा लोकाभिमूख करुन प्रशासन सक्षम करण्यात येईल. कारण सरकार गतिमान करण्याच्या दृष्टीने] मग जे दोष दाखविले असतील ते दूर करण्याचाही प्रामाणिकपणे प्रयत्न करण्यात येईल. या ठिकाणी जी चर्चा झाली मग ती टीकात्मक असली तरी त्यातूनही मार्गदर्शन होते त्याचाही विचार सरकार करील. विरोधकांनी टीका केली म्हणजे विषय सोडून द्यावयाचा नाही तर उलट त्यातून बोध घेऊन कार्यान्वित करण्याचाच आम्ही प्रयत्न करणार आहोत.

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ......

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी ड्रेझरबाबतचा मुद्दा उपस्थित केला. मी सभागृहाला माहिती देणार आहे की, शासनाने अशा तीन ड्रेझर्सना मान्यता दिली आहे. कारण अनेक बंदरे गाळाने भरलेली असल्याने मासेमारी होत नाही, प्रवासी बोट वाहतूक करण्यात अडचणी निर्माण होतात. म्हणून हा गाळ काढण्यासाठी आपल्याला केरळ राज्यातून ड्रेझर्स मागवावे लागतात आणि ते आपल्याला परवडण्यासारखे नाही तसेच वेळेवर उपलब्धही होत नाहीत. म्हणून स्वत:चेच ड्रेझर्स असावेत यासाठी प्रत्येक ड्रेझरला 20 कोटी प्रमाणे 60 कोटी रुपयाची तरतूद शासनाने केली आहे. त्यातून हे तीन ड्रेझर्स घेण्यात येतील. त्याचा उपयोग करुन या चार जिल्ह्यातील 720 कि.मी. लांबीच्या किनाऱ्यावरील बंदरामधील गाळ काढून प्रवासी बोटींची वाहतूक तसेच मासेमारी करण्यात अडचणी येणार नाहीत. जर ही रक्कम कमी होत असेल तर पॅकेजमध्ये जाहीर केलेली सर्व रक्कम सुध्दा आपल्याला मिळेल अशी मी ग्वाही देतो. म्हणून महसूल खाते सक्षम असले म्हणजे सरकार सक्षम असे आपण म्हणतो आणि त्याच माध्यमातून आमचे प्रयत्न आहेत. एवढे बोलून महसूल विभागाच्या मागण्यांना मान्यता द्यावी अशी विनंती करतो आणि माझे मनोगत संपवितो.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ड्रेझर खरेदी करताना कटर स्वरुपाचे ड्रेझर्स खरेदी करावेत अन्यथा जुने वगैरे असतात त्यामुळे अडचणी निर्माण होतात.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, यासंबधी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांचेही मार्गदर्शन घेण्यात येईल.

----------

......3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन, माहिती व जनसंपर्क, सांस्कृतिक कार्य, राजशिष्टाचार, शालेय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य राज्य मंत्री) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन, सांस्कृतिक कार्य, शालेय शिक्षण, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील मुद्यांना उत्तरे देण्यासाठी मी उभी आहे.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील, श्रीमती मंदाताई म्हात्रे, डॉ. दीपक सावंत, श्री. संजय केळकर यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी बेळगांवच्या प्रश्नाला शासनाने गांभीर्याने घेतले नाही असे सांगितले. मी या निमित्ताने सांगणार आहे की, शासन बेळगांव प्रश्नाच्या संदर्भात गंभीर आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ 19:10

प्रा. फौजिया खान ....

श्रीमती मंदा म्हात्रे यांनी बेलापूर येथे बचत भवन तसेच विश्रामगृहाची बांधणी बीओटी तत्वावर करण्यात यावी अशी सूचना केलेली आहे त्यामुळे त्यांच्या सूचनांचा जरुर विचार केला जाईल असे मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी ओळखपत्र चांगल्या दर्जाचे असावे यासंदर्भात सूचना केलेली आहे तसेच निवडणूक कार्डच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोग आणि राज्य मुख्य निवडणूक अधिका-यांची यासंदर्भात बैठक घेऊन यामध्ये ज्या काही त्रुटी आहेत त्या दूर करण्याचा प्रयत्न निश्चित प्रकारे केला जाईल.

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी लोकसेवा आयोगाचे काम वेळेवर (टाईम टेबल ठरवून) होण्यासाठी लक्ष देण्यात यावे अशी मागणी केलेली आहे तसेच विभागवार प्रशिक्षण केंद्र असले पाहिजे यासंदर्भात त्यांनी जी सूचना केली आहे त्याचा निश्चितपणे विचार केला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले यांनी लोकराज्य या शासनाच्या मासिकामध्ये भारतीय संस्कृतीचे प्रतिबिंब उमटले पाहिजे अशी सूचना केली आहे त्यामुळे त्यांच्या सूचनांचा देखील जरुर विचार केला जाईल तसेच त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारण्याच्या संदर्भात मागणी केलेली आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांच्या मागणीचा निश्तिपणे विचार केला जाईल. तसेच ज्या ज्या सन्माननीय सदस्यांनी जी जी मागणी केलेली आहे त्या सर्व मागण्यांचा निश्चितपणे विचार केला जाईल.

सभापती महोदय, सांस्कृतिक धोरणाबद्दल सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. मला यासंदर्भात सांगावेसे वाटते की, सांस्कृतिक धोरणाच्या संदर्भात दिनांक 4.8.2009 रोजी एक समिती गठीत करण्यात आलेली असून या समितीचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. ए.एच.साळुंखे असून श्री. दत्ता भगत हे उपाध्यक्ष असून यामध्ये एकूण 11सदस्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. या समितीचा अहवाल जानेवारी, 2010 मध्ये येण्याची शक्यता आहे. आतापर्यंत या समितीच्या 15 बैठका झाल्या आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री उल्हास पवार, गिरीष गांधी यांनीही याबाबत विचार मांडलेले आहेत. यासंदर्भात जनतेची मते मागविण्यात येत असून यासंदर्भात सहयाद्री येथे मान्यवरांची एक बैठक देखील झालेली आहे. अशा प्रकारे

....2....

प्रा. फौजिया खान ....

चांगले सांस्कृतिक धोरण आखले जाणार आहे एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छिते.

सभापती महोदय, जुन्या मराठी चित्रपटाचे रंगीत चित्रफितीमध्ये रुपांतर करण्याच्या संदर्भात विचार या ठिकाणी मांडला गेला आहे त्यामुळे या सूचनेच्या संदर्भात देखील निश्चितपणे विचार केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील, डॉ. दीपक सावंत, श्रीमती उषाताई दराडे, श्री. रामनाथ मोते यांनी अनेक महत्वाच्या सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सुधाकर एज्यूकेशन सोसायटीबद्दल मुद्दा उपस्थित केलेला आहे. मला यासंदर्भात सांगावयाचे आहे की, ज्या शाळेबद्दल या ठिकाणी मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात मी स्वत: माहिती घेतलेली आहे. या ठिकाणी संगणकीकरणामुळे सरप्लस स्टाफ दिसत आहे. त्यामुळे यासंदर्भात अधिक माहिती घेतली जाईल. मीड डे मिलच्या क्वालीटी आणि क्वान्टीटीच्या बाबत मॉनिटरींग यासंदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मुद्दा मांडलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छिते की, यासंदर्भात एक समिती स्थापन झाली असून भरारी पथकाची निर्मितीही करण्यात आलेली आहे. तसेच पुढचे जे धोरण ठरवावयाचे आहे त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्या सूचनांचा जरुर विचार केला जाईल.

सभापती महोदय, आरोग्य विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे, श्रीमती मंदा म्हात्रे, डॉ. दीपक सावंत , श्रीमती उषा दराडे, श्रीमती अलका देसाई, श्री.संजय केळकर , डॉ. नीलम गो-हे तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती मधू जैन यांनी आपले विचार मांडलेले आहेत राज्यातील जिल्हा रुग्णालये तसेच ग्रामीण रुग्णालये इंडीयन पब्लीक हेल्थ स्टँडर्ड प्रमाणे डॉक्टर्स, यंत्रसामुग्री, औषधे तसेच अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान ................

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी व्हेन्टीलेटर्स किती खरेदी करण्यात आले होते असा प्रश्न उपस्थित केला होता. त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छिते की, 30 व्हेन्टीलेटर्स खरेदी करण्यात आले असून 15 कोटी रुपयांचे अजून 30 व्हेन्टीलेटर्स आणि अन्य सामुग्री खरेदी करण्याची प्रक्रिया सुरु आहे त्याचबरोबर .95 मास्क देखील खरेदी करण्यात आलेले आहेत. शासनाकडे औषधांचा भरपूर साठा उपलब्ध आहे. औषधाची कोठेही कमतरता नाही. त्यामुळे राज्य सरकारला आणखी औषधे खरेदी करण्याची काही गरज नाही.या ठिकाणी ज्या मागण्या मांडण्यात आलेल्या आहेत त्या मान्य कराव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री) सभापती महोदय,सामाजिक न्याय विभागाच्या पूरक मागण्यांवर बोलत असतांना सन्माननीय सदस्यांनी काही विचार व्यक्त केले असून शासनाकडून काही अपेक्षा व्यक्त केल्या आहेत.त्या अपेक्षांच्या संदर्भात मी खुलासा करु इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी घरकूल योजनेच्या संदर्भात एक मुद्दा मांडला होता. घरकूल योजना जाहीर केली होती परंतु ती कृतीमध्ये आली नाही ही गोष्ट खरी आहे.या चर्चेच्या निमित्ताने मी आपल्याला आश्वासित करु इच्छितो की, जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये मागासवर्गीयासाठी चांगली घरकूल योजना कार्यान्वित करण्याचे काम करण्यात येईल त्याचबरोबर साहित्य खंड आणि चरित्र प्रसिध्द करण्याच्या बाबतीत त्यांनी उल्लेख केला होता त्याही बाबतीत माहिती घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी पर्यावरणाच्या बाबतीत सांगितल्या प्रमाणे एक अभ्यासगट तयार करण्यात येईल. सध्या टॉवर्सवर ॲन्टीना लावण्यात येत असतो त्याच्या रेडिएशनमुळे काही ठिकाणी अडचणी निर्माण होत असतात अशा प्रकारचा मुद्दा त्यांनी मांडला होता तेव्हा यातून मार्ग काढण्यासाठी अभ्यास गट निर्माण करण्यात येईल.सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनीसुध्दा सांगितले होते की, ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे.

सभापती महोदय, व्हॅलिडीटी सर्टिफिकेटच्या संदर्भातसुध्दा अनेक तक्रारी करण्यात येत असतात म्हणून शासन या बाबतीत गांभीर्याने विचार करीत असून व्हॅलिडीटी सर्टिफिकेटसुध्दा ऑन लाईन देण्याचा शासनाचा निर्धार असून जिल्हाधिका-यांकडे ही यंत्रणा देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सन्माननीय सदस्य ज्या व्यक्तीबद्दल बोलले होते त्या व्यक्तीचे नाव जर त्यांनी सागितले तर 48 तासाच्या आत त्याच्या विरुध्द कारवाई करण्यास शासन तयार आहे. त्याचबरोबर जे सर्टिफिकेटस पेन्डीग आहेत त्याबाबतीत सुध्दा माहिती घेण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी सागितल्याप्रमाणे केन्द्र शासनाच्या शाळांच्या बाबतीत 248 शाळांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते त्यापैकी 33 शाळांना केन्द्र शासनाने परवानगी दिली असून उर्वरित शाळांना परवानगी देण्याच्या बाबतीतसुध्दा केन्द्र शासनाबरोबर चर्चा करुन निर्णय घेण्याचा प्रयत्न राज्य सरकार करीत आहे.

श्री.सचिन अहिर ...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सगितले की,मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षेसाठी उत्तेजन मिळावे यासाठी शासनाने प्रयत्न करावेत तेव्हा या संदर्भात निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री .रामनाथ मोते यांनी सांगितले आहे की, अपंगाच्या शाळेतील कर्मचा-यांचे काही प्रश्न आहेत. अपंगाच्या शाळेतील कर्मचा-यासाठी सहावा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय गेल्याच आठवडयात घेतला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी संगितल्यप्रमाणे् ऊस तोड कामगारांच्या प्रश्नाच्या बाबतसुध्दा शासन निश्चितपणे दखल घेणार आहे. सामाजिक न्याय विभागाच्या ज्या पूरक मागण्या या ठिकाणी मांडण्यात आल्या आहेत त्या मान्य कराव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण,पर्यटन व विशेष सहाय्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण तसेच पर्यटन विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी उभी आहे. या चर्चेमध्ये आदरणीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर, डॉ.दीपक सावंत, श्रीमती मंदा म्हात्रे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.किरण पावसकर यांनी सहभाग घेतला आणि आपले विचार मांडले, आपली मते व्यक्त केली आहेत. सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री. फुंडकर यांनी जे.जे.रूग्णालयाबद्दल सांगताना पंतप्रधान स्वास्थ्य सुरक्षा योजनेंतर्गत 100 कोटी केंद्र सरकारने दिले आहेत असे सांगितले.. मी त्यांना सांगू इच्छितो की,त्याच्या जोडीला मॅचिंग ग्रँट म्हणून राज्य सरकारने देखील 20 कोटी रूपये दिले आहेत. या 20 कोटी मधून आपण तेथे इमारतीचे काम सुरू केले असून त्याच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम देखील पार पडलेला आहे. मात्र जे.जे.रूग्णालयातील स्वच्छतेबाबतचा जो मुद्दा आपण उपस्थित केला आहे त्याबाबत मी आपल्याला सांगेन की, मंत्रालयाच्या धर्तीवर तेथे स्वच्छतेसाठी आऊट सोर्सिंगचा प्रस्ताव देखील आपल्या विचाराधीन आहे. सभापती महोदय, तेथील सहा डॉक्टरांच्या रेसिग्नेशनबद्दल सांगितले ते सहा डॉक्टरांचे प्रकरण हे न्यायप्रविष्ठ असून सध्या ते मॅटमध्ये आहे. तसेच आपण तेथील डॉ.रेखा दावर यांच्याबद्दल सांगितलि. पण मी आपल्याला सांगेन की, डॉ.रेखा दावर या हेड ऑफ द डिपार्टमेंट असून त्या अत्यंत स्ट्रीक्ट असून नियमाने काम करीत असतात. त्या उत्कृष्ट शिक्षक आहेत तसेच उत्कृष्ट सर्जन देखील आहेत. तसेच आपण श्री.गगराणी साहेबांबद्दल जे सांगितले त्याबद्दल आम्ही नक्कीच माहिती काढून घेऊ. सभापती महोदय, सन्माननीय डॉ.दीपक सावंत यांनी राज्यपालांच्या कार्यालयातून चालविलेल्या अभियानाबद्दल सांगितले. मी आपल्याला सांगू इच्छिते की, आपल्याला राज्यभरातून 10 लाख ब्लड बँकेच्या बाटल्या मिळतात पण आपल्याला अजूनही 8 ते 9 लाख बाटल्यांची कमतरता भासते आहे. त्यामुळे राज्यपालांच्या कार्यालयाअंतर्गत जे अभियान आहे त्याच्या कार्यालयाला हे पैसे आपण वर्ग करणार आहोत. त्यातील 10 लाख रूपये आपण विद्यापीठाला देणार आहोत आणि 50 लाख रूपये जाहिरातीसाठी देणार आहोत. अशा प्रकारे 60 लाख रूपये आपण राज्यपालांच्या कार्यालयाला देत आहोत. सभापती महोदय, पंतप्रधान स्वास्थ्य योजनेंतर्गत मी जसे सांगितले की,जे.जे.रूग्णालयाच्या बाबतीत 120 कोटी रूपये आपल्याला दोन्ही सरकारांकडून मिळाले आहेत आणि त्यातून राज्य सरकारने काही इक्विपमेंटस् घेतलेली आहेत, इमारत बांधकाम सुरू केलेले आहे. आपण सीटी स्कॅन मशिनबद्दल बोललात. ...

..... 4यू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये यासाठी मी सांगू इच्छितो की, तेथे कोणतेही बांधकाम अजून सुरू नाही. ...

प्रा.श्रीमती वर्षा गायकवाड : सभापती महोदय, त्याचे भूमिपूजन आम्ही आता करणार आहोत. आणि त्या वेळेस माननीय सदस्यांना देखील आवर्जून बोलाविण्यात येईल. सभापती महाराज, संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या रूग्णालयांमध्ये एकंदर 14 सीटी स्कॅन मशिन्स आहेत, एमआरआयच्या 5 मशिन्स आहेत, इंदिरा गांधी गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेजचे व्हर्टिकल एक्स्पान्शन बद्दल आपण जे सांगितले त्याची टेंडर प्रक्रिया सुरू आहे. तसेच जीएमसी आणि नागपूर सुपर स्पेशालिटी रूग्णालयाबद्दल जे सांगितले तर त्यामध्ये देखील आपण पंतप्रधान स्वास्थ्य सुरक्षा योजनेत 150 कोटी दिलेले आहेत आणि त्यात केंद्र सरकारने 125 कोटी दिले असून राज्य सरकारने 25 कोटीचे बजेट केलेले आहे. आणि हे पैसे आपण निश्चितपणे त्यासाठी देणार आहोत. तसेच कॅपलॅबचे जे काम आहे तेही या योजनेतून होईल आणि आपल्याकडे जी 300 पदे रिक्त आहेत ती बदली कामगारांच्या माध्यमातून भरणार आहोत.

सभापती महोदय, पर्यटन विभागासंबंधात बोलताना आपण चिखलदरा पर्यटन क्षेत्राबद्दल मुद्दा उपस्थित केला. त्याबद्दल मी आपल्याला सांगू इच्छिते की, चिखलदरा येथे एकूण 3 रिसॉर्टस् आहेत, वाहनतळ आहे आणि एकूण 81 लाख रूपयांचा रोप-वे मंजूर झाला आहे. केंद्र सरकारच्या सर्किट डेव्हलपमेंट योजनेंतर्गत पर्यटनाचा त्यात समावेश आहे. सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण व पर्यटन विभागाच्या सर्व मागण्या आपण मंजूर कराव्यात अशी मी आपल्याला विनंती करते.

***

..... 4यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, माझ्याकडील जलसंपदा विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी उभा आहे. या चर्चेमध्ये भाग घेताना विरोधी पक्षनेता सन्माननीय श्री.फुंडकर यांनी सांगितले की, विदर्भामध्ये काही कामे देताना ती जोडून दिली जातात. मी आपल्याला सांगू इच्छितो की, 2007 पासून कामे जोडून देण्याचे बंद केले असून त्यापूर्वीची ही कामे कदाचित असतील. तरी त्याबाबत माहिती घेऊन त्यासंबंधात निश्चितपणे कारवाई केली जाईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.तेली यांनी कोकणातील 90 प्रकल्पांची कामे अपूर्ण असल्याची माहिती दिली. त्याबाबत देखील राज्य सरकार निश्चितपणे विचार करील. तसेच सन्माननीय सदस्य श्री.नवले यांनी उपोर प्रकल्पाच्या कामाच्या संदर्भात काम चालू नाही असे सांगितले. याही कामाच्या बाबतीत राज्य सरकार ही बाब तपासून निश्चितपणे कारवाई करील इतकेच मी या निमित्ताने आपल्याला सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्या ॲड.दराडे यांनी गोदावरीचे पाणी माजलगावल धरणात सोडण्याची मागणी केली आहे. त्याबद्दल देखील विचार राज्य सरकार करील. सन्माननीय सदस्या डॉ.गोऱ्हे यांनी सांगितले की, कोयना धरण परिसरामध्ये भूकंप मापन यंत्रणा बसविली आहे पण ती सारी यंत्रणा सध्या चालू नाही. पण मी आपल्याला सांगू इच्छितो की, सर्व यंत्रणा कार्यरत आहे. ...

( यानंतर श्री. सरफरे .... 4व्ही 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार..

भूकंप झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी सत्वर धरणाची पहाणी केली असून ते पूर्णत: सुरक्षित आहे. तेव्हा जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 114 ते 123 पर्यंतच्या योजनेतर 100 कोटींच्या व योजनेंतर्गत 638 कोटी 98 लाख रुपयांच्या एकूण 13 पूरक मागण्या सभागृहाने संमत कराव्यात अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे ऊर्जा विभागाच्या बाब क्रमांक 146 व 147 या दोन पूरक मागण्या सभागृहाने संमत कराव्यात अशी विनंती करतो.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या बाब क्रमांक 77 ते 85 पर्यंतच्या 9 पूरक मागण्या सभागृहाने संमत कराव्यात अशी विनंती करतो. तसेच, नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 178 ते 210 पर्यंतच्या 34 पूरक मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री.रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, ग्राम विकास विभागाच्या पूरक मागण्यांवरील चर्चेमध्ये माननीय सदस्या सर्वश्रीमती मंदाताई म्हात्रे डॉ. नीलमताई गोऱ्हे, माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी भाग घेऊन काही महत्वाच्या सूचना केल्या आहेत. त्या सूचनांच्या बाबतीत हा विभाग निश्चितपणे लक्ष घालून कार्यवाही करील. म्हणून मी सभागृहाला विनंती करतो की, ग्राम विकास विभागाच्या बाब क्रमांक 152 ते 160 व फलोत्पादन विभागाच्या बाब क्रमांक 55 व 56 या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2009-10 च्या पूरक मागण्यांवर चर्चा करतांना कृषी जलसंधारण, विमुक्त जाती भटक्या जमाती, परिवहन या विभागाच्या मागण्यांवर माननीय सदस्य श्री. सुरेश नवले, माननीय सदस्या ॲड. उषा दराडे, माननीय सदस्य सर्वश्री सुभाष चव्हाण, अरविंद सावंत, रामनाथ मोते, पांडुरंग फुंडकर, राजन तेली, माननीय सदस्या सर्वश्रीमती मंदाताई म्हात्रे, अलका देसाई यांनी भाग घेऊन आपले विचार व्यक्त केले.

माननीय सदस्य श्री. सुरेश नवले यांनी सूचना केल्याप्रमाणे राज्यामध्ये ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी दोन आश्रमशाळा कार्यान्वित आहेत आणखी आश्रमशाळा सुरु करण्याची मागणी केली आहे. तथापि 31.5.2006 पासून नवीन आश्रमशाळांना मंजूरी न देण्याचे शासनाचे धोरण असल्यामुळे नवीन आश्रमशाळांना मान्यता देण्यात येणार नाही. सभापती महोदय, माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी 31.5.2006 च्या जी.आर. नुसार नवीन आश्रमशाळा न देण्याचे धोरण असल्यामुळे त्याबाबतीतचा जी.आर. रद्द करण्याची मागणी केली असून त्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

माननीय सदय श्री. रामनाथ मोते यांनी कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करावा अशी मागणी केली आहे. कृषी विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केला आहे. त्यामुळे शिक्षकांनासुध्दा सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. त्याचप्रमाणे माननीय ॲड. उषाताईंनी कृषी विभागासाठी मोठया प्रमाणात तरतूद करावी. ओ.बी.सी., व्ही.जे.एन.टी. या प्रवर्गातील मान्य असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात यावी अशी सूचना केली आहे. या सूचनेचा सहानुभूतीपूर्वक विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, इयत्ता बारावी नंतर कृषी विद्यापीठामध्ये शेतक-यांच्या मुलांना प्राधान्याने प्रवेश देण्यात येतो. त्यामुळे माननीय सदस्यांनी कृषी शिक्षणाचा समावेश शालेय शिक्षणामध्ये करण्याबाबत सूचना केली आहे. सदरची बाब शालेय शिक्षण विभागाशी संबंधित आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी पीक विमा उतरविणे व विशेष कार्यक्रमांतर्गत आर्थिक निकष बदलून आर्थिक मदतीमध्ये वाढ करुन कृषी विद्यापीठातील आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांची फी माफ करणे यासंबंधी सूचना केली आहे. माननीय सदस्यांच्या या मागणीचा विचार करण्यात येत आहे. सभापती महोदय, राज्यामध्ये मोठया प्रमाणात



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर..

के.टी.वेअरच्या साईट्स उपलब्ध असून त्यांचे सर्व्हेक्षण करुन मोठया प्रमाणात के.टी.वेअर बांधण्यात यावेत जेणेकरुन सिंचन क्षमता वाढेल अशी सूचना करण्यात आली आहे सन्माननीय सदस्यांची सूचना योग्य असून त्यांच्या मागणीचा विचार करण्यात येईल. माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी बाब क्रमांक 159 अन्वये विदर्भ मराठवाडा पाणलोट मिशनच्या धर्तीवर कोकण पाणलोट विकास मिशन स्थापन करण्यात यावे अशी सूचना केली आहे. सदर मिशनची स्थापना दिनांक 6.2.2008 च्या शासन निर्णयाव्दारे करण्यात आली आहे. यामध्ये कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयातील अंदाजित 20 ते 25 हजार हेक्टर क्षेत्र विकसित करण्यात येणार आहे. सभापती महोदय, अशाप्रकारे कृषी, परिवहन,. भटक्या व विमुक्त जाती विभागाच्या मागण्या मान्य करण्यात याव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ SST पूर्वी श्री.सरफरे . . . . 19:30

श्री.हर्षवधन पाटील (सहकार व पणन मंत्री) : सभापती महोदय, मी सहकार व पणन विभागाच्या पुरवणी मागण्यांच्या संबंधात कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी सूचना न केल्याबद्दल सर्वांचे आभार मानतो आणि या विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करतो.

**उपसभापती** : सन 2009-2010 च्या खर्चाच्या पूरक विवरण पत्रावरील चर्चा आता संपली आहे.

यानंतर आज केवळ एक विधेयक चर्चेसाठी घेण्यात येईल.

----

. . . .4डब्ल्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: आरोग्य विज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक

**L. C. BILL NO. XI OF 2009**

( A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES ACT, 1998.)

प्रा.वर्षा गायकवाड (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन सन 2009 चे वि.प.वि.क्र.11 **-** महाराष्ट्र आरोग्य विद्यान विद्यापीठ अधिनियम, 1998 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न प्रस्तुत झाला.

.. . .4 डब्ल्यू-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ 1998 यामध्ये काही सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे. वास्तविक पाहता माननीय मंत्री महोदयांनी सुरुवातीला या बिलामधील उद्देश व कारणे सांगणे अत्यंत आवश्यक होते. पण त्यांनी तसे सांगितलेले नाही याबद्दल मी सर्वप्रथम खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कलम 14 मध्ये सुधारणा सुचविलेली आहे. कुलगुरुंच्या नियुक्तीच्या बाबतीतील तरतूद आहे. आपण जर पाहिले तर कोणत्याही विद्यापीठाचा कुलगुरु असला तरी त्याला दुर्दैवाने एक अमर्याद सत्ता आणि अधिकार दिलेले आहेत. त्याच्यावर कोणाचाही कंट्रोल नाही. अगदी मंत्रिमंडळातील त्या संबंधित विभागाच्या मंत्र्यांचा कंट्रोल नसतो किंवा राज्यमंत्र्यांचा नसतोच नसतो. हे कुलगुरु आपल्या मनाप्रमाणे काम करीत असतात.आपण असे म्हटलेले आहे की, "जो विद्यापीठाचा मुख्य कार्यकारी व विद्याविषयक अधिकारी आणि व्यवस्थापन परीक्षक, विद्या परीक्षा मंडळ, वित्त समिती व ग्रंथालय समिती याचा पदसिध्द अध्यक्ष आहे." अशा प्रकारे त्यांना घटनेप्रमाणे एवढा मोठा स्कोप दिलेला आहे हे मी मान्य करतो. पण ज्यावेळी एखादा प्रश्न निर्माण होतो किंवा ज्यावेळी एखादी गोष्ट करावयाची असते त्यावेळी या विद्यापीठांच्या कुलगुरुंना जे काही अधिकार दिलेले आहेत, त्यामुळे ते स्वत: ऑटोनॉमस समजतात. अशा वेळी त्यांच्यावर कोणाचाही कंट्रोल नाही. मुंबई विद्यापीठ ऑटोनॉमस असेल, शिवाजी विद्यापीठ ऑटोनॉमस असेल तसे आरोग्य विज्ञान विद्यापीठ देखील ऑटोनॉमस आहे. पण ज्यावेळी एखादा प्रश्न निर्माण होतो, जेव्हा एखादा मंत्री काही सांगतो, याबाबतीत मी थोडक्यात एक उदाहरण देतो.ज्यावेळी एम.डी.मायक्रो बॉयॉलॉजीचा निर्णय झाला, त्यावेळी 6 मुले नापास झाली आणि 4 मुले पास झाली. ही सगळी सहाही मुले मुंबईमधील सायन, नायर,जे.जे.या वैद्यकीय कॉलेजमधील होती.

**सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)**

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, ही मुले नापास कां झाली. कारण तो सायन वैद्यकीय महाविद्यालयाचा विद्यार्थी होता म्हणून जे.जे. वैद्यकीय महाविद्यालयाने त्याला नापास केले. जे.जे. वैद्यकीय महाविद्यालयाचा विद्यार्थी होता म्हणून के.ई.एम. वैद्यकीय महाविद्यालयाने त्याला नापास केला. सभापती महोदय, वास्तविक पहाता यथे शिकणारी ही सर्व मुले मेरीटची मुले असतात. त्याशिवाय त्यांना के.ई.एम.ला ॲडमिशन मिळत नाही. जे.जे.ला ॲडमिशन मिळत नाही, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. पण दुर्दैवाने ही मुले नापास झाली. ज्यावेळी ही मुले अशा प्रकारचे निवेदन घेऊन माझ्याकडे आले. त्यावेळचे तत्कालीन मंत्री महोदय, श्री. राजेश टोपे यांच्याकडे मी त्यांना पाठविले. आणि त्यांना सांगितले की, टोपे साहेब ही दहाच मुले आहेत. दहा पैकी सहा मुले नापास झालेली आहेत आणि चार मुले पास झालेली आहेत. ही चारही मुले ग्रामीण भागातील आहेत. म्हणजे मुंबईतील विद्यार्थी नापास होतो आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी पास होतो. हे सर्व चित्र बघितल्यानंतर श्री. राजेश टोपेसाहेबांना देखील थोडी चिंता वाटली म्हणून त्यांनी कुलगुरुंना फोन केला आणि कुलगुरुंना सांगितले की, आपल्याकडे री-ॲसेसमेंटची पध्दत नाही. पण तरी देखील एक "विशेष बाब" म्हणून यांचे री-व्हॅल्यूएशन करावे. श्री. गगराणी साहेबांना देखील याबाबतीत सांगण्यात आले. पण कुलगुरुंनी मंत्रिमहोदयांना काहीही सांगितले नाही, मला काहीही सांगितले नाही आणि त्या सरळ लंडनच्या दौऱ्यावर निघून गेल्या. रीझल्ट लागल्यानंतर जवळ जवळ दीड महिना त्या दौऱ्यावरुन परत आल्या नाहीत. मी स्वत: तीन वेळा त्यांना भेटलो. स्वत: श्री. टोपे साहेबांनी त्यांना तीन-चार वेळा फोन केले. सर्व रजिस्टारनी संगितले की, हे काम आपल्याला करावयाचे आहे आणि परीक्षा मंडळाला अशा प्रकारचे री-व्हॅल्यूएशन करण्याचा अधिकार आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी देखील सांगितले होते की, तुम्ही री-ॲसेसमेंट करा, रीव्हॅल्यूएशन करा आणि ही मुले नापास असतील तर नापास म्हणून निर्णय द्या आणि पास असतील तर पास म्हणून निर्णय द्या. पण कुलगुरुंनी ऐकले नाही. शेवटी या मुलांच्या आयुष्यावर याचा फार मोठा परिणाम झाला. नापासचा रिझल्ट असल्यामुळे या मुलांच्या मुलाखतीच्या तारखा निघून गेल्या आणि त्यांना एक वर्षे घरी बसून काढावे लागले. अजूनही रिझल्ट मिळाला की नाही याची मला माहिती नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी याबाबतची माहिती घ्यावी. पण अशा प्रकारचा मनमानी कारभार मग तो कोणाच्या नियुक्तीचा असो अथवा खर्चाची बाब असो जसा सिनेटमध्ये होतो, विद्यापीठात होतो,तशा प्रकारचा कारभार

...2..

याठिकाणी चाललेला आहे. सभापती महोदय, यावर कोणाचा तरी कंट्रोल असण्याची आवश्यकता आहे. जर आमच्यावर ब्युरॉक्रसी राज्य करणार असेल तर आम्ही लोकप्रतिनिधी असून काय उपायोग? हा प्रश्न मला या ठिकाणी शासनाला विचारावासा वाटतो. आपल्याला देखील लोकांनी निवडून दिलेले आहे. त्यामुळे लोक त्यांचे प्रश्न घेऊन आपल्याकडेच येणार, त्यांच्याकडे जाणार नाहीत. त्यामुळे माझे असे मत आहे की, ज्यावेळी अशा प्रकारचा कायदा करण्यात येतो किंवा ज्यावेळी शिक्षणाचा स्तर उंचावण्याच्या गोष्टी करण्यात येतात, दर्जेदार संशोधन करण्याच्या गोष्टी करण्यात येतात  किंवा त्यावेळी या खात्याचे मंत्री किंवा लोकप्रतिनिधी अशा प्रकारचे सूचवितात त्यावेळी यावर कंट्रोल आणण्यासाठी कोणता तरी कायदा अंतर्भुत करणे आवश्यक आहे. त्यांच्यावर कुठल्याही व्यक्तीचा कंट्रोल नको, कुठल्याही पक्षाचा कंट्रोल नको, पण शासनाचा कंट्रोल असणे आवश्यक आहे. ही परिस्थिती आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या बाबतीतच नाही तर सर्व विद्यापीठाच्या बाबतीत आहे. मुंबई विद्यापीठाच्या बाबतीत देखील हेच चालू आहे. आज मुंबई विद्यापीठाची काय परिस्थिती आहे?एस.एन.डी.टी.च्या प्रभारी महिला कुलगुरु काय करीत आहेत हे आपण सर्वजण वर्तमानपत्रात वाचतो. तीच परिस्थिती आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या बाबतीत आहे.त्या सिनेटवर मी असल्यामुळे मला याबाबतीत चांगली माहिती आहे. शासनाचे अधिकारी यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करीत नाहीत किंवा कार्यवाही देखील करीत नाहीत.

सभापती महोदय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा कुलगुरु म्हणून नियुक्त करण्यासाठी कुलपतींच्या विचारार्थ उचित नावाची शिफारस करण्यासाठी लवकरच प्रक्रिया सुरु होणार आहे म्हणून उक्त अधिनियमात तात्काळ सुधारणा करणे ईस्ट वाटते. यासंबंधीचा अध्यादेश काढलेला आहे आता फक्त त्याचे कायद्यात रुपांतर करावयाचे आहे. पण त्यावेळी असा एक कायदा आणावा की, सरकारचा वचक या कुलगुरुंवर असेल आणि सरकारला शासन म्हणून काही तरी "Say" असेल की, अशा एखाद्या विपरीत परिस्थितीमध्ये विशेष बाब म्हणून शासन हस्तक्षेप करु शकेल. दुसरी बाब अशी की, सेवाज्येष्ठता लक्षात घेण्यात यावी. जे ज्येष्ठ आहेत त्यांना घेण्यात यावे  त्यासाठी कुठल्याही प्रकारचा वशिला लावण्यात येऊ नये. आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरुचे पद हे फार मोठे पद आहे. जे कोणी Hierarchy मध्ये श्रेष्ठ असतील, त्यांचा अनुभव

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

जास्त असेल, ज्याची योग्यता असेल अशाच व्यक्तीला नेमण्यात यावे. शक्यतो या महाराष्ट्रामध्ये प्रत्येक विद्यापीठाचा कुलगुरु मग तो आरोग्य विज्ञानपीठाचा असेल किंवा मुंबई विद्यापीठाचा असेल तो मराठीच असला पाहिजे अशा प्रकारची पावले उचलण्यात यावीत आणि याबाबतीत शासनाकडून सकारात्मक उत्तराची मी अपेक्षा व्यकत करतो.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत.....

मी हे ठासून सांगतो आणि तशा प्रकारे शासनाने पावले उचलावीत अशी मी सूचना करतो. आपल्याकडून पॉझिटिव्ह उत्तराची अपेक्षा आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड ( वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या ठिकाणी मौलिक विचार मांडलेले आहेत आणि चांगले मार्गदर्शन केलेले आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे शिक्षणाचा स्तर उंचावणे तसेच दर्जेदार संशोधनामध्ये सुनिश्चिती करणे त्याचबरोबर समाजाच्या ज्या गरजा आहेत त्या दृष्टीकोतून हे विधेयक आणलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हा कायदा आणण्यामागचे सर्वात महत्वाचे कारण योग्य व्यक्ती या पदावर आली पाहिजे हे आहे. सन्माननीय सदस्यांनी अपेक्षा व्यक्त केली की, या पदावर योग्य व्यक्ती आली पाहिजे, यामध्ये पारदर्शकता आली पाहिजे, ही प्रोसेस होत असताना कोणाचाही वशिला असता कामा नये. हाच विचार करुन कुलगुरु निवडीची कार्यपध्दती विहित करण्यासाठी हा कायदा आणलेला आहे. या कायद्याच्या अंतर्गत आपण कुलगुरु निवडीची प्रक्रिया करणार आहोत. कुलगुरु पदावर निवड करावयाच्या व्यक्तीच्या पातत्रेबाबत सध्या जरी शर्ती नसल्या तरी जी प्रोसेस होणार आहे त्यामध्ये शोध कमिटीच्या प्रोसेसमध्ये जे काम करणारे आहेत त्या शोध कमिटीची प्रोसेस कशी असावी यासाठी हे बिल आलेले आहे. यामध्ये सन्माननीय सदस्यांनी जशी अपेक्षा केली त्याप्रमाणे आपण बघितले तर पूर्वी 6 सदस्यांची शोध कमिटी होती आता ती तीन सदस्यांची केलेली आहे. त्या तीन सदस्यांमध्ये एक सदस्य हे माननीय राज्यपालांव्दारे नामनिर्देशित सदस्य आहेत. तो सर्वोच्च न्यायालयाचा निवृत्त न्यायाधीश किंवा उच्च न्यायालयाचा निवृत्त मुख्य न्यायाधीश किंवा तो वैद्यकीय शिक्षणामधील पद्मभूषण असेल किंवा जो संशोधक असेल, उच्चशिक्षित असेल, अशाच व्यक्तीला आपण या पदावर घेतलेले जाईल. तो या समितीचा अध्यक्ष असेल. इतर जे दोन सदस्य असणार आहेत त्यामध्ये वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव असतील आणि तिसरा सदस्य हा ॲकॅडमिक कौन्सिल आणि मॅनेजमेंट कौन्सिलचा संयुक्तिक असा असणार आहे. ही समिती आपण सहावरुन तीन सदस्यांची केलेली आहे. त्याचे कारण असे आहे की, कुलगुरु निवडीची कार्यपध्दती पारदर्शक व्हावी. हे करीत असताना काही निकष दिलेले आहेत. एक बाब अशी सांगितलेली आहे की, राज्यपालांव्दारे नामनिर्देशित केलेला सदस्य या समितीचा अध्यक्ष असेल. त्यांची बैठक एकट्याच्या उपस्थितीने होणार नाही. बैठकीसाठी तीनही सदस्यांनी उपस्थित असले पाहिजे आणि त्यांच्यामध्ये ती बैठक होणार आहे. कुलगुरुचे पद जेव्हा रिक्त असेल तेव्हा त्याची मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी व्हावयास पाहिजे. खूप लोकांनी यासाठी अर्ज केले पाहिजेत. ते

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

प्रा. वर्षा गायकवाड ....

करताना आपण असे सांगितले आहे की, पंधरा दिवसांपूर्वी आपण पब्लिसिटी केली पाहिजे. याच्या व्यतिरिक्त हे बिल आपण व्यवस्थित वाचले असेल तर या बिलामध्ये असे सांगितले आहे की, त्या पदावर असलेला व्यक्ती हा विव्दान तर असावाच त्याचबरोबर तो उत्तम प्रशासक सुध्दा असला पाहिजे. याच्या व्यतिरिक्त आपण त्यांचा जो बायोडाटा घेऊ तो व्यवस्थित क्रमाने लावल्यानंतर त्याचा जो ब्रिफ आणि डिस्क्राईब्ड असा रेझ्युमे असेल तो व्यवस्थित लावला पाहिजे. त्यामध्ये आपण त्या समितीच्या प्रिफरंसनुसार एक, दोन, तीन, चार असे क्रमांक देणार नाही. छाननीनंतर ज्या पाच कुलगुरुंची फाईल तयार करणार आहोत ती अल्फाबेटीक ऑर्डरने करणार आहोत. म्हणजे ही प्रोसेस पूर्णत: पारदर्शक होणार आहे. यामध्ये जी व्यक्ती कुलगुरु म्हणून नियुक्त होणार आहे ती त्याच लेव्हलची असणार आहे. यासाठी आपण ही निवड समिती केलेली आहे. जेणेकरुन जेव्हा ते लोक जातील तेव्हा एक वेगळे असे पारदर्शक व्यक्तिमत्व आणतील. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जे मौलिक विचार व्यक्त केलेले आहेत त्याबाबत आम्ही निश्चितपणे विचार करु. सन्माननीय सदस्यांनी या बिलाला सहकार्य द्यावे अशी माझी अपेक्षा आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी माझ्या मूळ प्रश्नाला पूर्णपणे बगल दिलेली आहे. माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही. माझा मूळ प्रश्न असा होता की, आपण हे बिल कुलगुरुंची निवड करण्याच्या संदर्भात आणले आहे पण शासनाचा त्यांच्यावर काही कंट्रोल राहणार की नाही ? याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी काहीही सांगितलेले नाही.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत मी सांगितले की, हे बिल फक्त कुलगुरुंच्या निवड प्रक्रियेबद्दल आहे. पण आपण जो मुद्दा सांगितलेला आहे त्याबाबत आम्ही निश्चितपणे विचार करु आणि त्याबाबत पुढे काही तरी कार्यवाही करण्याचा विचार करु. सभागृहाने हे विधेयक संमत करावे अशी मी विनंती करते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

...4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि.प.वि.क्र.11 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक 11 संमत झाले आहे.

-----

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :बीड जिल्हा उद्योग केंद्राच्या इमारतीला भेगा पडल्यामुळे निर्माण झालेला धोका

**मु. शी.** :बीड जिल्हा उद्योग केंद्राच्या इमारतीला भेगा पडल्यामुळे निर्माण झालेला धोका यासंबंधी ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

ॲड.उषा दराडे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

" बीड जिल्हयातील जिल्हा उद्योग केंद्राच्या इमारतीस मोठया प्रमाणात भेगा पडल्यामुळे इमारत केव्हाही पडण्याची स्थिती निर्माण होणे, सदर जिल्हा उद्योग केंद्रातील अधिकारी कार्यालयात उपस्थित न राहणे, गत वर्षापासून उद्योग केंद्रात कचऱ्याचे ढीग मोठया प्रमाणात पडून राहणे, सबब याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

सभापती महोदय, बीड जिल्हयातील जिल्हा उद्योग केंद्राच्या इमारतीला मोठया प्रमाणात भेगा पडलेल्या आहेत. त्यामुळे ही इमारत केव्हाही पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सदरहू जिल्हा उद्योग केंद्रातील अधिकारी उपस्थित रहात नाहीत, तसेच गतवर्षापासून या उद्योग केंद्रात कचऱ्याचे ढीग पडून राहिले आहेत. सभापती महोदय, बीड जिल्हा मागासलेला जिल्हा आहे. जिल्हा उद्योग केंद्राच्या वाईट स्थितीमुळे केंद्रामार्फत राबविल्या जाणाऱ्या सर्व योजना खोळंबून गेल्या आहेत. त्यामुळे मी शासनाला विनंती करते की, शासनाने जिल्हा उद्योग केंद्राच्या नवीन इमारतीसाठी तातडीने तरतूद करावी आणि आमच्या बीड जिल्हयाच्या उद्योग केंद्राचा प्रश्न मार्गी लावावा अशी मी शासनाला विनंती करते आणि माझे भाषण संपविते.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा ( उद्योग मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. बीड जिल्हयाचे महाव्यवस्थापक आहेत त्यांचा अतिरिक्त कार्यभार नागपूरच्या महाव्यवस्थापकांकडे आहे. एक महाव्यवस्थापकाचे पद सोडले तर 17 पदे भरलेली आहेत. त्याचप्रमाणे उद्योग निरीक्षकांची पदे किंवा दोन व्यवस्थापकांची पदे मंजूर आहेत ती भरलेली आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, जिल्हा उद्योग केंद्रात अधिकारी उपलब्ध नसतात. परंतु वस्तुस्थिती तशी नाही. त्या जिल्हा उद्योग केंद्रामध्ये येणाऱ्या सुशिक्षित बेरोजगारांना मदत करण्यासाठी स्वतंत्र कक्ष आहे. त्याठिकाणी उद्योग निरीक्षक नेहमी उपलब्ध असतात. जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी कार्यालय नसल्यामुळे उद्योग निरीक्षकांना इतर ठिकाणी जावे लागते. त्यामुळे कर्मचारी उपलब्ध नाहीत असे त्यांचे मत झाले असावे. परंतु हे अधिकारी व कर्मचारी आठवडयाच्या प्रत्येक सोमवारी उपस्थित असतात. गेल्या वर्षभराचा हिशेब केला तर या उद्योग केंद्रातून अनेक चांगली कामे झालेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी एक महत्वपूर्ण विषय या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केला आहे. तेथील उद्योग केंद्राच्या इमारतीला भेगा पडलेल्या आहेत, त्याठिकाणी कचरा साचलेला असल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. सभापती महोदय, ही इमारत बाजारपेठेमध्ये आहे. तसेच मध्यवर्ती बस स्थानकाला लागून आहे. त्यामुळे त्या परिसरामध्ये किरकोळ भाजी विक्रेते कचरा सोडून जातात. त्यामुळे त्या इमारतीमध्ये स्वच्छता रहात नाही. यासंबंधी नगरपालिकेला वेळोवेळी कळविले आहे. या इमारतीला भेगा पडलेल्या आहेत ही गोष्ट खरी आहे. या जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना 1982 साली झाली. महाराष्ट्रात सगळयाच ठिकाणी 27 वर्षांपासून उद्योग केंद्रांच्या इमारतीच्या देखभालीसाठी निधी उपलब्ध झाला नाही. परंतु सन 2009-10 या वर्षासाठी शासनाने प्रादेशिक कार्यालये व जिल्हा उद्योग केंद्रांच्या दुरुस्तीसाठी 1 कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. त्यामुळे बीड जिल्हा उद्योग केंद्राच्या दुरुस्तीसाठी मी 15 लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन देतो. सभापती महोदय, शासनाने सर्व जिल्हयांमध्ये उद्योग भवन निर्माण करण्याचे ठरविलेले आहे. या उद्योग भवनाच्या माध्यमातून उद्योगासंबंधी जेवढी कार्यालये येतात, मग लेबर

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

श्री.राजेंद्र दर्डा....

असो, पर्यावरण असो, कारखाना निरीक्षक असो हे सर्व विभाग या उद्योग भवनामध्ये आणण्याचे ठरविले आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे बीड जिल्हा उद्योग केंद्रासाठी शासन निधी उपलब्ध करुन देत आहे, त्यामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधान होईल असे वाटते. सन्माननीय सदस्यांनी जिल्हा उद्योग केंद्रास न्याय मिळवून दिला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

**तालिका सभापती ( श्री.अरविंद सावंत )** : मंत्रिमहोदय, संपूर्ण राज्यातील जिल्हा उद्योग केंद्रांच्या दुरुस्तीसाठी 1 कोटी रुपये मंजूर केले आहेत. परंतु सर्व जिल्हा उद्योग केंद्रांची अवस्था अतिशय वाईट झालेली आहे.

यानंतर श्री.शिगम

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा : उद्योग भवनाचे काम सर्व ठिकाणी करीत असल्यामुळे कारण नसताना दुरुस्तीवर जास्त खर्च होऊ नये याकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

---

.......2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शिक्षकेत्तरांसाठी कालबध्द पदोन्नती लागू करण्याची आवश्यकता

**मु.शी.**: उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शिक्षकेत्तरांसाठी कालबध्द पदोन्नती लागू करण्याची आवश्यकता यासंबंधी श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"शालेय शिक्षण विभागाप्रमाणे तंत्र माध्यमिक शाळा तसेच द्विस्तरावरील व द्विलक्षी किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमातील शिक्षक शिक्षकेत्तरांना 1981ची नियमावली लागू असणे, शालेय शिक्षण विभागाने शिक्षकेतरांना कालबध्द पदोन्नती योजना दिनांक 23 जुलै 1998च्या शासन निर्णयानुसार माहे ऑक्टोबर, 1994 पासून लागू केलेली असणे, तथापि, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सदर योजना सन 2004 पासून लागू करुन शिक्षकेत्तर कर्मचा-यांवर अन्याय होत असणे, सबब त्यांच्यामध्ये भेदभाव निर्माण झालेला असणे, शिक्षकेत्तर कर्मचा-यांना माहे ऑक्टोबर, 1994 पासून उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शिक्षकेत्तरांसाठी कालबद्ध पदोन्नती लागू करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजा."

राज्यातील अशासकीय तंत्र माध्यमिक शाळा आहेत त्याच बरोबर प्लस टू स्तरावरील अशासकीय अनुदानित व द्विलक्षी व किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रमातील जे शिक्षकेत्तर कर्मचारी आहेत त्यांच्या कालबद्ध पदोन्नती संदर्भातील हा विषय मी येथे उपस्थित करीत आहे. राज्यातील माध्यमिक शाळांसाठी प्लस टू स्तरावरील कर्मचा-यांसाठी किंवा एमसीव्हीसीच्या कर्मचा-यांसाठी राज्य शासनाने 1981ची नियमावली लागू केलेली आहे. या 1981च्या नियमावलीमध्ये ज्याप्रमाणे खाजगी शाळांमधील प्राथमिक शिक्षक येतात, माध्यमिक शिक्षक येतात,उच्च माध्यमिक शिक्षक येतात त्याचप्रमाणे या तंत्र माध्यमिक शाळांमधील शिक्षक, एमसीव्हीसीचे शिक्षक, प्लस टू स्तरावरचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी येतात. या सर्वांना 1981ची नियमावली लागू आहे. राज्य शासनाने शिक्षकांसाठी त्रिस्तरीय वेतनश्रेणी आणली. ज्यांना

..3..



MSS/ ST/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 19:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते....

पदोन्नतीची संधी मिळत नाही. पण पदोन्नतीसाठी जे पात्र आहेत अशा शिक्षकांसाठी राज्य शासनाने 12 वर्षानंतर वरिष्ठ वेतनश्रेणी आणि 24 वर्षानंतर निवडश्रेणी लागू केली आहे. हाच विषय शिक्षकेतर कर्मचा-यांच्या संदर्भात देखील निर्माण झाला. म्हणून ज्या शिक्षकेतर कर्मचा-यांना पदोन्नतीची संधीच उपलब्ध होऊ शकत नाही किंवा त्यांना पदोन्नतीची संधी मिळत नाही अशा शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी सुध्दा राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने एक योजना आणली. ती योजना राज्य सरकारी कर्मचा-यांसाठी लागू आहे. या राज्य सरकारी कर्मचा-यांच्या धर्तीवरच कालबध्द पदोन्नतीची योजना शालेय शिक्षण विभागातील शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी लागू झाली. त्यासंदर्भातील आदेश निघाला. माध्यमिक शाळामध्ये किंवा उच्च माध्यमिक शाळांमध्ये काम करणारे जे शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांना 1998 पासून कालबध्द पदोन्नती लागू झालेली आहे. या संदर्भातील आदेश 23 जुलै 1998ला निघाला आणि त्याचा फायदा ऑक्टोबर 1994 पासून देण्यात आला. राज्य शासनाच्या धोरणाप्रमाणे त्या त्या विभागाचा वेगळा जी.आर. काढावा लागतो. शालेय शिक्षण विभागाचा वेगळा जी.आर असतो, जरी 1988च्या नियमावलीत येत असले तरी सुध्दा तंत्र शिक्षण विभागाचा वेगळा जी. आर. असतो. आश्रमशाळेसाठी आदिवासी विभागाचा जी.आर. निघावा लागतो. नगरपालिकांच्या शाळांसाठी नगरविकास विभागाचा जी.आर. निघावा लागतो. असे हे वेगवेगळे जी.आर. निघतात. शालेय शिक्षण विभागाचा जी.आर. 1998ला काढण्यात आला. ऑक्टोबर 1994 पासून कालबध्द पदोन्नती पूर्वलक्षीप्रभावाने लागू झाली. आता तंत्र माध्यमिक शाळा, एमसीव्हीसी आणि प्लस टू स्तरावर काम करणा-या शिक्षकेतर कर्मचारी यांचा विषय शिल्लक राहिला. त्यांच्यासाठी शासनाने जी.आर. काढला. हा जी.आर. 12 जुलै 2004ला काढण्यात आला आणि तो जून 2004 पासून लागू करण्यात आला. एकाच शाळेमध्ये तंत्र शिक्षण विभाग आहे आणि शालेय शिक्षण विभाग देखील आहे. शालेय शिक्षण विभागातील कर्मचारी 1994 पासून पदोन्नती घेतो आणि तंत्र शिक्षण विभागामध्ये काम करणारा शिक्षकेत्तर कर्मचा-याला त्याचा लाभ 2004 पासून मिळतो. हे डिस्क्रीमिनेशन आहे. शासनाला अशा प्रकारे एकाच ठिकाणी काम करणा-या दोन कर्मचा-यांमध्ये भेदभाव निर्माण करता येणार नाही. या सभागृहामध्ये अनेक वेळा हा विषय उपस्थित करण्यात आला. अनेक वेळा चर्चा झाली. पत्रव्यवहार झाला. शासन मान्य करायला

..4..



(श्री. रामनाथ मोते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तयार नाही. आम्ही जर न्यायालयात गेलो तर आम्हाला पटकन न्याय मिळेल. परंतु आम्ही न्यायालयात जाऊ इच्छित नाही. आम्ही शासनाला विनंती करीत आहोत की, या तंत्र विभागातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांवर आपण अन्याय केलेला आहे, डिस्क्रिमिनेशन केलेले आहे, भेदभाव निर्माण केलेला आहे.....

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ..........

हा जो जी.आर.काढला आहे तो बदलण्यात यावा आणि शालेय शिक्षण विभागाप्रमाणेच यांना पूर्वलक्षी प्रभावाने ऑक्टोबर, 1994 पासून लागू करावा अशा प्रकारची आमची सरळ आणि सोपी मागणी आहे. शासनाने ती नक्की मान्य करावी अशी विनंती आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड (उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी जी माहिती सभागृहाला दिली ती पूर्णत: खरी आहे. शासन सेवेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना 12 वर्षानंतर कालबध्द पदोन्नती दिली जाते व त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू केली जाते. शालेय शिक्षण विभागातील एकाच शाळेमध्ये सेवेत असलेल्या शिक्षकी कर्मचाऱ्यांना पदोन्नती देत असताना ती 1994 पासून दिली जाते व तंत्रशिक्षण शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना 2004 पासून दिली जाते. या संदर्भात वस्तुस्थिती अशी आहे की, ज्या अशासकीय अनुदानित शाळा आहेत, त्यातील तंत्र माध्यमिक शाळांमध्ये पूर्व व्यावसायिक आठवी ते दहावी, द्विस्तरीय अकरावी व बारावी आणि व्होकेशनल कोर्सेसच्या अकरावी व बारावी शाळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये क व ड वर्ग आहे. क वर्गामध्ये कनिष्ट लिपिक, वरिष्ठ लिपिक, भांडार लिपिक पदे असून 'ड' वर्गामध्ये चतुर्थश्रेणी कामगार आहेत. यांची एकूण आकडेवारी माझ्याकडे उपलब्ध आहे. एकूण अशासकीय अनुदानित तंत्र माध्यमिक शाळा व कनिष्ट महाविद्यालयामध्ये 1278 पदे असून त्यामधील पूर्वप्राथमिक 225, द्विस्तरीय व द्विलक्षी 129, द्विस्तरीय उच्च माध्यमिक 924, उच्च व तंत्रशिक्षण विभागातील एकूण मंजूर पदे शिक्षकेतर 9543 आहेत. त्यामध्ये शिक्षक 5134 पदे आहेत. वर्ग 3 मधील शिक्षकेतर पदे 1075 असून वर्ग 4 ची 1334 पदे आहेत. त्यातील भरलेली पदे एकूण 9398 असून शिक्षकी पदे 7030, शिक्षकेतर वर्ग 3 ची 1003 पदे, शिक्षकेतर वर्ग 4 ची 2258 पदे आहेत. सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न मागील अधिवेशनात देखील अर्धातास चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केला होता. वारंवार अधिवेशनात या प्रश्नाबाबत चर्चा होते. मागील अधिवेशनानंतर वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला असता वित्त विभागाने असे अभिप्राय दिले की, मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार 12 जुलै, 2004 चे आदेश निर्गमित केले असल्यामुळे त्यात बदल करण्यास वित्त विभाग मान्यता देऊ शकत नाही. आम्ही वारंवार मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव नेण्याचा प्रयत्न केला आहे. सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे ती आम्हाला मान्य आहे. एकाच शाळेमधील दोन शिक्षकांवर अन्याय होता कामा नये. म्हणून या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडे एक बैठक आयोजित करु आणि हा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे कसा जाईल यासाठी प्रयत्न करु. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या दालनात बैठक लावू आणि त्यानंतर मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव नेण्यासाठी प्रयत्न करु.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.अरविंद सावंत) : मागील अधिवेशनात सन्माननीय सदस्यांनी हा विषय मांडला, त्यानंतर विभागाने प्रोसेस केल्यानंतर सुध्दा वित्त विभागाने मान्यता दिली नाही. आपण पुन्हा एकदा सांगत आहात की, माननीय मुख्यमंत्र्यांकडे बैठक घेऊ. या विषयामध्ये भेदभाव हा सरळसरळ दिसून येतो. एकाच शाळेत काम करणाऱ्या एका शिक्षकाला 1994 पासून पदोन्नतीचा लाभ मिळतो तर दुसऱ्या शिक्षकाला 2004 पासून लाभ दिला जातो हा भेदभाव आहे. या संदर्भात अधिक वेळ न दवडता कालावधी निश्चित करावा. किती महिन्यात याचा निर्णय घेतला जाईल?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदय निर्णय घेतील तो आम्ही मान्य करु. लवकरात लवकर आम्ही प्रयत्न करु असे सांगितलेच आहे.

(नंतर श्री.खर्चे...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने यह बात मान्य की है कि तांत्रिक शिक्षण संस्थाओं में काम करने वाले कर्मचारियों के साथ डिस्क्रिमिनेशन हुआ है और उनको कालबद्ध पदोन्नति सन् 1994 की बजाय सन् 2004 से दे रहे हैं. मंत्री महोदय ने शालेय शिक्षण संस्थाओं में काम करने वाले कर्मचारियों और तांत्रिक शिक्षण संस्थाओं में काम करने वाले कर्मचारियों की संख्या बताई है और प्रभावित कर्मचारियों की संख्या भी अधिक नहीं है. मेरा कहना यह है कि पदोन्नति पूर्वलक्षी प्रभाव से नहीं दे सकते हैं, इसलिए प्रभावित कर्मचारियों के लिए सन् 1994 और सन् 2004 के दरमियान प्रमोशन के हिसाब से नोशनल सीनियरिटी देकर उनका आगे का कॅरियर सुनिश्चित करना चाहिए. इस प्रकार का निर्णय शासन को लेना चाहिए.

**तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत)** : मला वाटते ही तांत्रिक बाब असल्याने यावर भाष्य करणे योग्य नाही.

श्री. रामनाथ मोते : हे डिस्क्रिमिनेशन अगदी स्पष्ट आहे. कारण एकाच शाळेतील दोन कर्मचाऱ्यांना वेगवेगळया प्रकारे जी.आर. लागू होतो, त्यांना त्याचा लाभ नाकारला जातो हे बरोबर नाही.

**तालिका सभापती** : मुळात येथे प्रमोशनचा प्रश्नच येत नाही तर केवळ एका स्केलमधून दुसरे स्केल मिळते एवढाच प्रश्न आहे.

श्रीमती वर्षा गायकवाड : महोदय, मी देखील मान्य करते की, एकाच शाळेतील दोन कर्मचाऱ्यांमध्ये फरक केला जातो. म्हणून यासंबंधीचा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांकडे सादर करण्यात येईल.

**तालिका सभापती** : लवकरात लवकर असा प्रस्ताव माननीय मुख्यमंत्र्यांकडे सादर करावा, शक्य झाले तर हे अधिवेशन संपण्यापूर्वी या कर्मचाऱ्यांना दिलासा देता येईल का ते देखील पहावे, अशी सूचना मी आपल्याला करीत आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 15 डिसेंबर, 2009 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 01 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 15 डिसेंबर, 2009 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही